
CMYK

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT

सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | गुरुवार, ३० जानेवारी २०२५ | युगाब्द ५१२५ | वर्ष ४१ वे अंक ८३ | पाने १२ | किंमत रु. ६/- | RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

विनम्र अभिवादन



महात्मा गांधी यांचा आज स्मृतिदिन.

# इथेनॉल दरवाढीला हिरवा कंदील

### केंद्रीय मंत्रिमंडळाचा निर्णय

### ऊस उत्पादकांना सरकारची भेट

◆ **नवी दिल्ली, २९ जानेवारी**

इथेनॉल मिश्रित पेट्रोल (ईबीपी) कार्यक्रमासाठी सार्वजनिक क्षेत्रातील कंपन्यांनी २०२४-२५ या वर्षासाठी इथेनॉल खरेदीच्या नव्या वाढीव दराला केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. या माध्यमातून ऊस उत्पादकांना सरकारने भेट दिली आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली बुधवारी झालेल्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत हा महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला. माहिती आणि प्रसारणमंत्री अश्विनी वैष्णव यांनी नंतर एका पत्रपरिषदेत याबाबतची माहिती दिली. १ नोव्हेंबर २०२४ ते ३१ ऑक्टोबर २०२५ या काळात पेट्रोलियम कंपन्या सुधारित दराने इथेनॉलची खरेदी करतील. सी हेवी मोलॅसिसचा भाव सध्या प्रतिलिटर ५६.५८ रुपये होता, तो आता ५७. ९७ प्रतिलिटर असा वाढवण्यात आला असल्याचे वैष्णव म्हणाले.

बी हेवी मोलॅसिसचा भाव मात्र प्रतिलिटर ६०.७३ रुपये, तर उसाचा रस, साखर आणि साखरेच्या पाकाचा दरही ६५.६१ रुपये कायम राहणार आहे. ऊस उत्पादक शेतकऱ्यांना जीएसटी तसेच वाहतुकीचा खर्च अतिरिक्त दिला जाणार आहे.

**एक लाख कोटींच्या विदेशी चलनाची बचत**

पेट्रोलमध्ये इथेनॉलचे प्रमाण वाढवण्यात आल्यामुळे १ लाख १३ हजार ७ कोटी रुपयांच्या विदेशी चलनाची बचत झाली आहे. त्याचप्रमाणे कच्च्या तेलाच्या आयातीत १९३ लाख टनाची घटही झाली असल्याचे वैष्णव यांनी सांगितले.

**इथेनॉलचे उत्पादन ७०७ कोटी लिटर**

२०१३-१४ पर्यंत देशात इथेनॉलचे उत्पादन ३८ लाख लिटर होते. २०२३-२४ पर्यंत वाढ होत ते ७०७ कोटी लिटर झाले. यामुळे पेट्रोलमध्ये सध्या १४.६० टक्के इथेनॉलचे मिश्रण वापरले जात आहे, असे वैष्णव म्हणाले.

**खनिज मिशनला मान्यता**

स्वच्छ प्रौद्योगिकीकरणाला चालना देण्यासाठी केंद्र सरकारने बुधवारी १६,३०० कोटी रुपयांच्या महत्त्वपूर्ण अशा खनिज मिशनला मान्यता दिली. राष्ट्रीयदृष्ट्या महत्त्वपूर्ण अशा या मिशनसाठी केंद्राने १६,३०० कोटी रुपयांची तरतूद केली आहे. (तभा वृत्तसेवा)

# महाकुंभस्थळी चेंगराचेंगरीत ३० ठार, ६० जखमी

मृतकांच्या कुटुंबीयांना २५ लाखांची मदत | मुख्यमंत्र्यांनी दिला न्यायालयीन चौकशीचा आदेश | त्रिसदस्यीय समिती गठित | पंतप्रधान, गृहमंत्र्यांनी घेतली माहिती

◆ **प्रयागराज, २९ जानेवारी**

**महाकुंभामध्ये मौनी अमावास्येला पवित्र स्नानासाठी येथे आलेल्या भाविकांची गर्दी झाल्याने चेंगराचेंगरी होऊन ३० जणांचा मृत्यू झाला, तर ६० हून अधिक भाविक जखमी झाले. या घटनेमुळे घटनास्थळी प्रशासनाचा गोंधळ उडाला. बुधवारी सकाळी महाकुंभात भाविक आणि संत पवित्र स्नानासाठी संगमाकडे जात असताना चेंगराचेंगरी झाली. तंबू नगरीत अचानक भाविकांची गर्दी झाल्याने गोंधळ उडाला. काहींनी संगमापर्यंत पोहोचण्यासाठी बॅरिकेड्स तोडले. त्यातूनच ही भयावह घटना घडल्याचे सांगण्यात येते.**



प्रयागराज येथील महाकुंभात मौनी अमावास्येनिमित्त स्नानासाठी भाविकांनी बुधवारी पवित्र संगमावर केलेली गर्दी

महाकुंभाचे पोलिस उपमहानिरीक्षक वैभव कृष्णा यांनी बुधवारी संध्याकाळी पत्रकार परिषदेत सांगितले की, मौनी अमावास्येला रात्री १ ते २ वाजेपर्यंत भाविकांचा पहिला जत्था स्नानासाठी जमला. प्रचंड गर्दीमुळे बॅरिकेड्स तुटले आणि चेंगराचेंगरी झाली. गोंधळ उडाल्यानंतर जमिनीवर झोपलेल्या आणि बसलेल्या भाविकांवर गर्दीतील भाविक पाय ठेवत होते. त्यामुळे बिकट परिस्थिती निर्माण झाली.

बुधवारी पहाटे महाकुंभात मौनी अमावास्येच्या पर्वावर भाविकांनी प्रचंड गर्दी केली होती. महाकुंभाच्या या खास दिवशी, देशभरातून कोट्यवधी लोक ब्रह्म मुहूर्तावर स्नान करण्यासाठी संगम येथे जमले होते.

या चेंगराचेंगरीत आतापर्यंत ३० जणांचा मृत्यू झाला आहे, तर ६० हून अधिक भाविक जखमी झाले आहेत, असे वैभव कृष्णा यांनी सांगितले.

मौनी अमावास्येला कोट्यवधी भाविक गंगेत स्नान करण्यासाठी संगम तीरावर जमले होते. दरम्यान, गर्दीमुळे गोंधळ उडाला आणि चेंगराचेंगरीसारखी परिस्थिती निर्माण झाली. जखमींना तातडीने जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले. प्रशासन परिस्थितीवर लक्ष ठेवून आहे. घटनेच्या कारणांच्या चौकशीचा आदेश देण्यात आला आहे.

काही जखमींना त्यांच्या कुटुंबीयांनी नेले आहे, तर ३६ जणांवर वैद्यकीय रुग्णालयात उपचार सुरू आहेत. सध्या भाविकांच्या सोयीसाठी १९२० हा हेल्पलाइन क्रमांक जारी करण्यात आला आहे. मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी सर्व महामंडलेश्वर, संत आणि आखाड्यांना उशिरा पवित्र स्नान करण्याची विनंती केली होती.


**पंतप्रधान मोदींकडून दुःख व्यक्त**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आजच्या घटनेबद्दल तीव्र दुःख व्यक्त केले. त्यांनी प्रयागराज महाकुंभात झालेला अपघात अत्यंत दुःखद असल्याचे म्हटले आहे. ज्या भाविकांनी आपल्या प्रियजनांना गमावले आहे त्यांच्याबद्दल मला तीव्र संवेदना आहेत. यासोबतच, सर्व जखमी लवकर बरे होण्यासाठी त्यांनी प्रार्थना केली. त्यांनी 'एक्स'वर म्हटले की, स्थानिक प्रशासन पीडितांना सर्वतोपरी मदत करत आहे. या घटनेविषयी मी मुख्यमंत्री योगींशी बोललो आहे आणि सतत राज्य सरकारच्या संपर्कात असल्याचे नमूद केले. (वृत्तसंस्था)

## महत्त्वाचे

### सलग दुसऱ्या दिवशी बाजारात तेजी

**मुंबई** : देशांतर्गत शेअर बाजारात बुधवारी सलग दुसऱ्या दिवशी तेजी दिसून आली. दिवसभर तेजीसह



व्यवहार केल्यानंतर सलग दुसऱ्या दिवशी शेअर बाजार तेजीसह बंद झाला. मिडकॅप आणि स्मॉलकॅप निर्देशांकातही मोठी खरेदी दिसून आली. निर्देशांक ६३१ अंकांनी वाढला, तर निफ्टीत २९९ अंकांची वाढ नोंदविण्यात आली. मुंबई बाजारातील ३० पैकी २३ शेअर्स तेजीत होते, तर निफ्टीतील ५० पैकी ४१ शेअर्स वधारले होते. निर्देशांकात झोमॅटोचे शेअर्स सर्वाधिक वाढीसह बंद झाले. आयटीसीचे शेअर्स ५ टक्क्यांच्या मोठ्या घसरणीसह बंद झाले.

### पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला यांचा राजीनामा

**मुंबई** : राज्याच्या पोलिस प्रमुख रश्मी शुक्ला यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे प्रकृतीच्या कारणास्तव त्यांनी राजीनामा दिला असल्याचे खात्रीशीर सूत्राकडून समजते नवीन नियुक्ती होईपर्यंत त्यांना पदभार सांभाळण्यास सांगण्यात आले आहे. दरम्यान, नवीन पोलीस महासंचालक पदासाठी मुंबईचे पोलीस आयुक्त विवेक फणसाळकर व राष्ट्रीय तपास यंत्रणेच्या (एनआयए) महासंचालक सदानंद दाते यांच्या नावांची चर्चा सुरू आहे.



रश्मी शुक्ला या दोन टप्यात गेल्या वर्षभरापासून राज्याचे पोलीस प्रमुख पद सांभाळत आहेत. विधानसभा निवडणुकीच्या वेळी विरोधी पक्षाने केलेल्या तक्रारीनंतर केंद्रीय निवडणूक आयोगाने त्यांना या पदावरून हटविले होते. निवडणुकीत महायुती सरकार पुन्हा प्रचंड बहुमताने सत्तेत आल्यानंतर डिसेंबर महिन्यात त्यांनी पुन्हा पदभार स्वीकारला. त्यांचा कार्यकाळ पुढील वर्षाच्या जानेवारीपर्यंत आहे. मात्र त्यांची प्रकृती बिघडल्याने त्यांना काही दिवस रुग्णालयात दाखल व्हावे लागले होते. त्यामुळे त्यांनी राजीनामा देण्याचा निर्णय घेतला असल्याचे सांगण्यात आले.
शुक्ला यांच्यानंतर सेवाजेष्ठतेनुसार मुंबईचे पोलीस आयुक्त विवेक पंचाळकर हे सर्वात ज्येष्ठ अधिकारी आहेत. त्यांची सेवानिवृत्ती ३0 एप्रिल महिन्यात आहे. त्यामुळे त्यांना डीजीपी केल्यास पुन्हा मुदतवाढ दिली जाईल. त्यांच्यासह एनआयएचे प्रमुख सदानंद दाते यांच्या नावही चर्चेत आहे मात्र ते मुंबईच्या पोलीस आयुक्तपदासाठी असल्याचे समजते. रश्मी शुक्ला यांची वयोमानानुसार गेल्यावर्षी ३0 जूनला सेवानिवृत्त होणार होत्या. मात्र राज्य सरकारने त्यांची गेल्या वर जानेवारी महिन्यात त्यांची डीजीपी पदावर नियुक्ती करीत दोन वर्षासाठीचा सारिका निश्चित केला होता. मात्र प्रकृती ठीक नसल्यान राजीनामा देण्याचे निश्चित केले.

# नेव्हिगेशन उपग्रह प्रक्षेपणासह इस्रोचे दमदार शतक




"इस्रोची २०२५ मधील पहिली मोहीम यशस्वी ठरली, हे जाहीर करताना अतिशय आनंद होत आहे. प्रक्षेपित केल्यावर उपग्रह आवश्यक कक्षेत अचूकपणे ठेवण्यात आला. ही मोहीम म्हणजे १०० वे प्रक्षेपण असून, हा एक अतिशय महत्त्वाचा टप्पा आहे. या मोहिमेचा डेटा आला आहे. सर्व वाहन प्रणाली सामान्य आहे.''

**व्ही. नारायणन्**, इस्रोचे अध्यक्ष

◆ **श्रीहरिकोटा, २९ जानेवारी**

बुधवारी पार पाडलेल्या ऐतिहासिक १०० व्या मोहिमेत इस्रोने एक प्रगत नेव्हिगेशन उपग्रह यशस्वीपणे प्रक्षेपित केला. हा उपग्रह जमीन, आकाश आणि सामुद्री नेव्हिगेशन आणि शेतीसाठी इतर क्षेत्रात अचूक माहिती देईल.

१६ जानेवारी रोजी इस्रोचे अध्यक्षपद स्वीकारल्यानंतर व्ही. नारायणन् यांच्या नेतृत्वातील तसेच इस्रोची २०२५ मधील ही पहाटे प्रक्षेपित करण्यात आलेली पहिलीच मोहीम आहे. यापूर्वी इस्रोने ३० डिसेंबर २०२४ रोजी स्पेस डॉकिंग प्रयोग यशस्वीरीत्या पार पाडला होता. ते इस्रोचे ९९ वे अभियान होते.

यापूर्वी २७.३० तासांची उलटगणना संपताच, स्वदेशी क्रायोजेनिक वरच्या टप्प्यासह ५०.९ फूट उंच भूस्थिर उपग्रह प्रक्षेपण वाहन (जीएसएलव्ही) रॉकेट दुसऱ्या प्रक्षेपण केंद्रावरून बुधवारी सकाळी ६.२३ वाजता आग आणि धुराचे लोट मागे सोडत आकाशात झेपावले. जीएलएलव्ही-एफ १५ ही मोहीम जीएसएलव्ही-एफ१२ नंतर हाती घेण्यात आली. यात २९ मे २०२३ मध्ये दुसऱ्या पिढीतील पहिला नेव्हिगेशन उपग्रह एनव्हीएस-०१ चे यशस्वी प्रक्षेपण करण्यात आले होते.

**एनव्हीएसचा प्रमुख वापर**

एनव्हीएस-०२ उपग्रहाचा प्रमुख वापर जमीन, आकाश आणि सामुद्री नेव्हिगेशन, अचूक शेती, ताफ्यांचे व्यवस्थापन, मोबाईल उपकरणांमध्ये स्थान आधारित सेवा, उपग्रहांसाठी कक्षा निर्धारण, इंटरनेट ऑफ थिंग्ज आधारित प्रयोग आणि आपत्कालीन सेवांसाठी केला जाईल.

**१९ मिनिटांचा प्रवास**

प्रक्षेपणानंतर काळोख्या आणि ढगाळ आकाशात सुमारे १९ मिनिटे प्रवास केल्यानंतर रॉकेटने एनव्हीएस-०२ नेव्हिगेशन उपग्रह यशस्वीरीत्या इच्छित भूस्थिर स्थानांतरण कक्षेत (जीटीओ) वेगळा केला.

**नाविक मालिकेतील दुसरा उपग्रह**

भारतीय उपखंडातील वापरकर्त्यांना तसेच भारतीय भूभागाच्या पलीकडे सुमारे १५०० किमी अंतरावरील प्रदेशांना अचूक स्थान, वेग आणि वेळ प्रदान करण्यासाठी 'नेव्हिगेशन विथ इंडियन कॉन्स्टेलेशन' अर्थात् नाविक मालिकेतील हा दुसरा उपग्रह आहे. (वृत्तसंस्था)

# ट्रॅक्टर चोरणारी टोळी बार्शी तालुका पोलिसांनी केली जेरबंद

**१० ट्रॅक्टरसह ५६ लाखांचा मुद्देमाल जप्त**

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि. २९ जानेवारी-**

बार्शी तालुका पोलिसांनी ट्रॅक्टर चोरणाऱ्या टोळीला अटक करुन त्यांचेकडून १० ट्रॅक्टरसह ५६ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. जिग्नेश अंजाबापू आडागळे (वय १९, रा. टाकरवन, ता. माजलगांव, जि. बीड), विजय राजू साळवे (वय २४, रा. शेलगांव थडी, ता. माजलगांव, जि. बीड), धीरज बाळू कारके (वय २४ रा. पाथरवाला, ता. अंबड, जि. जालना) व प्रदीप उर्फ भगत भगवान तौर (वय २२, रा. शेलगांव थडी, ता. माजलगांव, जि. बीड) अशी अटक केलेल्या आरोपींची नावे आहेत.

दुचाकीवरुन आलेल्या तीन इसमांनी इंद्रेश्वर साखर कारखान्याजवळ ट्रॅक्टर चालकाला अडवले, त्याला चाकूचा धाक दाखवत दोरीने हातपाय व तोंडाला मफलर बांधून आडरानात टाकून दिले आणि त्याचेकडील ट्रॅक्टर, ट्रॉली व मोबाईल चोरुन नेला.



सदर घटना १३ जानेवारी रोजी घडली. याबाबत सचिन कृष्णा नवले (वय २९), रा. कांदलगांव, ता. बार्शी यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन बार्शी तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

सदर गुन्ह्याचा तपास करुन बार्शी तालुका पोलिसांनी तीन संशयित आरोपींना बीड जिल्ह्यातील टाकरवन येथून ताब्यात घेतले. त्यांना अटक करुन चौकशी केल्यानंतर त्यांनी भगत तौर याचे सांगण्यावरून गुन्हा केल्याची कबुली दिली. पोलिसांनी भगत तौर यालाही माजलगांव येथून अटक केली. चौकशीमध्ये किशोर शिंपले रा. आंबेवडगांव, ता. थारुर, जि. बीड याने चोरीचे ट्रॅक्टर विकल्याची माहिती मिळाल्यावरुन पोलिसांनी गुन्ह्यातील १० ट्रॅक्टर, ट्रॉली, ट्रेलर व १ मोबाईल मिळून ५५ लाख ६५ हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. सदर आरोपींनी बार्शी तालुका, टेंभुर्णी, अंबाजोगाई व मुधोळ (जि. बागलकोट, कर्नाटक) या पोलीस ठाण्याचे हद्दीतून चार ट्रॅक्टर चोरल्याचे निष्पन्न झाले असून इतर ६ ट्रॅक्टरबाबत पोलीस माहिती घेत आहेत.

सदर कामगिरी पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अपर पोलीस अधीक्षक प्रितम यावलकर, उपविभागिय पोलीस अधिकारी जालीदर नालकुल, बार्शी तालुका सहाय्यक पोलीस निरीक्षक दिलीप ढेरे यांचे मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक बालाजी वळसणे, हवालदार राजेंद्र मंगरुळे, सुभाष सुरवसे, शिपाई राहुल बोंदर, सागर वाकळे, उत्तरेश्वर जाधव, आकाश कांबळे, युवराज गायकवाड, नागनाथ आंधळे व सायबरचे रतन जाधव यांनी केली.

# पुढील वर्षापासून एम. एड. एक वर्षाचे

### नवीन अभ्यासक्रम लवकरच

◆ **नवी दिल्ली, २९ जानेवारी**

नवीन शैक्षणिक सत्र २०२६-२७ पासून दोन वर्षांचा एम. एड. (शिक्षण पदव्युत्तर) अभ्यासक्रम बदलून एक वर्षाचा होईल. शिक्षक शिक्षण परिषदेने हा निर्णय घेतला आहे.

नुकताच एनसीटीईच्या निर्णयानंतर बी. एड.चा अभ्यासक्रम एक वर्षाचा करण्याची घोषणा करण्यात आली. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० अंतर्गत हा निर्णय घेण्यात आला आहे.

२०१४ पर्यंत बी.एड. अभ्यासक्रम एक वर्षाचा होता, तो आता पुन्हा सुरू होणार आहे. तर दोन वर्षांचा एम. एड. अभ्यासक्रम २०२६ पासून एक वर्षाचा होईल.

एनसीटीईचे अध्यक्ष पंकज अरोरा यांनी दिलेल्या माहितीनुसार, एक वर्षाचा बी. एड. अभ्यासक्रम करणारे उमेदवार, दोन वर्षांचा शिक्षक शिक्षण अभ्यासक्रम करणारे उमेदवार आणि चार वर्षांचा एकात्मिक अभ्यासक्रम करणारे उमेदवार एम. एड.मध्ये प्रवेश घेऊ शकतात.

एनसीटीई यासाठी नवीन अभ्यासक्रम तयार करत असून, त्यासाठी संस्थांकडून सूचना मागवण्यात आल्या होत्या. हा अभ्यासक्रम २०२६-२७ पासून सुरू होईल. यातील प्रवेश प्रक्रिया अद्याप ठरलेली नाही. सध्या चार वर्षांच्या एकात्मिक शिक्षक शिक्षण अभ्यासक्रमासाठी प्रवेश परीक्षेद्वारे प्रवेश घेतला जातो. ही परीक्षा नॅशनल टेस्टिंग एजन्सीद्वारे घेतली जाते. (वृत्तसंस्था)



**नवीन शैक्षणिक धोरणानुसार राहणार अभ्यासक्रम**

पदव्युत्तर आणि चार वर्षांचे एकात्मिक शिक्षक शिक्षण घेतलेले एक वर्षाच्या बी. एड. अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेऊ शकतात. एक वर्षाच्या बी. एड. अभ्यासक्रमासाठी अभ्यासक्रमाचा आराखडा तयार करण्यासाठी एनसीटीईने एक समितीही स्थापन केली आहे. नवीन शैक्षणिक धोरणानुसार नवीन अभ्यासक्रमाचा अभ्यासक्रम तयार करण्यात येणार आहे.

# प्रलंबित तक्रारींबद्दल खासदारांनी अधिकाऱ्यांना विचारला जाब

### नियोजन समितीच्या बैठकीपूर्वीच खा. ओमराजे निंबाळकर यांच्याकडून आढावा

**सोलापूर, दि. २९ जानेवारी -**

बार्शी तालुक्यातील शेतकऱ्यांच्या दाखल झालेल्या विविध तक्रारीवर निर्णय घेण्यासाठी प्रशासनाकडून होत असलेल्या दिरंगाईबद्दल धाराशिवचे खासदार ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांनी प्रशासनातील अधिकाऱ्यांना जाब विचारुन प्रलंबित तक्रारी निकाली काढण्यास भाग पाडले तसेच यापुढील काळात जनतेच्या कामाला प्राधान्य देण्याची सूचनाही त्यांनी केली.

बुधवारी, येथील जिल्हाधिकारी कार्यालयात खासदार राजेनिंबाळकर यांनी बार्शी तालुक्यातील नागरिकांच्या प्रलंबित प्रश्नांवर आढावा बैठक घेतली. या बैठकीत काम चुकार आणि निष्क्रिय अधिकाऱ्यांना त्यांनी चांगलेच फैलावर घेतल्याचे सांगण्यात येते. या बैठकीला अपर जिल्हाधिकारी मोनिका सिंह, निवासी उपजिल्हाधिकारी मनीषा कुंभार,



जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी इशाधीन शेळकंदे, जिल्हा कृषी अधीक्षक कृषी अधिकारी शुक्राचार्य भोसले, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता भोसले, बार्शीचे तहसीलदार एफ.आर.शेख उपस्थित होते. या बैठकीत पूर्वीच्या तालुकास्तरीय बैठकीतील ११३ तक्रारी तसेच नव्याने प्राप्त झालेल्या २३ तक्रारी अशा एकूण १३६ तक्रारींचे तत्काळ निराकरण करण्यात आले.

**आम्ही आमचे कर्तव्य करायचे नाही का?**

मतदारसंघातील अथवा जिल्ह्यातील शेतकरी सर्वसामान्य नागरिकांच्या अनेक समस्या आडचणी असतात त्यासाठी लोक वारंवार लोकप्रतिनिधी म्हणून आम्हाला भेटत असतात. त्यांची सोडवणूक होण्यासाठी अधिकारी आणि संबधित लोकांमध्ये समन्वय व्हावा आणि अनेक समस्या वेळेत सुटाव्यात यासाठी ही बैठक बोलावण्यात आली होती. मात्र अधिकाऱ्यांनी २१ जुलै २0२0 चे शासनाचे सचिव अन्शु सिन्हा यांनी जारी केलेले परिपत्रक दाखवून प्रमुख अधिकारी या बैठकीला उपस्थित राहू शकत नाहीत असे सांगितले. मग जर अधिकारी सहकार्य करित नसतील तर आम्ही आमचे कर्तव्य पार पाडायचे नाही का? असा सवाल खा. निंबाळकर यांनी उपस्थित केला.

प्रशासनाच्या दिरंगाईमुळे प्रलंबित असलेल्या कामांवर त्वरित कार्यवाही करत नागरिकांना दिलासा देण्याचा खासदार राजेनिंबाळकर यांनी प्रयत्न केला.

बार्शी तालुक्यातील नागरिकांकडून तहसील कार्यालय, सोयाबीन अनुदान, पीक विमा, महावितरण, सार्वजनिक बांधकाम, शिक्षण व कृषी विभाग यांसारख्या विषयांवर प्रशासनाकडे तक्रारी दाखल झाल्या होत्या. या सर्व तक्रारींवर सक्षम अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत तातडीने उपाययोजना करण्यात आल्या. यावेळी खासदार राजेनिंबाळकर यांनी नागरिकांच्या समस्या प्राधान्याने सोडवण्यासाठी प्रशासनाने तत्परता दाखवावी व भविष्यात अशा तक्रारी प्रलंबित राहू नयेत, यासाठी प्रभावी प्रणाली विकसित करावी, अशा सूचना संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

दरम्यान, उद्या गुरूवारी नियोजन समितीची बैठक असून या बैठकीपूर्वीच विविध प्रश्नांचा आढावा घेऊन खासदार राजेनिंबाळकर यांनी तत्परता व जनतेच्या प्रश्नांविषयी संवेदनशीलता दाखवून दिली आहे.

# मराठा आरक्षणाची हायकोर्टात नव्याने सुनावणी

◆ **मुंबई, २९ जानेवारी**

मराठा आरक्षणाबाबत मुंबई उच्च न्यायालयाने मोठा निर्णय दिला असून, आता या प्रकरणाची सुनावणी पुन्हा नव्याने सुरू होणार असल्याची माहिती पुढे आली आहे. सरकारी नोकऱ्या आणि शिक्षणात मराठा आरक्षण कायद्याला आव्हान देणाऱ्या याचिकांवर सुरुवातीपासून पुन्हा सुनावणी होणार आहे.

याचिकाकर्त्यांच्या वतीने नवनियुक्त मुख्य न्यायमूर्तींना विनंती केली होती. नवीन विशेष पूर्णपीठ स्थापन करण्याचेही साकडे घातले होते. दरम्यान, ही विनंती मंजूर करण्यात आली. त्यामुळे मुख्य न्यायमूर्तींच्या अध्यक्षतेखाली पूर्णपीठ नव्याने सुनावणी घेण्यास तयार झाले आहे. सोबतच याचिकाकर्त्यांना याबाबत रजिस्ट्रारकडे नव्याने अर्ज करण्याचा निर्देश न्यायालयाने दिला आहे.

न्यायालयाने सुनावणी पुन्हा नव्याने होणार असल्याचा निर्देश दिला असला तरी, कुठेतरी मराठा आरक्षणाची सुनावणी आता लांबणीवर पडण्याची शक्यता वर्तवली जात आहे. कारण, याआधी ज्या मुख्य न्यायमूर्तींच्या अध्यक्षतेखाली पीठ या प्रकरणी सुनावणी घेत असत, ती सुनावणी जवळपास पूर्ण होण्याच्या मार्गावर होती. (वृत्तसंस्था)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त



### वाहतुकीचे नियम पाळा, अपघात टाळा : सपोनि सागर कुंजीर

**करकंब, दि.२९ जानेवारी-**

सर्व वाहनधारक व नागरिकांनी वाहतूकीचे नियम पाळले तर निश्चितच अपघाताचे प्रमाण कमी होण्यास मदत होईल असे मत करकंब पोलीस ठाण्याचे सपोनि सागर कुंजीर यांनी व्यक्त केले. करकंब पोलीस ठाणे, आदर्श प्रशाला व ज्युनियर कॉलेज करकंब यांच्या संयुक्त विद्यमाने रस्ता सुरक्षा सप्ताहानिमित्त जनजागृती प्रभात फेरी काढण्यात आली. यावेळी पोह विजय गोरवे, पोकॉ चंद्रशेखर भोसले, पोना प्रकाश ननवरे, पोना दयानंद हजारे, प्रा.बापूराव खांडेकर, प्रा. नंदकुमार नाईकनवरे, प्रा. हरीश दिवटे, सुप्रिया शिंदे, आरती कसबे, प्रा. दत्तात्रय जुदळे, संजय सांगोलकर, दीपक जाधव, पोकॉ सचिन गात आदीसह पोलीस, शिक्षक, शिक्षिका, विद्यार्थी प्रभात फेरीत सहभागी झाले होते.

### राष्ट्रीय शालेय योगासन स्पर्धेत अमृता सरगुले देशात प्रथम

**करकंब, दि. २९ जानेवारी-**



प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून राष्ट्रीय शालेय योगासन स्पर्धेत करकंब येथील अमृता विनायक सरगुले हिने राष्ट्रीय स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवल्याबद्दल करकंब पोलीस ठाणेच्या वतीने सहाय्यक पोलीस निरीक्षक सागर कुंजीर यांनी सत्कार केला. या राष्ट्रीय शालेय योगासन स्पर्धेत एकूण ३१ राज्यांतून निवडक १५५ स्पर्धकांनी सहभाग घेतला होता. महाराष्ट्रातून वैयक्तिकरीत्या अमृता विनायक सरगुले हिचा सहभाग होता. या राष्ट्रीय शालेय योगासन स्पर्धेत करकंबच्या अमृता विनायक सरगुले हिने गोल्ड मेडलसह देशात प्रथम येण्याचा बहुमान मिळवला.



### सांगवीच्या गगनगिरी विद्यालयातील क्लास रुम बनले डिजिटल

**करकंब, दि. २९ जानेवारी-**

शहरातील विद्यार्थ्यांबरोबरच खेडेगावातील विद्यार्थ्यांनाही डिजीटल शिक्षण मिळावे, त्यांच्या ज्ञानात वाढ व्हावी या उद्देशाने करकंब व सोलापूर रोटरी क्लबचेवतीने मोफत डिजिटल क्लासरुम देण्यात आल्याचे सोलापूर रोटरीयन राजन व्होरा यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना असे मनोगत व्यक्त केले. करकंब रोटरी क्लब व सोलापूर रोटरी क्लबच्या वतीने पंढरपूर तालुक्यातील सांगवी येथील गगनगिरी विद्यालयास दिलेल्या डिजिटल क्लासरुमचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी सोलापूरचे अक्षय जव्हेरी, संतोष कणेकर, करकंब रोटरी क्लबचे अध्यक्ष डॉ. अक्षय मोरे, क्लब डायरेक्टर रघुनाथ जाधव, संस्थापक अध्यक्ष डॉ. प्रशांतकुमार मोरे, मुख्याध्यापक अनिल रणदिवे उपस्थित होते. प्रास्ताविक सर्जेराव दाईंगडे तर आभार आदिनाथ ढेकळे यांनी मानले.

### दयानंद कांबळे यांना पीएच. डी. प्रदान

**अणदूर, दि. २९ जानेवारी-**



येथील जवाहर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयातील सहाय्यक प्राध्यापक दयानंद सखाराम कांबळे यांना स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाकडून भूगोल विषयात पीएच. डी. प्रदान करण्यात आली. त्यांनी स्टडी ऑफ अॅग्रीकल्चरल प्रोडक्टिव्हिटी इन सांगली डिस्ट्रिक्ट- अ जॉग्रफिकल रेव्हिएव या विषयावर प्रा. कांबळे यांनी नांदेड विद्यापीठात शोधनिबंध सादर केला आहे. यासाठी त्यांना राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर येथील भूगोल विभाग प्रमुख कॅप्टन प्रा. डॉ. ओमप्रकाश व्ही. शहापूरकर यांचे मार्गदर्शन लाभले. त्याबद्दल शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव रामचंद्र आलुरे, अॅड. लक्ष्मीकांत पाटील, प्रा. भालचंद्र बिराजदार, प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी, उपप्राचार्य मल्लिनाथ लंगडे, प्रो. डॉ. अंकुश कदम, विक्रम आलुरे यांनी अभिनंदन केले.



### राजू राठी यांच्या वाढदिवसानिमित्त कोअर कमिटी, पदाधिकाऱ्यांचा सत्कार

**सोलापूर, दि. २९ जानेवारी-**

सोलापूर चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्रीज अॅण्ड अॅग्रीकल्चरचे अध्यक्ष राजू राठी यांच्या ५८ व्या वाढदिवसानिमित्त सोलापूर चेंबर ऑफ कॉमर्सच्या वतीने कोअर कमिटी, सर्व पदाधिकारी, संचालक व मान्यवरांच्या हस्ते त्यांचा सत्कार सोलापूर चेंबर ऑफ कॉमर्सच्या कार्यालयात करण्यात आला. सत्कारास उपस्थित मान्यवरांनी सोलापूर चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष राजू राठी यांचा शाल, नॅपकीन बुके देऊन सत्कार केला. यावेळी सचिव धवल शहा, खजिनदार निलेश पटेल, पी. आर.ओ.पशुपती माशाळ, संचालक प्रकाश वाले, सुकुमार चंकेश्वरा, शैलेश बच्चुवार, विनोद अग्रवाल, हर्षवर्धन शहा, वस्तीमल संकलेचा, यंत्रमाग संघाचे अध्यक्ष पेंटप्पा गड्डम, महेश सिंदगी, दयासागर सालुटगी, प्रकाश कलकोटे, इंदरमल होतवानी, अशोक भिंगारे, राजेश पडसलगीकर, प्रवीण कलकोटे, सुनील मसरे, राजू नाशिककर, हितेश कांकरिया, राजू दरगड, संतोष आकुल, अमर पाटील उपस्थित होते.

# तेराव्यासाठी आलेल्या साडूचा अपघातात मृत्यू

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि. २९ जानेवारी-**

बार्शी तालुक्यातील मानेगाव येथे साडूच्या तेराव्यासाठी आलेल्या उपळे दुमाला येथील नारायण माळी यांना बार्शी-सोलापूर रोडवरून चालत जात असताना चारचाकी भरधाव वाहनाने पाठीमागून जोराची धडक दिल्याने मृत्यू झाला.

हा अपघात बुधवारी सकाळी साडे आठ वाजण्याच्या सुमारास बार्शी-सोलापूर रोडवर हॉटेल निवारा परिसर रोडवर घडला. नारायण सुब्राव माळी (वय ६५, रा. उपळे दुमाला, ता. बार्शी) असे मयत इसमाचे नाव आहे. याबाबत नानासाहेब चंद्रकांत डाके (वय ४५, रा. माळी वस्ती, मानेगांव) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून वाहन चालक सचिन ज्ञानेश्वर शिखरे (वय ३४, रा. बार्शी) याच्याविरोधात वैराग पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



फिर्यादी नानासाहेब चंद्रकांत डाके ( वय ४५, रा. माळी वस्ती मानेगांव) यांचे वडील चंद्रकांत संभा माळी हे १७ जानेवारी रोजी मयत झाले होते. बुधवारी तेराव्या दिवस होता. त्यासाठी उपळे दुमाला येथून अपघातातील मयत इसम नारायण सुब्राव माळी हे बसने वैराग येथे सकाळी सात वाजता आले होते. ते पायी बार्शी रोडने रस्त्याच्या डाव्या बाजूने माळी वस्ती या ठिकाणी निघाले होते. तेव्हा माळी वस्तीजवळ निवारा हॉटेलसमोर रोडवरून रस्त्याचे डाव्या बाजूने पायी जात असताना सकाळी साडेआठच्या सुमारास पाठीमागून येणारे चारचाकी वाहन (क्र. एम. एच. १२/ ई. एम. २०१८) या वाहनाने पाठीमागील दिशेने भरधाव वेगात हयगयीने गाडी चालवून रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करून पाठीमागून जोराची धडक दिली. यात नारायण माळी गंभीर जखमी झाले. त्यांना बार्शी येथे उपचाराकरीता दाखल केले असता डॉक्टरांनी उपचारापूर्वीच मयत झाल्याचे सांगितले. त्यामुळे वाहन चालक सचिन ज्ञानेश्वर शिखरे याच्याविरूध्द फिर्याद दाखल करण्यात आली आहे. मयत नारायण माळी यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, दोन मुली, नातवंडे असा परिवार आहे.

# भिशीवरुन वृद्धाचा खून

**मालेगावातील घटना; एका अल्पवयीन मुलासह दोघांना अटक**

**तभा वृत्तसेवा**
**वैराग दि. २९ जानेवारी -**

भिशीतील पैशाच्या देवाण-घेवाणीवरून एका वयोवृद्धाचा काठीने व लोखंडी रॉडने जबर मारहाण करून भर दिवसा खून केल्याची घटना बुधवारी सकाळी साडेनऊच्या सुमारास बार्शी तालुक्यातील मालेगाव आर येथे घडली आहे. या प्रकरणी वैराग पोलिसांनी एका अल्पवयीन मुलासह अन्य दोघांविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

सुरेश घोडके (वय ६०) हे मयत झाले असून संशयित आरोपी समाधान घोडके, जनाबाई भारत घोडके यांच्यासह एका अल्पवयीन मुलास ताब्यात घेण्यात आले आहे. दादासाहेब सुरेश घोडके (रा. मालेगाव, ता. बार्शी) हा वडील सुरेश घोडके यांच्यासोबत बुधवारी सकाळी शेतामध्ये जाऊन परत आला होता. त्यानंतर ९.३० च्या सुमारास लोकांनी दादासाहेब यास सांगितले की, समाधान घोडके व इतर दोघेजण तुझ्या वडिलांना मारहाण करीत आहेत. तात्काळ दादासाहेब घटनास्थळी पोहोचले. त्यावेळी समाधान घोडके व इतर दोघे काठीने मारहाण करीत होते. दादासाहेब याने त्यांना अडविण्याचा प्रयत्न केला असता त्यालादेखील मारहाण केली. मारहाण थांबत नसल्यामुळे त्याने शंभर नंबर डायल करून पोलीस गाडीला बोलविले. दरम्यान या मारहाणीमध्ये सुरेश घोडके गंभीररित्या जखमी झाले. त्यांना धाराशिव सरकारी दवाखान्यात दाखले केले असता डॉक्टरांनी मयत झाल्याचे सांगितले. संशयित आरोपीने देखील ११२ नंबरवर फोन करून माझ्या आईची छेडछाड केल्याचे पोलिसांना सांगितल्याचे समजते. वैराग पोलिसांनी संशयितांना ताब्यात घेतल्याचे पोनि कुंदन गावडे यांनी सांगितले. तपास सापेनि विश्वजीत जगदाळे करीत आहेत. उपविभागीय पोलीस अधिकारी जालिंदर नालकुल यांनी वैराग पोलीस ठाण्याला भेट देऊन घटनेची सविस्तर माहिती घेतली आहे.




## आमरण उपोषणकर्ते आनंद काशीद यांची प्रकृती ढासळली

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २९ जानेवारी-**

बार्शी तहसील कार्यालयाजवळ मराठा समाजाला आरक्षण मिळावे यासाठी आमरण उपोषणाकरिता बसलेले आनंद काशीद यांची पाचव्या दिवशी प्रकृती ढसाळली.

त्यांनी उपचार घेण्यास नकार दिला असून जोपर्यंत जरांगे-पाटील उपचार घेणार नाहीत तोपर्यंत आपण उपचार घेणार नाही ही भूमिका त्यानी घेतली. मराठा समाजाचे प्रश्न सरकारने आजच्या आज सोडवून मराठा समाजाच्या हक्काचे आरक्षण द्यावे यासह हैद्राबाद, सातारा व बॉम्बे गॅझेट घ्या. सर्व आंदोलकांवरील गुन्हे माघारी घ्या यासह सर्व मागण्या मान्य करा. याकरिता आनंद काशीद यांचे बार्शी तहसील समोर मागील पाच दिवसा'पासून आमरण उपोषण चालू आहे.

## गुरु हा संतकुळीचा राजा : हभप डॉ. रंगनाथ काकडे

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २९ जानेवारी-**



विद्यार्थ्यांनी श्रवण, वाचन, लेखन अशा विविध कौशल्यांमध्ये पारंगत व्हावे. शिक्षकांना चांगले बोलता आले पाहिजे, लिहिता आले पाहिजे. शिक्षक हा अंधाराकडून प्रकाशाकडे नेतो, वाईट कढून चांगल्याकडे घेऊन जातो त्याला गुरु असे म्हणतात. अर्थपूर्ण बोला, कमी बोला, गरजेपुरते बोला, पुस्तक वाचण्याबरोबर माणसांची मन वाचता आलं पाहिजे. गुरु हा संतकुळीचा राजा असतो, असे प्रतिपादन डॉ. रंगनाथ काकडे यांनी केले.

श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ बार्शी संचलित शंकरराव निंबाळकर अध्यापक विद्यालय येथे कर्मवीर डॉ मामासाहेब जगदाळे यांच्या १२२ व्या जयंतीनिमित्त आयोजित समाजदिन सप्ताहानिमित्त तिसरे पुष्प गुंफण्यासाठी प्रमुख व्याख्याते म्हणून डॉ. रंगनाथ काकडे यांच्या व्याख्यानाचे आयोजन केले होते. अध्यक्ष म्हणून अध्यापक विद्यालयाचे प्राचार्य डॉ दीपक गुंड हे होते. या समाजदिन सप्ताहाची सुरुवात प्रथम पुष्प गुंफण्यासाठी अध्यापक विद्यालयातील प्रा. डॉ. जितेंद्र जळकुटे यांनी मामांच्या जीवन व कार्य याविषयी आपले मनोगत व्यक्त केले.

समाजदिन सप्ताहाचे दुसरे पुष्प गुंफण्यासाठी प्रा. चंद्रहास गंभीर हे आले होते. कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराज व कर्मवीर डॉ मामासाहेब जगदाळे यांच्या प्रतिमापूजन करुन झाली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कू. अंकिता चव्हाण व पाहुण्यांचा परिचय नरके अस्मिता यांनी करुन दिला. शेवटी अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ.दीपक गुंड सर यांनी कर्मवीर समाजदिन सप्ताहाचा उद्देश्य सांगितला. तसेच विविध मान्यवरांच्या व्याख्यानातून विद्यार्थ्यांना गुरु शिष्याची परंपरा कळते. तसेच कर्मवीरांचे विचार हे सर्व दूर पसरण्याचे काम अशा प्रकारच्या समाज दिन सप्ताहातून होतात असे त्यांनी सांगितले. आभार केतकी गव्हाणे हिने मांडले. सूत्रसंचालन भालेकर व मुके यांनी केले. कार्यक्रमाचे नियोजन सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. गायकवाड जे. पी. यांनी केले.



## विद्यार्थ्यांनी लिहिलेल्या 'शब्दाची गोष्ट' चे प्रकाशन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२९ जानेवारी-**

आतापर्यंत साहित्यिकांची पुस्तके वाचा असा विद्यार्थ्यांना सल्ला दिला जायचा. पण याला फाटा देत चक्क विद्यार्थ्यांनी लिहिलेल्या व शिक्षिका कविता हिंगमिरे यांनी संपादित केलेल्या शब्दाची गोष्ट या पुस्तकाचे प्रकाशन खंडाळी जिल्हा परिषद शाळेत प्रजासत्ताक दिनानिमित्त करण्यात आले.

खंडाळी शाळेतील चौथीच्या विद्यार्थ्यांनी स्वकल्पनेतून लिहिलेल्या बोधकथा कविता हिंगमिरे यांनी शब्दबद्ध करून बोधकथेचे शब्दाची गोष्ट हे पुस्तक तयार केले. दोन वर्षांपासून पाच शब्दांपासून गोष्ट तयार करण्याचा उपक्रम चालू होता. त्यातूनच निवडक विद्यार्थ्यांच्या अतिशय नाविन्यपूर्ण कल्पना असलेल्या बोधकथा निवडून कविता हिंगमिरे यांनी बोधकथेचे पुस्तक तयार करुन विद्यार्थ्यांना लेखक म्हणून एक वेगळी ओळख दिली. यातूनच तयार झाले अवांतर वाचनासाठीचे शब्दांची गोष्ट हे बोधकथेचे पुस्तक. मुलांना लेखन व वाचनाची सवय लागावी, स्वयंप्रेरणेने मुले व्यक्त व्हावेत हा उद्देश समोर ठेवून वेळोवेळी प्रोत्साहन देण्याचे काम शिक्षकांनी केले. गोष्टीचे पुस्तक सर्वांनी आवर्जून वाचावे, वाचनासाठी ग्रंथालयामध्ये ठेवावे, इतर ठिकाणच्या विद्यार्थ्यांनाही अवांतर वाचनासाठी हे साहित्य उपयोगी असल्याचे मत मान्यवरांनी व्यक्त केले. यावेळी मुख्याध्यापक मनोहर एकतपुरे, केंद्रप्रमुख राजेंद्र उकिरडे, गटशिक्षणाधिकारी करडे साहेब यांनी कविता हिंगमिरे व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

## जुळे सोलापूरमध्ये ड्रेनेजची कामे पूर्णत्वास; नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२९ जानेवारी-**

सोलापूर महानगरपालिकेच्या प्रभाग क्रमांक २६ जुळे सोलापूर येथील माजी नगरसेविका राजश्री चव्हाण यांच्या अथक प्रयत्नांना अखेर यश आले आहे. जुळे सोलापुरातील विशेष करून प्रभाग २६ मध्ये हद्दवाढ झाल्यापासून ड्रेनेजची कामे अर्धवट झाली होती. त्या विकास कामांना प्रत्यक्षात सुरुवात झाली आहे.

येथील स्थानिक नागरिकांनी विविध विकास कामांच्या पूर्ततेसाठी माजी नगरसेविका राजश्री चव्हाण यांच्याकडे लेखी निवेदने सादर केलेली होती. त्यानुसार प्रभाग २६ मधील कृष्णा कॉलनी, रोहिणी नगर भाग एक, द्वारका नगर, उद्धव नगर भाग एक व दोन, रेणुका नगर, सुभाष शहा नगर, गुरुदेव दत्त नगर भाग एक ते सहा, रत्न मंजिरी नगर, बंडापा नगर, राऊत वस्ती, अशा अनेक नगरामध्ये प्रत्यक्ष पाहणी करून महानगरपालिकेतील अधिकारी यांना ड्रेनेजसमस्या बाबत निवेदन दिले होते. विकासकामांच्या एकूण खर्चाचा तपशील महानगरपालिकेने तयार करून शासन दरबारी पाठवण्यात आला होता. शासनाच्या मूलभूत सुविधा व सवर्ण योजना नगरोस्थान योजनेतून सदर कामे मंजूर होऊन प्रत्यक्ष कामाला सुरुवात झाली आहे. त्यामुळे विविध नगरात ड्रेनेजचे



कामे सुरू झाल्याने नागरिकांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. यावेळी स्थानिकांनी माजी नगरसेविका राजश्री चव्हाण यांचा सत्कार केला. तत्पूर्वी सत्काराला उत्तर देताना चव्हाण यांनी शासनाच्या मूलभूत सुविधा व सवर्ण योजना नगरोस्थान योजनेतून अंतर्गत रस्ते करण्यात येईल व त्याचा पाठपुरावा सुरू असून अनेक कामे मंजूर आहेत असे आश्वासन दिले. यावेळी विशाल माने, राठोड, शिवाजी वाघमारे, मनोज गायकवाड उपस्थित होते.

# दिल्लीत फडकणार मराठी साहित्याची पताका

**दिल्ली येथे होत असलेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात उत्तमोत्तम पुस्तके प्रकाशित व्हावीत यासाठी अनेक प्रकाशकांचे सातत्याने प्रयत्न सुरू होते. यात 'चपराक प्रकाशन'ची वैविध्यपूर्ण विषयांवरील सर्वाधिक पंचवीस पुस्तके प्रकाशित होत असल्याची माहिती प्रकाशक आणि ग्रंथ प्रकाशन समितीचे अध्यक्ष घनश्याम पाटील यांनी दिली.**

**चपराक प्रकाशनच्या तब्बल २५ पुस्तकांचे संमेलनात प्रकाशन**

नाशिकच्या शैक्षणिक क्षेत्रात भरीव योगदान देणारे सावानाचे अध्यक्ष प्रा. दिलीप फडके यांचे पुस्तकानुभव हे वेगळ्या धाटणीचे पुस्तक आहे. यात १८३० ते १९१० या कालखंडातल्या निवडक पन्नास दुर्मीळ पुस्तकांची ओळख करून देण्यात आली आहे.

मुंबईतील काशिनाथ माटल यांनी कोविडच्या काळात ज्यांनी निरपेक्षपणे काम केले अशा कोविडयोद्ध्यांच्या प्रेरक कथा लिहिल्या आहेत. त्यांचा त्यावरील सावट हा कथासंग्रह आणि बेवारस हा दुसरा एक कथासंग्रहही प्रकाशित होतोय. ज्येष्ठ कवी अनंतराव घोगले यांचा सोनचाफा हा द्विभाषिक कवितासंग्रह आहे. त्यांच्या कविता मोडी आणि देवनागरी लिपित एकाचवेळी, एकाच पुस्तकात प्रकाशित होत आहेत.

शिक्षणतज्ज्ञ संदीप वाकचौरे यांच्या शिक्षणविषयक पुस्तकमालेतील दहा पुस्तके आजवर प्रकाशित झाली आहेत. एकच विषय, एकच लेखक आणि एकच प्रकाशक अशा मालिकेतील शिक्षणावर बोलू काही आणि शिक्षणरंग ही समारोपाची दोन महत्त्वपूर्ण पुस्तके प्रकाशित होत आहेत.

मुंबई महानगरपालिकेचे निवृत्त आयुक्त गिरीश गोखले यांचे अरे सरकार सरकार हे अनुभवकथन, कराडचे लेखक सुहास कोळेकर यांनी त्यांच्या महाविद्यालयीन जीवनासंदर्भात लिहिलेले रॅगिंगचे दिवस हे अनुभवकथन, सुरेखा बोर्हाडे यांनी भारतवर्षातील ६७ कर्तृत्ववान महिलांचा आढावा घेतलेला देदीप्यमान शलाका हा लेखसंग्रह, चंद्रलेखा बेलसरे यांचा ओव्हरटेक हा भयकथासंग्रह, सातारचे लेखक डॉ. राजेंद्र माने यांचे मनापासून हे ललित लेखांचे पुस्तक, आशिष निनगुरकर यांचा लालबत्ती ते कारंबा हा पटकथासंग्रह, डॉ. बी. व्ही. कुलकर्णी यांचा परिणीता हा कवितासंग्रह, हिरालाल पगडाल यांचे पुन्हा एकदा लंडन हे प्रवासवर्णन अशी दर्जेदार पुस्तके वाचकांच्या भेटीस येत आहेत. संगमेश्वरचे लेखक जे.डी. पराडकर यांनी गेल्या वर्षभरात फक्त कोकण याच विषयावरील आठ पुस्तके लिहिण्याचा आणि ती प्रकाशित होण्याचा विक्रम केला आहे. इंडिया रेकॉर्ड बुकने त्यांच्या या लेखन योगदानाची दखल घेतली. आता कोकणातील फुलांची सचित्र आणि तंत्रशुद्धा माहिती देणारे ऋतुरंग हे त्यांचे नवे पुस्तक साहित्य संमेलनात प्रकाशित होत आहे. नाटककार डॉ. सोमनाथ मुटकुळे यांची तीन नाटके प्रकाशित होत आहेत. महत्त्वाचे म्हणजे संजय सोनवणी यांचे रत्नजडीत खंजिराचे रहस्य ही कुमार कादंबरी, जनार्दन देवरे यांनी लिहिलेले क्रांतिकारक सरदार भगतसिंह हे चरित्र, राजेंद्र दिघे यांचा पाखरांची गाणी हा बहुरंगी कवितासंग्रह, नांदेडच्या डॉ. भगवान अंजनीकर यांचे चरित्र स्मरण अशी काही बालसाहित्यातील पुस्तकेही प्रकाशित होत आहेत. दिल्लीच्या साहित्य संमेलनात पुस्तक प्रकाशित होण्याचा बहुमान मिळावा यासाठी अनेक लेखक उत्सुक होते. महाराष्ट्राच्या वेगवेगळ्या भागातील आणि विविध साहित्य प्रकारातील दर्जेदार पुस्तके आम्ही प्रकाशनासाठी निवडली आहेत. मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यानंतर होणारे हे पहिले साहित्य संमेलन असल्याने राजधानी दिल्लीत आपला आवाज आणखी सशक्त व्हायला हवा. त्या दृष्टिने उत्तमोत्तम पुस्तके निवडण्याचा प्रयत्न आम्ही केला आहे.

**- घनश्याम पाटील,**
चपराक प्रकाशन

## कुरनूरच्या पोलिस पाटलांसह वडिलांना बेदम मारहाण

**दोघांवर शासकीय कामात अडथळा आणल्याचा गुन्हा दाखल**

**अक्कलकोट दि.२९ जानेवारी**

गावात वाघ आल्याची खात्री केल्याशिवाय चुकीचे संदेश स्पिकरवर देणार नाही. यामुळे पंचक्रोशीत घाबरहाट निर्माण होईल असे म्हणत असताना कुरनूरचे पोलीस पाटलांसह त्यांच्या वडिलांना दोघांनी मिळून लाथाबुक्याने, लाकडी दांडक्याने बेदम मारहाण करून बाप, लेखाला जखमी केले. याबाबत शासकीय कामात अडथळा, जखमी करणे, असे विविध कलमान्वे तक्रार दाखल करण्यात आला आहे.

ही घटना२८ जानेवारी रोजी रात्री १० वाजता घडली. पोलीस पाटील हणमंतराव पोतदार यांनी दिलेल्या तक्रारीत असे म्हटले आहे की, रात्री वडील शेतात जाताना लोकांच्या ओरडण्याचा आवाज येत होता. तेव्हा दत्त मंदिरासमोर थांबून आवाजाच्या दिशेने जात असताना ओंकार बाबू मोरे व राहुल उर्फ समर्थ सुधाकर काळे हे त्यांना थांबवून तू गावचा पोलीस पाटील आहेस. गावात वाघ आला आहे, तू माईकवर आनाऊन्स का करत नाहीस, असे म्हणून



शिवीगाळ करु लागले. तेव्हा त्यांनी चुकीचे संदेश देणार नाही, असे सांगताच ओंकारे, राहुल यांनी पोलिस पाटलांना मारहाण करू लागले. तेव्हा वडील उत्तम पोतदार हे सोडवासोडवी करीत असताना, ओंकारने दांडका हिसकावून घेऊन व वडिलांचा हात मुरगाळला, मारहाण केली म्हणून शासकीय कामात अडथळा, जखमी करणे अशा कलमान्वे तक्रार दाखल करण्यात आली आहे.

## संक्षिप्त वृत्त

### कर्करोगाने मृत झाल्याचे कळताच महिलेच्या नातेवाईकांनी काढला पळ

**सोलापूर, दि. २९ जानेवारी -**

कर्करोगाच्या आजाराने त्रस्त महिलेचा उपचाराचादरम्यान शासकीय रुग्णालयात मृत्यू झाला. मात्र ही बाब माहित होताच नातेवाईकांनी पळ काढला. डॉक्टरांनी नातेवाईकांनी संपर्क केला असता, त्यांनी रुग्णालयात येणार नसल्याचे सागितले. हा प्रकार सोलापूरच्या सिव्हील हॉस्पीटलमध्ये घडला. सुमन बलभिम शिंदे (वय ७०,रा. करमाळा) असे मृत महिलेचे नाव आहे. सुमन यांना कर्करोग होता. यातूनच त्यांना पोटदुखीचा त्रास सुरू होता. त्यामुळे २३ जानेवारी रोजी त्यांना सोलापूर येथील शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल केले होते. दरम्यान उपचार सुरू असताना २९ जानेवारी रोजी उपचार सुरु असताना त्यांचा मृत्यू झाला. ही बाब माहित होताच नातेवाईकांनी रुग्णालयातून पळ काढला.त्यांच्याशी डॉक्टरांनी संपर्क केला असता, त्यांनी येणार नसल्याचे सांगितले.

### फ्रॉकने पेट घेतल्याने बालिका जखमी

**सोलापूर, दि. २९ जानेवारी -**

घरासमोर शेकोटी करत असताना अंगावरील फ्रॉकने पेट घेतल्याने १३ वर्षाची बालिका जखमी झाली आहे. हा प्रकार उत्तर सोलापूर तालुक्यातील तेलगाव सिना येथे बुधवारी सकाळी ६ च्या सुमारास घडला. सोनाली विष्णु बंडगर (वय १३, रा. तेलगाव सिना, उ. सोलापूर) असे भाजून जखमी झालेल्या बालिकेचे नाव आहे. काही दिवसांपासून पुन्हा थंडीचा कडाका वाढला आहे. थंडीपासून वाचण्यासाठी सोनाली हिच्या घरासमोर बुधवारी सकाळी सहाच्या सुमारास शेकोटी करत असताना अचानक तिच्या अंगावरील फ्रॉकने पेट घेतला. यात पाठीला भाजल्याने वडील विष्णु यांनी सकाळी ९.५५ वाजता शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल केले. या घटनेची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### माढा शहरात बिबट्यासदृश्य प्राण्याचे दर्शन

**माढा, दि. २९ जानेवारी-**

माढा-सोलापूर रोड लगतच्या आर्या पब्लिक स्कूल परिसरात बिबट्यासदृश्य प्राणी दिसल्याने नागरिकांमध्ये बुधवारी रात्री नऊ वाजल्यापासून भीतीचे वातावरण पसरले आहे. शहरातील आर्या पब्लिक स्कूल परिसरात पूर्वी सूतगिरणी होती. या परिसराला घटनेची माहिती मिळताच माढा पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक नेताजी बंडगर यांनी त्या ठिकाणाला भेट देऊन पाहणी केली असता त्या ठिकाणाच्या एका घरातील सीसीटीव्हीमध्ये हा बिबट्यासदृश्य प्राण्याचे दृश्य कैद झाले आहे, असे समजले. हे समजल्यानंतर त्या सीसीटीव्ही कॅमेऱ्याचे काही दृश्य माढा पोलिसांनी फॉरेस्ट अधिकाऱ्यांना पाठवून या संदर्भात शहानिशा केली असता हा प्राणी बिबट्या नसून, रानबोका असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले आहे. माढा शहर व परिसरातील नागरिकांनी घाबरून जाऊ नये असे आवाहन वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी केले आहे. कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये, असेही अधिकाऱ्यांकडून सांगण्यात आले.

### होटगी स्टेशन येथे पैशाच्या कारणातून मारहाण

**सोलापूर, दि. २९ जानेवारी -**

पैशाच्या कारणातून होटगी स्टेशन येथे तरुणाला लोखंडी रॉड व लाथाबुक्यांनी मारहाण केली. ही मारहाण मंगळवारी रात्री ७.३० वाजता झाली. सुमित शशीकांत शिंदे (वय १९) असे मारहाण करण्यात आलेल्या तरुणाचे नाव आहे. मंगळवारी रात्री ७.३० वाजता राहत्या घराजवळ थांबला होता. त्यावेळी दयानंद बसवराज बंडगर हा तेथे आला. त्यांच्यात पैशाच्या कारणातून वाद झाला. या वादातून दयानंद याने लोखंडी रॉड व लाथ्राबुक्यांनी मारहाण केल्याने सुमितच्या सर्वांगास मुकामार लागल्याने वडील शशीकांत यांनी रात्री १०.१५ च्या सुमारास शासकीय रुग्णालयात दाखल केले. या घटनेची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### महावीर चौकात चारचाकीची दुचाकीला धडक

**सोलापूर, दि. २९ जानेवारी -**

विजापूर रोड येथून गुरुनानक चौकाकडे जाताना महावीर चौकात चार चाकी वाहनाची धडक बसल्याने दुचाकीवरील दोघे जखमी झाले. हा अपघात बुधवारी रोजी सकाळी ८ वाजता घडला. अंबादास नागप्पा पेरणे (वय ४०, रा. नेहरू नगर, सोलापूर) व प्रणिता सचिन भोसले (वय १७, रा.आदित्य नगर, सोलापूर) अशी अपघातात जखमी झालेल्यांची नावे आहेत. बुधवारी सकाळी आठ वाजता दुचाकीवरून अंबादास व प्रणिता असे दोघे दुचाकीवर बसून गुरूनानक चोकाकडे जात होते. दरम्यान ते महावीर चौकात आले असता, समोरून आलेल्या चार चाकी वाहनाच्या चालकाने दुचाकीला धडक दिली. अंबादास हे डोक्याला तर प्रणिता ही उजव्या हाताला खरचटून जखमी झाली. सकाळी ८.५० वाजता सागर भोसले यांनी उपचारास दाखल केले. या घटनेची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### सिध्देश्वर गड्डा यात्रेत तिघांना मारहाण

**सोलापूर, दि. २९ जानेवारी -**

सोलापूर - होम मैदानावरील गड्डा यात्रेत अज्ञात कारणातून तिघांना १५ जणांच्या जमावाने मारहाण केली. ही भांडणे मंगळवारी रात्री आठच्या सुमारास झाली. श्रीनिवास किरण मुदगल (वय २५), अनिल श्रीनिवास विटकर (वय २२) व आकाश अशोक जाधव (वय २५, रा. रविवार पेठ, सोलापूर) अशी मारहाण झालेल्यांची नावे आहेत. यातील तिघे जखमी हे मंगळवारी रात्री आठच्या सुमारास गड्डा यात्रा पाहण्यासाठी होम मैदानावर गेले होते. दरम्यान मार्केट पोलीस चौकीसमोरील पाणी बोटजवळ अनोळखी १० ते १५ जणांनी अज्ञात कारणातून लाथाबुक्यांनी तसेच फायटरने मारहाण केली. यात श्रीनिवासच्या पाठीवर, अनिलच्या नाकास आणि चेहऱ्याला तर आकाशच्या उजव्या खांद्याला जखम झाली. तसेच तिघांनाही मुकामार लागल्याने सिद्राम मंजेरी यांनी उपचारास दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.



### शांताबाई पाटील यांचे निधन

**सोलापूर, दि. २९ जानेवारी -**



महानगरपालिकेचे माजी सभागृह नेता तथा श्री बृहन्मठ होटगी संस्थेचे संचालक शिवानंद पाटील यांच्या मातोश्री शांताबाई सिद्धाराम पाटील (वय ७२) यांचे निधन झाले. त्यांची अंत्ययात्रा गुरुवार ३० जानेवारी रोजी दुपारी १ वाजता आकाशवाणी केंद्राजवळील राहत्या घरातून निघून मौजे होटगी, ता. द. सोलापूर येथील शेतात अंत्यसंस्कार करण्यात येणार आहे त्यांच्या पश्चात तीन मुले, एक मुलगी, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

# जिल्हा नियोजन समितीची आज गाजणार बैठक

## ● नूतन पालकमंत्र्यांच्या उपस्थितीत ठरणार वार्षिक बजेट
## ● गतवर्षी ७०२ कोटी तर यंदा ८०० कोटीच्या पुढे जाणार विकास आराखडा

**तभा वृत्तसेवा । अविनाश गायकवाड**
**सोलापूर, दि. २९ जानेवारी-**

जिल्हा वार्षिक नियोजन समिती (डीपीसी) ही जिल्ह्याच्या विकासासाठी तयार केलेली घटनात्मक संस्था आहे. जिल्ह्यातील पंचायती आणि नगरपालिकांनी तयार केलेल्या योजनांचे एकत्रीकरण करून, जिल्ह्याचा प्रारूप विकास आराखडा तयार करणे हे डीपीसीचे काम आहे. जिल्ह्याच्या विकासाच्या प्रक्रियेत डीपीसीची भूमिका महत्त्वाची असते. या डीपीसीची बैठक आज गुरूवार, ३० जानेवारी रोजी नूतन पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या अध्यक्षतेखाली होत आहे.

गतवर्षी या डीपीसी बैठकीत ७०२ कोटीच्या जिल्हा विकास आराखड्यास मंजुरी देण्यात आली होती; यंदा यामध्ये किमान १०० कोटीपर्यंत वाढ होण्याचे संकेत असून, एकंदरीत ८०० कोटीच्या पुढे हा जिल्हा विकास आराखडा जाण्याची शक्यता आहे. यातून वर्षभराच्या विकासकामांचे नियोजन केले जाणार आहे. दरम्यान, जिल्ह्याच्या विविध प्रश्नांवर मात्र सत्ताधारी अन् विरोधकांची




जुगलबंदी रंगणार असल्याचे संकेत सध्यातरी मिळत आहेत.

गेल्या ३ वर्षापासून राज्यात जिल्हा परिषद सदस्य, महानगरपालिका नगरसेवकांच्या निवडणुका न झाल्याने अनेक कार्यकर्त्यांना जिल्हा नियोजन समितीचा निमंत्रित सदस्य म्हणून एकनाथ शिंदे सरकारने संधी दिली होती. यामध्ये १४ जणांचा सहभाग होता. मात्र आता नव्याने विधानसभा निवडणुका होवून नव्याने सरकार स्थापन झाल्याने जुन्या सदस्यांच्या निवडी रद्द झाल्या असून, त्यांना गुरुवारच्या डीपीसीच्या बैठकीत प्रवेश दिला जाणार नसल्याचा 'जीआर' शासन स्तरावरून निघाला आहे आणि आता नव्याने या समितीच्या निवडी जाहीर झाल्यानंतरच नवीन सदस्यांना पुढील जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीला प्रवेश दिला जाणार आहे. या निवडीमध्येही महायुतीच्या ३ पक्षातील पदाधिकाऱ्यांना संधी मिळणार आहे.

उद्याच्या जिल्हा नियोजन विकास आराखडा बैठकीस जिल्ह्यातील नियोजन समिती सदस्यांना प्रवेश नसल्याने विविध प्रश्नांवर चर्चा कमी होणार असली तरी सत्तेतील आमदार आणि पालकमंत्र्यांना जिल्हा विकासाच्या विविध प्रश्नांवर जाब विचारण्यासाठी जिल्ह्यातील विरोधी पक्षातील अभ्यासू आमदार, खासदार आहेतच. यामुळे गुरूवारची डीपीसी बैठक चांगलीच रंगणार असल्याचीही चर्चा राजकीय वर्तुळातून रंगू लागली आहे. गेल्या आढावा बैठकीत उच्च तंत्र शिक्षणमंत्री तथा तत्कालिन पालकमंत्री चंद्रकांत दादा पाटील यांच्यासमोरच खासदार ओमराजे निंबाळकर, खा. धैर्यशील मोहिते-पाटील, खा. प्रणिती शिंदे आणि काही जिल्हा नियोजन समिती सदस्यांची जनतेच्या विविध प्रश्नांवर चांगलाच राडा घातला आणि चंद्रकांत दादांना धारेवर धरले होते.

यंदाही जिल्हा नियोजन बैठकीच्या एक दिवस अगोदरच खासदार ओमराजे निंबाळकर यांनी बार्शी तालुक्यातील विविध खात्याचे अधिकारी आणि जिल्ह्यातील इतर वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत जिल्हा नियोजन समिती सभागृहात आढावा बैठक घेवून शेतकरी आणि सर्वसामान्य नागरिकांच्या विविध प्रश्नांवर धारेवर धरल्याची चर्चा बुधवारी दिवसभर रंगली. जनतेच्या कामात हयगय केली तर तुमची अन् माझी गाठ आहे; असा सज्जड दम खा. ओमराजेंनी दिल्याचेही काही अधिकाऱ्यांनी नाव न छापण्याच्या अटीवर सांगितले. ४ दिवसांपूर्वीच खा. प्रणिती शिंदे, खा. धैर्यशील मोहिते पाटील यांनीही आढावा बैठक घेवून जनहिताच्या कामात अधिकाऱ्यांनी हयगय करू नये, असा इशारावजा सल्ला दिला होता. यामुळे ३० तारखेच्या डीपीसी बैठकीकडे अवघ्या जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

### पालकमंत्र्यांचा लागणार कस!



जिल्हा नियोजन समितीसाठी आयोजित बैठकीत उपस्थित असलेल्या सर्व पदाधिकाऱ्यांना जिल्ह्यातील जनतेच्या विविध विकास कामांवर, खर्च झालेल्या निधीवर चर्चा करता येते, सूचना करता येतात. मात्र एखाद्या निर्णयावेळी सर्वांना मतदान करता येत नाही. जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत काही नियोजन समिती सदस्यांना बोलू न दिल्याने अनेकवेळा शाब्दिक चकमक आपल्या जिल्ह्यात पहावयास मिळालेली आहे. मात्र आता जिल्हा नियोजन समितीचे निमंत्रीत सदस्य नसल्याने शाब्दिक चकमकी कमी घडतील मात्र विरोधी पक्षातील आमदार-खासदारांचे म्हणणे पालकमंत्र्यांनी ऐकून नाही घेतल्यास पहिला पाढा पंचावन्न होणार असल्याचेही सांगण्यात येते.

# सर्वांनी एकत्र येत गाव अन् जिल्हा समृद्ध करावा : आ. सुभाष देशमुख

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ जानेवारी-**



आपल्या गावाची ताकद ओळखा, प्रत्येक कुटुंब सक्षम करा, घराघरामध्ये, गावागावामध्ये विकासाच्या स्पर्धा लावा, भेंड गावाने पाण्याची पातळी वाढवण्यासाठी अत्यंत चांगले काम केले आहे. गट तटाचे राजकारण न करता सर्वांनी एकत्रित येत काम करत आपले गाव, जिल्हा समृद्ध करावा, असे आवाहन आ. सुभाष देशमुख यांनी केले.

अटल भुजल योजना जिल्हांतर्गत आ. देशमुख यांनी अभ्यास सहल काढून आदर्श गाव (भेंड, ता. माढा) येथे सदिच्छा भेट दिली, त्यावेळी आ. देशमुख बोलत होते. यावेळी माजी समाजकल्याण सभापती शिवाजी कांबळे, माजी जि. प. सदस्य भारत शिंदे यांनी प्रमुख उपस्थिती होती. भेंड हे जिल्ह्यातील मॉडेल गाव म्हणून पुढे येत आहे. या गावामध्ये लोकसहभागाच्या माध्यमातून पाणी, जलसंधारण, बायोगॅस समृद्ध गाव या विषयावर काम सुरू करावे. प्रत्येक गावाने स्वतःची ओळख निर्माण करावी व आपल्या गावात कृषी पर्यटन निर्माण करावे. यामुळे रोजगार निर्मिती होते. जिल्ह्यात धार्मिक पर्यटन स्थळे खूप आहेत त्याची प्रसिद्धी करा आणि आपले गाव एका उत्पादनाने प्रसिद्ध ; असे आवाहनही आ. देशमुख यांनी केले. यावेळी सुभाष रणदिवे, कनिष्ठ भूवैज्ञानिक डॉ. संजय साबळे, यशदा प्रशिक्षक शिवाजी पवार, कृषीतज्ज्ञ शरद गायकवाड, भेंड गावचे सरपंच डॉ. मनिषा दळवी, माजी सरपंच डॉ. संतोष दळवी, प्रवीण गायकवाड यांच्यासह जिल्ह्यातील सरपंच व गावचे प्रतिनिधी उपस्थिती होते.



### ज्ञान प्रबोधिनीतर्फे ३२६ महिलांची सहल...

**सोलापूर :** ज्ञान प्रबोधिनीतर्फे प्राणायाम वर्गातील ३२६ महिलांची देवदर्शन, स्नेहवर्धन आणि प्रबोधन व्हावे, या उद्देशाने पंढरपूर-मंगळवेढा-माचणूर येथे सहल झाली. सोलापुरात ज्ञान प्रबोधिनीतर्फे ६ प्रभागात ३६ गटांतून सुमारे ४०० विडी कामगार महिला दररोज प्राणायाम करतात. त्यातील ३२६ महिला व त्यांच्या परिवारातील मिळून ३६० जणांची सहल पार पडली.

# घरफोडी करणाऱ्यास अटक; ३ लाखांचा मुद्देमाल जप्त

## पाच गुन्हे उघडकीस; शहर गुन्हे शाखेची कारवाई

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २९ जानेवारी -**

सोलापूर शहर गुन्हे शाखेच्या पोलिसांनी घरफोडी करणाऱ्या कर्नाटकातील गुन्हेगारास अटक करून त्याच्याकडून पाच गुन्हे उघडकीस आले आहेत. या कारवाईत पोलिसांनी ८६.७ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने व रोख रक्कम असा ३ लाख १ हजार २०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

सोहेल नुरअहमद किरेसूर (वय २५, रा. पोस्ट ऑफीसच्या मागे, स्टेशन रोड, बागलकोट, कर्नाटक सध्या रा. रेल्वे स्टेशन, सोलापूर) असे अटक करण्यात आलेल्याचे नाव आहे. सोहेल किरेसूर याच्याकडून विजापूर नाका, जेलरोड, सलगर वस्ती, एमआयडीसी आणि सदर बझार पोलिस ठाण्यातील गुन्हे उघडकीस आले आहेत. सोहेल हा रेल्वे स्टेशन परिसरात राहून बंद घरांची दिवसा पाहणी करून रात्री घरफोड्या चोऱ्या करीत असल्याचे पोलिस तपासात निष्पन्न झाले आहे.

### यांनी केली कामगिरी...

पोलिस आयुक्त एम राजकुमार, उपायुक्त डॉ. दिपाली काळे, सहायक आयक्त राजन माने, पोलिस निरीक्षक सुनिल दोरगे यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलिस निरीक्षक संदीप पाटील, पोलिस अमंलदार विजयकुमार वाळके, विद्यासागर मोहिते, तात्यासाहेब पाटील, गणेश शिंदे, योगेश सावंत, सतिश काटे, बाळासाहेब काळे, निलोफर तांबोळी, सायबर पोलिस ठाण्याकडील प्रकाश गायकवाड व मच्छिंद्र राठोड यांनी केली.



२६ जानेवारी रोजी शहर गुन्हे शाखेचे पोलिस पथक हे होम मैदान येथे गड्डा यात्रेत पेट्रोलिंग करीत होते. त्यावेळी पोलिसांच्या रेकॉर्डवरील घरफोड्या करणारा सराईत गुन्हेगार सोहेल किरेसूर हा ज्ञान प्रबोधनी शाळेच्या बाजूच्या रोडवर थांबला असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार पोलिसांनी सोहेल किरेसूर यास त्याच्याकडील एका बँगसह सापळा लावून ताब्यात घेतले. पोलिसांनी सोहेल याची तपासणी केली असता त्याच्याकडे असलेल्या बॅगेमध्ये सोन्याचे दागिने व रोख रक्कम मिळून आली. त्यामुळे पोलिसांनी त्याच्याकडे अधिक चौकशी केल्यानंतर त्याने सोलापूर शहरात अनेक ठिकाणी चोऱ्या केल्याचे सांगितले.

पोलिसांच्या तपासामध्ये सोहेल याने जानेवारी २०२५ मध्ये सोलापूर शहरात ३ घरफोड्या. नोव्हेंबर २०२४ मध्ये एक, मे २०२३ मध्ये एक घरफोडी करून सोन्याचे दागिने चोरल्याचे निष्पन्न झाले. त्यानुसार पोलिसांनी सोहेल याच्याकडून पाच गुन्हे उघडकीस आणून त्यामधील सुमारे ८६.७ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने व रोख १५ हजार रुपये असा ३ लाख १ हजार २०० रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला.



# भारतीय भाषेत नैतिक मूल्ये : प्रा. बिराजदार

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २९ जानेवारी-**

भारतीय भाषेत नैतिक मूल्ये व जीवन कौशल्ये समाविष्ट असून स्वजाणीव, सम अनुभूती, समस्या निराकरण, निर्णय क्षमता, परिणामकारक संप्रेषण, चिकित्सक विचार प्रक्रिया, सर्जनशील विचार, आंतर मानवीय व्यवहार, भावनिक अनुकूलता, ताणतणावाचे समायोजन यासारख्या जीवन कौशल्यामुळे आपले जीवन सफल होईल. भाषाई कौशल्य व जीवन कौशल्ये दोन्ही एका नाण्याच्या दोन बाजू असून जीवन कौशल्यामुळे जगणे सुखकर होईल असे मत माउंट कार्मेल स्वायत्त महाविद्यालय, बेंगलोर येथे 'हिंदी भाषा कौशल, भाषाई दक्षता आणि भारतीय ज्ञान परंपरा' या विषयावर आयोजित अंतर्राष्ट्रीय चर्चासत्रात प्रा. धन्यकुमार बिराजदार यांनी मांडले. यावेळी राष्ट्रपती सन्मानाने सन्मानित डॉ. मंजरी पांडेय, ज्येष्ठ साहित्यकार डॉ.जयप्रकाश कर्दम, डॉ. हरिश अरोड़ा, आयोजक डॉ. कोयल विश्वास, डॉ. वाणीश्री बुग्गी उपस्थित होते.

# अंतराळात पाठविलेले ३ उपग्रह बनविण्यात सोलापूरच्या नीरज गाडीचे योगदान

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २९ जानेवारी -**

भारतात प्रथमच एका कंपनीतर्फे नुकतेच अंतराळात पाठविलेले ३ उपग्रह बनविण्याच्या प्रकल्पात सोलापूरचे सुपुत्र नीरज जनार्दन गाडी यांचे मोठे योगदान आहे. सोलापूरच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवणारी ही गोष्ट असून सोलापूरकरांच्यादृष्टीने ही अतिशय अभिमानास्पद अशी बाब आहे.

बंगळुरुस्थित पिक्सेल या खाजगी कंपनीने हे ३ उपग्रह बनविले आहेत. भारताच्या इतिहासात यापूर्वी पाठविण्यात आलेले उपग्रह हे केंद्र शासनाच्या इस्रो या संस्थेमार्फत पाठविण्यात आले होते. पण नुकतेच १५ जानेवारी रोजी अमेरिकेतील कॅलिफोर्निया येथून पाठविण्यात आलेले ३ उपग्रह भारताच्या पिक्सेल या कंपनीमार्फत पाठविण्यात आले. भारतात





खाजगी कंपनीमार्फत उपग्रह पाठविण्याची ही पहिलीच वेळ आहे. या कंपनीने अमेरिकेतील प्रख्यात स्पेस एक्स या कंपनीद्वारे हे उपग्रह अंतराळात पाठविले. या प्रकल्पाकामी या कंपनीची सुमारे २०० टीम कार्यरत होती.

यामध्ये या कंपनीमध्ये प्रॉडक्शन इंजिनिअर या क्रमांक दोनच्या पदावर कार्यरत असलेल्या व मूळचे सोलापूरचे असलेल्या नीरज जनार्दन गाडी यांचे योगदान आहे. राजस्थानमधील बिट्स, पिलानी येथे बी. ई. (मेकॅनिकल) तसेच फ्रान्समध्ये एरोस्पेस इंजीनिअरिंग मध्ये एम.एस. केलेले नीरज हे सन २०२२ मध्ये या कंपनीत प्रॉडक्शन इंजिनिअर यापदी रुजू झाले. अवेस अहमद व क्षीतिज खंडेलवाल हे नीरज यांचे बिट्स, पिलानी येथील बॅचमेट आहेत, हे विशेष. नीरज हे येथील अश्विनी सहकारी रुग्णालयाचे माजी संचालक रामचंद्र गाडी यांचे नातू व ज्येष्ठ पत्रकार वेणुगोपाळ गाडी यांचे पुतणे आहेत. या कंपनीत कार्यरत असलेल्या नीरज गाडी यांनी प्रॉडक्शन इंजिनिअर या नात्याने उपग्रहाविषयी पारंगत असणाऱ्या सुमारे ५० जणांची टीम बनवून त्यांना मार्गदर्शन केले. नंतर उपग्रह तयार करण्याची प्रक्रिया बनवून त्या संपूर्ण प्रक्रियेचे पर्यवेक्षण केले. उपग्रह बनविल्यावर कॅलिफोर्निया येथे जाऊन स्पेस एक्स या कंपनीच्या रॉकेटशी उपग्रहांची जुळवाजुळवही केली. हे तीनही उपग्रह अंतराळात यशस्वीपणे पाठवण्यात पिक्सेल कंपनीला यश आले, ज्याचे देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मन की बात या कार्यक्रमात कौतुक केले.

### उपग्रह काढणार पृथ्वीवरील विविध गोष्टींची छायाचित्रे...

पिक्सेल कंपनीने हायपर स्पेक्ट्रल पिक्चरबाबत इनोव्हेशन केले आहे. ज्याद्वारे उपग्रहामार्फत पृथ्वीवरील २०० विविध रंगांची छायाचित्रे टिपता येणार आहे. त्याचा उपयोग करून वृक्ष, पीक, माती, हवा, पाणी, शहरी नियोजन आदींबाबत सूक्ष्म वैज्ञानिक माहिती मिळवता येणार आहे. हायपर स्पेक्ट्रल पिक्चरच्या माध्यमातून एका छायाचित्रात १०० स्क्वेअर किलोमीटरपर्यंतचा डेटा उपलब्ध होणार आहे, अशी माहिती नीरज गाडी यांनी दिली.

### येत्या ६ महिन्यांत आणखी ३ उपग्रह पाठविणार

पिक्सेल कंपनीच्यावतीने ३ उपग्रह यशस्वीपणे अंतराळात पाठविण्याचे मिशन पूर्ण झाल्याच्या पार्श्वभूमीवर येत्या ६ महिन्यांत आणखीन ३ उपग्रह अंतराळात पाठविण्याचा या कंपनीचा प्रकल्प आहे. यासंदर्भात कंपनीची टीम मेहनत घेत आहे. हा प्रकल्पदेखील यशस्वी होईल, असा कंपनीला विश्वास आहे.

## अग्रलेख...

# ...तोपर्यंत त्यांना प्रगल्भ म्हणता यायचे नाही!

इंदिरा गांधी पंतप्रधान असताना १९७५ साली त्यांनी गरिबी हटावचा नारा दिला होता. पण, प्रत्यक्षात काँग्रेसच्या सत्ताकाळात गरिबांच्या मतांचे फक्त राजकारण केले गेले आणि गरिबी हटण्याऐवजी गरीबच हटवले गेलेत. प्रत्येकवेळी गरिबीच्या नावाने राजकारण करण्यात काँग्रेस यशस्वी होत गेली आणि याच काँग्रेसने देशावर सर्वाधिक काळ राज्य केले. आज परिस्थिती बदलली आहे. जनता हुशार झाली आहे, स्वतःच्या हक्कांप्रति जागरूक झाली आहे. त्यामुळेच २०१४, २०१९ आणि २०२४च्या लोकसभा निवडणुकीत मतदारांनी संधिसाधू काँग्रेसला घरी बसवून मोदींच्या नेतृत्वावर विश्वास ठेवत भाजपाच्या हाती सत्ता सोपविली आहे. तेव्हापासून काँग्रेसचे नेते राहुल गांधी हे सातत्याने फक्त मोदी आणि भाजपावरच टीका करीत आहेत, परदेशात जाऊन भारताची बदनामी करीत आहेत. ते दिशाहीन राजकारण करीत असल्याने काँग्रेसचे राजकीय भवितव्यही अंधकारमय झाले आहे. असे असले तरी मोदींच्या दहा वर्षांच्या कार्यकाळात देशातील गरिबी मोठ्या प्रमाणात दूर झाली, हे वास्तव आहे.

मध्यंतरी राहुल गांधी अमेरिकेत गेले होते. घराणेशाहीबाबत आणि भारतातील एकूण स्थितीबाबत ते तेथे बोलले. कोणी कुठे काय बोलावे, याचे प्रत्येकाला स्वातंत्र्य आहे. असे असले तरी बोलताना तारतम्य बाळगण्याचे भान ठेवणे तेवढेच आवश्यक आहे. घराणेशाही तर भारतात चालतच राहणार, ती सगळीकडेच आहे, केवळ काँग्रेसमध्ये नाही. त्यामुळे इतरांनी आमच्यावर टीका करू नये, अशी अपेक्षा राहुल गांधी यांनी व्यक्त केली होती. ती अजिबात योग्य नाही. देशात घराणेशाहीची सुरुवात काँग्रेसनेच केली. पंडित नेहरूंनंतर इंदिरा गांधी, इंदिरा गांधींनंतर राजीव गांधी, त्यांच्यानंतर सोनिया आणि राहुल गांधी काँग्रेसची धुरा सांभाळत आहेत. मल्लिकार्जुन खडगे हे फक्त नामधारी अध्यक्ष आहेत. त्यामुळे लोक काँग्रेसवर घराणेशाहीचा आरोप करणारच. शिवाय, काँग्रेस पक्षातल्या अनेक नेत्यांची मुलेही सक्रिय राजकारात उतरली आहेत. अनेकांची मुले आमदार आणि खासदार झाली आहेत. यात काही गैर नाही आणि हे असे चालतच राहणार, असे जर राहुल गांधी म्हणत असतील तर त्यांचे राजकीय भवितव्य किती उज्ज्वल आहे, हे येणारा काळच सांगेल. ज्या काँग्रेसने घराणेशाही जन्माला घातली, त्याच काँग्रेसने घराणेशाही संपुष्टात आणण्यासाठी पुढाकार घेतला असता तर अन्य राजकीय पक्षांनाही त्याबाबत विचार करावा लागला असता. काँग्रेसने जन्माला घातलेली घराणेशाही इतर राजकीय पक्षांमध्येही आली आहे, हे नाकारता येत नाही. पण, ज्यांनी घराणेशाहीची सुरुवात केली, ते तिचा बचाव करीत असतील आणि त्यासाठी नेहरूंनी देशासाठी काय काय केले, याचा पाढा वाचणार असतील तर २०२९ च्या सार्वत्रिक निवडणुकीत मतदार पुन्हा त्यांना जागा दाखवून देतील यात शंका नाही. पंडित नेहरूंच्या राजवटीत देशात उच्च शिक्षण देणाऱ्या अनेक संस्था स्थापन झाल्या, पंडित नेहरू यांनीच देशाला वैज्ञानिक विचार दिला आणि आयआयटीसारख्या संस्थांनाही जन्म दिला असा युक्तिवाद काँग्रेसकडून कायम केला जात असतो. पण, या देशात असलेली गरिबी वाढविण्याला, भ्रष्टाचाराची कीड फैलावण्याला, घराणेशाहीचा विस्तार करण्यालाही आम्हीच जबाबदार आहोत, हे काँग्रेस कधीच मान्य करीत नाही. काँग्रेसचे नेते स्वतःच्या सोईने खरे-खोटे बोलत असतात, हे देशाने अनुभवले आहे.

ज्या भारतीय जनता पार्टीवर काँग्रेसकडून कायम जातीयवादाचा आरोप केला जातो, त्याच काँग्रेसने देशातील मुस्लिमांचे लांगूलचालन करीत बहुसंख्य असलेल्या हिंदू समाजावर अन्याय केला आहे, याचा विसर पडता कामा नये. झालेल्या चुकांमधून धडा शिकायला काँग्रेस तयार नाही. २०१४, २०१९ आणि २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत मतदारांनी जोरदार आपटी दिल्यानंतरही काँग्रेस स्वतःमध्ये सुधारणा करायला तयार नाही. ज्या मुस्लिम समुदायाने काँग्रेसला कायम साथ दिली, त्या समुदायाच्या अधोगतीला काँग्रेसच जबाबदार आहे, हे मुस्लिमांच्याही आता लक्षात आले आहे आणि त्यामुळेच ते काँग्रेसेतर भाजपाविरोधी पक्षांकडे वळले आहेत, हेही काँग्रेस लक्षात घ्यायला तयार नाही. मुस्लिमांच्या एकगठ्ठा मतांसाठी बहुसंख्य हिंदू समाजाच्या हिताकडे दुर्लक्ष केल्याचा मोठा फटकाही काँग्रेसला बसला आहे. भाजपाने हिंदुहिताचा मुद्दा हाताळला तर लागलीच भाजपाला जातीयवादी ठरवायचे आणि मुस्लिमांच्या मनात भाजपाची प्रतिमा व्हिलनसारखी निर्माण करायची, असला उद्योग केल्यानेच काँग्रेसने मार खाल्ला आहे, याचाही विसर काँग्रेसने पडू देता कामा नये. राहुल गांधी अमेरिकेत जातात तेव्हा तिथे बोलताना घराणेशाही तर सगळीकडेच असल्याचे सांगत काँग्रेसच्या भूमिकेचे समर्थन करतात. पण, आज देशातील जी चार सर्वोच्च पदं आहेत, त्यापैकी एकाही पदावर घराणेशाहीतून आलेली व्यक्ती आरूढ झालेली नाही, हे त्यांनी लक्षात घेतले पाहिजे. राष्ट्रपतिपदी आरूढ झालेल्या द्रौपदी मुर्मू यांना कुठलाही राजकीय वारसा नाही. पंतप्रधानपदी आरूढ झालेले नरेंद्र मोदी यांच्या कुटुंबातील कोणतीही व्यक्ती कधीच राजकारणात नव्हती. उपराष्ट्रपती झालेले जगदीप धनकड यांनाही राजकीय वारसा नाही. लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांच्या घरातीलही कोणी कधी राजकारणात नव्हते. आपल्या नागपूरचे नितीन गडकरी भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष राहिले आहेत. आता ते केंद्रात दिग्गज मंत्री आहेत. हे फक्त भारतीय जनता पार्टीतच होऊ शकते, हे राहुल गांधी यांनी लक्षात घेणे गरजेचे आहे. लालूप्रसाद यादव यांनी तर बिहारमध्ये घराणेशाहीचे किळसवाणे अन् ओंगळवाणे प्रदर्शन घडविले आहे. तिकडे उत्तरप्रदेशात मुलायमसिंहांनी मुलगा अखिलेशला मुख्यमंत्री केले होते. त्याने बापाचे कसे बारा वाजवले, हे आपल्या सगळ्यांनाच माहिती आहे. त्यामुळे राहुल गांधी यांनी घराणेशाहीचे समर्थन न करता झालेली चूक मान्य करत पुढची वाटचाल केली तरच ते राजकारणात यशस्वी होतील. अन्यथा, २०१४, २०१९ आणि २०२४ ची पुनरावृत्ती २०२९ मध्ये होणारच आहे. कोणत्या पक्षात घराणेशाही आहे, देश कोण चालवतो आहे यापेक्षा देशाचा कारभार कसा चालविला जातो आहे, याला सामान्य माणसाच्या लेखी जास्त महत्त्व आहे. देशाचा कारभार चांगला चालला पाहिजे, मग तो घराणेशाहीतून असो वा अन्य कसा, ही सामान्य माणसाची भावना आहे. पण, अनुभव तर हेच सिद्ध करतो की घराणेशाहीपेक्षा इतरांकडून राज्यकारभार उत्तम रीतीने चालविला जात आहे. अटलबिहारी वाजपेयी पंतप्रधान असताना देशात एक विश्वासाचे वातावरण तयार झाले होते आणि आता मोदी पंतप्रधान असताना सामान्य माणसामधील आत्मविश्वास वाढीस लागला आहे. देशातल्या गरिबाचा, समाजातल्या शेवटच्या घटकाचा विकास झाला पाहिजे, यासाठी मोदी सरकार काम करीत आहे. काँग्रेस पक्ष अनेक वाईटांचे आणि अपयशाचे प्रतीक बनला होता आणि काँग्रेसच्या राजवटीत जो भ्रष्टाचार माजला होता, मोठमोठे घोटाळे झाले होते, त्याला कंटाळूनच जनतेने काँग्रेसला नेस्तनाबूत केले, हेही विसरता येणार नाही. काँग्रेसच्या नाकर्तेपणामुळेच घराण्यात कुणीही राजकीय व्यक्ती नसताना देशातल्या चार सर्वोच्च पदांवर जनतेने अतिशय सामान्य कुटुंबातल्या व्यक्तींना आरूढ केले आहे. राहुल गांधी यांच्या व्यक्तिमत्त्वात सुधारणा झाली, त्यांच्या ठायी राजकीय परिपक्वता आली, ते आता प्रगल्भ झाले आहेत, असा दावा काँग्रेसच्या नेत्यांकडून केला जात असला आणि राहुल गांधी पंतप्रधानपदासाठी पात्र झाले आहेत असा युक्तिवाद त्यांच्या भगिनी प्रियांका वढेरा यांच्याकडून केला जात असला तरी देशातील जनतेला मात्र राहुल गांधी यांच्या व्यक्तिमत्त्वात कोणतीही सुधारणा झालेली दिसत नाही, हे वास्तव आहे. देशहिताला प्राधान्य देऊन राहुल गांधी विदेशात जाऊन भारताची बदनामी करणे थांबवत नाहीत, तोपर्यंत तरी त्यांच्या व्यक्तिमत्त्वात सुधारणा झाली, असे म्हणता यायचे नाही.

## इतस्ततः

**डॉ. विवेक राजे**

# हिजाबी विरोधाभास

कुणी तरी एका ब्लॉगरने आपल्या ब्लॉगवर लिहिले की, ''हिजाब घालणे हे शालीनतेचे प्रतीक आहे. यावर बंदी घालणे हे मुस्लिम स्त्रियांना हिजाब घालण्याच्या स्वातंत्र्यापासून वंचित ठेवणे आहे. तसेच हिजाब बंदी म्हणजे जगातील सर्व स्त्रियांच्या पेहराव निवडीच्या स्वातंत्र्यावरील आक्रमण आहे. म्हणून जगातील सर्व स्त्रियांनी एकत्र येऊन ही स्त्री स्वातंत्र्याची लढाई भारतासारख्या पर्दा प्रथा नसलेल्या देशातील हिंदू स्त्रियांनी देखील लढायला पाहिजे.'' 'हिजाब वापरण्याने स्त्रियांचे सबलीकरण म्हणजे एम्पॉवरमेंट होते म्हणून मुस्लिमेतर स्त्रियांनी हिजाब वापरायला हवा.'

एखाद्या टाकाऊ प्रथेचे उदात्तीकरण यापेक्षा चांगल्या पद्धतीने करता येत नाही. त्यातही ज्या प्रथेचा जन्मच मुळात स्त्री स्वातंत्र्यावर घाला घालण्याच्या उद्देशाने झाला आहे, अशा प्रथेचे उदात्तीकरण करीत जगातील स्त्री शक्तीला एखाद्या चळवळीत सहभागी होण्याचे आवाहन करणे हे, शुद्ध गुलामगिरीची मानसिकता जोपासण्याचे निदर्शक मानले पाहिजे. दुर्दैवाने इस्लाममध्ये विचारस्वातंत्र्य, उपासनास्वातंत्र्य, आहार-विहारस्वातंत्र्य यांना मागील दोन हजार वर्षांपासून स्थान नाही. त्यामुळे मुस्लिम उच्चशिक्षित व्यक्तीदेखील आज स्वतंत्र विचार करताना दिसत नाही. त्यातही जेव्हा जागतिक पातळीवर इस्लामला त्यातील प्रथा परंपरा व मानसिकतेसह टीकेचे लक्ष्य केले जात असलेल्या या काळातही कुठेही दृष्टीला दिसत नाही. किंबहुना मुस्लिम स्त्रियाच या विषयावर दुभंगलेल्या दिसतात.

हिजाब हा आज जगभरात चर्चेचा विषय झालेला दिसतो. ९/११ च्या वर्ल्ड ट्रेड सेंटरवर दहशतवादी हल्ल्यात जवळजवळ ३००० लोक मृत्युमुखी पडले. अमेरिकेवर होणारा पहिलाच दहशतवादी हल्ला हा एवढा मोठा होता की त्यानंतर अमेरिकन समाजमनात एक भयगंड निर्माण झाला. त्यातून मग इस्लामिक संस्कृती, खानपान, आचरण, पेहराव याविषयी संशय निर्माण झाला. इस्लामिक स्त्रियांच्या पेहरावावर मग शंका घेतल्या जाऊ लागल्या. हिजाब म्हणजे स्त्रियांनी सर्व शरीर झाकण्यासाठी वापरले जाणारे एक वस्त्र. या हिजाबला मुस्लिम धर्मात एक विशिष्ट महत्त्व देखील आहे. त्यामागे स्त्रीचे सौंदर्य आच्छादण्याचा उद्देश आहे. स्त्रीचे सौंदर्य परपुरुषांच्या नजरेला पडू नये हा उद्देश होता. पुरुषांनी आपला मानसिक तोल सांभाळला पाहिजे याकडे इस्लाम दुर्लक्ष करतो. किंवा स्त्री संरक्षणाची वेगळी व्यवस्था निर्माण न करता, इस्लाम स्त्रीलाच बंधनात अडकवताना दिसतो. हिजाब वापरण्याचे मानसिक व आरोग्य दृष्टीने अनेक दुष्परिणाम आहेत. तसेच केस आणि चेहरा झाकण्यामुळे त्या स्त्रीची ओळख देखील झाकली जाते हे लक्षात घेतले पाहिजे. ९/११ चा दहशतवादी हल्ला हा मुस्लिम अतिरेक्यांनी केलेला असल्याने, मुस्लिम व्यक्तीच्या ओळखीला त्यानंतर विशेष महत्त्व प्राप्त झाले. या हिजाबचा किंवा बुरख्याचा वापर मुस्लिम अतिरेकी करू शकतात हे लक्षात घेऊन मग अनेक देशांमध्ये हिजाबच्या वापरावर निर्बंध घातले गेले. फ्रान्स, डेन्मार्क, स्पेन, बेल्जियम अशा देशांमध्ये हिजाब वापरण्यावर बंदी घातली गेली. काही ठिकाणी हिजाब वापरणाऱ्या मुस्लिम स्त्रियांना अपमानित केले जाऊ लागले. या सामाजिक आणि राजकीय वादाला प्रत्युत्तर देण्यासाठी २०१३ पासून अमेरिकेत हिजाब वापरणे हा स्त्रियांचा अधिकार आहे अशा स्वरूपाची चळवळ उभी केली गेली. वोक विचारसणीच्या ताब्यात असलेल्या माध्यमांनी लागलीच ही चळवळ उचलून धरली. आणि त्यातून आता १ फेब्रुवारी हा दिवस 'वर्ल्ड हिजाब डे' म्हणून साजरा करून जगातील गैर इस्लामिक स्त्रियांना गोडीगुलाबीने वा जबरदस्तीने एक दिवस इस्लामिक पेहराव चढवण्याचे षडयंत्र आकाराला आलेले दिसते. मुस्लिमेतरांना इस्लाममधील हिजाब प्रथेविषयी माहिती देणे, या पोशाखात त्यांना कसे सुरक्षित वाटते याचा अनुभव देणे (की पटवून देणे), वर्षातून एक दिवस एक वेगळा पोशाख, वेगळी फॅशन असे या चळवळीचे गोंडस आणि वरकरणी निरुपद्रवी उद्देश सांगितले जातात.

त्याच वेळी इस्लामिक राष्ट्र इराणमध्ये मात्र हिजाबच्या सक्ती विरोधात आंदोलन छेडले गेले आहे. इराणमध्ये सार्वजनिक ठिकाणी हिजाब आणि ढिलेढाले कपडे असणे स्त्रियांकरिता अनिवार्य आहे. असे कपडे न घातल्यास त्या देशात दंड आणि कैद अथवा फटक्यांच्या शिक्षेची तरतूद आहे. हिजाब सक्तीच्या विरोधात तेथे चळवळ फोफावते आहे. ही आंदोलने/चळवळी 'व्हाईट वेनेस्डे' तसेच 'माय स्टिल्थी फ्रीडम' या नावाने जगभरात ओळखल्या जातात. हिजाबविरोधी आंदोलनात एका विद्यार्थिनीचा इराण पोलिसांच्या कस्टडीत मृत्यू झाल्यावर हे आंदोलन अधिकच चिघळताना दिसते. अनेक तरुणी आपला विना हिजाब फोटो समाज माध्यमांवर टाकून हिजाब विरोधी आंदोलनात सहभागी होताना दिसतात. एखाद्या विशिष्ट पोशाखाची किंवा पोशाख पद्धतीची सक्ती ही कोणत्याही व्यक्ती समूहाच्या स्वातंत्र्याचा विलोप करणारेच असते. एकीकडे इराणसारख्या इस्लामिक देशात हिजाब विरोधी चळवळ मूळ धरताना दिसते, तर त्याच वेळी अमेरिकेसारख्या अवास्तव व्यक्तिस्वातंत्र्याचा पुरस्कार करणाऱ्या देशातून 'हिजाब डे'सारख्या प्रतिगामी प्रथा जगभर पसरताना दिसून येतात. दोन्ही चळवळी एकाच काळात घडत असताना इतरत्र यावर काय भूमिका घ्यावी यावर समाज संभ्रमात दिसतो. त्यामुळे भारतासारख्या हिंदूबहुल देशातील समाजाने यावर वेळीच निश्चित भूमिका घेणे आवश्यक आहे. कोणत्याही व्यक्तीला विशिष्ट पोशाख घालण्याची सक्ती करणे हे आधुनिक स्त्रीवादाच्या आणि तथाकथित उदारमतवादाच्याही विरोधात जाणारे आहे. त्यामुळे 'हिजाब डे' आणि 'व्हाईट वेनेस्डे' या दोन चळवळी वरवर परस्परविरोधी वाटत असल्या, तरी त्यामध्ये- स्त्रियांना पोशाख निवडण्याचे स्वातंत्र्य द्यावे ही समान मागणी आहे. आणि हेच आजच्या सांस्कृतिक मार्क्सवादाचे वैशिष्ट्य आहे. दोन परस्परविरोधी चळवळींचा वापर करून एकाच वेळी अनेक ठिकाणी अराजक माजवणे हेच यांचे उद्दिष्ट होय. तर त्याच वेळी कोणत्याही प्रकारे इस्लामी प्रथा भारतीय हिंदू स्त्रियांमध्ये रुजवण्याचे इस्लाम आणि वोक विचारसरणीचे हे कारस्थान आहे. ज्या देशात हिजाब प्रथा कधीच अस्तित्वात नव्हती, ज्या देशातील वातावरण या प्रथेला कोणत्याही प्रकारे अनुकूल नाही, अशा हिंदूबहुल देशात 'हिजाब डे' किंवा 'व्हाईट वेनेस्डे'चे कोणतेही प्रयोजन असूच शकत नाही. त्यामुळे असल्या प्रथा, फॅशनच्या नावाखाली, हिंदू स्त्रियांमध्ये रुजवण्याचा हा प्रयत्न आहे. याच पद्धतीने हलाल प्रथा या देशात रूळवली गेली. तर कपाळी कुंकू किंवा गंध लावण्याच्या प्रथेचे उच्चाटन करण्याची सुरुवात झाली. मुसलमानांना मशिदीतून ध्वनिक्षेपकाद्वारे नमाजासाठी बांग देण्याची पद्धत देखील अशीच या देशात रुजवली गेली. ज्या गोष्टींची येथील नैसर्गिक वातावरणात आणि समाजात आवश्यकताच नाही अशा वरकरणी निरुपद्रवी गोष्टींचा वापर इस्लामिक संस्कृती, प्रथा परंपरा रुजविण्यासाठी केला जातो. ज्या देशात स्त्रीला आचार, विचार, आहार आणि वस्त्र निवडीचे संपूर्ण स्वातंत्र्य आहे, अशा भारतात फॅशन वा कोणत्याही नावाखाली, कोणत्याही कारणाने अशा दिवसांच्या आयोजनाचे कोणतेही औचित्य असत नाही.

प्रश्न आहे तो हा की, सहअस्तित्व आणि इतर धर्मांप्रति सन्मान राखण्याच्या नादात मुस्लिम समाजाचा दबाव आम्ही स्वीकारायचा का? या देशात बहुसंख्य असलेल्या हिंदूंनी आपली अत्यंत उदात्त आणि उदार संस्कृती विकृत करायची का? जर या प्रश्नांची उत्तरे नकारार्थी असतील तर 'हिजाब डे' आणि 'व्हाईट वेनेस्डे' आम्ही आजच नाकारले पाहिजे. आजच शाळा, महाविद्यालये, कार्यालये यातून सर्व समाजाने या इस्लामिक थेरांना स्पष्ट आणि उच्चरवाने नाही म्हटले पाहिजे. मागील काही शतकांपासून या देशावर सातत्याने होत असलेले सांस्कृतिक आक्रमण हे अनेकदा खुलेपणाने तर अनेकदा छुपेपणाने झाले आहे. दुर्दैवाने बहुसंख्य हिंदू, संख्येने अल्प असलेल्या मुस्लिम समाजाविरोधात वा मुस्लिम धर्म संस्कृती विरोधात आपला नकाराधिकार खणखणीतपणे वापरण्यात ढिसाळपणा करतात किंवा कच खातात, असा इतिहास आहे. 'हिजाब डे'सारख्या छुप्या आक्रमणाला वेळीच खुलेपणाने हिंदू समाजाने नाकारणे ही काळाची गरज आहे. विशेषतः महाविद्यालयातील हिंदू तरुणाईने ठामपणे हिजाबला नकार दिलाच पाहिजे.

९८८१२४२२२४

## दिल्ली वार्तापत्र

**श्यामकांत जहागीरदार**

# खडगे तुम्हीसुद्धा...



दिल्ली विधानसभा निवडणुकीच्या मतदानाला एक आठवडा उरला असताना काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खडगे यांनी महाकुंभमेळ्याबाबत वादग्रस्त विधान करत सेल्फ गोल केला आणि पुन्हा एकदा काँग्रेसच्या पायावर दगड पाडून घेतला आहे. २०१५ आणि २०२० च्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेसला आपले खातेही उघडता आले नव्हते. यावेळी काँग्रेस किमान आपले खाते तरी उघडेल, असे वाटत असताना काँग्रेसने आपल्या हाताने त्यावर पाणी फेरले आहे. हिंदूंना दुखावल्याशिवाय, त्यांच्या सणांची आणि उत्सवाची टिंगलटवाळी केल्याशिवाय काँग्रेसला चैन पडत नाही असे म्हणायला हरकत नाही. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीच्या आधी अयोध्येत उभारण्यात आलेल्या रामललाच्या भव्यदिव्य मंदिरातील प्राणप्रतिष्ठा कार्यक्रमावर काँग्रेसने बहिष्कार घातला होता. त्या बहिष्काराची किंमत काँग्रेसला नंतर लोकसभा निवडणुकीत मोजावी लागली होती. तरीपण काँग्रेस नेत्यांना शहाणपण येत नाही, त्यांचे डोळे उघडत नाही, याचे आश्चर्य वाटते. काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि राज्यसभेतील विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खडगे यांनी प्रयागराज येथे सुरू असलेल्या महाकुंभमेळ्याबाबत हिंदूंच्या भावना दुखावणारे विधान केले. आतापर्यंत काँग्रेसचे माजी अध्यक्ष आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी अनेकवेळा हास्यास्पद तसेच पक्षाला अडचणीत आणणारी विधाने करत होते. पण आता त्या मालिकेत राजकारणातील प्रगल्भ आणि अनुभवी नेते अशी प्रतिमा असलेले खडगे जाऊन बसले आहेत. त्यामुळे 'छोटे मियां तो छोटे मियां, बडे मियां सुभानअल्ला' म्हणण्याची वेळ आली आहे.

कुंभमेळा हा देशातील कोट्यवधी हिंदूंच्या श्रद्धेचा तसेच आस्थेचा विषय असतो. त्यात यावेळी तेथे होत असलेला मेळा हा साधा कुंभमेळा नाही तर महाकुंभमेळा आहे. दर बारा वर्षांनी कुंभमेळा होत असतो. असे बारा कुंभमेळे पूर्ण झाल्यानंतर महाकुंभमेळा होत असतो. म्हणजे महाकुंभमेळ्याचा योग हा १४४ वर्षांनी येत असतो. त्यामुळे हिंदूंच्या दृष्टीने त्याचे असाधारण असे महत्त्व आहे. मुस्लिमांच्या तुष्टीकरणात आपली पूर्ण हयात घालवलेल्या आणि तसे करताना हिंदूंकडे सोयीस्कर दुर्लक्ष करणाऱ्या काँग्रेस आणि त्याच्या नेत्यांना महाकुंभमेळ्याचे महत्त्व समजणे शक्य नाही. महाकुंभमेळ्यात देशातील जवळपास १५ कोटी भाविकांनी आतापर्यंत स्नान केले आहे. मेळा संपेपर्यंत ही संख्या ४० कोटींच्या वर जाऊ शकते. साधुसंतांसह अनेक महामंडलेश्वर तसेच संरक्षण मंत्री राजनाथसिंह, गृहमंत्री अमित शाह, उत्तरप्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ, योगगुरू बाबा रामदेव यांच्यासह अनेक केंद्रीय मंत्री आणि अनेक मान्यवरांनी गंगेत डुबकी लावली आहे. इंडिया आघाडीत असणाऱ्या समाजवादी पक्षाचे अखिलेश यादव यांनीही महाकुंभमेळ्यात जात गंगेत स्नान केले.

अमित शाह यांच्यासह अनेक केंद्रीय मंत्र्यांनी गंगेत स्नान केल्यामुळे खडगे यांचे डोके फिरले. महाकुंभमेळ्यात स्नान करून देशातील गरिबी कमी होणार का, भुकेल्यांच्या पोटाला अन्न मिळणार का, त्यांच्या हाताला काम मिळणार का, असे अकलेले तारे खडगे यांनी तोडले. असे तारे तोडत त्यांनी देशातील कोट्यवधी हिंदूंच्या श्रद्धेची आणि आस्थेची टिंगलटवाळी केली, असे म्हणायला हरकत नाही. महाकुंभमेळ्यात गरीब, श्रीमंत अशा सगळ्यांनी स्नान केले. आपली गरिबी दूर व्हावी या हेतूने यातील एकही जण येथे आला नाही. उलट पोटाला चिमटा देत तिकिटासाठी पैसे खर्च करत ते येथे पोहोचले होते. हिंदू धर्मावरील श्रद्धेपोटी त्यांना येथे ओढून आणले. खडगे यांच्या पक्षाच्या एकेकाळच्या नेत्या आणि देशाच्या तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी सत्तेवर डोळा ठेवत गरिबी हटावचा नारा देत निवडणुका लढवल्या आणि जिंकल्या पण. इंदिरा गांधींच्या गरिबी हटावच्या घोषणेनुसार देशातील गरिबांची गरिबी दूर झाली नसली तरी गांधी घराण्याची तसेच काँग्रेसच्या नेत्यांची गरिबी मात्र निश्चितपणे दूर झाली. गरिबाची नसली तरी कोणाची का होईना गरिबी त्यांनी दूर केली, असे म्हणायला हरकत नाही. महाकुंभमेळ्याबाबत आचरटपणाचे विधान करण्यापूर्वी खडगे यांनी काँग्रेस पक्षाच्या इतिहासाचा थोडा अभ्यास केला असता तर असे विधान करण्याची त्यांची हिंमत झाली नसती. १९५४ ला अलाहाबादला झालेल्या कुंभमेळ्यात तत्कालीन पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी त्रिवेणी संगमावर स्नान केले होते. लहानपणापासूनच मला गंगा आणि यमुना नदीबद्दल प्रेम होत, वय वाढल्यानंतर ते आणखी वाढत गेले, असे नेहरूंनी लिहून ठेवले आहे. १९६६ मध्ये झालेल्या कुंभमेळ्यात इंदिरा गांधी यांनीही संगमावर जात डुबकी मारली होती. २००१ मध्ये काँग्रेसच्या तत्कालीन अध्यक्ष सोनिया गांधी यांनीही अलाहाबादला जात संगमावर डुबकी मारली होती. २०२२ च्या उत्तरप्रदेशातील विधानसभा निवडणुकीच्या आधी काँग्रेसच्या महासचिव प्रियांका वढेरा यांनीही अलाहबादला जात त्रिवेणी संगमावर जात गंगेत डुबकी मारली होती. कुंभमेळ्यात जात त्रिवेणी संगमावर डुबकी मारल्यामुळेच गांधी-नेहरू घराण्याची गरिबी दूर झाली, त्यांना पंतप्रधानपदाचा रोजगार मिळाला आणि त्यांचीही पोटेही भरपेट भरली, याचा खडगे यांना विसर पडलेला दिसतो. महाकुंभमेळ्यात स्नान करून देशातील गरिबाची गरिबी दूर होणार नसली तरी गांधी घराण्याने परदेशातील बँकांत ठेवलेला काही हजार कोटींचा आपला (काळा) पैसा देशातील गरिबांना वाटला तर देशातील काही लोकांची गरिबी पूर्ण नसली तरी काही प्रमाणात निश्चितच दूर होऊ शकते. त्यामुळे खडगेंसारख्या अनुभवी, संयमी आणि जाणकार नेत्याकडून अशा बेजबाबदार विधानाची अपेक्षा नव्हती. राहुल गांधींनी खडगेंसारखी प्रगल्भता आणावी, अशी देशातील जनतेची अपेक्षा असताना खडगे राहुल गांधींसारखे बोलायला आणि वागायला लागलेले दिसतात.

आपल्या विधानामुळे हिंदूंच्या भावना दुखावू शकतात, याची जाणीव झाल्यामुळे खडगे यांनी नंतर दिलगिरीही व्यक्त केली. पण तोपर्यंत बराच उशीर झाला होता. खडगे यांच्या विधानाने काँग्रेसचे जे नुकसान व्हायचे ते होऊन गेले, त्याची भरपाई आता होणे शक्य नाही. खडगेंसारख्या समजूतदार नेत्याकडून अशी अपेक्षा नव्हती. त्यामुळे खडगे तुम्हीसुद्धा... असे म्हणावेसे वाटते.

९८८१७१७८१७

## वेध

**नंदकिशोर काथवटे**

# पुढच्याला ठेच, मागचा शहाणा!

'पुढच्याला ठेच, मागचा शहाणा' ही म्हण प्रचलित आहे. या म्हणीचा अर्थ असा आहे की, एखाद्याने चूक केल्यानंतर दुसऱ्याने ती पुन्हा करू नये, सावध राहिले पाहिजे, निदान काळजी तरी घेतली गेली पाहिजे. कोरोना या महामारीनंतर जग सावध होईल आणि कोरोनासारखी परिस्थिती पुन्हा उद्भवू नये म्हणून काळजी घेईल असे वाटले होते. मात्र संपूर्ण जग पुन्हा गाफील झाले असून चार वर्षांपूर्वी जणू काहीच घडले नाही अशाच तोऱ्यात वावरत आहे. पुढील चार वर्षांत जगात कोरोनासारखी एखादी मोठी साथ येण्याची शक्यता वर्तवली जात असून यासाठी सर्वांनी सतर्क राहावे, असे आवाहन मायक्रोसॉफ्ट कंपनीचे सहसंस्थापक बिल गेट्स यांनी केले आहे. त्यांनी एका मुलाखतीत म्हटले आहे की, संकटांना तोंड देण्यासाठी अधिक पूर्वतयारी केली पाहिजे. पण भविष्याचा विचार करून लोकांनी तशी तयारी केलेली दिसत नाही. कोरोनासारखी भीषण साथ भविष्यात पसरली तर तिला रोखण्यासाठी जग अजिबात सज्ज नाही. जागतिक आरोग्य संघटनेने आरोग्यविषयक सुविधांच्या कमतरतेबद्दल तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. शिवाय कोरोनापासून जगभरातील देशांनी कुठलाही धडा घेतलेला नाही अशीही खंत बिल गेट्स यांनी व्यक्त केली आहे. एखाद्या मोठ्या व्यक्तीने अशी खंत व्यक्त केल्यानंतरही त्याकडे जर दुर्लक्ष केले जात असेल तर याला राजकीय इच्छाशक्तीचा अभाव मानले पाहिजे. आपल्याकडे कोणत्या साधनांची कमतरता आहे, याबद्दल जगातील सर्व देशांनी एकमताने निर्णय घेऊन त्यासाठी त्या साधनांच्या पूर्ततेकरिता प्रयत्न करण्याची गरज आहे. मात्र तसे न होता पूर्वी केलेल्या चुकांचीच अनेक देश पुनरावृत्ती करीत आहे. यामध्ये आपल्याही देशाचा समावेश आहे. कोरोनामध्ये उद्भवलेल्या भयंकर परिस्थितीनंतर मानवी जीवन अनिश्चित मानले गेले. याशिवाय अनेक जण तणावपूर्ण आयुष्य जगू लागले. जीवाच्या आकांताने भयभीत होऊन नैराश्यात गेले. कोरोनामधील परिस्थिती आजही आठवली तरी अंगावर शहारे येतात. या परिस्थितीने डॉक्टरांना देव होण्याची संधी दिली. तशीच संधी राज्यकर्त्यांना सुद्धा कोरोनाने दिली होती. लाखो रुपये असून एकेका इंजेक्शनसाठी लोकांनी गयावया केली. फुकट मिळणाऱ्या ऑक्सिजनसाठी लोक तडफडून मेले. कित्येकांच्या अन्त्यसंस्कारासाठी कुणीही आले नाही, पोटची मुले सुद्धा त्या अखेरच्या क्षणी वेळेवर पोहोचू शकली नाहीत. त्या महामारीची जवळपास ७ कोटी ४७ हजार लोकांना लागण झाली. त्यापैकी जगभरातील ७ लाख १० हजार लोकांचा मृत्यू झाला. तरीसुद्धा आज आपण एखाद्या महामारीसाठी लढण्याकरिता सज्ज नाही, ही खरी शोकांतिका आहे. कोरोनासारखी एखादी प्राणघातक साथ पुन्हा पसरली तर तिला रोखण्यासाठी कोणतीही ठोस उपाययोजना सध्या तरी जगातील कोणत्याही देशाकडे दिसत नाही, ही वस्तुस्थिती बिल गेट्स यांच्यासारख्या दूरदर्शी व्यक्तीने मांडली असून, ते या संदर्भात सर्वांना सतर्क करण्याचे काम करीत आहेत. जगात पसरणाऱ्या साथी व त्यापासून मानवी जीवनाला असलेला धोका याबाबत गेल्या अनेक वर्षांपासून बिल गेट्स जनजागृती करीत आहेत. २०१५ मध्ये एका मुलाखतीत प्राणघातक साथीचा सामना करण्यासाठी जगाने कोणतीही पूर्वतयारी केलेली नाही, असे बिल गेट्स यांनी म्हटले होते आणि त्यांचे भाकीत कोरोनासारख्या महामारीने खरे ठरले. कोरोनानंतर जग सुधरेल, लोक स्वच्छतेचे नियम पाळतील असे वाटले होते. मात्र कोरोनासारख्या भयंकर महामारीनंतरही लोक सुधरले नाहीत, आजही गाफील राहूनच वागत आहेत. आणि याच चुका जर लोक करत राहतील तर भविष्यात कोरोनासारख्या साथीच्या आजाराला तोंड देणे लोकांना कठीण जाईल. कोरोनामध्ये संपूर्ण देश भीतीच्या गर्तेत पोहोचला होता. एकमेकांचा एकमेकांशी संवाद तुटला होता. आधार द्यायला कुणीही नव्हते. रुग्णालयातील डॉक्टर, नर्सेस अहोरात्र झटून रुग्णांना बरे करण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करीत होते. ते तर आपले काम इमानेइतबारे करीत होते. मात्र रुग्णांना दिलासा द्यायला त्यांचे आप्तेष्ट सुद्धा जवळ येत नव्हते. कित्येक डॉक्टरांना सेवा देताना आपले जीव गमवावे लागले. फुकट मिळणारा ऑक्सिजन लाखो रुपये देऊनही मिळत नव्हता. या महामारीने अनेकांचे पितृछत्र हिरावून घेतले. अनेकांना रस्त्यावर आणले, मात्र हे सारे डोळ्यादेखत घडूनही आजही लोक, समाज, देश, या देशातील राजकारणी, अधिकारी आणि आरोग्य यंत्रणा देखील भविष्यातील साथीच्या आजाराबाबत गाफील आहे. हाच गाफीलपणा भविष्यात अडचणीचा ठरू शकतो हे प्रत्येकानेच समजून घेण्याची गरज आहे. कोरोनासारखी परिस्थिती परत उद्भवल्यास तिला तोंड देण्यासाठी सज्जा राहण्याचा प्रयत्न संपूर्ण जगाला करावा लागणार आहे. याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही.

९९२२९९९५८८

### 'व्हाईट कॉलर' पाकीटमार

महाकुंभासाठी देशभरातील लाखो भाविक प्रयागराज येथे जाण्याचा प्रयत्न करत आहेत, परंतु त्या ठिकाणी पोहोचण्यासाठी ज्या काही व्यवस्था आहे त्या प्रचंड अपुऱ्या पडत असल्याने अनेकांनी हवाई प्रवासाचा पर्याय शोधला. पण विमान कंपन्यांनी याचा गैरफायदा घेत तिकिटांचे दर दुप्पट-तिप्पट नव्हे, तर तब्बल पाचपट वाढवले आहेत. मुंबई ते लंडन प्रवास ३२ हजार रुपयांत करता येतो, पण मुंबई ते प्रयागराजसाठी ७५ हजार रुपये आकारले जात आहेत, हे आश्चर्यकारक आणि अन्यायकारक आहे. मोठ्या गर्दीमध्ये भुरटा चोर पाकीटमारी करतो, तशी पाकीटमारी विमान वाहतूक कंपन्या करत आहेत. असे असताना नागरी विमान वाहतूक महासंचालनालय (डीजीसीए) नामक सरकारी विभागाने केवळ विमान कंपन्यांना 'भाडे कमी करा' अशी सूचना केली आहे. मात्र, या कंपन्यांनी त्याकडे साफ दुर्लक्ष केले आहे आणि सरकारसुद्धा त्यांच्यावर कोणतीही कठोर कारवाई करण्यास तयार नाही. त्यामुळे भाविकांची पिळवणूक सुरूच आहे. महाकुंभ हा एक धार्मिक सोहळा आहे, जिथे जाणे हा श्रद्धेचा आणि भावनेचा भाग आहे. मात्र, आर्थिक शोषणाच्या या प्रकारामुळे अनेक साधारण लोक प्रयागराजला जाऊ शकणार नाहीत. सरकारने तत्काळ हस्तक्षेप करून किफायतशीर विमानसेवा सुरू करावी, तसेच भाडेवाढीवर कठोर नियंत्रण ठेवावे, अन्यथा मढ्याच्या टाळूवरचे लोणी खाणाऱ्या व्यावसायिक मनोवृत्तीचा निषेध जनतेतून वाढत जाईल.

**संजय चौधरी**/९४२३३००४८५

## वाचक पत्रे

### 'त्यांनी' नाहक का मरावं ?

हल्ली जवळजवळ दर एक दोन दिवसाआड वर्तमानपत्रात बातमी असते, 'वाघाच्या हल्ल्यात गुराखी ठार', 'वाघाने घेतला तरुणाच्या नरडीचा घोट', 'शेतात धान कापणी कापूस वेचणाऱ्या महिलांवर झुडपात लपवून बसलेल्या वाघाने हल्ला करून ठार मारले!' अलिकडील काळात वाघाने माणसांवर केलेल्या हल्ल्याचे प्रमाण वाढलेले दिसते. शेतमजूर, गाई चरायला नेणारे, गुराखी शेतातील पिकाचे निरीक्षण करणारे हे संघटित नसल्यामुळे व या कामावरच त्यांची रोजी रोटी असल्यामुळे शेतात काम करणे भाग असते. वाघाच्या हल्ल्यात मरण पावलेल्या लोकांना २५-३० हजार रुपये देऊन त्यांच्या तोंडाला पाणी पुसल्यासारखे करून त्यांच्या कुटुंबाचे सांत्वन केल्याचे समाधान सरकार करून घेते. दिवसेंदिवस गंभीर होत चाललेल्या या समस्येसाठीही अंदाजपत्रकामध्ये महाराष्ट्र सरकारने मोठा निधी उभारायला हवा. मृतांच्या कुटुंबीयांना कमीत कमी २५ लाख रुपये त्यांच्या भविष्याच्या तरतुदीसाठी देण्यात यावे म्हणजे ते बँकेत एफडीमध्ये ठेवून नियमित व्याज उत्पन्न म्हणून मिळवता येईल. हरिण, रानटी डुक्कर, जंगलातील इतर प्राणी यापेक्षा माणसाची शिकार करणे वाघांकरता अतिशय सोपे भक्ष्य झाले आहे. ज्याची शेती किंवा गावे जंगलाला लागून आहे अशा गावातील लोकांसाठी वाघापासून सुरक्षेसाठी खात्रीलायक उपाय हवा. शस्त्रास्त्र निर्माण करणाऱ्या आयुध निर्माणीत असे पिस्तूल निर्माण करावे जे फक्त मोठा आवाज करेल ते जंगला जवळ राहणाऱ्यांना द्यावे. काम करणाऱ्या जागी पिस्तुलाचा मोठा आवाज केल्यावर आजूबाजूला वाघ लपून बसला असल्यास पळून जाईल. वाघाच्या हल्ल्यात बळी पडलेल्या लोकांबद्दल तेवढ्यापुरते लोकांना अतिशय वाईट वाटते आणि लोक दुसरे करणार तरी काय? यासाठी सरकारने वन खात्यातील व वनाव्यतिरिक्त इतर तज्ज्ञ लोकांची कमिटी नेमून यावर उपाय शोधावे. ज्या कुटुंबावर असे नाहक मरण ओढवले आहे तेच याची दाहकता समजू शकतात.

**प्रा. अनिल पळणीटकर**/९३७३२१३६१०

### स्वच्छ भारत-विकसित भारत



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा २०४७ पर्यंत विकसित भारताचा संकल्प आहे. त्यादृष्टीने सरकार प्रयत्नशील आहे. ती एकट्या मोदींची जबाबदारी नसून आपल्या सर्वांची सामुदायिक जबाबदारी आहे. अनेक विकसित देशांची यादी जर आपण पाहिली तर एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते ती म्हणजे स्वच्छता. अमेरिका, रशिया तसेच संपूर्ण युरोपमधील शहरे अतिशय स्वच्छ आहेत. स्वच्छतेचा आरोग्याशी घनिष्ठ संबंध आहे. स्वच्छता असेल तर शरीर निरोगी राहील आणि शरीर निरोगी असेल तर राष्ट्र बलशाली होईल. स्वच्छतेचा हाच मूलमंत्र या विकसित राष्ट्रांनी स्वीकारला. मुळात स्वच्छतेचा आदर्श आपणास इतरांकडून घेण्याची गरज नाही. एवढा मोठा देश एका क्षणात स्वच्छ होईल अशी कुठलीही यंत्रणा किंवा जादूची कांडी उपलब्ध नाही. या देशातील प्रत्येक नागरिकाची ती जबाबदारी आहे.

**अखिल देशपांडे**/अकोला

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com

हे पत्र मुद्रक व प्रकाशक दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : विवेक कृष्णाजी घळसासी. ● समूह मुख्य संपादक : दिलीप यशवंत पेठे.● मुख्य संपादक :प्रशांत वसंतराव माने दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. E-mail starunbharatgmail.com. ● Website:http://dainiktarunbharat/ या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company Solapur Tarun Bharat Media Limited., and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● Mr. Vivek Krishnaji Ghalsasi - Dissertation Editor / ● Mr. Dilip Yeshwant Pethe - Group Chief Editor ● Mr. Prashant Vasantrao Mane - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) Email ID starunbharat@gmail.com and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: https://dainiktarunbharat.com/, ● Epaper: https://epaper.dainiktarunbharat.com/. The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## क्राईम वृत्त

### सराईत गुन्हेगार सोहेल मुलाणी दोन वर्षासाठी तडीपार

**सोलापूर, दि. २९ जानेवारी -**

सोलापूर शहरातील सराईत गुन्हेगार सोहेल मुलाणी यास पोलिस उपायुक्त विजय कबाडे यांनी सोलापूर व धाराशिव या दोन जिल्ह्यातून दोन वर्षासाठी तडीपार केले आहे. सोहेल खुदाबक्ष मुलाणी (वय २३, रा. विजापूर नाका झोपडपट्टी नं. २, चाँदतारा मशिदीजवळ, सोलापूर) असे तडीपार करण्यात आलेल्याचे नाव आहे. सोहेल मुलाणी याच्याविरुध्द सन २०१८, २०१९, २०२० व २०२४ या कालावधीमध्ये चोरी करणे, घरफोडी करणे यासारखे गुन्हे दाखल आहेत. त्यामुळे त्याच्या गुन्हेगारी कृत्यांना आळा घालण्यासाठी सलगर वस्ती पोलिस ठाण्याकडून मुलाणी यास तडीपार करण्याबाबतचा प्रस्ताव पोलिस उपायुक्त कबाडे यांच्याकडे पाठविण्यात आला होता. त्यास पोलिस उपायुक्त कबाडे यांनी मंजूरी देत सोहेल यास सोलापूर व धाराशिव जिल्ह्यातून दोन वर्षासाठी तडीपार करण्याचे आदेश दिले.



### मामाविरुध्दची केस मिटवून घेण्यासाठी भाच्याकडून तरूणास मारहाण

**सोलापूर, दि. २९ जानेवारी -**

मामाविरुध्दची केस मिटवून घेण्यासाठी भाच्याकडून तरूणावर कोयत्याने वार करण्याचा प्रयत्न करून जबर मारहाण करण्यात आली. याप्रकरणी गणेश दिलीप जाधव (वय ४०, रा.. मेजर परशुराम व्यायाम शाळेच्या पाठीमागे, लिमयेवाडी चौक, सोलापूर) याच्या फिर्यादीवरुन प्रेम प्रकाश गायकवाड (रा. पटवर्धन चाळ, वांगी रोड, सोलापूर) याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २८ जानेवारी रोजी सकाळी साडेआकराच्या सुमारास गणेश जाधव हा लिमयेवाडी येथील आदीशक्ती माता चौक येथे मित्र प्रणव गायकवाड, प्रविण गायकाड यांच्यासोबत चर्चा करीत थांबला होता. त्यावेळी विनोद शिवलाल जाधव याचा भाचा प्रेम गायकवाड हा त्याठिकाणी आला. प्रेम याने गणेश यास माझा मामा विनोद जाधव याच्याविरुध्द कोर्टात असलेली केस मागे घे म्हणून पॅन्टीत लपवून आणलेल्या कोयत्याने गणेश याच्या मानेवर वार केला. तो वार गणेश याने चुकवून प्रेमचा हात पकडला. त्यावेळी प्रेम याने गणेश यास शिवीगाळ करून लाथाबुक्क्याने मारहाण करून विटेने कंबरेवर मारले. म्हणून सलगर वस्ती पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस उपनिरीक्षक कुतवळ पुढील तपास करीत आहेत.

### रस्त्यावर पाण्याच्या टीपा भरून ठेवल्याच्या कारणावरून वृध्दास मारहाण


**सोलापूर, दि. २९ जानेवारी -**

रस्त्यावर पाण्याच्या टीपा भरून ठेवल्याच्या कारणावरून वृध्दास मारहाण करून ठार मारण्याची धमकी देण्यात आल्याप्रकरणी चौघांविरुध्द सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत महंमद अली ईस्माईल मनुरे (वय ७०, रा. मौलाली चौक, मनुरे वाडा, महात्मा बेकरीजवळ, सोलापूर) यांच्या फिर्यादीवरुन अलीम हमीद मनुरे, जलील अलीम मनुरे कलीम हमीद मनुरे, जाहेर कलीम मनुरे (रा. मौलाली चौक, मनुरे वाडा, महात्मा बेकरीजवळ, सोलापूर) याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २७ जानेवारी सकाळी साडेआठच्या सुमारास अलीम मनुरे व इतरांनी त्यांच्या घराच्या समोर येणे जाण्याच्या रस्त्यावर पाणीचे टीप भरून ठेवल्याच्या कारणावरून महंमद मनुरे, त्यांची जावई सलीम, मुलगी दिलशाद यांना शिवीगाळ करून दमदाटी करून नळाचे पाईप व विटाने, लाथाबुक्क्याने मारहाण केली. यामध्ये महंमद मनुरे यांचे हाताचे मनगट फ्रॅक्चर झाले असून याबाबत सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार नदाफ पुढील तपास करीत आहेत.

### सोनी नगरमध्ये साडेचार लाखांची घरफोडी

**सोलापूर, दि. २९ जानेवारी -**

शहरातील मोदी हुडको परिसरातील सोनी नगरामध्ये चोरट्याने उघड्या दरवाजातून घरात प्रवेश करून ४ लाख ६० हार रुपयांचे सोन्याचे दागिने व रोख रक्कम चोरून नेली. याबाबत श्रीकांत बाबू गोलेकर (वय ३७, रा. सोनी नगर, हुडको, मोदी, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. श्रीकांत गोलेकर हे २२ जानेवारी रोजी घरीच होते. त्यावेळी चोरट्याने गोलेकर यांच्या घराच्या उघड्या दरवाजातून घरात येऊन गोलेकर यांच्या आई-वडीलांचे बेडरूममधील बेडखाली ठेवलेली पत्र्याची पेटी घेऊन ती उघडून त्यातील सोन्याचे दागिने व रोख रक्कम, कागदपत्रे लबाडीने चोरून नेली. म्हणून सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहायक फौजदार आटुळे पुढील तपास करीत आहेत.



### रेल्वे स्टेशन येथून दुचाकी चोरीस

**सोलापूर, दि. २९ जानेवारी -**

शहरातील रेल्वे स्टेशन येथून चोरट्याने २५ हजार रुपयांची दुचाकी चोरून नेली. याबाबत प्रभाकर मल्लिनाथ शिवशरण (वय ३०, रा. आंबेडकर चौक, नविन आरटीओ ऑफीसजवळ, सोलापूर) यांच्या फिर्यादीवरुन सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १८ जानेवारी रोजी सकाळी आठच्या सुमारास प्रभाकर शिवशरण यांनी त्यांची एमएच १३ सीवी ६६२० क्रमांकाची दुचाकी रेल्वे स्टेशन दादर पूल येथे हॅन्डल लॉक करून पार्क केली होती. ती चोरट्याने चोरून नेल्याची नोंद पोलिसांकडे करण्यात आली आहे. पोलिस हवालदार मुलाणी पुढील तपास करीत आहेत.

# आता तरी पोलिस कर्मचारी हेल्मेट वापरणार का?

## हेल्मेट असेल तरच आयुक्तालयामध्ये प्रवेश

## पोलिस आयुक्तांकडून शहरातील विविध चौकांची पाहणी

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २९ जानेवारी -**

सोलापूर शहर पोलिस आयुक्तालयामध्ये यायचे झाल्यास आता दुचाकीवरून येणाऱ्या सर्वांनाच हेल्मेट वापरावे लागणार आहे. कारण बुधवारपासून पोलिस आयुक्तालयामध्ये येणाऱ्या कर्मचारी व नागरीकांना हेल्मेट असल्यानंतरच प्रवेश दिला गेला असून दुचाकी चालविणाऱ्यांना हेल्मेट सक्ती करण्यास पोलिस आयुक्तांनी सुरुवात करण्यात आली आहे. दरम्यान, बुधवारी दुपारच्या सुमारास पोलिस आयुक्त एम राजकुमार यांनी शहरातील अनेक चौकांना भेटी देऊन सिग्नल यंत्रणा तसेच वाहतूक कर्मचारी चौकात वाहतूक सुरळीत करीत आहेत का ? याची अचानकपणे तपासणी केली. त्यामुळे पोलिस आयुक्तांनी सुरु केलेल्या या मोहिमेस पोलिस कर्मचारी तरी हेल्मेट वापरून प्रतिसाद देतात का हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.



दुचाकी चालविणाऱ्यास व पाठीमागे बसणाऱ्यास हेल्मेट वापरणे अनिवार्य आहे. सोलापूर शहरामध्ये अनेक तत्कालीन पोलिस आयुक्तांनी हेल्मेट सक्ती करण्याचा प्रयत्न केला, परंतु नागरीकांच्या विरोधामुळे तो सफल झाला नाही. पोलिस आयुक्त एम राजकुमार यांनी आता हेल्मेट सक्ती करण्यासाठी पोलिस आयुक्तालयापासून सुरवात केली आहे. आयुक्तालयात कार्यरत असणारे कर्मचारी व बाहेरून दुचाकीवर येणाऱ्या कर्मचाऱ्यांना हेल्मेट असेल तरच आयुक्तालयामध्ये प्रवेश दिला जात आहे. दुचाकी चालविणाऱ्या ज्या कर्मचाऱ्याकडे हेल्मेट नाही अशा कर्मचाऱ्यांना दंड ठोठावण्यात येत आहे. आयुक्तालयात येणाऱ्या प्रत्येक दुचाकीधारकाने हेल्मेट वापरणे अनिवार्य असल्याचा नियमाची कडक अमंलबजावणी बुधवार पासून करण्यात येत आहे.






**सर्वच सरकारी विभागात हेल्मेट सक्ती व्हावी**

पोलिस दल हे शिस्तीचे दल आहे म्हणून सर्वत्र परिचित आहे. कोणताही नियम किंवा कायदा हा पहिल्यांदा पोलिसांनी पाळला पाहिजे, असा सर्वांचा सूर असतो. हेल्मेट सक्ती करण्यासाठी पोलिस आयुक्तांनी पहिल्यांदा पोलिस दलातील कर्मचाऱ्यांपासून सुरुवात केली आहे. त्यामुळे पोलिस विभागाबरोबरच जिल्हा प्रशासनातील इतर विभाग जसे जिल्हाधिकारी कार्यालय, महानगरपालिका, जिल्हा परिषद, पंचायत समिति कार्यालये, शासकीय रुग्णालय अशा कार्यालयामध्येही दुचाकी वापरणाऱ्या कर्मचाऱ्यांनी हेल्मेट वापरणे अनिवार्य केले तर नागरीकांनादेखील हेल्मेट वापरण्यासाठी तयार करणे सोपे जाणार असल्याचे मत अनेक नागरीकांनी व्यक्त केले.

### पोलिस ठाण्यात जाऊनही वाहतूक शाखेकडून कारवाई

पोलिस आयुक्तालयासोबतच शहरातील प्रत्येक पोलिस ठाण्यामध्ये जाऊन वाहतूक शाखेचे कर्मचारी हे हेल्मेट न वापरणाऱ्या दुचाकीधारक कर्मचाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करीत आहेत. त्यामुळे पोलिस ठाण्यात कार्यरत असलेले कर्मचारी आणि वाहतूक शाखेच्या कर्मचाऱ्यांमध्ये काही वेळा शाब्दीक खडाजंगी होत असल्याचेही दिसून येत आहे.

### पोलिस आयुक्तांची विविध चौकांना अचानक भेट

बुधवारी दुपारी पोलिस आयुक्त एम राजकुमार यांनी शहरातील विविध चौकांना भेट देऊन तेथील वाहतूक सुरळीत आहे का आणि सिग्नल यंत्रणा सुरळीत आहे का? याची पाहणी केली. त्यामुळे भर उन्हात देखील वाहतूक शाखेचे कर्मचारी हे नेमून दिलेल्या चौकांमध्ये वाहतूक सुरळीत करण्याच्या कामावर कार्यरत असल्याचे दिसून आले.

# उजनी-सोलापूर दुहेरी जलवाहिनीच्या कामाला मार्चअखेर मुदत

## स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कार्पोरेशन कंपनीचे सीईओ कदम यांची माहिती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २९ जानेवारी -**

शहरातील महत्त्वकांक्षी प्रकल्प मानला जाणाऱ्या उजनी- सोलापूर दुहेरी जलवाहिनीच्या कामाला मार्चपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. जलवाहिनी टाकण्याचे काम जवळपास संपत आले आहे. एक दोन ठिकाणी शेतकऱ्यांनी अडवणुकीचे धोरण घेतले. चालु आठवड्यात हे काम मार्गी लागेल, अशी माहिती स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कार्पोरेशन कंपनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोपीचंद कदम यांनी दिली.



पोचमपाड कंपनीला हे काम दिले आहे. यापूर्वी झालेल्या कराराप्रमाणे जलवाहिनी टाकण्याचे काम २१ महिन्यात आणि त्यानंतरचे तीन महिने चाचणीसाठी देण्यात आले होते. आता आणखी चार महिने मुदतवाढ देण्याचा निर्णय स्मार्ट सिटी संचालक मंडळाच्या बैठकीत घेण्यात आला आहे. जलवाहिनी टाकण्याचे काम जवळपास संपत आले आहे. एक दोन ठिकाणी शेतकऱ्यांनी अडवणुकीचे धोरण घेतले असून त्यामुळे काम थांबले आहे. चालु आठवड्यात हे काम मार्गी लागेल आणि कोणत्याही परिस्थितीत मार्चपर्यंत काम पुर्ण होईल, असा विश्वास कदम यांनी व्यक्त केला. पोचमपाड कंपनीला ३० नोव्हेंबरपर्यंत मुदत होती. तसा करारही करण्यात आला होता. परंतु भूसंपादनाची अडचण आल्याने मुदतीत हे काम पुर्ण होऊ शकले नाही. मी पदभार घेतल्यानंतर काही शेतकऱ्यांच्या अडचणी सोडवल्या. त्याचप्रमाणे उर्वरीत अडचणीही दूर होतील. जिल्हाधिकारी, महापालिका आयुक्त तसेच प्रांताधिकारी यांच्या मदतीने दुहेरी जलवाहिनीचे उर्वरीत काम निर्धारित वेळेत पुर्ण करण्यात येईल, असे कदम यांनी स्पष्ट केले. स्मार्ट सिटी कंपनीने शहरात ४६ प्रकल्प पुर्ण करुन ते महापालिकेकडे हस्तांतरित केले आहेत. उर्वरित तीन प्रकल्पाचे काम अंतिम टप्प्यात आहे. दुहेरी जलवाहिनी वगळता दोन प्रकल्प हस्तांतरित करणे बाकी आहे. या सर्व प्रकल्पांच्या पुढील देखभालीची जबाबदारी महापालिकेकडे आहे, असे माहिती कदम यांनी सांगितले.

### महसूल खात्यातील अनुभवामुळे अडचणी दूर

सोलापूर जिल्हा मला नवा नाही. अपूर्वचंद्रा जिल्हाधिकारी असताना मी एक वर्षे उपजिल्हाधिकारी म्हणून काम केले आहे. नंतर मंगळवेढ्याला तहसीलदार म्हणून गेलो. पंढरपूरला विठ्ठल - रुक्मिणी मंदिर समितीवर काही काळ काम केले. महसूल खात्यातील कामाचा अनुभव असल्याने दुहेरी जलवाहिनीच्या कामातील अडचणी दूर करता आल्या. येत्या मार्चपर्यंत स्मार्ट सिटीचे काम संपवण्याचे आदेश आहेत. नंतर माझ्याकडे कोणती जबाबदारी येणार माहीत नाही. निधी नाही आणि मनुष्यबळही नाही. त्यामुळे नवीन काही करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही, असेही सीईओ गोपीचंद कदम यांनी स्पष्ट केले.




## श्रमिक पत्रकार संघातर्फे नेत्र तपासणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २९ जानेवारी-**

सोलापूर श्रमिक पत्रकार संघ, छत्रपती शिवाजी महाराज शासकीय सर्वोपचार रुग्णालय, डॉ. वैशंपायन स्मृती शासकीय वैद्यकीय महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने पत्रकारांसह त्यांचे कुटुंबीय आणि संस्थेतील कर्मचाऱ्यांसाठी मोफत शिबिर पार पडले.

श्रमिक पत्रकार संघाच्या सभागृहात हे शिबिर पार पडले. यावेळी वैद्यकीय महाविद्यालयाच्या ही प्रा. डॉ. स्नेहलता येळमकर, डॉ. दौला ठेंगील, डॉ. श्रीकांत जाधव, डॉ. अर्चना यादव, डॉ. आकांक्षा पालीवाल, डॉ. प्रतीक्षा तानगावडे, डॉ. वैभवी कांबळे, डॉ. साक्षी बोगा, डॉ. अश्विनी आवटे, डॉ. विश्वजीत मठपती आदींनी तपासणी करून औषधोपचार केले. यावेळी श्रमिक पत्रकार संघाचे अध्यक्ष विक्रम खेलबुडे, सरचिटणीस सागर सुरवसे, खजिनदार किरण बनसोडे, कृष्णकांत चव्हाण आदींसह पदाधिकाऱ्यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी प्रा. डॉ. स्नेहलता येळमकर यांनी डोळ्यांची काळजी कशी घ्यावी आणि उपचाराबाबत मार्गदर्शन केले. त्या म्हणाल्या, प्रत्येकाने नियमित नेत्र तपासणी करून घेणे आवश्यक आहे. डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार पुढे उपचार घ्यावेत, असे आवाहन केले. खजिनदार किरण बनसोडे यांनी सूत्रसंचालन केले.

### महिलेस शिवीगाळ करणाऱ्यावर गुन्हा

**सोलापूर, दि. २९ जानेवारी -**

डफरीन चौकातील आदित्य बिर्ला कॅपीटल कार्यालयाच्या गेटवर पैशाच्या कारणावरून महिलेस शिवीगाळ करणाऱ्याविरुद्ध सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. राधिका अंबादास कुरापाटी (वय ३७, रा. अशोक चौक) या महिलेच्या फिर्यादीवरुन रमेश कनकुंटला (रा. सोलापूर) याच्याविरुध्द गुन्हा दाखल झाला आहे. ४ एप्रिल २०२४ रोजी राधिका कुरापाटी या डफरीन चौकातील आदित्य बिर्ला कॅपीटल या ऑफीच्या गेटवर काम करीत असताना रमेश कनकुंटला हा ऑफीसच्या बाहेर आला व त्याने राधिका यांना बाहेर बोलावून घेतले. राधिका यांना रमेश याने पैसे मागितले असता राधिका यांनी कोर्टात केस चालू आहे, त्याचा निकाल लागल्यानंतर आपण पैशाचे काय ते बोलू असे म्हणाल्या. त्यावेळी रमेश कनकुंटला याने राधिका यांना अश्लिल शिवीगाळ केली. पोलिस उपनिरीक्षक बनकर तपास करीत आहेत.

# बारमधील खाण्यापिण्याचे बिल देण्याच्या कारणावरुन मारहाण



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २९ जानेवारी-**

बारमध्ये बसून खाऊन पिऊन झाल्यानंतर बिल देण्याच्या कारणातून एकास बेदम मारहाण करण्यात आली. ही भांडणे मंगळवारी सायंकाळी ५.३० वाजता झाली. निखिल नामदेव शेजाळ (वय ३०, रा. विरशैव नगर, जुळे सोलापूर) असे मारहाण झालेल्याचे नाव आहे. मंगळवारी सायंकाळच्या सुमारास निखिल हा अशोक चौकातील रिमझिम बारमध्ये गेला होता. तेथे जेवण झाल्यानंतर बिल देण्याच्या कारणातून वाद झाला. त्या कारणातून नितेश सुरजसिंग रजपत, संदिप बिराजदार व इतर दोन यांनी लाथाबुक्यांनी मारहाण केली. या मारहाणीत नाकाला जखम झाली तसेच सर्वांगास मुकामार लागल्याने रात्री ९ वाजता नामदेव शेजाळ यांनी उपचारास शासकीय रुग्णालयात दाखल केले. या घटनेची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.


### खरेदीपुर्व जाहीर नोटीस

तमाम विशेषतः डि. सोलापूर सब. डि. व तालुका बार्शी पैकी मौजे नागोबाची वाडी व आसपासचे परिसरातील लोकांना कळविण्यात येते की,

१) मिळकतीचे वर्णन : डि. सोलापूर सब. डि. व ता. बार्शी पैकी मौजे नागोबाची वाडी हद्दीतील जमीन, याचा गट नं. १०६ याचे क्षेत्र १० हे. ०१ आर. पो. ख. ०० हे. २४ आर., एकुण क्षेत्र १० हे. २५ आर., याचा आकार ०३ रु. ०६ पैसे, यासी चतुः सिमा पूर्वेस गट नं. १०५, दक्षिणेस- गट नं. ६७, पश्चिमेस गट नं. १०७ व उत्तरेस गट नं. ११२, येणेप्रमाणे चतुः सिमापूर्वक वर्णनाची जमीन, आतील दगड-माती, झाड-झुडुप, वगैरे सर्व तदंगभूत वस्तुसह, मालकी कब्जे वहिवाटीच्या हक्कासह मिळकत,

२) वर कलम १ मध्ये नमूद केलेली मिळकत ही सुर्यनारायण उर्फ संजय हिरालाल तेलंग व धरती उर्फ सुशिला अनंत गुरगुळे यांचे सामाईक वडीलोपार्जीत वारसा हक्काने मिळालेली मिळकत आहे. सदर मिळकतीचे ७/१२ हक्कपत्रकी व रेकॉर्ड ऑफ राईटसला त्यांचे नावाची नोंद आहे. सदर मिळकत त्यांचे मालकी हक्काने कब्जे वहिवाटीस आहे. सदर मिळकत सुर्यनारायण उर्फ संजय हिरालाल तेलंग व धरती उर्फ सुशिला अनंत गुरगुळे यांनी त्यांचे कायदेशीर गरजेपोटी आमचे अशिल सुरजितसिंह शंकरराव कोकाटे, रा. बार्शी, जि. सोलापूर यांना योग्य त्या बाजारभाव किंमतीस विक्री करणेची ठरवुन इसारापोटी आमचे अशिलाकडून रक्कम घेऊन तसा लेखी करार केलेला आहे. सदर मिळकत वर्ग २ ची जमीन असल्याने मिळकत धारकांनी ती विक्री करण्याकरीता आवश्यक तो नजराना शासकीय दरबारी भरुन संबंधीत प्राधिकृत अधिकारी/जिल्हाधिकारी यांची स्वखर्चाने परवानगी प्राप्त करुन आणल्यानंतर सदर मिळकत सुर्यनारायण उर्फ संजय हिरालाल तेलंग व धरती उर्फ सुशिला अनंत गुरगुळे यांनी आमचे अशिलांस विक्री करण्याचे ठरविलेले आहे. सदर मिळकत निर्वेध, निजोखमी व बिनबोजाची असल्याची खात्री मिळकत मालकांनी आमच्या अशिलास दिलेली आहे व आमचे अशिलाचीही तशी खात्री झालेली आहे.

३) तरी वर नमुद मिळकतीवर कोणाचा कसलाही हक्क हितसंबध असल्यास, सदर मिळकती संदर्भाने कोणी इसार पावती, साठेखत, गहाणखत, खरेदीखत, भाडेपट्टा, दान, लिज, पोटगी, हितसंबंध, बोजा, बक्षिस, मृत्युपत्र किंवा तत्सम स्वरुपाचा दस्त केला असल्यास किंवा सदर मिळकतीवर कोणाचा बोजा असल्यास सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन ०८ दिवसाच्या आत आमच्या अशिलास लेखी स्वरुपात कागदपत्रासह त्यांचे विधीज्ञांचे खालील नमुद पत्यावर हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध, निजोखमी व बिनबोजाची आहे असे समजुन आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील. मुदतीनंतर कोणाचीही हरकत आमचे अशिलाचे खरेदीहक्कावर बंधनकारक राहणार नाही. कोणाचीही फसगत होवू नये म्हणुन ही खरेदीपुर्व जाहीर नोटीस दिली असे. दि. ३०/०१/२०२५.

सही/-
ॲड. प्रशांत पांडुरंग एडके
बी.एस.एल., एल.एल.एम.
कचेरी रोड, न्यायालयाच्या समोर,
खेडकर बिल्डींग, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर.
मो. नं. ७३८५११०१८५/९८२२८१६४७८
अशिलातर्फे ॲडव्होकेट

### भा.कृ.अनु.प.-राष्ट्रीय अनार अनुसंधान केंद्र, सोलापूर
**ICAR - National Research Centre On Pomegrante**
(Indian Council Of Agricultural Research)
NH-65, Solapur-Pune Highway, Kegaon, Solapur-413 255(M.S.)
T-(0217) 2354330, 2350074, 2350263, F-(0217) 2353533
E-mail : nrcpomegranate@gmail.com, Website: nrcpomegranate.icar.gov.in
**(ISO 9001:2015 Certified Institute)**

**WALK-IN-INTERVIEW**

A Walk in interview will be held on **05/03/2025 11:00** AM at ICAR-National Research Centre on Pomegranate, Kegaon, Solapur for engagement of worker under time bound project on contractual basis at a consolidated remuneration.

| Sr. no | Name of the Project | Name of Post | Number of Post |
|---|---|---|---|
| 1. | Contract research project titled Test protocol for efficacy evaluation of new molecules (SYN products) of Syngenta against wilt of pomegranate sponsored by Syngenta India Pvt. Ltd. | Young Professional - I | 01 |

For more details of posts, application form, essential and desirable qualifications, Job requirements and the terms and conditions please visit our website : nrcpomegranate.icar.gov.in

Sd/-
DIRECTOR

### सोलापूर महानगरपालिका, सोलापूर
इंद्रभुवन आंबेडकर चौक, रेल्वे लाईन्स, सोलापूर ४१३००१
मंडई, कोंडवाडा व लायसन विभाग, प्रशासकिय इमारत, तिसरा मजला,
ई-मेल : mandaivibhag124@gmail.com

जा.क्र. मंडई/१३/३५९ — दि. २९/०१/२०२५

**जाहीर आवाहन**

तमाम सोलापूर शहरातील जनावरे पाळणाऱ्या नागरीकांना याद्वारे आवाहन करण्यात येते की, आपली जनावरे शहरातील रस्त्यावर, मोकळ्या जागेवर सोडण्यात येऊ नये. सदर जनावरे रस्त्यावर सोडल्यामुळे शहरातील नागरीकांना व रस्त्यावरील वाहतुकीस आडचण निर्माण होत आहे. तसेच अनेक वेळा छोटे, मोठे आपघात घडल्याचे निदर्शनास आले आहे. जनावरे रस्त्यावर सोडल्यामुळे त्यांच्या विष्ठेमुळे अस्वच्छता निर्माण झालेली आहे. त्यामुळे मोकाट जनावरांना त्यांच्या मालकाने स्वतःच्या जागेत व गोठ्यामध्ये बंदिस्त करावे व मोकळे सोडू नये. मोकाट जनावरांचे प्रार्दुभाव मोठ्या प्रमाणात वाढल्यामुळे सदरची परिस्थिती नियंत्रणात आणण्या करिता मोकाट जनावरे म.न.पा.ने पकडून कोंडवाड्यात जमा केल्या नंतर पहिल्या वेळेस दंड भरुन ताकिद देऊन सोडण्यात येईल. दुसऱ्या वेळेस पुन्हा तेच जनावर मोकाट फिरताना आढळल्यास गोशाळेला सोडण्यात येईल अथवा लिलाव करण्यात येईल सर्व जनावरे पाळणाऱ्या नागरीकांना याबाबत गंभीर दखल घेऊन कायदेशीर वर्तणुक ठेवावी व प्रशासनास सहकार्य करावे, असे अवाहन करण्यात येत आहे.

मा.आयुक्त यांच्या मान्यतेने
सही/-उपायुक्त
सोलापूर महानगरपलिका, सोलापूर

### सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, अकलूज ता. माळशिरस
### कृषि उत्पन्न बाजार समिती इमारत, अकलूज

दुरध्वनी क्र. ०२१८५-२२२४४९ — Email- arcsaklujgmail.com
जा.क्र.सनिअ/कक्ष-१/अवसायन नोंदणी रदद/१४४/२०२५ — दिनांक- २९/०१/२०२५

**जाहीर प्रकटन**

मी. एम.एल. शिंदे, सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, अकलूज ता. माळशिरस या निवेदनाद्वारे जाहीर करतो की, खालील नमूद केलेल्या सहकारी संस्था या कार्यालयाने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ मधील तरतुदीनुसार अंतीम अवसायनात घेण्यात आलेल्या आहेत. तरी खाली दिलेल्या सहकारी संस्थांचे सर्व संबंधित सभासद, धनको, ऋणको यांना सूचना देण्यात येते की, खालील सहकारी संस्थांच्या बाबतीत जर कोणाचे काही येणे देणे किंवा आक्षेप असतील तर संबंधित संस्थांच्या नावासमोर दर्शविलेल्या अवसायकाकडे व या कार्यालयाकडे आपले आक्षेप पुराव्यासह विहीत मुदतीत दाखल करावेत. आक्षेप नोंदविण्याची शेवटचा दिनांक-१३/०२/२०२५ पर्यंत असून संबंधिताचा आक्षेप सदर तारखेपर्यंत अवसायकाकडे प्राप्त न झाल्यास दर्शविलेल्या तारखेनंतर कोणत्याही सभासदांची व धनको, ऋणको यांची तक्रार विचारात न घेता नोंदणी रद्द करणेबाबत पुढील कार्यवाही करण्यात येईल याची संबंधितांनी नोंद घ्यावी. तसेच खालील नमूद केलेल्या सहकारी संस्थांच्या सर्व सभासदांना विनंती करण्यात येते की, संस्थेच्या नावासमोर दर्शविलेल्या तारखेस व वेळेस संस्थेच्या आमसभेत या कार्यालयात उपस्थित रहावे. सभेस उपस्थित न राहिल्यास कायद्यातील तरतुदीनुसार संस्थेची नोंदणी रद्द करणेबाबत पुढील कारवाई करण्यात येईल याची संबंधित सभासद धनको, ऋणको यांनी नोंद घ्यावी.

| अ. क्रं. | अवसायन संस्थेचे नाव | नोंदणी क्रमांक व दिनांक | अवसायकाचे नाव व पद | आक्षेप सादर करावयाची तारीख | अंतीम सर्वसाधारण सभा | अंतीम सभेची वेळ |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | रणजितसिंह मो.पा.ग्रा. बि.शे.सह.पत सं. फोंडशिरस | ११९४/२००२ दि. १३/०५/२००२ | डी.पी. राऊत, अप्पर लेखापरीक्षक, अकलूज | १३/२/२०२५ | २७/२/२०२५ | सकाळी- ११.०० वा |
| २ | महात्माफुले ग्रा.बि.शे. सह.पत सं.म. वेळापूर | १२५१/१९९४ दि.१४/०६/१९९४ | डी.पी. राऊत, अप्पर लेखापरीक्षक, अकलूज | १३/२/२०२५ | २७/२/२०२५ | सकाळी- ११.०० वा |
| ३ | धुळदेव ग्रा. बि.शे.सह.पत सं.म.खुडूस | ८०२/२००१ दि.०६/११/२००१ | एस. के. यादव, सहा.सह. अधिकारी | १३/२/२०२५ | २७/२/२०२५ | सकाळी- ११.०० वा |
| ४ | जनकल्याण मागासवर्गीय औद्योगिक सह.सं.म. माळशिरस | १६३५/२०१५ दि.२०/०६/२०१५ | बी.एच. बंडगर, मुख्य लिपीक अकलूज | १३/२/२०२५ | २७/२/२०२५ | सकाळी- ११.०० वा |

टिप- सर्वसाधारण सभेचे ठिकाण- सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, अकलूज ता. माळशिरस जि. सोलापूर यांचे कार्यालय अकलूज, कृषि उत्पन्न बाजार समिती अकलूज यांचे इमारतीमध्ये.

स्थळ- अकलूज
दिनांक- २९/०१/२०२५

सही/-
(एम.एल. शिंदे)
सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था, अकलूज ता. माळशिरस

## महत्त्वाचे

### डेव्हिस चषक सामन्यासाठी टोगो संघ दिल्लीत दाखल



**नवी दिल्ली** : आगामी १ आणि २ फेब्रुवारी रोजी होणाऱ्या डेव्हिस चषक जागतिक गट प्ले-ऑफ सामन्यासाठी टोगो संघ नवी दिल्लीत दाखल झाला. डेव्हिस चषकासाठी भारतात आल्याबद्दल टोगो टेनिस फेडरेशनचे अध्यक्ष मावुली अहिआले यांनी आनंद व्यक्त केला. बुधवारी आर. के. खन्ना स्टेडियममध्ये टोगोचे टेनिसपटू सराव करताना दिसले. या सामन्याच्या निमित्ताने भारतीय चाहत्यांना टोगोच्या खेळाडूंची आफ्रिकन शैली बघता येईल. भारत हा एक मजबूत संघ आहे आणि डेव्हिस चषकात त्यांचा समृद्ध इतिहास आहे, कारण त्यांनी अनेक वेळा जागतिक गटाच्या अंतिम फेरीत प्रवेश केला आहे. आमचे खेळाडू व्यावसायिक टेनिस खेळाडू आहे, परंतु ते टेनिस शिकवतात आणि प्रशिक्षित करतात.आम्ही आमचा सर्वोत्तम खेळण्याचा प्रयत्न करू, असे अहिआले म्हणाले. टोगोने १९९० मध्ये डेव्हिस चषकात प्रवेश केला असला तरी, २००३ नंतर ते २०२२ मध्ये टेनिस विश्वचषकात परत येईपर्यंत सर्किटबाहेर होते.

### कोहलीच्या उपस्थितीमुळे दिल्ली संघात चैतन्य

**नवी दिल्ली** : विराट कोहलीच्या चुंबकीय उपस्थितीमुळे केवळ रणजी करंडक स्पर्धेचे स्वरूप उंचावले नाही, तर दिल्ली संघाचे मनोबलही उंचावले आहे. गुरुवारपासून येथे सुरू होणाऱ्या रेल्वेविरुद्धच्या अंतिम गट ड सामन्यात दिल्ली संघ आपल्या मोहिमेचा शेवट विजयाने करण्यास उत्सुक आहे. जर रेल्वेने बोनस गुणांसह दिल्लीला हरवले आणि त्यांचे गुण २४ वर नेले ,तर त्यांना बाद फेरी गाठण्याची संधी आहे. दिल्ली (सहा सामन्यांमधून १४) वर अवलंबून राहणे केवळ गणितीय अशक्य आहे. पात्रता फेरीच्या शक्यतेच्या बाबतीत तामिळनाडू (सहा सामन्यांमधून गुण), चंदीगड (सहा सामन्यांमधून १९ गुण) आणि सौराष्ट्र (सहा सामन्यांमधून १८ गुण) या दोन्ही संघांच्या तुलनेत चांगल्या स्थितीत आहेत. कोहलीच्या पुनरागमनाबद्दल इतकी उत्सुकता आहे की फिरोजशाह कोटला मैदानावर सामन्याच्या थेट प्रक्षेपणासाठी प्रसारणकर्ते या उत्सवात सहभागी होतील. तीन महिन्यांत या स्टार फलंदाजाचा पहिला रणजी सामना असेल.



### देवेंद्र गुलमिरे यास ज्युनियर महाराष्ट्र श्री मध्ये सुवर्ण

सोलापूर : कोल्हापूर येथील आदित्य भोसले युवा मंचने आयोजित केलेल्या २३ वर्षांखालील ज्युनिअर महाराष्ट्र श्री स्पर्धेत ७५ ते ८० किलो गटात सुवर्ण पटकाविले. तो जिल्यातील सांगोला तालुक्याचा खेळाडू आहे. त्याचे सोलापूर जिल्हा बॉडी बिल्डिंग अँड फिटनेस असोसिएशनचे अध्यक्ष संतोष पवार व सरचिटणीस विशाल गायकवाड, कार्याध्यक्ष अनिल जाधव, उपाध्यक्ष रवींद्र पाटील, संजय हिरेमठ, शशिकांत अक्कळवडी, अविनाश गंजे, खजिनदार अन्वर शेख, आतिक नदाफ यांनी कौतुक केले.

### आमदार सुभाषबापू देशमुख पश्चिम महाराष्ट्र श्री स्पर्धा उद्या

**सोलापूर** : आमदार सुभाषबापू देशमुख पश्चिम महाराष्ट्र श्री बॉडी बिल्डिंग स्पर्धा शुक्रवार ३१ जानेवारी रोजी नेहरूनगर येथील शासकीय मैदानावर सायंकाळी ६ वाजता आयोजित केली आहे. या स्पर्धेत सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, रत्नागिरी या जिल्ह्यातील राज्य, राष्ट्रीय खेळाडूचा सहभाग असणार आहे. तसेच सोलापूर जिल्ह्यातील खेळाडूसाठी युवानेते मनीष देशमुख सोलापूर टॉप टेन श्री स्पर्धा असणार आहे. भारतीय जनता पार्टी चे शहर उपाध्यक्ष सोमनाथ मालक केंगनाळकर या स्पर्धेचे संयोजक आहेत, असे सोलापूर बॉडी बिल्डिंग अँड फिटनेस फेडरेशन सरचिटणीस विशाल गायकवाड यांनी कळविले आहे.

# महाराष्ट्राचा पदकाचा चौकार, मिहीर आम्बेची रुपेरी कामगिरी

## ३८ वी राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा

**हल्दवानी, दि. २९ जानेवारी**

उत्तराखंडात सुरू असलेल्या ३८व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत महाराष्ट्राने आज पदकाची चौकर झळकविला. २ रौप्य व २ कास्य पदके जिंकून महाराष्ट्राने दिवस गाजविला. मिहीर आम्ब्रे यांनी रौप्य पदक पटकाविले. मुलींच्या रिले शर्यतीत महाराष्ट्राला रौप्य पदक तर आदिती हेगडे हिला एक कांस्यपदकाची कमाई केली. सोलापूरच्या ओम अवस्थी याने दहा मीटर प्लॅटफॉर्म डायव्हिंग प्रकारात कांस्यपदकाची कमाई केली. हल्दवानीतील इंदिरा गांधी स्टेडियममध्ये जलतरण तलावावर पुण्याच्या मिहिर आम्रेने पुरूषांच्या १०० मीटर बटरफ्लाय प्रकारात रौप्य पदकाचा करिश्मा घडविला. नाशिकच्या अदिती हेगडे हिने महिलांच्या २०० मीटर फ्री स्टाईल प्रकारात कांस्यपदकाची कमाई केली.

### सोलापूरच्या ओम अवस्थीला कांस्य



सोलापूरच्या ओम अवस्थीने अप्रतिम कौशल्य दाखवीत दहा मीटर हायबोर्ड डायव्हिंग प्रकारात कांस्यपदकाची कमाई केली. श्रीकांत शेटे, मनीष भावसार व हरिष अन्नलदास यांच्या मार्गदर्शनाखाली त्याने यापूर्वीही राष्ट्रीय क्रीडा स्पर्धांमध्ये भरघोस पदके जिंकलेली आहेत. तसेच राज्यस्तरीय स्पर्धांमध्ये त्याने सातत्याने सुवर्णपदके जिंकली आहेत. ओमने रेल्वेकडूनही वेगवेगळ्या स्पर्धांमध्ये सहभागी होत अव्वल दर्जाची कामगिरी केलेली आहे. गतवर्षी, त्याने वरिष्ठ गटाच्या राष्ट्रीय स्पर्धेमध्ये सोनेरी कामगिरी केली होती.

मिहीर आम्ब्रे या महाराष्ट्र्याच खेळाडूने १०० मीटर्स बटरफ्लाय क्रीडा प्रकारात रुपेरी यश संपादन केले. त्याला ही शर्यत पार करण्यासाठी ५४.२४ सेकंद वेळ लागला. मुलींच्या चार बाय शंभर मीटर फ्रीस्टाइल रिले शर्यतीत महाराष्ट्राला रौप्य पदक मिळाले. अवंतिका चव्हाण, अन्वी देशवाल, सान्वी देशवाल व अदिती हेगडे यांनी हे अंतर चार मिनिटे २.१७ सेकंदात पार केले. महाराष्ट्राच्या आदिती हेगडे हिने २०० मीटर्स क्रीडा प्रकारात कांस्यपदकाची कमाई केली तिला हे अंतर पार करण्यास दोन मिनिटे ९.५३ सेकंद वेळ लागला कर्नाटकची देसिंधु धिनिधी (दोन मिनिटे ३.२४ सेकंद) व दिल्लीची भाव्या सचदेव (दोन मिनिटे ८.६८ सेकंद) यांनी अनुक्रमे सुवर्ण व रौप्य पदकाचा मान मिळविला.

# महाराष्ट्र विरुद्ध त्रिपुरा रणजी सामना आजपासून सोलापुरात

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २९ जानेवारी-**

देशांतर्गत क्रिकेट स्पर्धेपैकी महत्त्वाच्या रणजी चषक स्पर्धेतील इलाईट अ गटातील महाराष्ट्र संघाचा शेवटचा साखळी सामना आजपासून येथील इंदिरा गांधी पार्क स्टेडियमवर सुरू होणार असल्याचे सोलापूर जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे संयुक्त सचिव चंद्रकांत रेम्बर्सु यांनी कळविले आले

गेल्या वर्षी सोलापूर जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या उत्कृष्ठ आयोजन नियोजनामुळे महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशन ने २०२४ मध्ये कुच बिहार क्रिकेट स्पर्धेतील २ सामने आयोजननंतर २०२५ ह्या नवीन वर्षात पहिल्याच महिन्यात रणजी सामना सोलापूरात होत असून त्रिपुरा संघाचा कर्णधार हा भारतीय खेळाडू मनदीप सिंग असून महाराष्ट्र कडून अंकित बावणे तर आयपीएल संघात निवडला गेलेला रामकृष्ण घोष तसेच इतर उत्तम नावाजलेले खेळाडू या सामन्यात खेळणार आहे. ४ दिवसीय या सामन्यात सकाळी नाणेफेकीचा कौल महत्त्वाचा ठरणार असून हा सामना जिंकून विजयी सांगता करण्याचा महाराष्ट्राचा प्रयत्न असल्याचे दिसते. दोन्ही संघांनी काल शहरात आगमन झाल्यानंतर विश्रांती घेतली आणि काल सकाळी कसून सराव केला. दोन्ही संघाचा हा ७ वा सामना असून महाराष्ट्र संघाने ६ पैकी २ सामने जिंकले असून नुकताच नाशिक येथे बलाढ्य बरोडा संघ विरुद्ध विजय प्राप्त करत १४ गुणासह गटात ६व्या स्थानी असून पाठोपाठ त्रिपुरा संघ ६ सामन्यात केवळ १ विजय मिळवत १३ गुणांसह आहे.

जिल्हा संघटनेच्या वतीने सकाळच्या सराव सत्रात दोन्ही संघांचे योग्य ते नियोजन केलेले होते तसेच सामना सुरू झाल्यावर प्रेक्षकांना मोफत सामना पाहता यावा म्हणून व्यवस्था करण्यात आलेली आहे. यातून निवडणार दोन्ही संघ -

**महाराष्ट्र** : अंकित बावणे, सौरभ नवले, सिद्धेश वीर, पवन शहा, यश क्षीरसागर, रामकृष्ण घोष, हितेश वाळुंज, प्रशांत सोळंकी, रजनीश गुरबानी, प्रदीप दधे, किरण चोरमले, योगेश चव्हाण, सत्यजित बच्छाव, धनराज शिंदे, सनी पंडित

**त्रिपुरा** : मनदीप सिंग, बिक्रम कुमार दास, जीवनज्योत सिंग, श्रीदाम पॉल, शरथ श्रीनिवास, रियाझ उद्दैन, मनी संकर मुरा सिंग, राणा दत्ता, रजत डे, अर्जुन देबनाथ संकर पॉल, विकी साहा, चिरनजीत पॉल, जोयदीप बाणिक, तेजस्वी जयस्वाल, अजय सरकार, जोयदेब देब

# महाराष्ट्राच्या पुरुष संघाची केरळवर, महिलांची पश्चिम बंगालवर मात

**◆ हल्दवानी, २९ जानेवारी**

हल्दवणी, उत्तराखंड येथे सुरू असलेल्या ३८ व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत महाराष्ट्राच्या पुरूष संघाने केरळचा, तर महिला संघाने पश्चिम बंगालचा पराभव करत गटात अव्वल कामगिरी केली.

गतविजेत्या महाराष्ट्राच्या महिला व पुरूष खो-खो संघांनी आपल्या लौकिकास साजेसा खेळ केला. पुरूषांच्या सामन्यात महाराष्ट्र संघाने केरळवर ४७-३६ अशी ११ गुणांनी मात केली. मध्यंतराला महाराष्ट्राकडे १० गुणांची (२४-१४) आघाडी होती. विजयी झालेल्या महाराष्ट्रातार्फे कर्णधार गजानन शेंगाळ (१.३० मि., २ मि. संरक्षण आणि २ गुण), राहुल मंडल (१.३० संरक्षण व १० गुण), रामजी कश्यप (१.१० मि., १.४० मि. संरक्षण व ८ गुण), शुभम थोरात (१.४० मि., १.२५ मि. आणि २ गुण) यांनी विजयात मोलाची कामगिरी केली.



पुरुषांच्या खो-खो सामन्यादरम्यानचा उत्कंठावर्धक क्षण

पराभूत झालेल्या केरळतर्फे निखिल बी. (१.१० मि. संरक्षण व १० गुण), देवनारायण (१ मि. संरक्षण व गुण) यांनी चांगला खेळ केला.

महिला गटातील सामन्यात महाराष्ट्र संघाने पश्चिम बंगालचा एक डाव ४ गुणांनी (२४-२०) सहज पराभव केला. विजयी महाराष्ट्राकडून प्रियांका इंगळे (२.१५ मि., नाबाद १.५० मि. आणि ६ गुण), संपदा मोरे (१.३० मि. संरक्षण आणि ६ गुण), पायल पवार (१.४० मिनिटे संरक्षण), संध्या सुरवसे (२.५५ मि. व १.२५ संरक्षण आणि २ गुण) यांनी दमदार खेळ केला. तर पश्चिम बंगालकडून इशिता विश्वास (१.२० मि. संरक्षण व ४ गुण), दीपिका चौधरी (१.१० मि. संरक्षण आणि ४ गुण) यांनी चांगली लढत दिली.

◄(तभा वृत्तसेवा)

# आर्या बोरसेला पदकाची संधी

## ३८ वी राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा, उत्तराखंड

### वॉटर पोलो-रग्बीत दणदणीत विजय

**◆ डेहराडून, २९ जानेवारी**

डेहराडून, उत्तराखंड येथे होणाऱ्या ३८व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत महाराष्ट्राच्या आर्या बोरसे हिने १० मीटर एअर रायफल प्रकारात अंतिम फेरीत गाठून पदकाच्या आशा पल्लवीत केल्या आहेत. दुसरीकडे वॉटर पोलोमध्ये पुरूषांनी, तर रग्बीमध्ये महिला संघाने जोरदार विजयी सलामी देत स्पर्धेत बुधवारचा दिवस गाजवला.

डेहराडूनमधीलइ त्रिशूल शूटिंग रेंजवरील नेमबाजी स्पर्धेत आर्या बोरसे प्राथमिक फेरीत ६३४.५ गुणांसह दुसरे स्थान मिळविले. हरयाणाची रमिता हिने ६३४.९ गुणांसह अव्वल स्थानी राहिली. आर्या ही नाशिकची खेळाडू असून, सध्या ती नवी दिल्लीतील भारतीय क्रीडा प्राधिकरणाच्या (साई) प्रशिक्षण केंद्रात सराव करते. तिने आजपर्यंत वेगवेगळ्या वयोगटातील स्पर्धांमध्ये भरघोस पदके जिंकली आहेत. उद्या देखील ती सर्वोत्तम कामगिरी करील असा आत्मविश्वास प्रशिक्षक ओंकार गोसावी यांनी व्यक्त केला.

**रग्बीत महिलांची धडाकेबाज सुरुवात**

बुधवारी रग्बी स्पर्धांना प्रारंभ झाला. महिलांच्या गटात महाराष्ट्राने तामिळनाडूची ६८-० गोल फरकाने दाणादाण उडविली. एकतर्फी झालेल्या या लढतीमध्ये महाराष्ट्राच्या मुलींनी पूर्वार्धात ३५-० अशी भक्कम आघाडी मिळविली होती.



लक्ष्य साधताना आर्या बोरसे

**वॉटर पोलोमध्ये दणदणीत विजय**

हल्दवानी येथे सुरू असलेल्या वॉटर पोलो स्पर्धेत पुरुषांच्या गटात महाराष्ट्राने हरयाणाला २०-० गोल फरकाने निष्प्रभ केले. एकतर्फी झालेल्या या लढतीत महाराष्ट्राच्या भूषण पाटीलने पाच गोल केले, तर सारंग चार गोल केले.

महाराष्ट्राने वॉटर पोलो मध्ये कायमच वर्चस्व गाजविले आहे. आजही त्याचीच प्रचिती आली. सुरुवातीपासूनच महाराष्ट्राच्या खेळाडूंनी उत्कृष्ट संगीत खेळाबरोबरच गोल नोंदविण्याबाबतही अचूकता दाखवित दणदणीत विजय मिळविला. ◄(वृत्तसंस्था)

### के. एल. राहुलच्या उपस्थितीमुळे कर्नाटकला विजयाची आशा

**◆ बंगळुरू, २९ जानेवारी**

रणजी करंडक क्रिकेट स्पर्धेत उपांत्यपूर्व फेरीत स्थान मिळवण्यासाठीच्या सामन्यात केएल राहुलच्या उपस्थितीमुळे कर्नाटक संघाला चालना मिळाली आहे. गुरुवारपासून बंगळुरू येथे कर्नाटक व हरयाणा यांच्यादरम्यान रणजी करंडक एलिट गट क मधील शेवटचा साखळी सामना खेळला जाणार आहे. हरयाणा संघ या लीगच्या गुणतालिकेत गटात अव्वल स्थानावर आहे. उपांत्यपूर्व फेरीत स्थान मिळविण्यासाठी कर्नाटकला हरयाणाविरुद्ध बोनस पॉइंटसह विजय आवश्यक आहे व त्याकरिता संघाला के. एल. राहुलच्या अनुभवाचा आधार घ्यावा लागेल. कर्नाटकचे सध्या १९ गुण आहेत हरयाणाकडे २६ गुण आहेत, परंतु २१ गुणांसह केरळ दोन्ही संघांवर दबाव निर्माण करत आहे. माजी विजेत्या संघाने एम. चिन्नास्वामी स्टेडियमवर बोनस पॉइंट मिळवून (७ गुण) विजय मिळवला, तर त्यांचे गुणसंख्या २६ होईल. अशा परिस्थितीत, केरळचा तिरुवनंतपुरममधील थुंबा येथे संघ अंतिम आठमध्ये प्रवेश करू शकतो.

◄(वृत्तसंस्था)



# नेताजी प्रशालेच्या सारिका बुधारामला राष्ट्रीय तायक्वांदो स्पर्धेत कांस्य पदक

**सोलापूर दि.२९ जानेवारी-**

नीलमनगर येथील नेताजी सुभाषचंद्र बोस प्रशालेतील सारिका दत्तात्रय बुधारामने चौथ्या राष्ट्रीय ओपन चॅम्पियनशिप तायक्वांदो स्पर्धेत कांस्य पदक पटकाविले. गोव्यातील मापुसा करसवाडा येथे झालेल्या चौथ्या इंडियन ओपन राष्ट्रीय तायक्वांदो चॅम्पियनशिपमध्ये महाराष्ट्राच्या सारिकाने ज्युनियर, महिला, ६८ किलो वजनी गटात ही कामगिरी केली. तिचे नेताजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष अण्णाराव कुंभार यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी मुख्याध्यापक रविशंकर कुंभार, राजराजेश्वरी प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका वैशाली कुंभार, पर्यवेक्षक गौरीशंकर आळंगे, क्रीडा विठ्ठल कुंभार, सूर्यकांत बिराजदार, अशोक पाटील आदी उपस्थित होते.

# स्मिथच्या १० हजार कसोटी धावा

**गॅले, २९ जानेवारी**

येथे बुधवारपासून प्रारंभ झालेल्या यजमान श्रीलंकेविरुद्धच्या पहिल्या कसोटी क्रिकेट सामन्यात ऑस्ट्रेलियाकडून खेळताना स्टीव्ह स्मिथने आपल्या १० हजार कसोटी धावा पूर्ण केल्या. सलामीवीर उस्मान ख्वाजा (१४७), स्टीव्ह स्मिथची (नाबाद १०४) दमदार शतके व ट्रॅव्हिस हेडच्या (५७) अर्धशतकाच्या बळावर ऑस्ट्रेलियाने दिवस अखेर पहिल्या डावात ८१.१ षटकांत २ बाद ३३० धावा उभारल्या. या महिन्याच्या सुरुवातीला सिडनी येथे झालेल्या पाचव्या ऑस्ट्रेलिया-भारत कसोटीत बाद झाला तेव्हा स्मिथने ९,९९९ कारकिर्दीतील कसोटी धावा केल्या होत्या. कारकिर्दीत १०,००० धावा पूर्ण करणारा स्मिथ कसोटी १५ वा आणि ऑस्ट्रेलियाचा चौथा खेळाडू ठरला. त्याने पहिल्याच चेंडूवर मिड- ऑनला एक धाव मारून हा टप्पा गाठला. रिकी पॉन्टिंग (१३,३७८), ॲलन बॉर्डर (११,१७४) व स्टीव्ह वॉ (१०,९२७) हे ऑस्ट्रेलियाचे इतर फलंदाज असून यांनी कसोटी कारकिर्दीत १०,००० धावा केल्या आहेत. सचिन तेंडुलकर १५,९२१ धावांसह सर्वाधिक कसोटी धावा काढणारा फलंदाज आहे. उस्मान ख्वाजा व ट्रॅव्हिस हेडने ९२ धावांची सलामी भागीदारी केली. उस्मानने २१० चेंडूत नाबाद १४७ धावांचे योगदान दिले. स्टीव्ह स्मिथ १८० चेंडूत १०४ धावांवर नाबाद राहिला.



# राष्ट्रीय स्पर्धेत वालचंदच्या विक्रम शर्माला सुवर्ण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २९ जानेवारी-**

छत्तीसगड येथे १८ ते २२ जानेवारी दरम्यान झालेल्या भारतीय पॉवरलिफ्टींग असोसिएशनच्या राष्ट्रीय पॉवरलिफ्टिंग स्पर्धेमध्ये वालचंद कॉलेज ऑफ आर्ट्स अँड सायन्सच्या विक्रम शर्मा याने ५३ किलो वजनी गटांमध्ये राष्ट्रीय रेकॉर्ड करत सुवर्णपदक पटकावले. त्याला क्रीडाशिक्षक राहुल हजारे यांचे मार्गदर्शन लाभले. त्याच्या या कामगिरीसाठी प्राचार्य डॉ. संतोष कोटी, उपप्राचार्य अनुप म्हेत्रे, पर्यवेक्षक डॉ.जीवराज कस्तुरे यांनी अभिनंदन केले.

# मध्य रेल्वे, रचना नोटरी वर्क्स अंतिम विजेते

## विद्यार्थी क्रीडा केंद्राच्या व्यावसायिक खो-खो स्पर्धा, ४ फुट ११ इंच किशोर गटात सरस्वती स्पोर्ट्स क्लब विजयी




### स्पर्धेतील उत्कृष्ट खेळाडू

४ फुट ११ इंच किशोर गट : आक्रमक - पवन गुरव (विद्यार्थी), संरक्षक - अधिराज गुरव (ओम साईश्वर), अष्टपैलू - महेक आदवडे - (सरस्वती). व्यावसायिक महिला :आक्रमक - काजल शेख (रचना), संरक्षण - सेजल. यादव (रचना), अष्टपैलू - कल्याणी कंक (महावितरण). पुरुष : आक्रमक - सम्यक जाधव (पश्चिम रेल्वे), संरक्षक - अवधूत पाटील (मध्य रेल्वे), अष्टपैलू - दिलीप खांडवी (मध्य रेल्वे).

**मुंबई, दि. २८ जानेवारी-**

विद्यार्थी क्रीडा केंद्राच्या व्यावसायिक खो-खो स्पर्धेत पुरुष गटात मध्य रेल्वे व महिला गटात रचना नोटरी वर्कसने विजेतेपद पटकाविले. ४ फुट ११ इंच किशोर गटात सरस्वती स्पोर्ट्स क्लबने विजेतेपदाचा मान मिळविला.

मुंबई खो-खो संघटनेच्या मान्यतेने ही स्पर्धा लाल मैदान परळ येथे पार पडली. यावसायिक पुरुष गटाच्या अंतिम सामन्यात मध्य रेल्वेने पश्चिम रेल्वेचा (८-८-९-६) १७-१४ असा ३ गुणांनी पराभव केला. मध्य रेल्वेतर्फे दिलीप खांडवीने १:१०, २:२० मिनिटे संरक्षण करून आक्रमणात २ गडी बाद केले. अवधूत पाटीलने १:३०, २:२० मिनिटे संरक्षण करून आक्रमणात २ गडी बाद केले. मिलिंद चावरेकर व रोहन शिंगाडेने प्रत्येकी १:००, १:२० मिनिटे संरक्षण करून आक्रमणात प्रत्येकी ४ गडी बाद केले. पश्चिम रेल्वेतर्फे सम्यक जाधवने १:१० मिनिटे संरक्षण करून आक्रमणात ५ गडी बाद केले. वृषभ वाघने २:१० मिनिटे संरक्षण करून आक्रमणात ३ गडी बाद केले. दिपक माधवने २:१०, १:३० मिनिटे संरक्षण केले.

व्यावसायिक महिला गटाच्या अंतिम सामन्यात रचना नोटरी वर्क्सने महावितरण कंपनी संघाचा (६-५-४-६) ११-१० असा १ गुण व १:१० मिनिटे राखुन पराभव केला. रचनातर्फे पुजा फरगडेने २:००, २:३० मिनिटे संरक्षण करून आक्रमणात ३ खेळाडू बाद केले. श्वेता जाधवने २:२० मिनिटे संरक्षण करून आक्रमणात ४ खेळाडू बाद केले. सेजल यादवने ३:२०, १:४० मिनिटे संरक्षण केले. महावितरण तर्फे दिलेली लढत संघाला पराभवापासून वाचवू शकली नाही.

४ फुट ११ इंच किशोर गटाच्या अंतिम सामन्यात सरस्वती स्पोर्ट्स क्लबने विद्यार्थी क्रीडा केंद्राचा (३-१-१-२) ४-३ असा १ गुण व ५:३० मिनिटे राखून पराभव केला. सरस्वतीतर्फे मेहक आदवडेने नाबाद ६:००, नाबाद ३:१० मिनिटे संरक्षण करून आक्रमणात १ गडी बाद केला. वरुण गुप्ताने २:५० मिनिटे संरक्षण करून आक्रमणात १ गडी बाद केला. शिवम झाने १:००, १:०० मिनिटे संरक्षण केले. विद्यार्थीतर्फे अपसर शेखने ३:२० मिनिटे संरक्षण केले. पवन गुरवने १:०० मिनिटे संरक्षण करून आक्रमणात १ गडी बाद केला. ओमकार जाधवने २:३० मिनिटे संरक्षण केले.



# आष्टीच्या नूतन विद्यालयाच्या खेळाडूंची विभाग स्तरावर निवड

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २९ जानेवारी -**

जिल्हा शालेय आष्टे टू आखाडा क्रीडा स्पर्धेत आष्टीच्या नूतन विद्यालयाच्या रोशनी तानाजी शेळके व अनुष्का अमोल व्यवहारे यांची पुणे विभागीय शालेय स्पर्धेसाठी निवड झाली.

बार्शी येथे झालेल्या स्पर्धेत १७ वर्षे वयोगटात रोशनीने (इयत्ता ८ वी) ३८ किलो वजनी गटात तर अनुष्काने (इयत्ता ८ वी) ४४ किलो वजनी गटात प्रथम क्रमांक पटकाविला. या कामगिरीवर त्यांची निवड झापली. संदीप शहा, श्री. घोडके व रणजित माने यांच्या मार्गदर्शनाखाली सात स्पर्धक सहभागी झाले होते. या यशस्वी खेळाडूंचे श्री ऐ. प. दि. जैन पाठशाळा या संस्थेचे मानद सचिव डॉ. रणजित गांधी, विश्वस्त भूषण शहा, पराग शहा, मुख्याध्यापक अजित हेरले, पर्यवेक्षक धैर्यशील पवार आदींनी अभिनंदन केले.

## भारतीय गणराज्य दिन




### लाल बहाद्दूर शास्त्री प्रशाला, वळसंग

**वळसंग :** लाल बहाद्दुर शास्त्री प्रशाला दिंडुर (ता.द.सोलापूर)च्या वतीने प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष विठ्ठल हुच्चे उपस्थित होते तर कार्यक्रमाचे अध्यक्ष संस्थेचे अध्यक्ष नागलिंगय्या स्वामीजी होते. शिवशरण हुंचळगी, बसवराज भद्रे (फ्रिडम ग्रुप सदस्य) व विठ्ठल हुच्चे यांच्या हस्ते प्रतिमा पूजन करण्यात आले. ध्वजकट्टाचे पूजन शांतय्या हिरेमठ यांच्या हस्ते करण्यात आला. अध्यक्ष नागलिंगय्या स्वामीजी यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. तसेच या कार्यक्रमास खाऊ वाटप श्री धानलिंगेश्वर विश्वस्त मंडळ, शरणबसप्पा कांदे, रवि वाघमारे व संस्थेकडून करण्यात आले. प्रास्ताविक मुख्याध्यापक बंडगर यांनी केले. सूत्रसंचालन मल्लिकार्जुन शिवयोगी यांनी केले. आभार घोडके यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी मुख्याध्यापक बंडगर, घोडके, कामरय्या स्वामी, शिवयोगी, नितीन नारायणकर, राणी बिराजदार, स्नेहल बिराजदार, शिक्षक मिरजे, पाकणीकर, लक्ष्मण हुळ्ळे, शिवानंद घोडके यांचे सहकार्य केले.




### गुळवंची ग्रामपंचायत

**सोलापूर :** भारताच्या ७६ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त गुळवंची ग्रामपंचायत कार्यालय येथे गावातील गिता गोलबले,राणू ढाले या विधुर महिलेच्या हस्ते तर जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत दिव्यांग हरिदास क्षीरसागर,विष्णू पवार यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले या आगळ्या- वेगळ्या क्षणांनी महिला भारावून गेल्या,यावेळी सरपंच सुनील जाधव,माजी सरपंच अश्विनी जाधव, संजय पौळ, विष्णू भोसले, दिनेश जगताप, उपसरपंच आरती त्रिंबक इंगळे, माजी उपसरपंच सुनंदा शिंदे, त्रिंबक इंगळे, शहाजी भोसले,भारत तांबे, संभाजी भोसले, गणेश शिंदे, मारुती इंगळे, अनिल तांबे, तानाजी बापू भोसले, किसन भोसले, अरुण बोराडे, गणेश नवगिरे, दादा भोसले, सुहास भोसले, धनाजी भोसले, गणेश भोसले, श्रीराम भोसले, विक्रम जगताप, सागर तांबे, प्रभाकर पांढरे, दत्तात्रय भोसले, शहाजी बोराडे, अजिंक्य गायकवाड, रंजना कोरके, विजया बोराडे, भाग्यश्री कोरके उपस्थित होते.



### खेडगी महाविद्यालय, अक्कलकोट

**अक्कलकोट :** अक्कलकोट एज्युकेशन सोसायटी संचलित सी. बी. खेडगी महाविद्यालयात प्रजासत्ताक दिनानिमित्त उपाध्यक्षा भारतीताई खेडगी यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. महाविद्यालयाच्या एनसीसीच्या विद्यार्थ्यांनी नेत्रदिपक संचलन करून राष्ट्रीय ध्वजास मानवंदना दिली. तसेच यावेळी महिला एनसीसी प्रमुख म्हणून प्रा. वर्षाराणी हत्ताळी यांची निवड झाल्याबद्दल सत्कार करण्यात आला. यावेळी माजी नगराध्यक्षा शोभाताई खेडगी, संस्थेचे चेअरमन बसलिंगप्पा खेडगी, सचिव सुभाष धरणे, व्हाइस चेअरमन अशोक हारकुड, संचालक ॲड. अनिल मंगरुळे, पवित्रा खेडगी, सिध्दम्मा कलशेट्टी, ज्योती धरणे, चंद्रकांत स्वामी, श्रीशैल भरमशेट्टी, प्राचार्य डॉ. शिवराय अडवीतोट, उपप्राचार्या वैदेही वैद्य, पर्यवेक्षक संजय कलशेट्टी, कार्यालयीन प्रमुख सुहास होटकर, एनसीसी प्रमुख डॉ. भैरप्पा कोणदे उपस्थित होते. सूत्रसंचालन डॉ. किशोर थोरे यांनी केले तर प्रा. प्रकाश सुरवसे यांनी आभार मानले.

## निधन वृत्त...

### प्रभावती गायकवाड



**सोलापूर, दि. २९ जानेवारी-**
प्रभावती अशोक गायकवाड (वय ८२) यांचे बुधवारी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात एक मुलगा, दोन मुली, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्यावर बुधवारी जुना पुणे नाका येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. शिवसेनेचे शहर उत्तर विधानसभा मतदारसंघ प्रमुख बाळासाहेब गायकवाड यांच्या मातोश्री होत.

### नागनाथ सोमा



**सोलापूर, दि. २९ जानेवारी-**
दाजी पेठ येथील नागनाथ सिद्रामप्पा सोमा (वय ६३) यांचे बुधवारी (दि. २९ जानेवारी) रोजी निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, २ मुले, १ मुली, भाऊ, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

### भीमराव गोडसे



**बार्शी, दि. २९ जानेवारी-**
तालुक्यातील पांगरी येथील जुन्या काळातील हळद व्यावसायिक तथा वारकरी संप्रदायातील भीम राव मारुती गोडसे याचे अल्प आजाराने निधन झाले. मृत्यू समयी ते ७८ वर्षाचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, एक मुलगी, सुना, नातवंडे, एक बहिण असा परिवार आहे. पत्रकार गणेश गोडसे यांचे ते वडील होत.

# विद्यार्थी, धावले, खेळले अन् जिंकलेही

## सोजर कॉलेज ऑफ फार्मसीमध्ये क्रीडा सप्ताह उत्साहात साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २९ जानेवारी-**
यशोदा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित सोजर कॉलेज ऑफ फार्मसीमध्ये क्रीडा सप्ताह घेण्यात आला. स्पर्धेचे उद्घाटन सोजर कॉलेज ऑफ फार्मसीच्या द्वितीय वर्षातील विद्यापीठस्तरीय ॲथलेटिक्स चॅम्पियन पवन सुरवसे याच्या हस्ते करण्यात आले. क्रीडा सप्ताहात क्रिकेट, हॉलीबॉल, चेस बॅडमिंटन, टेबल टेनिस, रनिंग, कॅरम, थ्रो बॉल आदींच्या स्पर्धा घेण्यात आल्या. यात विद्यार्थी धावले, खेळले, जिंकलेही.

क्रिकेट मुलांच्या संघामध्ये प्रथम क्रमांक बी. फार्म सेकंड इयर व द्वितीय क्रमांक फायनल इयर बी. फार्म तसेच क्रिकेट गर्ल यामध्ये प्रथम डी. फार्म फर्स्ट इयर आणि द्वितीय -बी. फार्म फायनल इयर,



व्हॉलीबॉलमध्ये प्रथम बी. फार्म थर्ड इयर आणि द्वितीय डी. फार्म फर्स्ट इयर, थ्रो बॉलमध्ये प्रथम बी. फार्म फायनल ईयर आणि द्वितीय बी. फार्म सेकंड इयर यांनी बाजी मारली.

तसेच चेस बॉईज स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक धनराज गाढवे बी फार्म थर्ड इयर आणि द्वितीय क्रमांक ऋत्विक ननवरे बी फार्म फायनल इयर व चेस गर्ल्स स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक वैष्णवी सपकाळ बी फार्म थर्ड इयर आणि द्वितीय क्रमांक आदिती आतकर डी फार्मसी फर्स्ट इयर यांनी बाजी मारली, याचबरोबर रनिंग बॉईजमध्ये डी फार्मसी फर्स्ट इयरमधील गणेश पाटील प्रथम क्रमांक आणि बी फार्मसी फायनल इयरमधील जयवंत गायकवाड याने द्वितीय क्रमांक पटकावला.

रनिंग गर्ल्स मध्ये प्रथम क्रमांक पूजा कदम डी फार्मसी फर्स्ट इयर आणि द्वितीय क्रमांक प्रतीक्षा गिराम बी फार्मसी सेकंड इयर यांनी पटकावला. तसेच कॅरम बॉईज स्पर्धेमध्ये अक्षय श्रीमल बी फार्म फायनल इयर याने प्रथम क्रमांक तर नौमान हुसेनी बी फार्मसी सेकंड ईयर आणि अभय पांचाळ बी फार्मसी थर्ड इयर यांनी द्वितीय क्रमांक पटकावला. कॅरम गर्ल्स मध्ये प्रथम क्रमांक वैशाली मिसाळ डी फार्मसी फर्स्ट इयर आणि द्वितीय क्रमांक सानिका सुरवसे बी फार्मसी फायनल इयर हिने पटकावला. त्याचबरोबर बॅडमिंटन बॉईज स्पर्धेमध्ये अथर्व एलमे बी फार्म थर्ड इयर याने प्रथम क्रमांक तर धनराज गाढवे बी फार्म थर्ड इयर याने द्वितीय क्रमांक मिळवला तर बॅडमिंटन गर्ल्समध्ये प्रणिता कुंभार फायनल इयर प्रथम क्रमांक व तनवी मुंडे बी फार्म फर्स्ट इयर द्वितीय क्रमांक. समन्वयक म्हणून प्राध्यापक रणजित शेळके यांनी काम पाहिले.

स्पर्धेसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुजित करपे व अध्यक्ष अरुणदादा बारबोले यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

#### टेबल टेनिसमधील विजेते

टेबल टेनिस बॉइज स्पर्धेमध्ये कानिफनाथ जाधव डी. फार्मसी सेकंड ईयर याने प्रथम क्रमांक तर करण सोळंकी डी. फार्मसी सेकंड ईयरने द्वितीय क्रमांक मिळवला आणि टेबल टेनिस गर्ल्समध्ये प्रथम क्रमांक सलोनी नरखेडकर आणि द्वितीय क्रमांक सानिका सुरवसे बी. फार्मसी फायनल इयर यांनी पटकावला.



## गुंजेगावमध्ये आरोग्याचा कुंभमेळा; तब्बल ६२७ रुग्णांची तपासणी

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि.२९ जानेवारी -**
गुंजेगाव ग्रामस्थ यांच्या सहकार्यातून प्रजासत्ताक दिनानिमित्त मोफत आरोग्य तपासणी शिबीरर घेण्यात आले. या आरोग्याच्या कुंभमेळ्यात ६२७ जणांची तपासणी करण्यात आली.

या शिबिरासाठी मिरज येथील डॉ. विराज लोकुर, डॉ. रवींद्र अरळी, डॉ. संजय साळुंखे, डॉ. तुषार धोपाडे, डॉ. प्रदीप देवकते, डॉ. योगेश वाघ, डॉ. सुरेश पाटील, डॉ. सचिन जंगम, डॉ. चैतन्य कारंजे , डॉ. विशाल पाटील, डॉ. राजकुमार खंबे, डॉ. राहुल चड्डा, डॉ. श्रीनाथ पाटील, डॉ. ऋषिकेश अरळी, डॉ. अक्षय पाटील, डॉ. अभिषेक कुलकर्णी, डॉ. अनुजा योगेश वाघ, डॉ. राजेश गोसावी अशी १८ डॉक्टरांची टीमने वेगवेगळ्या आजाराची आरोग्य तपासणी केली. या मध्ये बालरोग, जनरल व लॅपरोस्कोपी, स्त्रीरोग , हृदयरोग, अस्थिरोग, किडणी स्टोन, फिजीशियन, नेत्ररोग, दंतरोग, नाक, कान व घसा, फुफ्फुस व श्वसन विकार अशा आजारांची तपासणी करण्यात आली. उद्घाटन माजी आ. प्रशांत परिचारक यांनी केले. समारोप आ. समाधान आवताडे यांचे हस्ते करण्यात आला.

## बचेरी येथे अनैतिक सबंधातून खून; आरोपीस जन्मठेपेची शिक्षा

**पिलीव, दि २९ जानेवारी-**
बचेरी येथे अनैतिक संबंधातून खून केल्याप्रकरणी एकाला जन्मठेप व दंडाची शिक्षा माळशिरस न्यायालयाने दिली आहे.

माळशिरस तालुक्यातील बचेरी येथे २ ऑक्टोबर २०१८ रोजी आरोपी महादेव विष्णू थिटे (वय ५२) याने त्याची पत्नी सिताबाई महादेव थिटे व यातील मयत मंगल शहाजी थिटे हिचे शहाजी आगतराव थिटे यांच्याबरोबर अनैतिक संबंध होते. याचाच राग मनात धरुन १ ऑक्टोबर २०१८ रोजी रात्री १२ वाजण्याच्या सुमारास आरोपीने त्याचा चुलतभाऊ शहाजी थिटे व त्याचा भाऊ यास कायमचे संपवून टाकण्याच्या इराद्याने घरातील कुऱ्हाड घेऊन शहाजी थिटे राहत असलेल्या वस्तीवर जाऊन दबा धरुन बसला होता. त्यावेळी रात्री शहाजी व त्याची पत्नी तसेच मुलगा संतोष हे सर्वजण अंगणात झोपले होते. यावेळी यातील मयत मंगल ही रात्री कशाला तरी उठून घराच्या बाजूला जात असलेले आरोपीने पाहिले असता मंगल थिटे हिच्या डोक्यात लोखंडी कुऱ्हाड घालून जागीच मारुन टाकून तेथून अंधाराचा फायदा घेत पळ काढला, अशी फिर्याद दत्तू शहाजी थिटे यांनी माळशिरस पोलीस ठाण्यात २ ऑक्टोबर रोजी दिली होती. या गुन्ह्याचा निकाल माळशिरस न्यायालयाने दिला असून आरोपीस जन्मठेपेची शिक्षा व एक हजार रूपये दंड सुनावण्यात आला आहे. तपास माळशिरस पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक विश्वंभर गोल्डे यांनी केला होता.



## पिलीव ग्रामोत्सवाची बक्षीस वितरणाने सांगता

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि. २९ जानेवारी-**
माळशिरस तालुक्यातील पिलीव येथे ग्रामपंचायत व पिलीव ग्रामोत्सव समिती व शाळा व्यवस्थापन समितीच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ग्रामोत्सवाची सांगता बक्षीस वितरणाने आ. रणजितसिंह मोहिते-पाटील यांच्या हस्ते करण्यात आली.

प्रारंभी सरस्वतीच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन करण्यात आले. यावेळी जिल्हा परिषदचे माजी कृषी व पशुसंवर्धन सभापती संग्रामसिंह जहागिरदार, ग्रामपंचायत प्रशासक अनिल सावळजकर, अविनाश जेऊरकर, मोहन करांडे, दादासाहेब शिंगाडे, सचिन मदने, प्रकाश जाधव, सुषमा जामदार, सुनिल खुर्द, उमेश देशमुख, समशेरसिंग रजपूत, नानासाहेब मदने, राजेंद्र करांडे, तानाजी लोखंडे, केंद्र प्रमुख राजकुमार फासे, अमोल गांधी, चंद्रकांत धसाडे, मोहसीन शेख, दामोदर लोखंडे, संजय पाटील उपस्थित होते. आ. उत्तमराव जानकर यांनीही उपस्थिती लावली.

## आवताडे शुगरच्या कर्मचाऱ्यांना वेतनवाढ

### प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधत चेअरमन संजय आवताडे यांच्याकडून कर्मचाऱ्यांना दिलासा

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि.२९ जानेवारी-**
आवताडे शुगरने दैनिक वेतनावर कामा करणाऱ्या कामगारास जून २०२४ पासून हंगाम २०२२-२३ मध्ये रुजू झालेल्यांना २००० व २०२३-२४ मध्ये कामावर हजर झालेल्यांना रु.१७५० प्रमाणे वेतनवाढ देण्यात आली आहे. तसेच हंगामी कामगारांना नोव्हेबर २०२४ पासून हंगाम २०२२-२३ मध्ये रुजू झालेल्यांना २००० व हंगाम २०२३-२४ मध्ये रुजू झालेल्यांना १,५०० प्रमाणे वेतन वाढ दिल्याचे चेअरमन संजय आवताडे यांनी सांगितले.

कायम सेवेतील कामगारासाठी जानेवारी २०२५ पासून हंगाम २०२२-२३ मध्ये कामावर हजर झालेल्यांना १० टक्के, हंगाम २०२३-२४ मधील कामगारास ७.५ टक्के व हंगाम २०२४-२५ मधील काम



गारास ५ टक्के वेतन वाढ देण्यात येईल, असेही आवताडे यांनी सांगितले. यावेळी कारखान्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुर्मदास चटके, कार्यकारी संचालक मोहन पिसे, सुहास शिनगारे, मोहन पवार, संभाजी फाळके, बजरंग जाधव, राहुल नगणे, तोहिद शेख, दामोदर रेवे, अभिजित पवार, चंद्रकांत राठोड, रणजीत पवार, सुधाकर पाटील, रणजीत रणदिवे, अमोल शिंदे उपस्थित होते.




## उमा महाविद्यालयाचे एनएसएसचे गादेगाव येथे शिबीर सुरु

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २९ जानेवारी-**
येथील उमा महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे 'युथ फॉर माय भारत व डिजिटल साक्षरतेसाठी युवक'हे ब्रीद वाक्य घेऊन पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ सोलापूर व उमा महाविद्यालय पंढरपूर राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे विशेष श्रमसंस्कार शिबिराचे गादेगाव येथे उद्घाटन संस्थेचे विश्वस्त युवा नेते प्रणव परिचारक, गादेगाव सरपंच सीमाताई बालाजी बागल यांच्या हस्ते करण्यात आले.

प्राचार्य डॉ. धीरजकुमार बाड यांनी रासेयो स्वयंसेवक विद्यार्थ्यांना या विशेष श्रमसंस्कार शिबिराच्या माध्यमातून भरीव कामे केली जातात. यामुळे स्वयंसेवक विद्यार्थ्यांना श्रमाचे महत्व कळते. स्वयंसेवक विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्व विकास होतो. यामध्ये समाजाचा मोठा वाटा असतो. म्हणूनच ग्रामस्थांचाही सहभाग असावा असे आवाहन केले. शिवाजी शिंदे, अनिल बागल यांनी मनोगते व्यक्त केली. स्वागत व प्रास्ताविक कार्यक्रमाधिकारी प्रा. सिंधू खिलारे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. व्ही. एन. कावरे यांनी केले. आभार कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. एन. एस. लोखंडे यांनी मानले.

## पंढरपुरात ७६६ जणांचे रक्तदान

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२९ जानेवारी-**
अखिल भारतीय व महाराष्ट्र राज्य औषध विक्रेता संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष, जगन्नाथआप्पा शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त देशव्यापी एकाच दिवशी, एकाचवेळी महारक्तदान शिबीर घेण्यात आले. यावेळी ७५५ जणांनी रक्तदान केले. यावेळी पढरपूर शहर व तालुक्यातील भाळवणी, भोसे, फुलचिंचोली या गांवामध्ये शिबीर घेण्यात आले.

पंढरपूरमध्ये केमिस्ट व ड्रगिस्ट असोसिएशन अध्यक्ष प्रशांत खलिपे यांच्या मार्गदर्शनाखाली पंढरपूर शहरात ५४७ तर व




तालुका ग्रामीणमध्ये फुलचिंचोली ७७, भोसे-करकंब ७२, भाळवणी ५९ असे एकूण विक्रमी ७५५ रक्तदात्यांनी रक्तदान केले. यावेळी अध्यक्ष प्रशांत खलिपे, सचिव महादेव जाधव, खजिनदार श्रीरंग राहिरकर, उपाध्यक्ष मिलिंद उकरंडे, सहसचिव दीपाली कारंडे, पीआरओ उमेश गायकवाड, कार्यकारिणी सदस्य श्रध्दा कुलकर्णी, रावसाहेब गवळी, मनोज वास्ते, शिवराज पाटील, सचिन मेनकुदळे, शिवराम कोरके, फरदीन शेख, गोवर्धन भट्टड, सुदेश व्होरा, श्रीरंग बागल, दिलीप कारंडे, विनय उपाध्ये, श्रीकांत भुमरेला, अजित कुलकर्णी, हर्षल इनामदार, राहुल जाधव, माधुरी जाधव, अमृता माने, आनंद मेलगे, विशाल वाघमोडे, गणेश मेटकरी यांनी परिश्रम घेतले.

## पिलीव येथील मोटर दुरुस्ती दुकानात चोरी


**पिलीव, दि. २९ जानेवारी-**
पिलीव येथील कोहिनूर मोटर दुरुस्ती दुकानाच्या शटर तोडून २० किलो कॉपर वायरे, ६० किलो जुनी स्क्प वायर, ३० किलो वजनाचे काउंटर बुश, ५००,१०० रुपयांच्या रोख स्वरुपातील चलनी नोटा पाच हजार असे एकूण ५० हजारांच्या साहित्याची चोरी झाली आहे. याबात फिर्याद चेतन कैलास काळे यांनी फिर्याद दिली आहे.


## बीआयटीमधील तीन विद्यार्थिनींची आवादा कंपनीमध्ये निवड

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २९ जानेवारी-**
जे. एस. पी. एम. पुणे संचलित बार्शी येथील भगवंत अभियांत्रिकी महाविद्यालय (बीआयटी) मधील इंजिनिअरिंगमध्ये शिकणाऱ्या ३ विद्यार्थिनींची आवादा कंपनीमध्ये निवड झाल्याची माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रणजित शिराळ यांनी दिली.

जे. एस. पी. एम. ग्रुपतर्फे कॅम्पस प्लेसमेंट ड्राइव्हचे आयोजन नुकतेच करण्यात आले होते. यावेळी कंपनीच्या निवड समितीने विद्यार्थ्यांच्या मुलाखती घेतल्या. त्या मुलाखतीमधून विद्यार्थ्यांच्या गुणात्मक अभ्यासाबरोबरच कमालीची शिस्त, आदरयुक्त संबंध व उत्कृष्ट शिक्षण पद्धती यामुळे निवड समिती अत्यंत प्रभावित झाली. त्यांनी निवड प्रक्रियेमधून इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशनमध्ये पदवीच्या शेवटच्या वर्षात (बी.ई.) शिकणाऱ्या वैष्णवी हंडीबाग, अंकिता ढगे आणि प्रणाली गोरे या ३ विद्यार्थिनींची कॅम्पस मुलाखतीमधून निवड केली. त्यांना प्रत्येकी वार्षिक ४.५० लाख रुपये इतके पॅकेज मिळाले आहे. शिक्षकांचे प्रयत्न व विद्यार्थ्यांची मेहनत यामुळे शिक्षण पूर्ण होण्यापूर्वीच नोकरीची संधी उपलब्ध झाल्याने विद्यार्थी व पालक यांच्यात समाधानाचे वातावरण पसरले आहे. तसेच बीआयटीमध्ये विविध राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय कंपन्या येत असतात व पात्र विद्यार्थ्यांची निवड करतात. त्यामुळे भविष्यात देखील महाविद्यालयाचे अनेक विद्यार्थी विविध कंपन्यामध्ये राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर आपले करिअर घडवतील यासाठी महाविद्यालय व त्यांचे ट्रेनिंग व प्लेसमेंट सेल कटिबद्ध असल्याचा विश्वास व ग्वाही यावेळी ट्रेनिंग व प्लेसमेंट अधिष्ठाता प्रा. गजानन बुरगुटे यांनी दिली.

या विद्यार्थ्यांना ट्रेनिंग अँड प्लेसमेंटचे सेलचे प्रा. गजानन बुरगुटे, प्रा. अभेद चोपडे, विभागप्रमुख प्रा. कुमार लोंढे व इतर सर्व शिक्षकांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल त्यांचे संकुल संचालक ऋतुराज सावंत, प्राचार्य डॉ. रणजित शिराळ, महाविद्यालयांतर्गत असलेल्या इतर विभागप्रमुख व प्राध्यापक वर्ग व शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्यासह पदाधिकाऱ्यांनी निवड झालेल्या विद्यार्थिनींचे अभिनंदन केले.


पद्म
भूषण
PADMA BHUSHAN
NBK
Shri. Nandamuri Balakrishna, MLA
Congratulations..
नरसिंह कनकी
अध्यक्ष
श्रीनिवास कट्टा
सचिव
Estd. 1988
PLATINUM JUBILEE STAR
NBK-BALU
YOUTH FEDERATION
SOLAPUR, MAHARASHTRA
PLATINUM JUBILEE STAR
NBK (BALU) YOUTH FEDERATION
Who In Need - Help Them
Reg.No.MH-933/15
नागनाथ बंडा
देविदास मंगलपल्ली
दयानंद अल्लोळी
रमेश महिंद्रकर
नागभूषण वंगारी
चंद्रकांत तुलसीगर
गिरीष अत्रलदास
अंबादास चाटला
रमेश तवटी
अंबादास नागुल
प्रभाकर इप्पलपल्ली
सत्यनारायण पोल
अंबादास मिठ्ठा
श्रीनिवास बिंगी
अंबुलाल अत्रलदास
बालाजी कोडम
लक्ष्मण महिंद्रकर
गोविंद बुगडे
किसन गुडेटी
रमेश सिद्दाल
अंबाजी कुणे
गोपी मिठ्ठा
श्रीनिवास नंदाल


पद्म
भूषण
Shri. Nandamuri Balakrishna, MLA
NBK
PADMA BHUSHAN
Congratulations
Balayya...
Helping Hands
NBK HELPING HANDS
SOLAPUR - MAHARASHTRA DIVISION
Anantapuram Jagan
Founder & Chairman
Nandal Shriniwas
Co-ordinator
Maharashtra Division
Narasimha Kanaki
Vijaykumar Konka
Mallesham Mushan
Krishna Chitken
Shivaji Mamdyal
Suresh Vanga
Sanjiv Kondur
Madhukar Shripuram
Jagdish Potu
Prakash Divate
Shriniwas Vadnal
Ramesh Bhimnath
Naresh Aken
Shriniwas Kandikatala
Dattatray Bacchu
Yalappa Macherla
Laxman Dasari
Narendra Gundeti
Gopi Dasari
Nagesh Yangandul

CMYK

# सोलापूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## सोलापुरात आज रोजगार मेळाव्याचे आयोजन

**सोलापूर दि.२८ जानेवारी-**

जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र आणि अहिल्याबाई प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने नोकरी इच्छुक बेरोजगार उमेदवारांसाठी गुरूवार ३० जानेवारी रोजी पंडित दीनदयाळ उपाध्याय (अल्पसंख्यांक विशेष) रोजगार मेळाव्याचे आयोजन केला आहे.

जिल्ह्यातील नोकरी इच्छुक उमेदवारांना रोजगार उपलब्ध होण्याच्या दृष्टीने हा रोजगार मेळावा आयोजित केला आहे. या रोजगार मेळाव्यात १० वी, १२ वी, आ. टी. आय. वेल्डर, फिटर, डिप्लोमा, ग्रॅज्युएट, ऑफिस असिस्टंट, कोणतीही पदवी, इलेक्ट्रीशीयन, मशीन ऑपरेटर, बी. कॉम अशा प्रकारची एकुण १ हजार ३७४ पेक्षा जास्त रिक्तपदे १३ उद्योजकांनी ऑनलाईन अधिसुचित केलेली आहेत.

नोकरी इच्छुक उमेदवारांनी बायोडेटांच्या तीन प्रती आणि कागदपत्रासह गुरुवार, दि. ३० जानेवारी रोजी सकाळी १० ते दुपारी २ वाजेपर्यंत अहिल्याबाई प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालय, ६८ आदर्श नगर, कुमठा नाका येथे मुलाखतीसाठी उपस्थित रहावे. याबाबत अधिक माहितीसाठी कार्यालयाच्या ०२१७-२९९२९५६ या दूरध्वनीवर अथवा प्रत्यक्ष भेटीद्वारे जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, नॉर्थकोट, पार्क चौक येथे संपर्क साधावा. असे आवाहन सहायक आयुक्त संगीता खंदारे यांनी केले आहे.



## ▶▶ संक्षिप्त वृत्त...

### पंचमुखी हनुमान देवस्थानम् येथे ३ फेब्रुवारीला कळसारोहण

**सोलापूर, दि. २९ जानेवारी-**

भावनाऋषी पेठ, जुन्या वालचंद महाविद्यालयसमोर ४५ वर्षांपूर्वी स्थापन झालेल्या श्री पंचमुखी हनुमान देवस्थानम् चा सुवर्ण



कळसारोहण, ३२ फुटी ध्वजस्तंभाची व परिवार देवतांची प्राणप्रतिष्ठापना सोमवार दि. ३ फेब्रुवारी रोजी सकाळी ९.५० या मुहूर्तावर यादगिरी गुट्टा येथील निवृत्त प्रधान अर्चक नरसिंहाचारी यांच्या पौरोहित्याखाली देवस्थानम् अर्चक नागराजशास्त्री व शिवराम शास्त्री यांच्या सहकार्याने दाक्षिणात्य वाद्यांच्या सुरात होणार आहे. या देवस्थानात श्री पंचमुखी हनुमानाची वराह, गरुड, हयग्रीव्ह, नृसिंह आणि हनुमान अशा पाच अवतारात पाहायला मिळतो. भक्तांच्या संकल्पनेतून अनेक वर्षानंतर सुवर्णकळसारोहणाचा योग आला असून यानिमित्त इतर धार्मिक कार्यक्रम आयोजित केले गेले आहेत. या धार्मिक सोहळ्याचा भाविकांनी लाभ घेण्याचे आवाहन देवस्थानम् सचिव सत्यनारायण गुर्रम यांनी केले आहे.

### निसर्ग विषयावर काव्यरचना पाठवण्याचे आवाहन


**सोलापूर, दि. २९ जानेवारी-**

जवाहर महाविद्यालय अणदूर येथील संस्कृत विभाग आणि ग्रीन क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने निसर्ग या विषयावर राज्यस्तरीय प्रातिनिधिक काव्यसंग्रह प्रकाशित करण्यात येणार आहे. कविता ही जास्तीत जास्त २० ओळीची आणि स्वरचित असावी. ही कविता आय. एस.बी.एन. नंबर असलेल्या राज्य काव्यसंग्रहात प्रकाशित करण्यात येईल. यातील सहभागी सर्व कवी आणि कवयित्रींना काव्य लेखनाचे प्रमाणपत्र व काव्यसंग्रहाची एक प्रत देण्यात येईल. कविता पाठवताना आपले पूर्ण नाव व पत्ता आणि मोबाईल नंबर देणे आवश्यक आहे. आपली स्वरचित कविता दि. १० फेब्रुवारी पर्यंत प्रा. डॉ. सत्येंद्र राऊत यांच्या ८२०८७४०८८० या व्हाट्सअॅप नंबरवर किंवा rautsatyendra07@gmail.com या मेलवर पाठवण्यात यावी, असे आवाहन संस्कृत विभाग प्रमुख व ग्रीन क्लब समन्वयक प्रा. डॉ. सत्येंद्र राऊत यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी ८२०८७४०८८० या नंबरवर संपर्क साधावा.

### ग्रंथपालन प्रशिक्षण प्रवेश ३१ जानेवारीपर्यंत मुदतवाढ

**सोलापूर, दि. २९ जानेवारी-**

महाराष्ट्र शासनाचे ग्रंथपालन प्रशिक्षण (मराठी माध्यम) जाने ते जून २५ या कालावधीमध्ये होणार आहे. यासाठी १२वी उत्तीर्ण ही पात्रता आहे. हे वर्ग मराठी माध्यमातून जूना पुणा नाका येथील जिल्हा ग्रंथालय संघाच्या कार्यालयात होतील. इच्छुकांनी सकाळी १० ते ५ यावेळेत ३१ जानेवारीपर्यंत ९४०४६६६४८८ अथवा ७३५०९२२२७६ या नंबरवर संपर्क साधावा, असे आवाहन सोलापूर केंद्राचे वर्गव्यवस्थापक ग्रंथमित्र कुंडलिक मोरे यांनी कळविले आहे.



### भारतीय योग संस्थानतर्फे रविवारी दोन योग शिबीरे

**सोलापूर, दि. २९ जानेवारी-**

येथील भारतीय योग संस्थानतर्फे रविवारी २ फेब्रुवारी रोजी सोलापुरात दोन योग शिबीराचे आयोजन केले आहे. पहिले योग प्रेरणा शिबीर हे रविवारी पहाटे सहा ते दुपारी दोन वाजेपर्यंत सिध्देश्वर साखर कारखान्यातील काडादी मंगल कार्यालयात होणार असून याचे उदघाटन कारखान्याचे संचालक धर्मराज काडादी यांच्या हस्ते होईल. याच दिवशी सायंकाळी पाच ते सात वाजेपर्यंत जुळे सोलापूरातील जलाराम नगर येथील द्वारकाधिश मंदिरात मधुमेह रोग आणि योग या विषयावर व्याख्यान होईल. याचे उद्घाटन द्वारकाधिश मंदिर समिती अध्यक्ष जयेशभाई पटेल यांच्या हस्ते होईल. दोन्ही कार्यक्रम सर्वांसाठी खुले आहेत. सोलापूर वासियांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन सोलापूर भारतीय योग संस्थानचे सोलापूर गट प्रमुख दत्तात्रय चिवडशेट्टी व जिल्हा प्रधान शेखर लक्ष्मेश्वर यांनी केले आहे.

# एसटीची भाडेवाढ नकोच; ना नफा ना तोटा धोरण गरजेचे

**● दर्जेदार प्रवासी सेवा द्या खुशाल भाडेवाढ करा; प्रवाशांनी टोचले कान**







**तभा वृत्तसेवा । यशवंत गुरव**
**सोलापूर, दि. २९ जानेवारी-**

''प्रवाशांच्या सेवेसाठी'' ब्रीदवाक्य घेऊन धावणाऱ्या एसटी महामंडळाने नवा शासन आदेश जारी करून एसटी महामंडळाच्या प्रवासी भाड्यात सुमारे १५ टक्के वाढ केली आहे. सदरची भाडेवाढ केल्यानंतर प्रवासी वाहतूक सेवा महागली आहे. एसटी महामंडळाच्या वतीने वाढती महागाई लक्षात घेता गतवर्षी डिसेंबर महिन्यापासून भाडेवाढीचा प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यात आला होता. मात्र यावर अंतिम शिक्कामोर्तब होत नव्हता. जानेवारी महिन्यात यावर निर्णय घेऊन भाडेवाढ लागू करण्याचा शासन आदेश जाहीर केला.

दरम्यान, एसटी महामंडळाकडून लागू करण्यात आलेल्या भाडेवाढीनंतर प्रवासी वर्गातून संमिश्र प्रतिक्रिया व्यक्त केल्या जात आहेत. एकीकडे सवलती देऊन नागरिकांना आकर्षित करणे, तर दुसरीकडे भाववाढ करून सर्वसामान्यांच्या खिशाला कात्री लावणे हे चुकीचे आहे. एसटी बसेसचे जाळे संपूर्ण राज्यभरामध्ये पसरलेले आहे. राज्याच्या विविध मार्गावर सुमारे दहा हजाराहून अधिक एसटी बसेस दररोज धावतात. ग्रामीण भागातील दळणवळण याच एसटीवर अवलंबून असते. त्यामुळे या भाववाढीचा सर्वाधिक फटका ग्रामीण भागातील सर्वसामान्य प्रवाशांना बसत आहे.

एस.टी. महामंडळाने जनहित सेवा लक्षात घेऊन प्रवाशांच्या सेवेसाठी हे ब्रीदवाक्य खरे ठरवावे. त्यासाठी ना नफा ना तोटा हे धोरण अवलंबले पाहिजे. एस टी महामंडळ हे सरकारच्या उत्पन्नाचे साधन नव्हे, तर सर्वसामान्य प्रवाशांच्या दळणवळणासाठी निर्माण केलेल्या मूलभूत सेवा आणि गरजा म्हणून ओळखले जाव्यात. अशी मागणी आता जोर धरू लागलेली आहे. त्यामुळेच राज्य परिवहन महामार्ग महामंडळ अर्थात एसटीच्या वतीने प्रवासी सेवांमध्ये दर्जेदार सेवा द्यावी, त्यानंतर खुशालपणे भाववाढ करावी. असे प्रतिक्रिया सर्वसामान्य तसेच महिला प्रवाशांमधून व्यक्त केली जात आहे.

### भाडेवाढ योग्य नाही



शासनाने नवे धोरण ठरवले आहे. त्यामध्ये दुमत नाही. परंतु निवडणुका डोळ्यासमोर ठेवून लाडकी बहीण योजना सुरू केली. त्यामध्ये तरतूद केलेला निधी एसटी महामंडळाच्या भाव वाढीतून वसूल करणे चुकीचे आहे. त्यामुळे सदरचे भाडेवाढ योग्य नाही. शासनाने एसटीकडे उत्पन्नाचे साधन न पाहता, सर्वसामान्य नागरिकांच्या दळणवळणासाठी केलेली तरतूद म्हणून पहावे. हे गरजेचे आहे.

**- मोहन बनसोडे, शेतकरी लातूर**

### महागाईमुळे केली भाडेवाढ



राज्य शासन आणि एसटी महामंडळाने राज्यातील वाढती महागाई लक्षात घेता. प्रति किलोमीटर प्रमाणे प्रवासी भाडेवाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. त्या निर्णयांमध्ये आमचे कोणतेही आक्षेप नाही. परंतु ज्याप्रमाणे भाडे वाढ केली जाते. प्रवाशांना दर्जेदार सेवा उपलब्ध केली पाहिजेत.

**- शोएब मोमीन, व्यवसायिक सोलापूर**

### भाडेवाढ कमी व्हावी



एसटी महामंडळाच्या बसेस सुरक्षित मानल्या जातात. त्यामुळे नागरिक एसटीला प्राधान्यक्रम देतात. लाडकी बहीण तसेच महिलांना एसटीच्या सेवेत सवलत देणे त्यानंतर भाडेवाढ करणे योग्य नाही चार घरची कामे करून जीवन जगणाऱ्या महिलांना याचा त्रास होणार आहे त्यामुळे भाडेवाढ रद्द करा

**- रतन चव्हाण, गृहिणी सोलापूर**





### भाडेवाढ अयोग्य



राज्यातील अनेक ज्येष्ठ नागरिक तसेच महिला एसटी महामंडळाच्या विविध सवलती व योजनेचा लाभ घेऊन प्रवास करतात. अगोदरच उतारवयात आलेल्या ज्येष्ठ नागरिकांना उत्पन्नाचे साधन नसते. पैसे कमवायचे जिकरीचे असते. अशामध्ये झालेली दरवाढ ही अयोग्य आहे.

**- उत्तम चव्हाण, ज्येष्ठ नागरिक सोलापूर**

### सुधारणेच्या नावाखाली आवास्तव भाडेवाढ नको



राज्यामध्ये चौफेर विकास होत आहे. रस्ते मोठ्या प्रमाणात निर्माण केले जात आहेत. त्यामुळे दळणवळणाच्या साधनांना वाव मिळत आहे. प्रगत देशाकडे वाटचाल करणाऱ्या भारताला महागाई सोसावी लागत आहे. या महागाईचा फटका एसटी महामंडळाला सहन करावा लागत आहे. मात्र ना नफा ना तोटा या धरतीवर एसटी महामंडळाने प्रवाशांचे हित जोपासून भाडेवाढ करणे गरजेचे आहे. अवास्तव भाडेवाढ करून प्रवाशांना वेठीस धरणे योग्य नाही. पाच टक्के भाडेवाढ केल्यास प्रवासी सहन करू शकतात. परंतु १५ च्या पटीत भाडे वाढ केल्यास योग्य होणार नाही. एकीकडे राज्य शासन शेतकऱ्यांना त्यांच्या शेतमालाला योग्य दर देत नाही. मात्र दुसरीकडे जनहित सेवांमध्ये भरमसाठ वाढ करत आहे.

**- चंद्रकांत उंबरे, शेतकरी धाराशिव**

### बसेसची स्थिती दयनीय



एकीकडे लाल परी म्हणून संबोधल्या जाणाऱ्या एसटी महामंडळाच्या अनेक बसेस जुनाट अडगळीच्या बनलेल्या आहेत. कधी कोणती दुर्घटना घडेल याचा काही नेम नाही. अशा अवस्थेतील बसेस रस्त्यावर धावत आहेत. दरवाढ करून जुनाट बसेस रस्त्यावर पळवणे हे प्रवाशांच्या हितासाठी धोकादायक आहे. त्यासाठी अगोदर प्रवासी सेवा उत्तम प्रकारे द्या त्यानंतर खुशाल भाडेवाढ करा.

**- सुभाष वडतीले, कारागीर सोलापूर.**

### सुरक्षा प्राधान्यक्रम घेऊन एसटीची पसंती



राज्य शासनाच्या वतीने चालवल्या जाणाऱ्या एसटी बसेस या सुरक्षित मानल्या जातात. एसटी बसेसचा प्रवास हा सुरक्षित प्रवास आहे. महागाई वाढल्याने महामंडळाने व शासनाने सदरची भाडे वाढ केली आहे. एका दृष्टीने सुरक्षेसाठी चार पैसे गेले हरकत नाही. परंतु राज्यातील विविध ग्रामीण भागातील विद्यार्थी एसटी महामंडळाच्या बसेसने शहरात शिक्षणासाठी येत असतात. काही विद्यार्थी पासद्वारे एसटी प्रवास करतात. तर काहींना पास काढणे देखील आर्थिक दृष्ट्या परवडत नाही. यामुळे केलेली १५ टक्के वाढ ही जास्त आहे. भाडेवाडी कमी प्रमाणात असावी. रस्त्याची अवस्था देखील चांगली असावी. जेणेकरून अपघात टाळता येईल.

**- प्रवीण माने, विद्यार्थी सातारा**



## सोलापुरातल्या चौघांना कामगार नाट्य स्पर्धेत वैयक्तिक पारितोषिके

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २९ जानेवारी-**

येथील अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद सोलापूर शाखेचे उपाध्यक्ष अशोक किल्लेदार, लपून-छपून या नाटकासाठी निमंत्रित सदस्य मिलिंद पटवर्धन, आणि मिताली कुलकर्णी या दोघांना एका उत्तराची कहाणी या नाटकासाठी तर उपनगरीय शाखेचे रत्नाकर जाधव यांना दुभंगून जाता जाता या नाटकासाठी सिने अभिनेत्री सुरेखा कुडची यांच्या हस्ते या सर्वांना वैयक्तिक पारितोषिक देण्यात आले.

महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ पुणे अंतर्गत कोल्हापूर येथे झालेल्या ७०व्या नाट्य कामगार महोत्सव स्पर्धेत वैयक्तिक अशोक किल्लेदार, मिलिंद पटवर्धन, रत्नाकर जाधव आणि मिताली कुलकर्णी यांना वैयक्तिक अभिनयासाठी पारितोषिक मिळाले असून पटवर्धन यांना एका उत्तराची कहाणी या नाटकाला सांघिक पारितोषिक मिळाले आहे. या नाट्य स्पर्धेसाठी कोल्हापूर विभागात २१ संघांनी सहभाग घेतला होता. त्यामधे ''सोलापूर '' च्या ललित कला भवन, रविवार पेठ संघाच्या '' एका उत्तराची कहाणी '' या नाटकाला सांघिक उत्तेजनार्थ पारितोषिक मिळाले आहे या पारितोषिक वितरण प्रसंगी नाट्य कलाकार अपर्णा जोशी, किरण फडके, सुनंदा शेंडगे उपस्थित होते.

## जुळे सोलापूर विकास आराखडा प्राधिकरण संघर्ष समितीचा महापालिकेवर मोर्चा

**● प्रारूप शहर विकास आराखड्यात बदल, सुविधांसाठी आरक्षण ठेवून आर्थिक तरतूद करा**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २९ जानेवारी-**

सोलापूर महानगरपालिकेने प्रसिद्ध केलेल्या प्रारुप विकास आराखड्याला विरोध दर्शवत त्यामध्ये बदल करण्याची जोरदार मागणी करत जुळे सोलापूर विजापूर रोड विकास आराखडा प्राधिकरण संघर्ष समिती आणि आणि विजापूर रोड मध्यवर्ती गणेशोत्सव मंडळाच्या वतीने आज महापालिकेवर मोर्चा काढण्यात आला.



महानगरपालिकेने पुढील २० वर्षाचा विचार करुन प्रारुप विकास आराखडा तयार केला आहे. या आराखड्यात हद्दवाढ भागाच्या विकासाचा विचार केलेला दिसत नाही. विशेषतः जुळे सोलापूर आणि विजापूर रोड परिसरातील अनेक मूलभूत गरजांच्या पुर्ततेसाठी आवश्यक असलेले आरक्षण टाकण्यात आलेले नाही. त्यामुळे या आराखड्याला विरोध आहे. शासनाकडे हा आराखडा मंजुरीला जाण्यापूर्वी काही बदल सुचवित आहोत. महापालिका प्रशासनाने याचा विचार करावा.

विजापूर रोड जुळे सोलापूर परिसरात इंचगेरी मठासमोरील जागेत एसटी स्थानकासाठी आरक्षण टाकण्यात यावे. विजापूर रोड तसेच जुळे सोलापूर परिसरासाठी प्रशस्त नाट्यगृहासाठी जागा आरक्षित करावी. विजापूर रोड व जुळे सोलापूर परिसरातील गरीब गरजू लोकांसाठी महापालिकेचा स्वतंत्र दवाखाना आणि प्रसूती गृहासाठी आरक्षण टाकण्यात यावे. जुळे सोलापूर भागात भाजी विक्रेते रस्त्यावर बसतात, त्यांच्या उदरनिर्वाहासाठी स्वतंत्र अद्ययावत मंडईसाठी जागा आरक्षित करावी. नेहरू नगर पासून विविध घोषणा देत सकाळी हा मोर्चा काढण्यात आला. दरम्यान महापालिकेत हा मोर्चा आल्यानंतर विविध मागण्यांचे निवेदन आणि दावे हरकती सर्वपक्षीय शिष्टमंडळाने महापालिका आयुक्त शितल तेली-उगले यांना देण्यात दिले.

या आंदोलनात माजी आ. शिवशरण पाटील, डॉ. बसवराज बगले, माजी नगरसेवक प्रभाकर जामगुंडे, विजय शाबादी, परिवहन माजी सभापती सुभाष चव्हाण, शिवसेनेचे आणप्पा सतूबर, प्रा.विलास मोरे, सुभाष उळागडे, बाळासाहेब पाटील, महेश पाटील, पांडुरंग पवार, विश्वनाथ आमणे, पद्माकर कुलकर्णी, शैलेश आमणगी, वैशाली माशाळ, सुजाता म्हेत्रे, सुरेखा गब्बूर आदी उपस्थित होते.

### नागरी सुविधांसाठी आरक्षण ठेवून आर्थिक तरतूद करावी

विजापूर रोड भागातील गोरगरीब लोकांच्या पाल्यांसाठी इंग्रजी माध्यमाची शाळा आवश्यक असून त्यासाठी आराखड्यात जागा आरक्षित करावी. जुळे सोलापूर तसेच विजापूर रोड परिसरातील वाढती लोकसंख्या विचारात घेता महापालिकेने अंतिम आराखड्यात वरील सर्व मागण्यांचा विचार करुन आरक्षण टाकावे आदी मागण्यासाठी हा मोर्चा काढण्यात आला.

## सोलापूर विद्यापीठ आता क्रीडा शिक्षक घडविणार

**▸ येत्या शैक्षणिक वर्षापासून बीपीएड व एमपीएड अभ्यासक्रम सुरू करणार**

**अजितकुमार संगवे । तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २९ जानेवारी-**

''खेलो इंडिया'' नाही तर ''खेलो सोलापूर''च्या माध्यमातून खेळाडूंच्या विकासास गती देण्याचे काम पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ करीत आहे. याचाच एक भाग म्हणून सोलापूर विद्यापीठ आता क्रीडा शिक्षक घडविण्याचे काम करणार आहे. यासाठी २०२५-२६ या शैक्षणिक वर्षापासून विद्यापीठात बीपीएड व एमपीएड हे अभ्यासक्रम सुरू करणार सुरू करणार असल्याची माहिती कुलगुरू प्रा. डॉ. प्रकाश महानवर यांनी दिली.

तत्कालीन कुलगुरू डॉ. मृणालिनी फडणवीस व क्रीडा संचालक डॉ. सुरेश पवार यांच्या प्रयत्नातून विद्यापीठाने भारत सरकारच्या खेलो इंडिया विभागाकडून जागतिक दर्जाचे मल्टीपर्पज इनडोर हॉल निर्माण करण्याकरिता वीस कोटीचा क्रीडा प्रकल्प मंजूर करून आणला. तो आता पूर्णत्वाच्या मार्गावर आहे. त्या हॉलच्या परिसरातच विद्यापीठ हे दोन्ही अभ्यासक्रम सुरू करणार आहेत.

### ▸▸ आउटडोर स्टेडियमचा ७८ कोटीचा प्रस्ताव



इनडोअर हॉलनंतर आता आउटडोर स्टेडियमचा प्रस्ताव विद्यापीठाने केंद्र शासनाकडे पाठविला आहे. ७८ कोटीचा हा प्रस्ताव असून यात ऑलम्पिक साईजचा जलतरण तलाव, सिंथेटिक अॅथलेटिक्स ट्रॅक, धनुर्विद्या व जिम्नॅस्टिक आदीचा समावेश आहे. तसेच खेळाडूंसाठी वसतिगृहाची व्यवस्था करण्यात येणार असल्याचेही कुलगुरू प्रा. डॉ. महानवर म्हणाले.

### ▸▸ विविध प्रकारचे १५ खेळ खेळता येणार

कुलगुरू प्रा. डॉ. महानवर म्हणाले, मल्टीपर्पज इनडोर हॉल परिसरास मेजर ध्यानचंद क्रीडा संकुल असे नाव प्रस्तावित आहे. त्या मल्टीपर्पज हॉलचा वापर खेळाडूना होण्यासाठी स्कूल ऑफ स्पोर्ट्सच्या माध्यमातून हे अभ्यासक्रम सुरू करणार आहोत. केंद्र शासनाकडून असा प्रकल्प मंजूर झालेले महाराष्ट्रातले एकमेव असे सोलापूर विद्यापीठ आहे. विद्यापीठाच्या ४८२ एकर परिसरातील एक एकर जागेवर खेळाडूंसाठी जागतिक दर्जाचा अगदी सुसज्ज असा ४० बाय ६० मीटरचा मल्टीपर्पज हॉल साकारत आहे. १५०० प्रेक्षक बसू शकतील, अशी प्रेक्षक गॅलरी आहे. या मल्टीपर्पज हॉलमध्ये बॅडमिंटन, बास्केटबॉल, बॉक्सिंग, हँडबॉल, जुदो, कबड्डी, हॉलीबॉल, टेबल टेनिस यासह विविध प्रकारचे १५ खेळ खेळता येणार आहे.



सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## ज्ञानामृत आनंदलहरी - १०१४

**हा ठाववरी शिष्याची निसी । सहातें गुरु आहाती कवणे देशीं ।**
**परी नेणिजे आवडी कैशी । संजयो म्हणे ।।**

विश्वरुप पाहण्याची अर्जुनाची इच्छा भगवंतांनी पूर्ण केली. विश्वरुप पाहण्यातच अर्जुनाने आनंद मानावा असे भगवंतांना वाटत होते; पण अर्जुन विश्वरुपाला कंटाळला होता. त्याला विश्वरुप पाहिजे तेवढे आवडत नव्हते. त्याला आता श्रीकृष्णाचेच रुप पाहायचे होते. म्हणून तो भगवंताला म्हणला की, आता तू तुझ्या मुळ रुपात ये. मला तुझ्या मुळ रुपाला अलिंगन द्यावयाचे आहे. विशेष म्हणजे अर्जुनाचे बाहुले बनलेल्या भगवंताने अर्जुनासाठी आपले विश्वरुप सोडून श्रीकृष्णरुप धारण केले. विश्वरुपात सर्व प्राणीमात्रांना एकत्रित पाहून सर्व जीव एका ईश्वराचे अंश आहेत, असा निष्कर्ष अर्जुनाने काढला होता. आता तो श्रीकृष्णाच्या ठिकाणी भगवंताला पाहात होता. हे सर्व क्षण संजय घरबसल्या आपल्या ज्ञानेंद्रियांनी टिपत होता. तो हे अमर क्षण आपल्या ऱ्हदयात साठवत होता.



हे सर्व प्रसंग तो मन:पुर्वक राजा धृतराष्ट्राला कथन करीत होता. राजाने या प्रसंगाशी एकरुप व्हावे अशी त्याची मनोमन तळमळ होती. पण सर्व व्यर्थ जात होते. कारण राजाचे मन पुत्रमोहाने आंधळे झाले होते. नैसर्गिकदृष्टया डोळयाने आंधळा व वैचारिकदृष्टया मनाने आंधळा झालेल्या राजासमोर संजयाचे काही चालत नव्हते. डोळयाने अंध होण्यात आपला दोष नसतो; पण मनाने अंध होण्यास आपण कारणीभूत असतो हे विसरता कामा नये. अर्जुनाच्या भाग्याची थोरवी संजयही गात आहे व माऊलीही गात आहेत. कारण अर्जुनाच्या इच्छेप्रमाणे भगवंत वागत आहेत. अर्जुन रागावला, रुसला, नाराज झाला तरी भगवंत हसत-हसत ते सर्व सहन करीत आहेत. अर्जुनाच्या प्रेमापोटी भगवंत स्वत:ला पूर्णत: विसरुन गेले आहेत. आतापर्यंत घडत असलेले प्रसंग पाहून या गुरुशिष्याच्या नात्याबद्यल बोलतांना संजय म्हणतो,

**हा ठाववरी शिष्याची निसी । सहातें गुरु आहाती कवणे देशीं ।।**
**परी नेणिजे आवडी कैशी । संजयो म्हणे ।।**

अर्थात, इतक्या मर्यादेपर्यंत शिष्याचा त्रास सहन करणारे गुरु कोणत्या देशात आहेत? अर्जुनाचे प्रेमच असे आहे की, भगवंत अर्जुनाचा सर्व त्रास आनंदाने सहन करीत आहेत. भगवंतासारखा सद्गुरु अर्जुनाला लाभला म्हणूनच आज अर्जुनाचे नांव आपल्या सद्गुरुबरोबर अमर झाले आहे. आज एखाद्या शिष्याने त्याच्या बुध्दीप्रमाणे चार-दोन प्रश्न विचारले तरी गुरुंना राग येत असतो. शिष्य गुरुंच्या इच्छेप्रमाणे वागला नाही तरी गुरुजी चिडत असतात. शिष्याच्या इच्छेप्रमाणे वागून शिष्यात परिवर्तन करणाऱ्या गुरुंची संख्या अत्यंत नगण्य आहे. गुरु शिष्याच्या नात्याला कलंकित करणाऱ्या अनेक घटना आपणाला ऐकायला-वाचायला मिळत आहेत. आपुलकी, प्रेमाने शिष्याच्या विचारांचा, प्रश्नांचा स्वीकार करुन त्याला निर्माण करणाऱ्या सद्गुरुंच्या ठिकाणी दृढ विश्वास ठेवणाऱ्या शिष्यांची गरज आहे. प्रेमाने शिष्यांचे अपराध पोटात घालून शिष्यांना मार्गदर्शन करणाऱ्या सद्गुरुंवर विश्वास ठेवून त्यांच्या सूचनांचे पालन करणाऱ्या शिष्यांची संख्या वाढावी व या संख्येत आपला क्रमांक निश्चित असावा, अशी सद्गुरु माऊली चरणी प्रार्थना.

**जय जय राम कृष्ण हरी।**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| वार : गुरुवार | दिनविशेष - चांगला दिवस |
| दि. ३० जानेवारी २०२५ | महात्मा गांधी पुण्यदिन, |
| विक्रम संवत् २०८०-८१ | हुतात्मा दिन |
| शके - १९४६ | ....राहू काल.... |
| संवत्सर - क्रोधी नाम | रविवार : दु.४.३० ते ६.०० |
| मास - पौष | सोमवार : स. ७.३० ते ९.०० |
| शु. प्रतिपदा - (१६.११) | मंगळवार : दु. ३.०० ते ४.३० |
| ऋतु - शिशिर | बुधवार : दु. १२ ते १.३० |
| नक्षत्र - धनिष्ठा (२९.५०) | गुरुवार : दु. १.३० ते ३.०० |
| योग - व्यतिपात (१८.३३) | शुक्रवार : स.१०.३० ते १२ |
| करण - बालव (२७.०६) | शनिवार : स. ९ ते १०.३० |

### राशीभविष्य

**मेष :** मुलांच्या बाबतीत कठोर निर्णय घ्यावे लागतील. अपेक्षित मित्रांची मदत मिळेल. भावनेपेक्षा कर्तव्य महत्त्वाचे ठरेल. प्रवासाचा योग संभवतो.

**वृषभ :** आपल्या भोळ्या स्वभावाचा इतर गैरफायदा तर घेत नाही ना याकडे लक्ष द्या. जास्त ताण घेऊ नका. अभ्यासाचा बाऊ न न करता विद्यार्थ्यांनी अभ्यास करावा.

**मिथुन :** मनाचा दाखविलेला मोठेपणा नातेसंबंधातील तेढ कमी करणारा ठरेल. विचार बदलतील. एखादा कार्यक्रम होण्याची शक्यता आहे.

**कर्क :** एखादी मौल्यवान वस्तूची खरेदी सर्वांच्या संमतीने होणे शक्य. घरामध्ये पूर्वी ठरलेला शुभ समारंभ पार पडेल.

**सिंह :** मोठ्या व्यवहारातून पुरेशी काळजी घेत वाटचाल करायची आहे. हितशत्रूंचा काही प्रमाणात त्रास होणे शक्य.

**कन्या :** आपल्या लहानसहान इच्छा:आकांक्षाना पूर्ण होण्यासाठी आवश्यक ती आवक झाल्याने तुम्ही खूश असाल.

**तुळ :** एकाच वेळी नोकरी आणि घर या दोन्ही गोष्टींवर लक्ष केंद्रित करावे लागल्याने तुमच्यावर एकप्रकारचा दबाव येईल. नोकरीत बडती मि ळण्याची शक्यता.

**वृश्चिक :** धंदा व्यवसायात कामाचा व्याप वाढेल. घरामध्ये छोट्या समारंभाच्या निमित्ताने प्रियजनांची गाठभेट होईल.

**धनु :** कोणताही टोकाचा विचार किंवा अतिरेकी कृती आपल्याच पायावर दगड पाडून घेणारी ठरेल. सदुगुरुची आराधनाने मन शांत होईल.

**मकर :** संततीच्या दृष्टीने येणाऱ्या शुभवार्ता अभिम ानास्पद ठरतील. मात्र, त्यांचे आरोग्याचे प्रश्नाबाबत वेळीच लक्ष द्या.

**कुंभ :** इतरांना न जमणारी कामे तुम्ही यशस्वीरीत्या हाताळाल. त्यामुळे वरिष्ठांची आपल्यावर मर्जी राहील. आनंदात जीवन जगाल. धन लाभ होईल.

**मीन :** एकत्रित होणाऱ्या सहली आनंददायक ठरतील. मुलांच्या हट्टापायी चैनीच्या वस्तूसाठी खर्च करावा लागेल. जीवनात यशस्वी व्हाल.

# दादाई समाजसेवी संस्थेतर्फे प्रजासत्ताक दिन साजरा


**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २९ जानेवारी-**



दादाई बहुउद्देशीय समाजसेवी संस्था आणि राजे प्रतिष्ठानच्या वतीने प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात आला. पुणे विभागीय कार्यालयाचे सहाय्यक उपायुक्त विजयकुमार गायकवाड यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. दक्षिण सोलापूर नायब तहसीलदार दत्ता गायकवाड, पोलीस उपनिरीक्षक राजेद्र जाधव, टकारी समाजातील जेष्ठ तथा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष भारत जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी टकारी समाज सरपंच नारायण जाधव, दादाईचे संस्थापक अध्यक्ष युवराज जाधव, निशांत गायकवाड, प्रभाकर जाधव, प्रकाश गायकवाड, कृष्णा जाधव, बप्पा जाधव, विजय जाधव, रमेश जाधव, सायबू गायकवाड, बालाजी जाधव, परशूराम जाधव, संतोष गायकवाड, श्रीकांत जाधव, भारत गायकवाड, प्रशांत जाधव, विवेक जाधव, निरज जाधव, शिवराज जाधव, दशरथ जाधव, शिवाजी जाधव, यश गायकवाड, भीमा जाधव, अनिल गायकवाड, संगमेश्वर जोकारे, महेंद्र कोपनर, शुभम महानोर उपस्थित होते.

## संघ हीच जीवनगाथा

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जनक डॉक्टर केशव बळीराम हेडगेवार (जन्म १ एप्रिल १८८९, मृत्यू २१ जून १९४०). आपल्यासमोर संघ हीच जीवनगाथा या शीर्षकाखाली मी छोट्या छोट्या कथा लिहित आहे. या कथांचे स्वरूप आहे अलक. म्हणजे अति लघु कथा. ही कथा वाचायला सोपी; स्मरणात ठेवायला सोपी; समजायला सोपी; अशी असेल असा माझा प्रयत्न आहे. आधीच सांगते कथा म्हणजे निव्वळ गोष्ट नव्हे एवढे ध्यानी ठेवावे. जसे यथा म्हणजे येन प्रकारेण; तथा म्हणजे तेन प्रकारेण; सर्वथा म्हणजे सर्वे प्रकारेण तसेच कथा म्हणजे केन प्रकारेण, या अर्थाने मी अलक लिहिले आहे.



**- सुरेखा विजय काणे,**
छत्रपती संभाजीनगर
माजी जिल्हा बौद्धिक प्रमुख राष्ट्र सेविका समिती मो. ९९६००५३५२१

### अलक:- (३६) प्रार्थना (२)

प्रभो शक्तिमन् हिन्दुराष्ट्राङ्गभूता
इमे सादरं त्वां नमामो वयम्
त्वदीयाय कार्याय बद्धा कटीयं
शुभामाशषं देहि तत्पूर्तये। अजय्यां च विश्वस्य देहीश शक्तिम् सुशीलं जगद्येन नम्र भवेत् श्रुतं चैव यत् कण्टकाकीर्णमार्गं स्वयं स्वीकृतं नः सुगङ्कारयेत् २। अर्थः- हे सर्व शक्तिमान परमेश्वरा हिंदू राष्ट्राचे आम्ही पुत्र तुला सादर प्रणाम करतो. तुझ्याच कार्यासाठी आम्ही कटिबद्ध झालो आहोत. या कार्याच्या पूर्ततेसाठी आम्हाला तू शुभाशीर्वाद दे. हे प्रभू आम्हाला अशी शक्ती दे की जिला आव्हान देण्याचे धैर्य जगातील अन्य कुण्या शक्तीला व्हावयाचे नाही. असे शुद्ध चारित्र्य दे की ज्या चारित्र्यामुळे संपूर्ण विश्व नतमस्तक होईल. आणि असे ज्ञान दे की ज्यामुळे आम्ही स्वतःहून पत्करलेला हा काट्याकुट्यांनी भरलेला मार्ग सुगम होईल. ।। भारत माता की जय ।।

**- क्रमशः**

# विविध उपक्रमांनी शहरात प्रजासत्ताक दिन साजरा


पापय्या तालीम संघ


बालाजी मूकबधिर शाळा


राष्ट्रवादी काँग्रेस


जय भारत शाळा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२९ जानेवारी-**

देशाच्या ७६ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त शहरातील विविध शाळा, महाविद्यालये, संस्था, संघटनांच्यावतीने महापुरुषांच्या प्रतिमांचे पूजन करुन मान्यवरांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.अंगणवाडी, शाळांमध्ये विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करण्यात आला. बहुतांश शैक्षणिक संस्थांमध्ये गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव करुन त्यांचे कौतुक करण्यात आले.


जय भारत शाळा


जि.प. शाळा एसआरपी कॅम्प

### राष्ट्रवादी काँग्रेस पक्षओम सच्चिदानंद वाचनालय

बाळीवेस येथील ओम सच्चिदानंद व श्री राजस्थानी विकास मंडळाच्यावतीने प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात आला. यावेळी पत्रकार सुभाष सुराणा हे प्रमुख पाहुणे म्हणून कार्यक्रमासाठी लाभले. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते झेंडावंदन करण्यात आले. वाचनालयाचे अध्यक्ष शरद कालानी यांनी पाहुण्यांचा परिचय करुन दिला. यावेळी विजय जाजू, कमलेश झंवर, लक्ष्मीकांत खडलोया, प्रविण चंडक, मीनाक्षी बजाज, अशोक गौड, गोपाल मंत्री, संतोष काबरा, अजय पाटील उपस्थित होते. सूत्रसंचालन संतोष काबरा यांनी केले तर आभार कमलेश झंवर यांनी मानले.

### मोहिते-पाटील विद्यालय, केगांव

स.म.शंकरराव मोहिते-पाटील विद्यालय, केगांव येथे प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात आला. यावेळी शरद गुळवे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी विविध स्पर्धांम ध्ये यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांना पारितोषिके देण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे सचिव रणजित पाटील उपस्थित होते. सूत्रसंचालन कोष्टी यांनी केले. यावेळी शाहू भोसले, इंद्रजित कांबळे, नागनाथ भोसले, अमोल इगवे उपस्थित होते.

प्रजासत्ताक दिनानिमित्त राष्ट्रवादी काँग्रेसतर्फे ध्वजारोहण जिल्हाध्यक्ष संतोष पवार यांच्या हस्ते ध्वजारोहण करून मानवंदना देण्यात आली. याप्रसंगी राष्ट्रवादीचे शहर कार्याध्यक्ष जुबेर बागवान, प्रदेश उपाध्यक्ष आनंद चंदनशिवे, जनरल सेक्रेटरी प्रमोद भोसले, महिला अध्यक्ष संगीता जोगदनकर, प्रदेश सचिव शशिकांत कांबळे, ज्येष्ठ नेते हेमंत चौधरी, माजी परिवहन समिती सभापती आनंद मुस्तारे, ॲड. सलीम नदाफ, सेवादल अध्यक्ष प्रकाश जाधव, युवक कार्याध्यक्ष तुषार जक्का, युवती अध्यक्ष किरण माशाळकर, आमिर शेख, तनवीर गुलजार, बसवराज कोळी, आशुतोष नाटकर, अल्मेराज आबादीराजे, मार्तंड शिंगारे, इस्माईल शेख, समदानी म त्तेखाने, अहमद बागवान, इरफान शेख, अहमद मसुलदार, रमीज कारभारी, भारत नागटिळक, वैभव गंगणे, सोमनाथ शिंदे, संजय सांगळे, अनिल छत्रबंध, तुषार गांगर्डे, राहुल जक्का, सामल, ओंकार हजारे, महेश कुलकर्णी, मौलाली शेख, शंकर पुजारी, दत्ता बनसोडे, मनोज शेरला, प्रदीप बाळशंकर, प्रज्ञासागर गायकवाड, रुपेश भोसले, अमोल कोठीवाले, मल्लिनाथ इटकळे, जयराज सांगे, भीमराज मटके, प्रकाश मोटे, कांचन पवार प्राजक्ता बागल, अर्चना दुलंगे, सुरेखा घाडगे उपस्थित होते. सेवादलाचे सिकंदर गोलंदाज सेवादल अध्यक्ष प्रकाश जाधव यांनी सूत्रसंचालन केले.

### जि.प. शाळा एसआरपी कॅम्प

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा एसआरपी कॅम्पमध्ये व्यवस्थापन समिती अध्यक्ष प्रियांका माळी यांच्या अध्यक्षतेखाली ध्वजारोहणाचा कार्यक्रम झाला. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून शिवसेना प्रवक्त्या ज्योती वाघमारे, लेक लदाख येथे कार्यरत असणारे भारतीय जवान दिनेश राठोड, एसआरपीएफचे पोलीस निरीक्षक सुरज पाटील, जवान सुरज सुभाष टोनपे, शाळा व्यवस्थापन समिती उपाध्यक्ष सुनील शिंदे, सदस्य रेखा वाघमारे, बिलवा बद्धिपुडी, सिद्धाराम खांडेकर, श्रीशैल रणखांबे, माता पालक आदी मान्यवर उपस्थित होते. सिद्धाराम खांडेकर यांनी सर्व मुलांना लाडूचा खाऊ वाटप केला. श्रीशैल रणखांबे, प्रियंका माळी, गरजे यांनी चॉकलेट व इतर खाऊ उपलब्ध करून दिला. ार्यक्रम यशस्वी होण्यासाठी मुख्याध्यापक पुंडलिक कलखांबकर, शिक्षक बाळासाहेब खटाळ श्रीशैल समदूरले, सारिका राठोड, कृपा राठोड, अंगणवाडी सेविका राजश्री स्वामी, कल्पना बिराजदार, श्वेता उंबरजे यांनी परिश्रम घेतले.

### पापय्या तालीम संघ

पापय्या तालीम संघाच्यावतीने जुनी मिल कंपौड येथील पापय्या तालीमच्या प्रांगणात प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमास मरिआई पोलीस चौकीचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सविता मोरे-पाटील यांच्या हस्ते व संस्थेचे अध्यक्ष जगन्नाथ व्यवहारे, उपाध्यक्ष जयंती मोरे, प्रदीप शिर्के, गजानन लामकाने, गणेश कुलकर्णी, बंडू कदम, प्रकाश सुरवसे यांच्या उपस्थितीत झेंडावंदन करण्यात आले. यावेळी विजय पाटील, शिवाजी चटके, लक्ष्मण भगत, प्रकाश पवार, किरण बायस, अक्षय कुलकर्णी, संजय हिरळीकर, तानाजी सावंत, अमोल जाधव, संभाजी मळगे, राकेश मेट्रे, सुरेश जानकर, रणजित खताळ, ओम इंगळे, समर्थ दुधाळ, प्रज्योत मुसळे, श्रीनिवास कोटा, विनायक इंगळे, प्रशांत पवार, आदित्य इंगळे, बबन झिंगाडे, अविनाश जावगडे उपस्थित होते. यावेळी प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते मुलांना खाऊ वाटप करण्यात आले. सूत्रसंचालन वसंत कुलकर्णी, आभार जयंत मोरे यांनी मानले.

### बालाजी मूकबधिर शाळा

व्यंकटेश नगर, कुमठा नाका येथील श्री स्वामी समर्थ अपंग सेवा मंडळ संचलित श्री बालाजी मूकबधिर व मतिमंद शाळेत प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात आला. अध्यक्षस्थानी संस्था सचिवा लक्ष्मी इटकर होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून ओम फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष आनंद गोसकी यांच्या हस्ते ध्वजारोहण व रेणुका स्विट्सचे सुभाष रेड्डी यांच्या हस्ते भारत मातेच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी ओम फाऊंडेशनच्या पदाधिकाऱ्यांनी दिव्यांग विद्यार्थ्यांना आवश्यक असणारी स्पीच ट्रेनर मशीन भेट देवून प्रजासत्ताक दिन साजरा केला. यावेळी अण्णप्पा पाटील, आनंद गोसकी, गणेश वंगा, युवराज गोसकी, शामराव वाघमारे, अरविंद कुलकर्णी, सुरेश इटकर, बालाजी दिकोंडा, इक्बाल जमादार उपस्थित होते. सूत्रसंचालन भगवान चौगुले, आभार सुरेश इटकरी यांनी मानले.

### जय भारत शाळा

जय भारत प्राथमिक शाळेत प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मारुती माळगे होते. प्रमुख पाहुणे म्हणून खासदार प्रणिती शिंदे, संस्थेचे अध्यक्ष सिद्राम फुले, सचिव दिपक फुले, दिनेश म्हेत्रे, शशिकला सगर, जावेद शेख, अंजना व्हटकर, सिद्राम पेद्दे, लक्ष्मण पेद्दे, मुख्याध्यापक नारायण सूर्यवंशी उपस्थित होते. खासदार प्रणिती शिंदे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. प्रास्ताविक कविता लेंगरे यांनी केले. सूत्रसंचालन रेश्मा म्हेत्रे, आभार मुख्याध्यापक नारायण सूर्यवंशी यांनी मानले.

### राजर्षि शाहू विद्यालय

राजर्षि शाहू मराठी विद्यालयात प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापिका चंद्रकला गायकवाड होत्या. तर प्रमुख अतिथी म्हणून शालेय शिक्षण समितीचे चेअरमन प्रज्ञासागर गायकवाड हे होते. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते ध्वजारोहण व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी गायकवाड यांनी संस्थेच्या भावी अध्यक्षा म्हणून ऋतुजा गायकवाड व सचिव म्हणून प्रणव गायकवाड यांच्या नावाची घोषणा केली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शिलरत्न गायकवाड, मनिषा झेंडगे, प्रतिभा गायकवाड, अभिजीत गुंजले, इरय्या स्वामी, सोनाली माने, साक्षी जाधव, प्रियंका गायकवाड, मोनिका माने आदींनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन सचिन डोईफोडे यांनी केले तर आभार विश्वासराव घंटेनवरु यांनी मानले.

### जि.प. शाळा, वागदरी

जि.प. प्राथमिक मराठी शाळा वागदरी (ता.अक्कलकोट) शाळेत प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात आला. प्रथम घोषणा देत गावातून प्रभात फेरी काढण्यात आली. ग्रामपंचायतीजवळ सरपंच शिवानंद घोळसगाव यांनी ध्वजारोहण केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बसवराज पाटील होते. तर महात्मा गांधीजी व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन उपसरपंच पंकज सुतार, उपसरपंच वागदरी यांनी केले. मुख्याध्यापिका रेखा सोनकवडे यांनी प्रास्ताविक केले. याप्रसंगी बाबासाहेब बनसोडे, तोलन बागवान, अनुसया कलशेट्टी, अर्चना गिरी, मनिषा कुणाळे, कविता फड, सरपंच शिवानंद घोळसगाव, माजी सरपंच श्रीकांत भैराम डगी, उपसरपंच पंकज सुतार, ग्रामसेवक कणमुसे, भाऊसाहेब शिंगे, राहुल रुही उपस्थित होते. सूत्रसंचलन बाबासाहेब बनसोडे यांनी केले तर रेखा सोनकवडे यांनी आभार मानले.

### कस्तुरे हायस्कूल

स्व.सौ. उषाताई भारत कस्तुरे हिंदी प्राथमिक विद्यालय व मातोश्री मालनबाई आप्पाराव कस्तुरे हायस्कूल, हिंदी माध्यम येथे प्रजासत्ताक वर्धापन दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुणे माजी मुख्याध्यापिका गायत्री आराध्ये व संस्थेचे उपाध्यक्षा किर्ती कस्तुरे उपस्थित होते. यावेळी प्रतिमेचे पूजन संस्थेचे उपाध्यक्षा किर्ती कस्तुरे, मुख्याध्यापक व कार्यक्रमाचे अध्यक्ष दयानंद तिर्थकर, मुख्याध्यापिका रोजमेरी गायकवाड यांनी केले. सूत्रसंचालन दत्तात्रय कदम यांनी केले तर आभार अनिलकुमार पाटील यांनी मानले.

### राजेभाई उर्दू हायस्कूल

राजेभाई उर्दू हायस्कूल ॲन्ड ज्युनिअर कॉलेज ऑफ आर्टस ॲन्ड सायन्स येथे प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात आला. संस्थेचे संचालक मेराजोद्दीन इनाम दार यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी प्राचार्या सबिहा पिरजादे, मुख्याध्यापिका इशरत पटवेकर, शाहीन बेगम, इस्माईल डोणगावकर यांची प्रमुख उपस्थिती होती. सूत्रसंचालन अफलिया पठाण, अंजलना शेख यांनी केले तर आभार उमर डोका यांनी मानले. यावेळी आलिया शेख, रिजवाना शेख, आफ्रिन वड्डो, गैबू जबीन, जिब्राईल शेख, निशाद शेख, जमीर शेख, निसारअहमद शेख, जाहिद शेख, अन्वर शेख, सिराजोद्दीन शेख, अमीर पठाण उपस्थित होते.

### जांबमुनी प्रशाला

श्री. जांबमुनी प्रशालेत प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात आला. प्रशालेचे चेअरमन शंकर परुल, ज्येष्ठ शिक्षिका दुभाषी नलिनी यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. कार्यक्रमास व्हाइस चेअरमन नागेश म्हेत्रे, सागर शिंगे, संचालक राजू पेद्दी, वाभय्या म्हेत्रे, श्रीनिवास म्हेत्रे, दत्तू म्हेत्रे, श्रीधर असादे, नरसिंग म्हेत्रे, अंजनकुमार म्हेत्रे, दिनेश म्हेत्रे, हणमंतू सायबोळू, आनंद पल्लोलू, अशोक सायबोळू, राजू असादे, देविदास कुमार, लिंगराज पल्लोलू, माजी संचालक सिद्राम म्हेत्रे, विशाल साबबोळू, मोहन जंगम, व्यंकटेश चन्नेपागोलू, राहुल असादे, भोजराज पाटील यांची उपस्थिती होती. सूत्रसंचालन महानंद लिगाडे यांनी केले. आभार नलिनी दुभाषी यांनी मानले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त



### दत्तकला इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसीची विश्वचैतन्य आयुर्वेदिक रसशाळेला भेट

**करमाळा, दि.२९ जानेवारी-**

दत्तकला इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी (डीफार्म) केतूर (ता. करमाळा) येथील औषध निर्माण शास्त्र महाविद्यालयांमधील विद्यार्थ्यांनी ग्रामीण रुग्णालय रुई व विश्वचैतन्य आयुर्वेदिक रसशाला येथे भेट दिली. प्राचार्य प्रा.रोहन जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रामीण रुग्णालय रुई येथील रुग्णालयास भेट देऊन तेथील क्ष- किरण विभाग, औषध विभाग, रोग निदान विभाग व अतिदक्षता विभाग इत्यादी विभागास भेट देऊन, रुग्णालयाचे कामकाज कशा प्रकारे चालते, तेथील डॉक्टर कर्मचारी व पेशंट यांची भेट घेऊन रुग्णालया विषयीची माहिती जाणून घेतली. महाविद्यालयांमधील प्रा.रणजीत साखरे, प्रा. शुभम हरिहर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.



### बोचरेवस्ती जि. प. शाळेचे स्नेहसंमेलन उत्साहात साजरे

**करकंब, दि. २९ जानेवारी-**

जि.प.प्राथमिक शाळा बोचरेवस्ती, करकंब येथे स्नेहसंमेलन उत्साहात पार पडला. स्नेहसंमेलनाचे उद्घाटन जि.प.महिला व बालकल्याण समितीचे सभापती रजनी देशमुख व शरदचंद्र पांढरे यांच्या हस्ते करण्यात आले. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या विविध कलागुणांमुळे त्यांना ३५ हजार रुपयांची बक्षिसे देण्यात आली. यावेळी ग्रामपंचायत सदस्य तुकाराम माने, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष दिलीप माने, उपाध्यक्ष युवराज शिवपालक उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मुख्याध्यापक अनिल जगताप, शिक्षक नवनाथ कवडे, संतोष कापसे, हेमंत माने, संतोष थोरात, शाळा व्यवस्थापन समिती मा. अध्यक्ष सतीश माने यांनी परिश्रम घेतले.



### मुस्लिम दफनभूमी रस्त्यासाठी आमदार निधीची मागणी

**करमाळा, दि. २९ जानेवारी-**

करमाळा शहरातील मुलाणी मुस्लिम दफनभूमी येथील रस्ता कॉंक्रीटीकरण करण्यासाठी आमदार नारायणआबा पाटील यांच्याकडे आमदार फंडातून दहा लाख रुपये मिळावे, यासाठी करमाळा अर्बन बँकेचे माजी उपाध्यक्ष फारुक जमादार, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष मजहर नालबंद, आयेशा मस्जिद चे साजीद बेग, राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे शहर अध्यक्ष सोहेल पठाण, अशपाक सय्यद, आलीम खान, युवा नेते अल्लाउद्दीन शेख, ईन्नुस पठाण यांनी निवेदन दिले. यावेळी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, मुलाणी मुस्लिम दफनभूमी येथे जाण्यासाठी सध्या रस्ता नाही झाडेझुडपे असल्यामुळे जाता येत नाही. त्यामुळे या ठिकाणी रस्ता कॉंक्रीटीकरण करणे गरजेचे आहे. त्यामुळे आमदार नारायणआबा पाटील यांच्या आमदार निधीतून कॉंक्रीटीकरण करण्यात यावा, असे या निवेदनात म्हटले आहे.



### शासकीय रेखाकला परीक्षेत उर्दू हायस्कूलचे घवघवीत यश

**अक्कलकोट, दि. २९ जानेवारी-**

महाराष्ट्र राज्य कलासंचालनालय मुंबई, शासकीय एलीमेंटरी व इंटरमिजिएट ड्रॉईंग ग्रेड तथा शासकीय रेखाकला परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला असून, येथील अंजुमन तरगीबे तालीम शिक्षण प्रसारक मंडळ, संचलित, अँग्लो उर्दू हायस्कूल च्या विद्यार्थ्यांनी दोन्ही परिक्षेत, घवघवीत यश संपादन केले असून शाळेचा निकाल शंभर टक्के लागला आहे. इंटरमिजिएट परिक्षेत अंजुम जमादार व सबा मुजावर या विद्यार्थीनींनी तर इलेमेंटरी परिक्षेत महेक जमादार, शिफा बागवान, अय्युब अबुबकर, अबुबकर बागवान, अलमास मुजावर, अंजुम पटेल, अर्शद अत्तार, हमिदाबी आळंद अ, श्रेणी घेऊन विशेष प्राविण्य मिळविले. इंटरमिजीएट परिक्षेत, ब श्रेणी मिळविलेले विद्यार्थी अनुक्रमे : जिया काझी,अफ्सीया सय्यद, जोया शेख,अल्तजीन फुलारी, फैजान कुरेशी, इरमसबा बेपारी, जैनबी नाईकवाडी, मंतशा तांबोळी, मुस्कान शेख, सालिया सक्करगे, तहुरा बागवान, तंजीला जमादार यांनी तर इलेमेंटरी परीक्षेत फिरदोस बागवान, शाहिन शेख, वरका सिद्दीकी, तर उर्वरीत विद्यार्थ्यांनी कश्रेणी घेऊन सर्वच्या सर्व विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. कलाशिक्षक अतुल जाधव, कलाविभाग प्रमुख तसनीम शेख यांचे सहकार्य लाभले. प्राचार्या नसरीन होटगीकर यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# ३८ वर्षानंतर भरली माजी विद्यार्थ्यांची शाळा

## अक्कलकोटमध्ये मित्रांच्या गप्पांची मैफिल चांगलीच रंगली; जुन्या आठवणींना उजाळा

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २९ जानेवारी-**

कर्नाटक लिंगायत एज्युकेशन सोसायटी बेळगाव संचलित अक्कलकोट मंगरुळे प्रशालेच्या १९८७-८८ मधील दहावी बॅचच्या माजी विद्यार्थ्यांचा शाळा हन्नूर रस्त्यावरील श्रीशैलम् यात्री निवास तथा फार्म हाऊसवर भरली. तब्बल ३८ वर्षानंतर एकत्र आलेल्या मित्रांच्या गप्पांची मैफिल चांगलीच रंगली. त्यातून जुन्या आठवणींना उजाळा मिळाला.

अध्यक्षस्थानी माजी विद्यार्थी चंद्रकांत स्वामी होते. स्वागत श्रीशैलम् यात्री निवासचे संचालक श्रीशैल भरमशेट्टी यांनी केले. एक दिवस बालपणीचा या शीर्षकाखाली तब्बल ३८ वर्षांनंतर माजी विद्यार्थी मेळाव्यानिमित्त एकत्र आले. सर्व विद्यार्थ्यांनी गुरुजनांचे आठवणीतून आशीर्वाद घेतले. त्यानंतर सर्वजण आपुलकीने एकमेकांची चौकशी करीत आठवणींना उजाळा देत होते. शाळेत शिकत असताना एकमेकांमध्ये स्नेहभाव निर्माण होतो. पण शालेय शिक्षण पूर्ण झाल्यानंतर मात्र प्रत्येकाच्या जीवन प्रवासाच्या वाटा वेगवेगळ्या होतात. त्यामुळे मित्र दुरावले जातात. अशा बालमित्रांना पुन्हा एकदा एकत्र आणण्याचे काम स्नेहमेळाव्याच्या माध्यमातून झाले. बरेच जण एकमेकांना ओळखूही शकले नाहीत. गप्पांच्या ओघात हळूहळू जुने दिवस प्रत्येकाला आठवले आणि स्नेहमेळाव्यात रंगत आली.




**कलाविष्काराला मिळाली दाद**

जवळपास ३८ वर्षांनंतर एकत्र आलेल्या मित्र-मैत्रिणींनी शाळेत असताना केलेल्या गमती-जमती, स्नेहसंमेलनातील सहभाग, लाजाळू पणाचा स्वभाव, शिक्षकांनी केलेली शिक्षा, खोड, निकालसह छडी व डस्टरने मारण्याची आठवण यावेळी करून दिली. अशा अनेक आठवणींना उजाळा दिला. जुन्या आठवणींना उजाळा देत गीत, नाट्यछटा, मराठी व कन्नड भाषेतील विनोदी चारोळ्या, डॉयलॉग, भाषण कला सादर केले. त्यामुळे अनेकांना ३८ वर्षांपूर्वीचाच हुबेहूब अनुभव आला. त्यामुळे आजचा दिवस हा कसा संपला याचे भान विद्यार्थी व विद्यार्थिनींना राहिले नाही.

मेळाव्याची सुरुवात उसाच्या रसाची चव आणि हरभरा दहाळ स्वाद घेत झाले. त्यानंतर गरमागरम हुरडा पार्टी व सायंकाळी जेवणाची चव घेत जुन्या आठवणींना सर्वांनी उजाळा दिला. यावेळी दिवंगत गुरुजन व विद्यार्थ्यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. प्रास्ताविक बसवराज दुधनी यांनी केले. अक्कलकोटसह सोलापूर, उस्मानाबाद, पुणे, पंढरपूर, कलबुर्गी, जळकोट आदी ठिकाणांहून तसेच आडत व्यापार, औद्योगिक, शिक्षण, शेती, राजकारण, समाजसेवा, पत्रकार आदी विविध क्षेत्रांत कार्यरत असलेल्या बालमित्र- मैत्रीण उपस्थित होते.

**नेटकेपणाने नियोजन**

स्नेहमेळावा यशस्वी करण्याबरोबरच नेटकेपणाचे नियोजन श्रीशैलम् यात्री निवासचे व्यवस्थापक शिवानंद भरमशेट्टी, केदार भरमशेट्टी, भारती भरमशेट्टी, अरुणा भरमशेट्टी, पूजा भरमशेट्टी, तारा भरमशेट्टी यांनी केले होते.

या स्नेहमेळाव्यास निर्मला स्वामी, सुहास होटकर, सुनील आडवीतोटे, कलावती जवळगे, हेमा पाटील, कल्पना किरनळी, अंजली मंगरूळे, गौरी मंगरूळे, महानंदा हत्तुरे, सुजाता होटकर, राहुल पाटील, भीमाशंकर भावे, सुनील अल्लोळी, शंकर निंबाळे, संजय आडवीतोटे, मनीषा होटकर, विजयालक्ष्मी कुंभार, सिध्दाराम स्थावरमठ, पत्रकार विरुपाक्ष कुंभार उपस्थित होते.सूत्रसंचालन सुनील आडवितोटे यांनी केले तर महानंदा हत्तुरे व अंजली मंगरुळे यांनी आभार मानले.

## मोडनिंब येथील डान्स स्पर्धेत शेटफळ संघ प्रथम

**तभा वृत्तसेवा,**
**मोडनिंब, दि. २९ जानेवारी-**




राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या संयुक्त विद्यमाने जयंतीनिमित्त डान्स स्पर्धा मोडनिंब (ता.माढा) येथे राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या संयुक्त जयंती निमित्त भव्य डान्स स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.

स्पर्धेत प्रथम पारितोषिक जिल्हा परिषद शाळा शेटफळ लिंबानी लमानी ग्रुपडान्स, तर द्वितीय क्रमांक समिक्षा सकट पारंपरिक लावणी, तृतीय क्रमांक वैभवी मांढरे बेटी बचाव थीम यांनी पटकावला. उत्तेजनार्थ वाघ्या मुरळी ग्रुप डान्स श्री उमा विद्यालय मोडनिंब, अनुराधा शिंदे, संस्कृती व्यवहारे, नक्षत्रा पुरवत यांनी पटकावला. धनाजी लादे मित्र परिवार आयोजित या स्पर्धेचे उद्घाटन भारतीय जनता पार्टीचे प. जिल्हा अध्यक्ष चेतनसिंह केदार-सावंत यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी व्यासपीठावर भाजपा माढा तालुका अध्यक्ष योगेश पाटील, दत्तात्रय जाधव, अमरसिंह महाडिक, गणेश सुर्वे, प्रकाश कुलकर्णी, नंदकुमार मोरे, प्रथमेश पवार, शुभम वाघमारे, पांडुरंग राऊत, सरपंच लक्ष्मी पाटील, कैलास तोडकरी, सरपंच प्रताप घाडगे, दिपक सुर्वे, किरण खडके, दत्ता सुर्वे, राहुल पाटील, अनिल शिंदे, अनिल सावंत, वैभव मोरे, रविकांत जाधव, वर्षा जाडकर, सुधाकर रेपाळ, रावसाहेब चौगुले, धनश्री लादे, स्नेहल रेपाळ, तृप्ती यादव, प्रेरणा तोडकरी, अनिता शेळके, नवनाथ मोहिते, नंदकुमार लादे, हनुमंत कुंभार, प्रमोद गाडे, सुनील ओहोळ, सिद्धार्थ शेंडगे, मोडनिंब आउट पोस्टचे देवकर, आतार उपस्थित होते. सर्व सहभागी स्पर्धकांना ट्रॉफी व प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी भाजप नेते धनाजी लादे, विशाल पाटील, सागर शेलार, मुरारी रेपाळ, अमोल काटकर, निखिल सुर्वे, अमोल पाटील, ऋषिकेश कणसे, विनायक खिल्लारे, रोहित कणसे, दिपक खिल्लारे, सौरभ पुरवत, सिद्धेश्वर दळवी, महेश लादे, संतोष लादे, सनी सुरवसे यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन शिवाजी लोखंडे यांनी केले.



## शिवशंकर बझारमध्ये तांदुळ महोत्सव

**८० प्रकारचे तांदुळ विक्रीस उपलब्ध**

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. २९ जानेवारी-**

येथील शिवशंकर मध्यवर्ती सहकारी ग्राहक संस्थेच्या शिवशंकर बझारमध्ये तांदूळ महोत्सवास उत्साहात सुरूवात झाली. ७६ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त या महोत्सवाचे उद्घाटन संस्थेच्या चेअरमन डॉ. स्वयंप्रभादेवी मोहिते-पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी व्हा. चेअरमन मदन भगत, संचालक जगन्नाथ धुमाळ, नारायण फुले, कैलास ताटे, अनिल मुंडेफणे, व्यवस्थापक गोपाळराव माने-देशमुख उपस्थित होते. उद्योगमहर्षि कै. उदयसिंह मोहिते-पाटील यांच्याध्येय धोरणानुसार ग्रामीण भागात गेल्या २९ वर्षापासून ना नफा ना तोटा तत्वावर सामाजिक बांधिलकी जपत शिवशंकर बझार सहकारी तत्वावर कार्यरत आहे. प्रत्येक वर्षी आयोजित करण्यात येणारा तांदुळ महोत्सव शिवशंकर बझारचे प्रमुख आकर्षण असते. माळशिरस तालुक्यासह आसपासच्या तालुक्यातील चोखंदळ व खवय्ये ग्राहक अवर्जुन या तांदूळ महोत्सवाला भेट देतात.

यावर्षीच्या तांदुळ महोत्सवामध्ये ८० प्रकारच्या विविध नामांकित कंपनींचे तांदूळ उपलब्ध करून देण्यात आले आहेत. याशिवाय ग्राहकांच्या सोईकरीता विविध प्रकारच्या डिस्काउंट ऑफर सुरू करण्यात आल्या आहेत. यामध्ये सौंदर्यप्रसाधने ज्वेलरी आयटमवर २५ टक्के डिस्काउंट, फुटवेअर शुज वर २५ टक्के डिस्काउंट, तसेच टॉप लेडीज प्लाजोवर २५ टक्के डिस्काउंट देण्यात येत आहे. हा तांदूळ महोत्सव व डिस्काउंट ऑफर ३१ मार्चपर्यंत चालू राहणार असून जास्तीत जास्त ग्राहकांनी याचा लाभ घेण्याचे आवाहन व्यवस्थापक गोपाळराव माने-देशमुख यांनी केले आहे.




## डॉ. अनिल जोशी लिखित पुस्तकाचे प्रकाशन

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २९ जानेवारी-**

पंढरपुरातील निवृत्त वैद्यकीय अधिकारी डॉ. अनिल जोशी यांच्या 'इच्छामरण' या संकल्पनेचा घेतलेला आगळावेगळा वेध या विषयावरील शेवटचा दिस गोड व्हावा या नूतन पुस्तकाचा व शवागरातील एक वेगळ्या विश्वाचा परिचय देणाऱ्या (अ) पार्थिवया पुस्तकाच्या दुसऱ्या आवृत्तीचा दिमाखदार प्रकाशन समारंभ मानसोपचार तज्ज्ञ डॉ. प्रसन्न दाभोलकर व अतिदक्षता विभाग तज्ज्ञ डॉ. शिरीष प्रयाग यांच्या हस्ते संपन्न झाला.

अध्यक्षस्थानी ज्येष्ठ लेखक भानू काळे होते. डॉ. प्रसन्न दाभोलकरांनी मानसशास्त्रीय दृष्टिकोनातून इच्छामरण या विषयावर प्रकाश टाकताना आपल्या दैनंदिन आचरणातून, आहार विहारातून आपण आपली इहलोकयात्रा मरणासन्न अवस्थेपर्यंत न जाता तुका म्हणे मुक्ति परिणिली नोवरी। आतां दिवस चारी खेळीमेळीं।। याजसाठी केला होता अट्टाहास। शेवटाचा दिस गोड व्हावा।। या पुस्तकाच्या शिर्षकाप्रमाणे शेवटचा दिस गोड व सुखकर करू शकतो हे जगद्गुरू तुकोबांच्या अभंगाचा दाखला देऊन आपले मौलिक विचार व्यक्त केले.

ज्येष्ठ अतिदक्षता विभाग तज्ज्ञ डॉ. शिरीष प्रयाग यांनी आयसीयू व व्हेंटिलेटर बरोबरच डायलिसिस, डिमेन्शिया, अल्झायमर या दुर्धर आजाराशी संबंधित शब्दांची एकूणच जनमानसावर बसलेली भीती यावर आपल्या भाषणातून मार्गदर्शन केले. भानू काळे यांनी (अ) पार्थिव या शवागरातील एका वेगळ्या विश्वावर प्रकाश टाकणाऱ्या पुस्तकावर आपले विचार मांडले. सूत्रसंचालन भूषण पानसे यांनी केले. पत्रकार अभय जोशी यांनी आभार मानले.

## पाकणीच्या कन्हैयालाल झुलामध्ये हुरडा महोत्सव सुरु

**प्रथमेश इंगळेंच्या हस्ते शुभारंभ**

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २९ जानेवारी-**

सोलापूरच्या पाकणी येथील पुणे हायवे लगत असलेल्या कन्हैयालाल झुला भोजन व पिकनिक पॉईंट मध्ये यंदाच्या हुरडा महोत्सवास नुकताच प्रारंभ झाला. या हुरडा महोत्सवाचे शुभारंभ येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानचे चेअरमन व नगरसेवक महेश इंगळे अतिपत्याखाली त्यांचे सुपुत्र प्रथमेश इंगळे यांच्या हस्ते करण्यात आला.

याप्रसंगी कन्हैयालाल झुला भोजन व पिकनिक पॉईंटचे मालक कपिल बजाज, मधुर बजाज, डॉ. स्वप्नाली बजाज, प्रितेश जाजू, रोहिणी देवकुळे, वासंती तांबेकर, शशिकांत तुळजापूरकर, भाग्यश्री तुळजापूरकर व सेवा सदन प्रशालेचे माजी मुख्याध्यापिका मानसी दामले यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रथमेश इंगळे यांनी भारतासारख्या कृषी प्रधान देशात आज पाश्चात्य संस्कृतीचे अनुकरण होताना दिसत आहे. त्या माध्यमातून बाहेर हॉटेलिंगची आजच्या तरुण पिढीमध्ये मानसिकता रुजलेली आहे. या पार्श्वभूमीवर सोलापूरसारख्या स्मार्ट सिटीत कृषीप्रधान भारतीय संस्कृतीची परंपरा टिकविण्याकरिता अशा प्रकारचे हुरडा महोत्सव नेहमीच आदर्शवत ठरतील अशा प्रकारचे मनोगत व्यक्त केले. यावेळी प्रथमेश इंगळे यांच्यासह मंदिर समितीचे सचिव आत्माराम घाटगे, विश्वस्त महेश गोगी, प्रा.शिवशरण अचलेर, श्रीशैल गवंडी, संजय पवार, खाजप्पा झंपले, अमर पाटील, सागर गोंडाळ, आदींसह स्विमिंग ग्रुपचे सदस्य संतोष पराणे, अरविंद पाटील, श्रीकांत झिपरे, सुनील पवार, बाबा सुरवसे, शेखर आडवीतोटे, शिवशंकर बिंदगे, बाळासाहेब एकबोटे, अंकूश केत, काशिनाथ सोलनकर, रवि कदम, दर्शन घाटगे, धनराज स्वामी, तुषार मोरे, विश्वनाथ देवरमनी, अशोक कलशेट्टी, मनोज जगताप, कुमार हत्तुरे, संजय बिराजदार, शिवगुंडे सर, मनोज इंगुले, चित्तरंजन अगरथडे, रमेश शिंदे, बाबा शिंदे, पत्रकार राजेश जगताप, स्वामीराव गायकवाड अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषद शाखा अक्कलकोट तालुकाध्यक्ष, नंदकुमार जगदाळे, रमेश भंडारी, काका सुतार आदींसह स्विमिंग ग्रुपचे सदस्य महेश मालक इंगळे, प्रथमेश मालक इंगळे मित्रपरिवारचे अन्य सदस्यांनी यावेळी मनसोक्त हुरड्याचा व सायंकाळी वनभोजनाचा आस्वाद घेतला. याप्रसंगी सर्वांनी पिकनिक पॉईंट मधील विविध उपक्रमांमध्ये सहभागी होऊन आपल्या कलागुणांना वाव दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. शिवशरण अचलेर यांनी केले तर आभार कपिल बजाज, मधूर बजाज यांनी मानले.

# एमआयडीसीत व्यवसाय सुरू न करणाऱ्यांच्या जागा परत घ्या

**आ. समाधान आवताडे यांच्या अधिकाऱ्यांना सूचना**

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि.२९ जानेवारी-**

मंगळवेढा शहरालगत असलेल्या एमआयडीसीमध्ये अनेक लोकांनी व्यवसायासाठी जागे घेतले आहेत मात्र त्या जागेवर व्यवसाय सुरू न करता शेड मारून फक्त जागा गुंतवून ठेवल्या आहेत अशा लोकांना नोटीसा काढून त्या जागा परत घ्या,व तात्काळ व्यवसाय करणाऱ्यांना जागा उपलब्ध करून द्या अशा सूचना आ. समाधान आवताडे यांनी एमआयडीसीच्या अधिकाऱ्यांना दिल्या.

ते मंगळवेढा येथील शासकीय विश्राम गृहात आयोजित केलेल्या अधिकाऱ्यांच्या व व्यावसायिकांच्या बैठकीत बोलत होते यावेळी व्यासपीठावर नगरपालिकेचे विरोधी पक्षनेते अजित जगताप,भाजपचे जिल्हा संघटक शशिकांत चव्हाण, जिल्हा नियोजन समितीचे सदस्य प्रदीप खांडेकर, सुरेश भाकरे, तानाजी काकडे प्रकाश आप्पा गायकवाड औदुंबर वाडदेकर यांचे सह एमआयडीसीचे अधिकारी उपस्थित होते



**लवकरच हस्तांतर करणार**

यावेळी पंढरपूरच्या एमआयडीसीबाबत अधिकाऱ्यांनी माहिती देताना सांगितले की, जागा हस्तांतर करून घेण्याची प्रक्रिया सुरू असून संयुक्तिकरित्या मोजणी करून लवकरच जागा हस्तांतर करून घेण्यात येईल. यावेळी आ. समाधान आवताडे यांनी लवकरात लवकर जागा हस्तांतरण करून घेण्याच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

आ. आवताडे म्हणाले की, एकूण ९४ हेक्टर जागा ही एमआयडीसीसाठी आरक्षित आहे त्यामधील ४० हेक्टर जागेवर सोलर कंपनी असून उर्वरित जागा या व्यवसायासाठी अनेक व्यावसायिकांनी घेतल्या पण व्यवसाय सुरू केले नाहीत अशांना नोटीस काढून दोन महिन्याची मुदत द्या जे दोन महिन्यात व्यवसाय सुरू करत नाहीत त्यांच्या जागा परत घ्या व नवीन व्यवसाय सुरू करू पाहणाऱ्या लोकांसाठी खुल्या करा त्याचबरोबर पाण्याची सोय करा, दिवाबत्ती, विजेची सोय या सर्व बाबींकडे गांभीर्याने लक्ष देऊन येथील एमआयडीसी मध्ये लोकांच्या हाताला काम मिळेल असे नियोजन करून त्वरित व्यवसायिकांना जागावाटप करण्याच्या सूचना देत आ. समाधान आवताडे यांनी पंढरपूर एमआयडीसीच्या कामाचाही आढावा घेतला. यावेळी उद्योजकांसह पदाधिकारी, अधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

CMYK

आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

# अक्कलकोटमध्ये घरकुलांचे काम पेंडिंग

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २९ जानेवारी-**

अक्कलकोट नगरपरिषद हद्दीतील भीमनगर व इतर वस्तीतील रमाई घरकुल आवास योजनेतील घरकुल लाभार्थी कर पावतीवर भोगवटदार असल्यामुळे अनेका घरकुल लाभार्थ्यांचे घरकुल पेंडिंग ठेवण्यात आले आहेत.

लाभार्थ्यांचे घरकुल फाईल पेंडिंग न ठेवता रिपाइं तालुकाध्यक्ष अविनाश मडीखांबे यांनी घरकुल लाभार्थीसह



अक्कलकोट रिपाइं शिस्टमंडळाने आ. सचिन

कल्याणशेट्टी यांना निवेदन दिले. यावेळी अविनाश मडिखांबे, दत्ता मडीखांबे, विजयकुमार बाळशंकर, श्रीकृष्णा सुतार, बाळासाहेब मडीखांबे, नितेश मडीखांबे, विजय मडीखांबे, सैदप्पा झळकी, विजय पोतेनवरू, राजू भगळे, अंबादास गायकवाड, अंदेवाडी सरपंच रमेश धोडमनी, गोरकनाथ धोडमनी, यामनप्पा शिंदे, दुधनीचे, निंगराज निंबाळ, मलकण्णा सोनकांबळे उपस्थित होते.



## संक्षिप्त वृत्त...



### ग्रंथ हे स्वर्गापेक्षा श्रेष्ठ असतात : प्रा. गंभीर

**बार्शी, दि. २९ जानेवारी-**

श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ बार्शी संचलित शंकरराव निंबाळकर अध्यापक विद्यालय येथे कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांच्या १२२ व्या जयंतीनिमित्त आयोजित समाजदिन सप्ताहानिमित्त दुसरे पुष्प गुंफण्यासाठी प्रमुख व्याख्याते म्हणून प्रा.चंद्रहस गंभीर यांच्या व्याख्यानाचे आयोजन केले होते. अध्यक्ष म्हणून अध्यापक विद्यालयाचे प्रा.डॉ. दीपक गुंड, देशमुख उपस्थित होते. या समाजदिन सप्ताहाची सुरुवात प्रथम पुष्प गुंफण्यासाठी अध्यापक विद्यालयातील प्रा. जितेंद्र जळकुटे यांनी मामांच्या जीवन व कार्य याविषयी आपले मनोगत व्यक्त केले. त्यासोबतच स्नेहा गुंड, अक्षता शिंदे, संस्कृती नागटिळक यांनी देखील आपले मनोगत व्यक्त केले. समाजदिन सप्ताहाचे दुसरे पुष्प गुंफण्यासाठी आज दि. २८ जानेवारी रोजी आयोजित कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराज व कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांच्या प्रतिमा पूजन करुन झाली. प्रास्ताविक प्रणव भडांगे यांनी केले. अध्यक्षीय समारोप प्राचार्य डॉ. दीपक गुंड यांनी केले. आभार संकेत मगर यांनी तर सूत्रसंचालन मारडकर व गवारे यांनी केले. कार्यक्रमाचे नियोजन सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. गायकवाड जे.पी. यांनी केले.



### पालकांनी स्वत:ची जबाबदारी ओळखावी : प्रा. मुजावर

**पंढरपूर, दि.२९ जानेवारी-**

प्रत्येक पालकांनी आपल्या पाल्याला घडवण्यासाठी स्वतःची जबाबदारी ओळखून आपल्या पाल्याबरोबर वर्तन करावे. पाल्य हे पालकांचे अनुकरण करत असतात तेव्हा आपले वर्तन आदर्श ठेवावे तरच आपले पाल्य जीवनामध्ये सुसंस्कारी घडतील, यशस्वी होतील, असे प्रतिपादन सोलापूर येथील प्रसिद्ध व्याख्याते प्राध्यापक आय. आय. मुजावर यांनी व्यक्त केले. विवेक वर्धिनी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयातर्फे रखुमाई सभागृहात आयोजित केलेल्या पालकांसाठी मार्गदर्शन शिबिरामध्ये ते बोलत होते. यावेळी संस्थेचे अध्यक्ष डॉ. मदन क्षीरसागर यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रम ासाठी सहसचिव अजित नडगिरे उपस्थित होते. प्राचार्य डॉ. यु. आर. मुंढे यांनी प्रास्ताविक केले. यावेळी प्रशालेतील वरिष्ठ लेखनिक हनुमंत मोरे, जेष्ठ शिक्षक विलास दराडे, अशोक पवार, अमोल हुंगे उपस्थित होते. सूत्रसंचालन राजूभाई मुलाणी यांनी केले.



### श्री शंकरलिंग महाविद्यालयात बारावीच्या विद्यार्थ्यांना निरोप

**वळसंग, दि. २९ जानेवारी -**

वळसंग (ता. द. सोलापूर) येथील श्री शंकरलिंग माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रशालेत बारावी विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ पार पडला. अध्यक्षस्थानी माजी प्राचार्य शिवशरण प्याटी होते. यावेळी जि. प. विभागीय अभियंता राजेश जगताप यांनी उपस्थित होते. प्राचार्य विरेश थळंगे यांनी प्रास्ताविक केले. या शैक्षणिक वर्षातील आदर्श विद्यार्थी शेख व आदर्श विद्यार्थिनी वैष्णवी हसके यांची निवड करुन त्यांचा सत्कार करण्यात आला. आदर्श विद्यार्थी अनिस पटेल व आदर्श विद्यार्थिनी वैष्णवी हंजगे यांनी मनोगत व्यक्त केले. संतोष शिंदे, राजेश जगताप, संस्थेचे अध्यक्ष श्रीशैल दुधगी, चेअरमन शिवशरण थळंगे, संचालक विश्वनाथ थळंगे, प्रकाश दुधगी, मल्लिनाथ थळंगे, प्राचार्य वीरेश थळंगे, पर्यवेक्षक शिवानंद घोडके, कट्टेप्पा कोळी, विनोद दुधगी आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रतिभा तांडुरे व आभार शरणय्या मसुती यांनी मानले.

### प्रा. डॉ. महेश निकत यांना युवा महाराष्ट्र फाऊंडेशनचा पुरस्कार

**करमाळा, दि.२९ जानेवारी-**



युवा महाराष्ट्र फाउंडेशन संस्थेतर्फे ग्लोबल सायन्स इन्स्टिटयूटचे संस्थापक प्रा. डॉ. महेश निकत यांना महाराष्ट्र प्रेरणा पुरस्कार जाहीर झाला आहे. अभिनेत्री हसीनी सुधीर, विजय चौधारी, भूमाता ब्रिगेडच्या संस्थापिका तृप्ती देसाई, अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळाचे अध्यक्ष मेघराज राजेभोसले यांच्या प्रमूख उपस्थितीत दिला जाणार आहे. फेटा, श्रीफळ, सन्मानचिन्ह, सन्मानपत्र, शाल असे पुरस्काराचे स्वरुप आहे.

# अहिल्या पुलास समांतर नवीन पूल होणार

## आ. समाधान आवताडे : केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरींनी केले ७७ कोटी मंजूर

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२९ जानेवारी-**

पंढरपूर आणि टेंभुर्णी मार्गावर भीमा नदीवर आणखी एक पूल होणार असून येथील अहिल्या पुलास समांतर अशा नवीन पुलासाठी केंद्रीय सडक आणि परिवहन मंत्री नितीन गडकरी यांनी ७७ कोटी रुपयांचा निधी मंजूर केल्याची माहिती आ. समाधान आवताडे यांनी दिली. या पुलासाठी आ. आवताडे यांनी गडकरी यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा केला होता.

पंढरपूर शहरात येणाऱ्या वाहनांची संख्या दरदिवशी वाढत आहे, मात्र भीमा नदीवर पंढरपूर जवळ सध्या एकच नवीन पूल आहे, आणि टेम्भूर्णी मार्गावर असलेला अहिल्या पूल ४५ वर्षे जुना आहे. त्यामुळे हा पूल वाहतुकीसाठी धोकादायक ठरतो आहे. दरवर्षी भीमा नदीला पूर आला कि हा पूल पाण्याखाली जातो आणि वाहतूक ठप्प



होते. शिवाय अहिल्या पूल जुना असल्याने त्यावरून वाहतूक करणे धोकादायक ठरते आहे. आजवर अनेक वाहने या पुलावरून भीमा नदीमध्ये पडलेली आहेत. या पार्श्वभूम ीवर अहिल्या पुलाजवळ आणखी एका समांतर पुलाची गरज होती. आणि आ. समाधान आवताडे यांनी या पुलाची मागणी केली होती. त्या नवीन पुलासाठी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी ७७.७१ कोटी रुपयाचा निधी मंजूर केला आहे. एनएच ५६१ ए या टेंभुर्णी-पंढरपूर-मंगळवेढा या मार्गावर हा पूल होणार असून सोमवार दि. २७ जानेवारी २०२५ रोजी या पुलाच्या कामास ना. गडकरी यांनी मंजुरी दिली आहे. या पुलाच्या तांत्रिक मान्यतेनंतर २०२७ अखेर पुलाचे काम पूर्ण करण्याचे उद्दिष्ट देण्यात आलेले आहे.

आ. समाधान आवताडे यांनी पंढरपूर शहर आणि मतदारसंघातील विकासासाठी, जास्तीत जास्त निधी उपलब्ध करून घेतला आहे. यामुळेच या मतदारसंघातील मतदारांनी त्यांना पुन्हा एकदा सेवा करण्याची संधी प्राप्त करून दिली आहे.

### एमआयडीसीसाठी पाठपुरावा सुरु

पंढरपूर मंगळवेढा मतदारसंघात काम करत असताना, विविध भागात अनेक प्रकारच्या विकास कामाचा निधी पोहोचविला आहे. त्याच धर्तीवर आणखी एक नव्याने पूल करण्याची मागणी केली असता. हा निधी मंजूर करून पंढरपूरकरासाठी आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. आ. समाधान आवताडे यांनी तरुणांच्या हाताला काम लवकरात लवकर मिळावे. यासाठीही एमआयडीसीची लवकर निर्मिती होण्याच्या दृष्टीने पावले उचलली आहेत. पंढरपूर शहरातील अनेक विकास कामामुळे आ. समाधान आवताडे यांच्या कामाची मोठी ओळख निर्माण झाली आहे.

# अभ्यास करा, अधिकारी बना : रावसाहेब मिरगणे

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२९ जानेवारी-**

लहान वयातच मुलांनी स्पर्धा परीक्षेचा अभ्यास केला पाहिजे. मराठी शाळा टिकवण्यासाठी कवठेकर प्रशाला अतिशय कष्ट घेत आहे. भरपूर अभ्यास करा, अधिकारी बना, असे आवाहन पुणे शिक्षण निरीक्षक रावसाहेब मिरगणे यांनी केले.

कवठेकर प्रशाला नाथ चौक पंढरपूर आयोजित करण्यात आलेल्या सप्तरंग सांस्कृतिक उत्सवात स्वरयात्रा व चित्रकला आणि पुरातन वस्तू प्रदर्शन प्रतिवर्षाप्रमाणे आयोजित करण्यात आला असताना पुणे शिक्षण निरीक्षक रावसाहेब मिरगणे बोलत होते. सुरुवातीला रावसाहेब मिरगणे, सचिव सुधीर पटवर्धन, प्रमुख अभ्यागत भारत गदगे, असावरी पटवर्धन, वि. दा. सवाई, ज्ञानेश्वर दुधाणे, डॉ. मिलिंद जोशी, एस. पी. कुलकर्णी, मुख्याध्यापक व्ही. वाय. पाटील, उपमुख्याध्यापक एम. आर. मुंढे, द. ह. कवठेकरचे मुख्याध्यापक व्ही. एम. कुलकर्णी, उपमुख्याध्यापक सुनील रुपनर यांच्या



हस्ते प्रदर्शनाचे उद्घाटन झाले. विद्यार्थी विद्यार्थ्यांनींनी अतिशय सुंदर चित्र काढून पूरातन वस्तूंचे प्रदर्शन पाहून भुतकाळात गेल्याची जाणीव झाली. यावेळी भारत गदगे यांनी काढलेले अप्रतिम सरस्वती देवीचे स्केच शाळेला भेट दिले. पंचम विद्यालयाचे संगीत शिक्षक वैभव केंगार यांच्या मार्गदर्शनाखाली अप्रतिम स्वरयात्रा समूहगीत बसवली होती. त्यामध्ये २ हजार विद्यार्थी, विद्यार्थिनी एका सुरात म ायभूमी तू उधळीत शत किरणा अनादी मी अनंत मी अतिशय सुंदर गीत सादर करत वाहवा मिळवली. त्यांना तितकीच सुंदर साथसंगत रोहन पंढरपूरकर, अविनाश इनामदार, करण भोसले सद्धार्थ दणाणे, ओंकार माने यांनी दिली. प्रास्ताविक मुख्याध्यापक व्ही. वाय. पाटील यांनी केले. सूत्रसंचलन आकांक्षा बिराजदार यांनी केले, आभार पर्यवेक्षिका एस. आर. कुलकर्णी यांनी मानले.

# सिल्व्हर ज्युबिलीमध्ये गुणवंतांचा सत्कार

## १ लाख ३६ हजारांची रोख पारितोषिके वितरित

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २९ जानेवारी-**



येथील के. एल. ई. सोसायटी बेळगांवी संचलित सिल्व्हर ज्युबिली हायस्कूलचा वार्षिक पारितोषिक वितरण सम ारंभ नुकताच संपन्न झाला.

यावेळी माजी विद्यार्थी व प्रसिध्द कान, नाक, धसा रोगतज्ञ डॉ. सिध्देश्वर शिराळ उपस्थित होते. अध्यक्षस्थानी माजी विद्यार्थी प्रा. दीपक राजमाने यांनी भूषविले. प्रास्ताविक मुख्याध्यापक प्रशांत कोल्हे यांनी केले. परिचय सांस्कृतिक विभाग प्रमुख शुभांगी म्हमाणे व सहशिक्षक सतीश होनराव यांनी करुन दिला. डॉ. शिराळ यांनी विद्यार्थ्यांनी उत्तम आरोग्य, चागल्या सवयी, केवळ पुस्तकी ज्ञानापेक्षा व्यवहार ज्ञान व इतर उपक्रमांमधून आपला आत्मविश्वास वाढवावा, असे प्रतिपादन केले. प्रा. दीपक राजमाने यांनी शाळेची गौरवगाथा मांडली. एसएससी, नववी, शिष्यवृत्ती परीक्षा, चित्रकला, शालेय क्रीडा स्पर्धा, हस्ताक्षर, पाठांतर व वक्तृत्व स्पर्धेतील विजेत्यांना एक लाख पस्तीस हजार सातशे एकोणव्वद रकमेचे पारितोषिक देण्यात आले. यावेळी उपमुख्याध्यापक अनिरुध्द चाटी, पर्यवेक्षिका अनुराधा विश्वेकर, कार्याध्यक्ष सुनिल पाटील, सांस्कृतिक प्रमुख शुभांगी म्हमाणे, विद्यार्थी प्रतिनिधी यशोधन गलांडे, पवन राऊत, विद्यार्थिनी प्रतिनिधी तनिष्का फल्ले आदी उपस्थित होते. आभार अनिरुध्द चाटी यांनी तर सूत्रसंचालन शिल्पा फल्ले व सूर्यकांत आदलिंगे यांनी केले. तनिष्का फल्ले हिच्या पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली. कार्यक्रमासाठी सतीश होनराव, गणेश ऐनापुरे, केदार गुडे, हेमंत गाढवे, जयदेवी खराडे, संतोष कुंभार, नागेश जम दाडे, आनंद लुंगारे, श्रीधर डिकुळे यांनी परिश्रम घेतले.

# अकलूजमध्ये सदाशिव शिवाचार्यांची संगीतमय इष्टलिंग महापूजा

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. २९ जानेवारी-**

प्रजासत्ताक दिनी अकलूज येथे प. पू. त्रिकालवंदनीय श्री. ष. ब्र.१०८ सदाशिव शिवाचार्य महास्वामी बृहन्मठ वेळापूर यांची भव्य संगीतमय इष्टलिंग महापूजा पार पडली. वीरशैव लिंगायत समाज अकलूज यांच्या वतीने सदर कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.



अकलूज येथील महादेव मंदिर बसवेश्वर पथ येथे मोठ्या जल्लोषात सद्गुरूंचे आगमन झाल्यानंतर भक्तिमय वातावरणात मंदिरातील शिवलिंगाचे दर्शन सद्गुरूंनी घेतले. नंतर स्नान करून बहुसंख्य शिवभक्तांच्या उपस्थितीत संगीतमय इष्टलिंग महापूजेला सुरुवात केली. पाच तास पूजा अतिशय सुंदर पद्धतीने भक्तिमय वातावरणात संपन्न झाली. यावेळी उपस्थित सर्व शिवभक्तांना पूजेचे तीर्थ देण्यात आले. इष्टलिंग महापूजा संपन्न होत असताना दिवे आरतीने उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. त्यानंतर सद्गुरुंनी आर्शिवचन करताना उपस्थितांना शिवभक्ती आणि गुरू बद्दलचे महत्व समजावून सांगितले.

# शिवाजी पॉलिटेक्निकचे हिवाळी परीक्षेत यश

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.२९ जानेवारी-**

महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांनी घेतलेल्या अभियांत्रिकी पदविका हिवाळी परीक्षा २०२४ मध्ये सांगोल्यातील शिवाजी पॉलिटेक्निक कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी उत्तुंग यश संपादन केले. यामध्ये प्रथम वर्ष-९०.४९ टक्के, द्वितीय वर्ष-६९.७१ टक्के, अंतिम वर्ष-७७.७९ टक्के निकाल लागला. विद्यार्थ्यांचे कौतुक करण्यात येत आहे.

अंतिम वर्षातील अभय गायकवाड प्रथम, प्रांजली इंगोले द्वितीय, स्वप्नाली पाटील तृतीय, द्वितीय वर्षातील आशुतोष कोडक प्रथम, शुभम माने द्वितीय, स्वप्नाली शिंदे तृतीय तसेच प्रथम वर्ष पदविकेच्या अमृता मिसाळ प्रथम, मृदुला पाटील द्वितीय, गायत्री मिसाळ तृतीय क्रमांक मिळवला. बेसिक मॅथेमॅटिक्स विषयात नेहा लेंडवे, सृष्टी काशीद, गौरी जाधव, डी. एस. यु. विषयात शुभम माने, ए. जे. पी. या विषयात पूनम माने, एम. डब्ल्यू. सी. या विषयात अक्षता बाबर या विद्यार्थ्यांना पैकीच्या पैकी गुण मिळाले. यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष बाबुराव गायकवाड, सचिव अंकुशराव गायकवाड, विश्वस्त डॉ. यशोदिप गायकवाड, प्राचार्य डॉ. आर. ए. देशमुख, विभाग प्रमुख, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, शासकीय अधिकारी, पदाधिकाऱ्यांनी अभिनंदन केले.

### ९० टक्केपेक्षा जास्त गुण प्राप्त विद्यार्थी

तनुजा मोरे, नीनत मुलानी, दीक्षा चव्हाण, गौरी नवले, साक्षी शेटे, ऋषिकेश शेंडगे, वैष्णवी भोसले, साक्षी मेखले, यशराज देशमुख, अविनाश गव्हाणे, तहूरा मुल्ला, शाहिद मुजावर, शितल सावंत, गौरी काटे, गुरुप्रसाद कदम, सुशांत काशीद, तनुजा मोरे, अजित गायकवाड, ऋतुजा मोहिते, प्रवीण घाडगे, कोमल सुरवसे, आर्या देशमुख, सानिका पवार, स्नेहल दिवसे, सायली गव्हाणे, वैष्णवी चक्रे, सानिका इंगवले, मेघा गायकवाड, तनुश्री खटकाळे, पल्लवी लिगाडे, प्रताप बुरंगे, तुषार दिघे.

# उजनीचे पाणी कुरनूर धरणात सोडण्यची प्रक्रिया सुरु

## प्रति सेकंद २,४०० लिटर क्षमता; लाभ क्षेत्रातील शेतकऱ्यांमधून समाधान

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि.२९ जानेवारी-**

उजनीचे पाणी पुन्हा दर्शनाळ खोल कालव्यातून कुरनूर धरणात सोडण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. यामुळे तालुक्यातील शेतकऱ्यांना रब्बी हंगामात फायदा होणार आहे. प्रति सेकंद २४०० लिटर म्हणजे २.४४ क्युसेक पाणी कुरनूर धरणात सोडण्यात आले आहे. उजनीतून पहिले आवर्तन संपेपर्यंत हे पाणी सोडण्यात येणार असल्याने शेतकऱ्यांमध्ये उत्साह निर्माण झाली आहे.



मागील वर्षी झालेल्या अत्यल्प पावसाम ुळे अक्कलकोट तालुक्यातील विविध जलस्रोत यापूर्वीच आटले आहेत. यामुळे आगामी उन्हाळ्यात पाणीटंचाई निर्माण होण्याची शक्यता निर्माण झाली होती. नागरिकांना व मुक्या जनावरांना त्रास होऊ नये यासाठी आ. सचिन कल्याणशेट्टी यांनी उजनी कालवा सल्लागार समितीच्या बैठकीत जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांच्याकडे पाणी सोडण्याविषयी मागणी केली होती. एखरुक योजनेंतर्गत उजनी धरणातून पाणी सोडण्यात आले असून हे पाणी मागील पंधरा दिवसांपासून दक्षिण सोलापूर तालुक्यातील विविध गावशिवारातून शनिवारी दुपारी दर्शनाळ कालव्याच्या माध्यमातून पाणी कुरनूर धरणाकडे सोडण्यात आले आहे.

### दुरुस्तीचे काम युद्धपातळीवर

अक्कलकोट तालुक्याला वरदायनी ठरलेल्या कुरनूर धरणातून खालच्या भागात सोमवारी २७ रोजी पाणी सोडण्याचे कालवा सल्लागार समितीच्या बैठकित ठरले. मात्र कुरनूर धरण खालच्या भागातील काही बंधारे दुरुस्ती व धरणावरील जनरेटर दुरुस्ती व अन्य काही तांत्रिक अडचणी दूर झाल्यावर ३ फेब्रुवारीच्या नंतर सोडण्यात येणार असल्याचे पाठबंधारे विभागाच्या अधिकऱ्याकडून सांगण्यात आले. पाटबंधारे विभागाचे अधिकारी, कर्मचाऱ्यांनी वेळेत सर्व बंधारे, स्वच्छ व दुरुस्ती करण्याचे काम युद्धपातळीवर करत आहेत.

धाराशिव दिनांक
सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महिला रुग्णालयातील वैद्यकीय कर्मचाऱ्यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा**

**धाराशिव, दि.२९ जानेवारी -**

शासकीय महिला रुग्णालय धाराशिव येथे उत्कृष्ट आरोग्य सेवा देणाऱ्या वैद्यकीय अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचा रुग्ण कल्याण समितीच्या वतीने सत्कार करण्यात आला. जिल्ह्यातील तसेच परजिल्ह्यातून येणाऱ्या गरोदर माता व रुग्णांना दर्जेदार सुविधा उपलब्ध करून दिल्याबद्दल त्यांना शाल गौरविण्यात आले.

कार्यक्रमात जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. धनंजय चाकुरकर, तालुकास्तरीय बाल संरक्षण समितीचे गणेश वाघमारे, आरोग्य मित्र शेख रौफ यांच्या हस्ते हा सत्कार करण्यात आला. यावेळी महिला रुग्णालयाच्या वैद्यकीय अधीक्षका डॉ. स्मिता गवळी यांनी सत्काराबद्दल आभार मानले. डॉ. धनंजय चाकुरकर यांनी महिला रुग्णालयातील कर्मचाऱ्यांनी अपुऱ्या मनुष्यबळातही उत्कृष्ट सेवा देत असल्याचे गौरवोद्गार काढले.

यावेळी सर्जन डॉ. स्मिता गवळी, डॉ. राहुल वाघमारे, डॉ. बाळासाहेब घाडगे, डॉ. रामढवे, डॉ. आदटराव, डॉ. बलवंडे, डॉ. राजेश, डॉ. शंकर, डॉ. रेखा टिके, डॉ. आयेशा यांच्यासह मेट्रन चव्हाण, रिबेका भंडारे, के.व्ही. मराठे, रेश्मा शेख यांच्यासह अन्य वैद्यकीय कर्मचारी उपस्थित होते.

### संक्षिप्त वृत्त...



### वैष्णवी माने हिचा सत्कार

**तेर, दि.२९ जानेवारी-**

धाराशिव तालुक्यातील तेर येथील वैष्णवी माने ने वेटलिफ्टिंग स्पर्धेत महाराष्ट्र राज्यात प्रथम तर देश पातळीवर चौथा क्रमांक पटकाविल्याबद्दल आ. राणाजगजितसिंह पाटील यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी महाराष्ट्र संत विद्यालयाचे मुख्याध्यापक जे.के. बेद्रे, रेवणसिद्धप्पा लामतुरे, बाळासाहेब वाघ, मुस्ताक काझी, संतोष गायकवाड, एस.एस. पटील, शिवाजीराव नाईकवाडी, पद्माकर फंड, विजयकुमार लाड, दिदी काळे, जयश्री माळी, पूजा चव्हाण, सतीश कदम, प्रवीण साळुंके, अमोल कस्तुरे, अविनाश पाडुळे, मजित मनियार, नितीन खंडाळकर, नरहरी बडवे, कवयित्री शांता सलगर, नवनाथ पांचाळ, शरद गोडसे, हनुमंत कोळपे, एस.एस. बळवंतराव, प्रा.डॉ. गुरुप्रसाद चिवटे, विठ्ठल कोकरे, गोरख माळी, मयूर तापडे, राहुल गायकवाड, श्रीकांत माळी, नारायण साळुंके, नवनाथ पसारे, अशिष माळी, प्रविण बंडे, सुनिल गायकवाड व विद्यार्थी, विद्यार्थीनी उपस्थित होते.



### सामुहिक राष्ट्रगीत कार्यक्रम संपन्न

**तुळजापूर, दि.२९ जानेवारी-**

येथील हाडको मैदानात दि.२९ जानेवारी रोजी तुळजापूर शहर वासीयाकडुन सामुहिक राष्ट्रगीत व राज्यगीताचा कार्यक्रम आयोजित केला होता. यावेळी तहसीलदार अरविंद बोळंगे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रस्ताविक अमोल कुतवळ यांनी केले. यानंतर अरविंद बोळंगे यांनी उपस्थित यांना मार्गदर्शन केले. उल्लेखनीय आणि वैशिष्ट्यपूर्ण कार्य केलेल्या पाच समाजसेवकांचा सत्कार करण्यात आला. यामध्ये अनुक्रमे गिरीश लोहारेकर, महेंद्र कावरे, ऋषिकेश साळुंके, नितीन जाधव व नितीन कासार यांचा सत्कार तहसीलदार यांच्या हस्ते करण्यात आला. यानंतर सर्वांनी उभारून सामुहिक राष्ट्रगीत व राज्यगीत म्हणण्यात आले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी सुहास साळुंके, नागनाथ भाऊ भांजी, खोपकर, सुदर्शन वाघमारे, नागेश किवडे, वल्लभ आप्पा कदम, मोटे, लक्ष्मण नन्नवरे, अनंत कोंडो, प्रशांत अपराध यांनी परीश्रम घेतली.

### कार्याध्यक्षपदी शिवशंकर तिरगुळे

**जळकोट, दि.२९ जानेवारी-**

व्हाईस ऑफ मिडिया धाराशिव जिल्ह्याच्या कार्याध्यक्षपदी अणदूर येथील शिवशंकर तिरगुळे तर संघटकपदी दयानंद काळुंके यांची निवड करण्यात आली. अणदूर येथील शिवशंकर तिरगुळे हे पत्रकारिता क्षेत्रामध्ये आल्यापासून आतापर्यंत विविध विषयावर लिखाण केले आहे. त्यांच्या कार्याची दखल घेऊन व्हाईस ऑफ मिडिया या पत्रकार संघटनेच्या धाराशिव जिल्हा कार्याध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. त्याचबरोबर अणदूर येथील जय मल्हार पत्रकार संघाचे सदस्य दयानंद काळुंके यांनीही आपल्या वृत्तपत्र लेखनातून अनेक विषय हाताळले आहेत. त्यांच्या सामाजिक व पत्रकारिता क्षेत्राचे योगदान लक्षात घेता त्यांची व्हॉईस ऑफ मिडीया या पत्रकार संघटनेच्या धाराशिव जिल्हा कार्यवाहकपदी निवड करण्यात आली आहे.



### हळदी-कुंकू व्याख्यानाचा कार्यक्रम

**जळकोट, दि.२९ जानेवारी-**

आष्टा (का.) येथील सेवानिवृत्त बहुउद्देशीय सामाजिक संस्थेतर्फे दत्त मंदिर येथे महिलांच्या उपस्थितीत श्री सिद्धेश्वर फाउंडेशन, सोलापूरच्या सौजन्याने लेकीच्या नावे वृक्षारोपण व वैद्य मेघा वनारोटे, आयुर्वेदाचार्य यांचे आरोग्यासह सौंदर्य सोहळा या विषयावर व्याख्यान व महिलांसाठी हळदी-कुंकू कार्यक्रम पार पडले. मुली, स्त्रिया आज काल वापरत असलेल्या सौंदर्य प्रसाधने हे शरीरास अपायकारक आहेत. दररोजचे आहार कसे, कोणते व केव्हा घ्यावे. यावर मार्गदर्शन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रु.रा. कोरे, सहाय्यक धम दाय आयुक्त, धाराशिव या होत्या. यावेळी श्री सिद्धेश्वर फाउंडेशनचे अध्यक्ष सर्जे, भास्कर बेशकराव उपस्थित होते. तसेच आष्टा (कासार) पोलीस पाटील संजीवनी चौधरी, शीला खडबडे, मंगल माळी या प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन दिपाली बलसुरे यांनी केले.

### जि.प. प्रशालेत हळदी कुंकू कार्यक्रम

**तेर, दि.२९ जानेवारी-**

धाराशिव तालुक्यातील तेर येथील जिल्हा परिषद पेठ प्रशालेत हळदी कुंकू कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी मुख्याध्यापिका सुलभा पवार, संतोष देशपांडे, शशिकांत देशमुख, गोरख चौरे, चंद्रकांत गिरे, उषा नाईक, वर्षा शेजाळ, प्रभावती मुंडे, लता बंडगर, रोहिणी हलसीकर, शकुंतला पांचाळ व शालेय व्यवस्थापन समितीचे पदाधिकारी, पालक उपस्थित होते.

# घाटात महिला भाविकांची खाजगी बस पलटी; एक महिला ठार

**१६ महिला गंभीर जखमी... महिला आणि लहान मुलांसह बस मध्ये ४८ भाविक... काचा फोडून वाचवले भाविकांचे जीवे...**



**उपजिल्हा रुग्णालयात आक्रोश...**

**तभा वृत्तसेवा**

**तुळजापूर, दि.२९ जानेवारी -**

भोसरी येथील केवळ महिला आणि लहान भाविकांनीना तुळजाभवानी दर्शनानंतर सोलापूरकडे घेऊन जाणारी खाजगी बस सोलापूर घाटातील पहिल्या वळणात टर्न बसला नसल्याने पलटी झाली. घाटात रहिवासी असणाऱ्या नागरिकांच्या मदतीने उत्कृष्ट कामगिरी करून महिलांना आणि लहान मुलांना बसच्या पुढील आणि पाठीम ागच्या काचा फोडून बसच्या बाहेर काढले.

याबाबत मिळालेली सविस्तर माहिती अशी की, आदिशक्ती आई तुळजाभवानी माता मोफत दर्शन करण्यासाठी डुडुळगाव येथील योगेश तळेकर यांनी ३० खाजगी बस मध्ये देवी दर्शन यात्रा काढली होती.

यामधील बस (क्र.एमएच १२/पी.क्यू. ०६६६) ही सायंकाळी सहा वाजता तुळजाभवानी दर्शन करून ४८ महिला आणि लहान मुलांना घेऊन सोलापूरकडे जात असताना घाटात पहिल्या वळणात गाडीचा टर्न न बसल्याने गाडी पलटी झाली.

या भागातील नागरिकांनी गाडीच्या काचा फोडून महिला आणि मुलांना बसम धून बाहेर काढले.

तात्काळ रुग्णवाहिकेमध्ये ४८ महिलांनी लहान मुलांना उपजिल्हा रुग्णालय येथे दाखल करण्यात आले. यामध्ये मोशी या गावातील रहिवाशी महिला रेखा गणपत ओव्हाळ (वय ५५) मयत झाली. तर १८ गंभीर जखमी महिला प्रवाशांना धाराशिव येथे पुढील उपचारासाठी पाठवण्यात आले. ही माहिती वाऱ्यासारखी शहरात पसरताच उपजिल्हा रुग्णालय येथे नागरिकांनी गर्दी केली.

पुजारी मंडळाचे अध्यक्ष विपीन शिंदे यांच्या वतीने अपघातग्रस्त व्यक्तींच्या नातलगांसाठी राहण्याची आणि जेवणाची सोय पुजारी मंडळाच्या भक्त निवासमध्ये करण्यात आली.

यावेळी उपजिल्हा रुग्णालयात अपघात ग्रस्तांच्या मदतीसाठी माजी नगराध्यक्ष सचिन रोचकरी, रुग्ण कल्याण समितीचे सदस्य आनंद कंदले, प्रक्षाळ मंडळाचे अध्यक्ष विशाल रोचकरी, भाजपचे प्रदेश कार्यकारणी सदस्य गुलचंद व्यवहारे, राम चोपदार, राहुल भोसले, अर्जुन साळुंके, यांच्यासह शेकडो नागरिक या अपघात ग्रस्तांच्या मदतीसाठी धावून आले.

## स्त्रीरोग तज्ञ संघटनेची जिल्हा कार्यकारीणी जाहीर

**तभा वृत्तसेवा**

**धाराशिव, दि.२९ जानेवारी -**

जिल्हा स्त्रीरोग तज्ञ संघटनेच्या (फॉग्सी) अध्यक्षपदी येथील डॉ. आदिनाथ राजगुरु, उपाध्यक्षपदी डॉ. वर्षा कस्तुरकर, सचिवपदी डॉ. सुशिलकुमार सरडे तर कोषाध्यक्षपदी डॉ. अश्विनी बलवंडे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.



राष्ट्रीय स्त्रीरोग संघटना (फॉग्सी) चे माजी अध्यक्ष डॉ. पी. के. शहा यांच्या उपस्थितीत धाराशिव येथे या संघटनेचा पदग्रहण समारंभ नुकताच पार पडला. यावेळी संघटनेचे मावळते अध्यक्ष डॉ. ललिता स्वामी, मावळत्या सचिव डॉ. परवीन पठ्ठा यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी डॉ. पी. के. शहा यांनी नुतन पदाधिकाऱ्यांचा सत्कार करुन पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. तसेच त्यांनी स्त्रीरोग तज्ञांना अद्यावत उपचार पध्दतीबाबत मार्गदर्शन केले. यावेळी संघटनेचे नुतन अध्यक्ष डॉ. राजगुरु यांनी मनोगत व्यक्त करताना संघटनेच्या माध्यमातुन स्त्रीरोग उपचार पध्दतीबाबतचे नवनवीन संशोधन व तंत्रज्ञान सीएमई व वर्कशॉपद्वारे स्त्रीरोग तज्ञांपर्यंत पोहोचविण्यासह समाजातील महिलांचे आरोग्यमान उंचावण्याच्या दृष्टीने प्रयत्न करणार असल्याचे सांगितले.

यावेळी डॉ. कार्तिक यादव, डॉ. राहुल वाघमारे, डॉ. स्मिता गवळी, डॉ. शिल्पा देशमुख, डॉ. शिल्पा हंबीरे, डॉ. रेखा टिके, डॉ. वैशाली डंबळ, डॉ. सफ ुदा शेख, डॉ. शैलजा मिटकरी आदी स्त्रीरोग तज्ञ उपस्थित होते.

## पोलीस ठाण्यात भाविकांच्या गाड्यांवर दंडात्मक कारवाईसाठी दिरंगाई

**तभा वृत्तसेवा**

**तुळजापूर, दि.२९ जानेवारी -**

**मनाई आदेश असताना भाविकांच्या गाड्या मंदिर परिसरात जातातच कशा?**

भवानी रोडवरील गेटवरून स्थानिक रहिवाशी आणि व्यापाऱ्यांच्या गाड्या व्यतिरिक्त कुठल्याही गाड्या मंदिर परिसरात सोडण्यास जिल्हाधिकारी यांच्या आदेशाने मनाई असताना भाविकांच्या गाड्या गेटमधून मंदिर परिसरात जातात गेटवर असणारे सिक्युरिटी गार्ड भाविकांच्या गाड्या अडवत नाहीत. गेटवरच गाड्या अडवल्यास भाविकांना होणारा मनस्ताप टाळता येऊ शकतो.

तुळजाभवानी मंदिर परिसरातील नो झोन पार्किंग मधील टू व्हीलर गाड्या मंदिर संस्थानचे सुरक्षा गार्ड उचलून पोलीस स्टेशनम ध्ये घेऊन जातात पण तेथे टू व्हीलर गाड्यावर दंडात्मक कारवाई करण्यासाठी कर्मचाऱ्यांची तासन तास वाट पहात लांबून लांबून आलेले भाविक त्यांच्यासोबत लहान मुले महिला भाविक पोलीस ठाण्याच्या आवारात बसून असतात. पोलीस प्रशासनाच्या निष्काळजी कारभारामुळे विनाकारण दंड देण्यास तयार असणाऱ्या भाविकांना त्यांच्या परिवारासह तासंतास पोलीस स्टेशनमध्ये विनाकारण बसून राहावे लागते.

तुळजाभवानी मंदिर परिसरातील नो झोन पार्किंग मधील गाड्या दि.२९ जानेवारी रोजी दुपारी साधारण दोन अडीचच्या दरम्यान उचलून पोलीस स्टेशनमध्ये नेहण्यात आल्या. त्यानंतर भाविक त्यांच्या गाड्या शोधत पोलीस स्टेशनमध्ये गेले असता तेथे कारवाई करणारे पोलीस कर्मचारी उपलब्ध नव्हते. त्यामुळे भाविकांना चार साडे चार पर्यंत म्हणजे दोन अडीच तास पोलीस स्टेशनमध्ये विनाकारण पोलीस कर्मचाऱ्याची वाट पाहत बसावे लागले.

पोलीस स्टेशनमध्ये थांबलेल्या भाविकांमध्ये लहान मुले महिला देखील होत्या तर धाराशिव सोलापूर फलटण मुरुड अशा गावावरून देवी दर्शनासाठी आलेल्या भाविकांना पोलीस स्टेशनने त्यांच्या उचलून आणलेल्या गाड्यांवर लवकर कारवाई केली नसल्याने वापस त्यांच्या गावाकडे जाण्यासाठी रात्र होत होती.

सोलापूर येथील भाविक रवींद्र बिजरगे, धाराशिव येथील दांपत्य भाविक संतोष साळुंखे आणि अनुराधा साळुंखे, फलटण येथील हनुमंत सोलंकर तसेच मुरूम येथील बापू यादव यांनी दैनिक तरुण भारतशी बोलताना सांगितले की, मंदिर संस्थेचे कर्मचारी गेटमधून गाडीखाली घेऊन जाऊ देतात आणि नंतर मंदिर परिसरात गाड्या लावल्या तर त्या उचलतात. म्हणजे गाड्या खाली सोडायच्या आणि नंतर गाड्यावर दंडात्मक कारवाई करायची विनाकारण भाविकांना मंदिर आणि पोलीस प्रशासन जाणीवपूर्वक त्रास देत आहेत.

भवानी रोडवरील गेटवरच भाविकांच्या गाड्या अडवल्यास भाविकांना मानसिक त्रास होणार नाही याची मंदिर प्रशासनाने तसेच पोलीस प्रशासनाने काळजी घ्यावी.

## क्रीडासंस्कृती रुजविण्याच्या उद्देशाने खेलो इंडिया स्पर्धेचे आयोजन

**मॅट कुस्ती आखाड्याचे आ. पाटील यांच्या हस्ते भूमिपूजन...**

**तभा वृत्तसेवा**

**तुळजापूर, दि.२९ जानेवारी -**

देशात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातील सरकार सत्तेत आल्यापासून खेळांना अधिक प्रोत्साहन मिळत आहे. शालेय विद्यार्थ्यांमध्ये खेळाची आवड आणि क्रीडासंस्कृती रुजविण्याच्या उद्देशाने 'खेलो इंडिया' सारखी स्पर्धा आयोजन करण्यात येत असल्याचे मत आमदार राणाजगजीतसिंह पाटील यांनी व्यक्त केले.



तुळजापूर तालुक्यातील आरळी बुद्रुक येथील शिवछत्रपती क्रीडा संकुल येथे मॅट कुस्ती आखाड्याचे भूमिपूजन आमदार राणाजगजीतसिंह पाटील यांच्याहस्ते करण्यात आले. आरळी बुद्रुक येथे पस्तीस लाख रुपयांचा साठ बाय शंभर फ ूट आकाराचा सुसज्ज मॅट कुस्ती आखाडा हॉल उभारला जाईल यासाठी आपण प्रयत्न करणार असल्याचे प्रतिपादन आमदार पाटील यांनी व्यक्त केले. आपल्या भागातून दर्जेदार खेळाडू घडावेत यासाठी संजय रमेश पारवे यांनी आपली स्वतः ची साडे सहा एकर जमीन दिल्याबद्दल आमदार राणाजगजीतसिंह पाटील यांनी कौतुक करून आभार मानले.

याप्रसंगी भाजपाचे नितीन काळे, राजसिंहराजे निंबाळकर, उप महाराष्ट्र केसरी मारुती वडार, महाराष्ट्र चॅम्पियन अजित भोसले, स्वराज पक्ष जिल्हाध्यक्ष महेश गवळी, दयानंद वाकुडे, संतोष बोबडे, विजय शिंगाडे, आनंद कंदले, शाहूराज मगर, अरविंद घोडके, प्रतीक रोचकरी, चित्तरंजन सरडे, प्रतापसिंह सरडे, माजी सरपंच गोविंद पारवे, सुनील पारवे यांची प्रमुख उपस्थिती होती.

## जिल्ह्यात सोयाबीन खरेदीसाठी मुदतवाढ द्या : खा. राजेनिंबाळकर

**तभा वृत्तसेवा**

**धाराशिव, दि.२९ जानेवारी -**

खरीप हंगाम २०२४ मध्ये जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी ४,२५,०४७ हेक्टर क्षेत्रावर सोयाबीनची लागवड केली होती. यंदाच्या हंगामात १,७०८ किलो प्रति हेक्टर उत्पादन मिळून एकूण ७२,५९८ मेट्रिक टन सोयाबीन उत्पादन झाले आहे. शासनाने जिल्ह्यासाठी १४,४१,९८८ क्विंटल सोयाबीन खरेदीचा लक्षांक दिला होता.



सोयाबीन खरेदीचा वेग मंद असुन सध्या जिल्ह्यात केवळ २,३०,५४२ क्विंटल सोयाबीन खरेदी करण्यात आले असून, अजूनही १२,११,४४६ क्विंटल सोयाबीन खरेदी बाकी आहे. आतापर्यंत ३५,४०३ शेतकऱ्यांनी हमीभावासाठी नोंदणी केली आहे, मात्र केवळ ८,८३७ शेतकऱ्यांकडीलच सोयाबीन खरेदी झाली आहे. अजूनही २६,५६६ शेतकऱ्यांचे सोयाबीन विक्रीसाठी प्रलंबित आहे.

शेतकऱ्यांकडून मुदतवाढीची उर्वरित सोयाबीन खरेदीसाठी मुदतवाढ देण्यात यावी, अशी मागणी पत्राद्वारे खा. ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांनी व्यवस्थापकीय संचालक, राज्य सहकारी पणन महासंघ मर्यादित, मुंबई. यांच्याकडे केली आहे.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा विटंबनेचा निषेध

**तभा वृत्तसेवा**

**नळदुर्ग, दि.२९ जानेवारी -**

पंजाब राज्यातील अमृतसर येथील मुख्य चौकात असलेल्या महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याची एका जातीवादी माथेफिरूने विटंबना केली असुन या निंदनीय घटनेचा नळदुर्ग येथे रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) च्या वतीने तीव्र जाहीर निषेध करण्यात आला असुन आरोपी मातेफिरूवर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी करण्यात करण्यात आली आहे.

या संदर्भात रिपाई (आठवले) नळदुर्ग शहर शाखेच्या वतीने व भारतीय दलित पँथरच्या वतीने नळदुर्ग पोलीस ठाण्याचे पोलीस निरिक्षक गजेंद्र सरोदे यांना निवेदन देण्यात आहे.

निवेदनावर रिपाईंचे एस.के. गायकवाड, अरुण लोखंडे, मारुती खारवे, शामकांत नागीले, कैलास गवळी गुरुजी, देवानंद बनसोडे, सुरेश लोंढे, आरविंद लोखंडे, उम ेश गायकवाड, आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## फटाका कारखान्यात भीषण स्फोट : आठ जण जखमी



**तभा वृत्तसेवा**

**तेरखेडा, दि.२९ जानेवारी -**

तेरखेडा येथील एका फटाका कारखान्यात सोमवारी दुपारी भीषण स्फोट झाला. या दुर्घटनेत आठ जण गंभीर जखमी झाले असून, त्यांना तातडीने रुग्णालयात हलविण्यात आले आहे. अद्याप स्फोटाचे नेमके कारण स्पष्ट झालेले नाही, मात्र प्राथमिक अंदाजानुसार कारखान्यातील असुरक्षित उत्पादन प्रक्रियेमुळे हा स्फोट झाला असल्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.

स्फोट इतका जोरदार होता की, त्याचा आवाज दूरपर्यंत ऐकू गेला. परिसरात एकच गोंधळ उडाला, आणि नागरिकांमध्ये घबराट पसरली. कारखान्याजवळील काही घरांच्या काचा फुटल्या, तसेच परिसरात धुराचे लोट पसरले होते. स्थानिकांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत जखमींना बाहेर काढण्यास मदत केली.

फटाका उत्पादनासाठी आवश्यक परवाने घेणाऱ्या कारखान्यांची संख्या मर्यादित असली, तरी प्रत्यक्षात उत्पादन मोठ्या प्रमाणावर सुरू असल्याचे उघड झाले आहे. तेरखेडा परिसरात अनेक कारखाने कार्यरत असून, सुरक्षा नियमांकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. काही कारखान्यांकडे परवाने असले तरी ठरवून दिलेल्या निकषांचे पालन होत नाही. यामुळे अशा दुर्घटनांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी कठोर कारवाईची मागणी होत आहे.

स्फोटाची माहिती मिळताच पोलीस आणि अग्निशमन दलाने घटनास्थळी धाव घेत मदतकार्य सुरू केले. जखमींना उपचारासाठी तातडीने जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले असून, त्यातील काही जणांची प्रकृती गंभीर आहे. स्थानिक प्रशासनाने घटनेच्या चौकशीचे आदेश दिले आहेत. गेल्या काही वर्षांत या भागात फटाका कारखान्यांमध्ये अनेक अपघात झाले असून, यात अनेकांना प्राण गमवावे लागले आहेत.

तरीही सुरक्षेच्या उपाययोजनांकडे दुर्लक्ष होत असल्याने असे अपघात वारंवार घडत असल्याची टीका होत आहे. स्फोट इतका भीषण होता की पत्र्यांचे तुकडे शेकडो फूट दूर जाऊन पडले.

यावरूनच या कारखान्यात किती मोठ्या प्रमाणावर धोकादायक साहित्य साठवले जात होते, हे स्पष्ट होते. सध्या जखमींवर उपचार सुरू असून, त्यांची प्रकृती स्थिर असल्याचे डॉक्टरांनी सांगितले. पुढील तपास सुरू आहे.

**नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण...**

या घटनेनंतर तेरखेडा व परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. या भागात अनेक फटाका कारखाने आहेत, पण सुरक्षा व्यवस्थेकडे दुर्लक्ष केले जाते. प्रशासनाने लक्ष घालून कठोर पावले उचलली पाहिजेत, अशी प्रतिक्रिया एका स्थानिक रहिवाशाने दिली.

**यंत्रणेला हादरवणारी घटना...**

हे फक्त एक अपघात नसून एका निष्काळजीतेची मोठी किंमत आहे. प्रशासनाने याचा कठोर पाठपुरावा करावा, दोषींवर कारवाई करावी आणि भविष्यकाळात अशा घटना होऊ नयेत म्हणून नियमित तपासणी व नियमन यंत्रणा सक्षम करावी. अन्यथा, असले स्फोट आणि निष्पाप लोकांचा बळी देणाऱ्या दुर्घटना चालूच राहतील.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# बचत गटांच्या वस्तू मॉल व सुपर मार्केटमध्ये

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. २९ जानेवारी**

नांदेड जिल्ह्यात ग्रामीण महिलांच्या बचत गटांनी उत्पादित केलेल्या वस्तूंना स्थिर बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करनवाल व जिल्हा अभियान संचालक डॉ. संजय तुबाकले यांच्या संकल्पनेतून नांदेड येथे विशेष विक्री प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रदर्शनाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून, स्थानिक व्यापारी, दुकानदार, मॉल व सुपर मार्केट, यांच्याकडूनही सकारात्मक प्रतिसाद मिळाल्याने जिल्ह्यातील ६ तालुक्यांमध्ये बचत गटांच्या वस्तूंना विक्रीची संधी मिळाली आहे.

देगलूर तालुक्यातील लक्ष्मी बचत गटाचे मसाले मुंबईतील न्यू बॉम्बे एक्स्पोर्ट आणि विकास राजदूत हॉटेल यांच्यासोबत विक्री करार झाला आहे. भोकर येथील वासवी सुपर मार्केटमध्ये मीराबाई बचत गटाच्या आवळा कॅन्डी, लोणचे आणि मुरंबा यांची विक्री सुरू झाली आहे. नायगाव येथील महालक्ष्मी गटाच्या घोंगडीला नांदेडच्या किसान मॉलमध्ये विशेष प्राधान्य देण्यात आले आहे. हिमायतनगरमधील पळशीकर सुपर शॉपमध्ये फातिमाबी गटाच्या भेसळमुक्त डाळी आणि अर्धापूर येथील संत सावता गटाची हळद बळीराजा शेतकरी उत्पादक कंपनीमार्फत विक्रीसाठी उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्यामुळे स्थानिक ग्राहकांना दर्जेदार आणि शुद्ध उत्पादनांची खरेदी करता येत आहे.

महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी प्रधानमंत्री लखपती दीदी कार्यक्रमाला जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर प्रोत्साहन मिळत असून, ग्रामीण महिलांसाठी शाश्वत उपजीविकेचे मार्ग खुले होत आहेत. ग्रामीण भागातील महिलांच्या उद्योजकतेला मिळणारे हे प्रोत्साहन ही यशस्वी परिवर्तनाची नांदी आहे, असे मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करनवाल यांनी म्हटले आहे. जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमध्ये बचत गटांच्या वस्तू विक्रीसाठी पुढील प्रयत्न सुरु असल्याचेही त्यांनी सांगितले.

# जि.प.विष्णुपूरी शाळेचा पालकमंत्र्यांच्या हस्ते सन्मान

**तभा वृत्तसेवा**
**नवीन नांदेड,दि. २९ जानेवारी**

मुख्यमंत्री 'माझी शाळा सुंदर शाळा' अभियानांतर्गत टप्पा क्रमांक दोनमध्ये लातूर विभागातून प्रथम क्रमांक प्राप्त केलेल्या जिल्हा परिषद हायस्कूल, विष्णुपूरी, ता.नांदेड येथील शाळेचा नांदेड जिल्ह्याचे पालकमंत्री अतुल सावे यांच्या हस्ते दिनांक २६ जानेवारी रोजी नांदेड येथे सन्मान करण्यात आला.

प्रजासत्ताक दिनानिमित्त नांदेड जिल्ह्याचे पालकमंत्री अतुल सावे दिनांक २६ जानेवारी २०२५रोजी नांदेड येथे मुख्य ध्वजारोहण पोलीस कवायत मैदान येथे करण्यात आला.त्यानंर मुख्यमंत्री 'माझी शाळा सुंदर शाळा' अभियानांतर्गत टप्पा क्रमांक दोनमध्ये लातूर विभागातून प्रथम क्रमांक प्राप्त केलेल्या जिल्हा परिषद हायस्कूल, विष्णुपूरी या शाळेची प्रशंशा करत पालकमंत्री ना.अतुल सावे यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. हा सन्मान विष्णुपूरीच्या प्रथम नागरिक




महिला सरपंच श्रीमती संध्या विलास हंबर्डे देशमुख, उपसरपंच अर्चना विश्वनाथ हंबर्डे, माजी जि.प.सदस्य तथा शालेय व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष साहेबराव हंबर्डे, बाबुराव हंबर्डे,मुख्याध्यापिका उज्वला जाधव, विद्यार्थीप्रिय शिक्षक आनंद वळगे यांनी स्विकारला. यावेळी राज्याचे माजी मुख्यमंत्री तथा राज्यसभा खासदार अशोक चव्हाण, खासदार अजित गोपछडे आणि मिनल करनवाल, मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.नांदेड यांची उपस्थिती लाभली होती. पालकमंत्री अतुल सावे यांनी शाळेचे कार्य पाहून शाळेस शुभेच्छा दिल्या. शाळेचे परिसरातील सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

# चिकन, अंडी खाणे शंभर टक्के सुरक्षित

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. २९ जानेवारी**



बर्डफ्लू आजारासंदर्भात नागरिकांनी कोणत्याही अफवांना बळी पडू नये. उकळलेली अंडी व शिजवलेले चिकन खाणे मानवी आरोग्यास पूर्णपणे सुरक्षित आहे. जिल्ह्यामध्ये बर्ड फ्लूची लागण झालेली नाही. त्यामुळे यासंदर्भात समाज माध्यमांवर फिरणारे संदेश व काही माध्यमातून आलेल्या चुकीच्या बातम्यांना बळी पडू नका. चिकन, अंडी खाणे शंभर टक्के सुरक्षित असल्याचा खुलासा पशुसंवर्धन विभागाने केला आहे.

यासंदर्भात आज एक चित्रफित पशुसंवर्धन विभागाचे जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त डॉ. राजकुमार पडिले यांनी जारी केली आहे. पशुसंवर्धन विभागामार्फत या आजारा संदर्भात अतिशय काटेकोरपणे लक्ष ठेवण्यात येत असून आवश्यक उपाययोजना करण्यात येत आहेत. नागरिकांनी अफवांना बळी पडू नये, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

नांदेड जिल्ह्यातील लोहा तालुक्यातील केवळ किवळा या एका गावामध्ये काही पक्षांमध्ये बर्डफ्लू सदृश्य लक्षणे आढळून आली आहेत. या ठिकाणी तातडीने आवश्यक प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यात आल्या आहेत. मात्र जिल्ह्यात अन्यत्र कुठेही बर्डफ्लूची लागण नाही, असा खुलासा जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त डॉ. राजकुमार पडिले यांनी केला आहे. किवळा या गावी साधारणता २० तारखेच्या आसपास एका पशुपालकाच्या कुक्कुट पक्षांमध्ये मृत पक्षी आढळून आल्याने त्याचे नमुने राज्य व राष्ट्रीयस्तरीय प्रयोग शाळेत निदानासाठी पाठविले होते. या प्रयोगशाळेतील बर्डफ्लूसाठीचे नमुने पॉझिटिव्ह दिसून आल्यानंतर या गावामधील १ किमी परिघाच्या क्षेत्रातील सर्व कुक्कुट पक्षी शास्त्रोक्त पद्धतीने नष्ट केले आहेत. त्यामध्ये साधारणपणे ३८२ मोठे पक्षी आणि ७४ छोटे पक्षी असे एकूण ४५६ पक्षी नष्ट केले आहेत. त्याची शास्त्रोक्त पद्धतीने विल्हेवाट लावली आहे.

त्याचबरोबर संसर्ग झालेल्या १ किमी क्षेत्राबाहेरील बाधित क्षेत्राच्या १० किमी अंतरापर्यत आपण सर्तकता क्षेत्र घोषित केले आहे.

## संक्षिप्त वृत्त



### कै.गोविंदराव पाटील विद्यालयात प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा

**माहूर**-माहूर तालुक्यातील वझरा (शे.फ.) येथील कै. गोविंदराव पाटील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी विद्यालयाचे मुख्याध्यापक एस.एस.फड यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.ध्वजारोहणानंतर संविधानाच्या प्रास्ताविकेचे वाचन करण्यात आले.त्यानंतर संस्थेचे सचिव बालाजी पांडागळे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रमुख पाहुण्यांच्या उपस्थितीतीत शाळेतील विद्यार्थ्यांच्या कवायती, शालेय क्रीडा स्पर्धा, बक्षीस वितरण कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी गावाचे सरपंच दीपक केंद्रे, उपसरपंच पुष्पा रनमले, ग्रा. पं. सदस्य अंकुश बहिरमकर, संतोष केंद्रे, आरोग्य सेवक ऐकाळे, आरोग्य सेविका जगदाळे सय्यद इसा विठ्ठल शेंडे, प्रभू चोले, शिवसांब मुंडे आदींची प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती होती. यावेळी विद्यालयाचे विद्यार्थी नगमा सय्यद, श्रद्धा फड, रविना राठोड, समीक्षा जगदाळे, माधवी ठाकरे, आदीनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक एस. आर. नागरगोजे यानी तर आभार पी. एम.मुनेश्वर यांनी मानले. यावेळी शिक्षक साईनाथ नागरगोजे, एस. बी. गळेगावे, एस. एन. पाटील, सुनील फड, एस. जी.पांडागळे,एस. एस. वाघमारे, आर. एम. भिसे, जी. एम.श्रीरामे, एस. बी. जमदाडे, एच एस. राघू, जी. पी. कपाळे, डी. एस. तेलंगे एस. पी. जमदाडे यांचेसह शाळेचे कर्मचारी,गांवकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### विठ्ठल चिगळे यांना उत्कृष्ट कर्मचारी पुरस्कार

**आदमपूर**-बिलोली तालुक्यातील ग्राम आदमपूर येथील लेखाधिकारी विठ्ठल हणमंतराव चिगळे,पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,जि. प.नांदेड यांना मुख्य कार्यकारी अधिकारी मा.मीनल करणवाल व उपमुख्य कार्यकारी अधिकारी मा.नारायण मिसाळ यांच्या शुभहस्ते उत्कृष्ट कर्मचारी पुरस्काराने रविवार दि.२६ जानेवारी रोजी ७६ व्या भारतीय प्रजासत्ताक दिनानिमित्त सन्मानित करण्यात आले. जि.प.नांदेड कार्यालयाच्या वतीने दरवर्षी उत्कृष्ट कर्मचारी पुरस्कार सोहळा घेण्यात येतो.जि.प.नांदेड पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग अंतर्गत जल जीवन मिशन योजने सबंधी जिल्हाभरातील तालुक्यांना योग्य मार्गदर्शन करीत कर्मचारी चिगळे यांनी ही कार्यपद्धती तळागाळात यशस्वीपणे राबविली आहे.



**नांदेड-स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठातून एम.ए. अर्थशास्त्र या विषयात प्रथम क्रमांक (सुर्णपदक)पटकवल्या बद्दल पालकमंत्री अतुल सावे यांच्या हस्ते पवन हिरालाल चौधरी (मंडले) यांचा डॉ. शंकराव चव्हाण मेमोरियल येथे पारितोषिक देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी खासदार अशोक चव्हाण, खासदार अजित गोपछडे, यशवंत कॉलेजचे सचिव डी. पी. सावंत, आमदार श्रीजया चव्हाण, भाजपचे नेते संजय कौडगे, महानगराध्यक्ष अमर राजूरकर, प्रवीण साले, चैतन्य बापू देशमुख, भाजपचे तुळजारम यादव आदी उपस्थित होते.**

# साहित्यिकांनी समाजाला योग्य दिशा दाखवावी : खा. अशोक चव्हाण

**तभा वृत्तसेवा**
**मुदखेड,दि. २९ जानेवारी**

आदर्श विचारधारा समाजात रुजवण्यासाठी योग्य दिशा साहित्यिकांनी दाखवावी चुकीच्या गोष्टी पसरविण्यात लगाम लावावा. सविधान त्रिकाल सत्य असून ते कुणीही बदलू शकत नाही असे उद्गार माजी मुख्यमंत्री तथा राज्यसभा खासदार अशोक चव्हाण यांनी काढले.

मुदखेड नगरीत प्रज्ञा दर्शन शिक्षण संस्था, सप्तरंगी साहित्य मंडळ महाराष्ट्र राज्य यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २७ जानेवारी रोजी चौथ्या जनसंवाद ग्रामीण साहित्य संमेलनाचे रणछोड मंगल कार्यालयात आयोजन करण्यात आले होते. संमेलनाची सुरुवात महापुरुषांच्या प्रतिमेच्या पूजनाने खासदार अशोक चव्हाण यांच्या



हस्ते करण्यात आली . सुप्रसिद्ध साहित्यिक प्रा. डॉ. जगदीश कदम अध्यक्षस्थानी होते. स्वागताध्यक्ष प्रवीण गायकवाड, उपविभागीय अधिकारी प्रवीण मेंगशेट्टे, तहसीलदार आनंद देऊळगावकर, मुख्य कार्यकारी अधिकारी शैलेश फडसे, निमंत्रक प्रल्हाद हिंगोले, पोलीस निरिक्षक वसंत सप्रे, विस्तार अधिकारी सुरेश पाटील, गोविंदराव शिंदे नागेलेकर, दिलीप सुपे, सटवाजी माचनवाड, कवी बी.जी. कळसे, प्रकाशक निर्मल कुमार सूर्यवंशी, सप्तरंगी साहित्य मंडळाचे संस्थापक अध्यक्ष अनुरत्न वाघमारे, नागोराव डोंगरे यांची प्रमुख उपस्थिती होती. जनसंवाद २०२५ मातोश्री भागाबाई डोंगरे पुरस्काराचे यावेळी वितरण करण्यात आले. यावर्षीचा पुरस्कार साहित्यिक रुचिरा बेटकर यांना प्रदान करण्यात आला. विशेषांक व पुस्तकाचे यावेळी विमोचन करण्यात आले. अध्यक्ष समारोप प्रसंगी बोलताना साहित्यिक डॉ. जगदीश कदम म्हणाले की मोबाईलच्या वाढत्या वापरामुळे दुरावा वाढत असून संवाद तुटत चालला आहे. संवाद राहिलाच नाही तर माणूस जिवंत राहू शकणार नसून माणुसकीचा प्रवाह आटून जाण्यास वेळ लागणार नाही. समाजाच्या बोथट संवेदना ताज्या करणे साहित्याचे काम आहे. जनसंवाद साहित्य संमेलन पूर्वीपासूनच या भावना जोपासत आहे. प्रास्ताविक पांडुरंग कोकुलवार यांनी केले. सूत्रसंचालन कैलास धोतराज तर आभार प्रज्ञाधर ढवळे यांनी मानले.

# एका फोनवर अंध विद्यार्थ्यांना मिळाली खुशी



**तभा वृत्तसेवा**
**देगलूर,दि. २९ जानेवारी**

देगलूर तालुक्यात सामाजिक कार्यात नेहमीच अग्रेसर असलेल्या खुशी सेवाभावी संस्थेच्या वतीने देगलूर शहरातील अंध विद्यालयातील विद्यार्थ्यांना गणवेश वाटप करून एक प्रेरणादायी उपक्रम राबवण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना विद्यालयाचे मुख्याध्यापक मारुती शिंदे म्हणाले, फक्त एका फोन वर बबलू टेकाळे यांनी विद्यार्थ्यांना आवश्यक तेवढे गणवेश उपलब्ध करून दिल्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो. त्याचबरोबर आमच्या शाळेतील विद्यार्थ्यांच्या उज्वल भविष्यासाठी संगणक उपलब्ध करून देण्याची विनंतीही मी त्यांना केली आहे. यामुळे येत्या काही वर्षांत विद्यार्थ्यांचे भविष्य घडवण्यासाठी मोठी मदत होईल. यावेळी बबलू टेकाळे यांनी लवकरच संगणक उपलब्ध करून देण्याचे आश्वासन दिले. दरम्यान कार्यक्रमात खुशी सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष एकनाथ शेषराव टेकाळे (बबलू) यांनी आपल्या भाषणात सांगितले की, खुशी सेवाभावी संस्था समाजातील गरजूंसाठी नेहमीच काम करत आली आहे. आज अंध विद्यार्थ्यांना गणवेश देताना आम्हाला आनंद होत आहे. यापुढेही सामाजिक उपक्रम अविरतपणे राबवले जातील. यावेळी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष एकनाथ शेषराव टेकाळे, गजानन टेकाळे , संगम बैलके, गंगाधर उल्लेवार, बाबुराव मीनकीकर, उमेश भांगे, संभाजी कोमावार, संजय गवलवाड, साहेबराव पेंडाळे, नागनाथ कुद्रे, शेख असलम, मिलिंद वाघमारे, धनाजी देशमुख, तोहीद काजी, दीपक तलवारे, रियाज अत्तार आदी उपस्थित होते. यावेळी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राजुरकर आंबुलगेकर यांनी केले, तर आभार प्रदर्शन एम. बी. गायकवाड यांनी मानले. कार्यक्रमादरम्यान उपस्थित सर्वांनी संस्थेच्या या उपक्रमाचे मनःपूर्वक कौतुक केले.

# ग्रामसेवक संघटनेची कार्यकारीणी जाहीर

**तभा वृत्तसेवा**
**नायगांव,दि. २९ जानेवारी**

तालुक्यातील ग्रामसेवक संघटनेच्या नायगांव तालुका अध्यक्षपदी तुकाराम रातोळीकर, सचिव पदी सुर्यकांत बोंडले यांची सर्वानुमते बिनविरोध निवड करण्यात आली.

ग्रामविकास अधिकारी या संघटनेची दि. २४ जानेवारी रोजी जिल्हाध्यक्ष धनंजय वडजे, जिल्हा सचिव हाणमंत वाडेकर, श्रीनिवास मुगांवे, बिलोलीचे तालुकाध्यक्ष धम्मा धोत्रे, बिडवे यांच्या उपस्थितीत पंचायत समिती नायगांव येथे नुकतीच तालुका कार्यकारिणीची बैठक आयोजित करण्यात आली. या बैठकीत नायगांव तालुक्यातील ग्रामसेवक संघटनेच्या तालुकाध्यक्ष पदी तुकाराम गोविंदराव पाटील रातोळीकर, तर सचिवपदी सूर्यकांत बोंडले यांची सर्वानुमते बिनविरोध निवड करण्यात आली. तद्नंतर कार्याध्यक्ष राजू मदेवाड, मानदअध्यक्ष साईनाथ चव्हाण, उपाध्यक्ष संदीप मोरे, मिलिंद जोंधले, प्रल्हाद गोरे, अशोक कदम, विश्वांभर यरपलवाड, संघटक - सदाशिव आगलावे, कानगुले, मोहन आडकीने, नामदेव माने, सल्लागार - डी. एल. वाघमारे, निलेश कुलकर्णी, कोंडावर, महिला उपाध्यक्ष शारदा भांजे, महिला संघटक अलका मुगटकर, प्रसिद्दीप्रमुख - गजानन इबिते, सदस्य - श्रीनिवास संगेवार, प्रकाश वाघमारे. कैलास बोधले आदींची निवड करण्यात आली. या प्रसगी जिल्हा संघटनेचे पदाधिकारी एम. एम. शेख, विद्या मोरे, धनराज केते आदिची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# कार्यकत्यांचे प्रेम हीच माझी खरी ताकद - माजी आ. जवळगावकर

**तभा वृत्तसेवा**
**हदगाव,दि. २९ जानेवारी**

हदगाव - हिमायतनगर चे माजी आ. माधवराव पाटील जवळगावकर यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधत सुमन मंगल कार्यालय येथे भव्य कीर्तनाचे व क्रिकेटचे खुले सामन्यांचे आयोजन करण्यात आले होते. वाढदिवस अभिष्टचिंतन सोहळ्यास दोन्ही तालुक्यातील अलोट गर्दी उसळल्याने माजी आ. जवळगावकर यांच्यावर जनतेचे प्रेम अद्यापही कायम असल्याचे चित्र पहावयास मिळाले असून कार्यकर्त्यांचे प्रेम पाहून हेच माझी खरी ताकद असल्याचे प्रतिपादन आमदार जवळगावकर यांनी यावेळेस केले.

माजी आ. जवळगावकर यांच्या वाढदिवसानिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.२६ जानेवारी सकाळी १० वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथे हदगाव तालुक्यातील काँग्रेसच्या वतीने त्यांचा जेसीबीच्या



साह्याने फुलाची उधळण करून मोठा हार घालून त्यांचे स्वागत केले. यावेळी त्यांचे निष्ठावंत कार्यकर्ते उपस्थित होते त्यानंतर हदगाव तालुक्यातील काँग्रेस कार्यकर्त्यांनी सुमन गार्डन मध्ये वाढदिवसा निमित्त ह भ. प कीर्तनकार पांडुरंग महाराज गिरी यांच्या कीर्तनाचा कार्यक्रम व जवळगावकर यांचा वाढदिवस अभिष्टचिंतन सोहळा आयोजित केला होता.या सोहळ्याला सकाळ पासूनच कार्यकर्त्यांच्या रांगा लागल्या होत्या. त्यांना शुभेच्छा देण्यासाठी दोन्ही तालुक्यातील जनता मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते.

माजी आ. जवळगावकर यांचा गेल्या विधानसभेचे अल्पशा मताने पराभव झाला तरी काँग्रेस कार्यकर्ते खचून न जाता फार मोठ्या जनसमुदाय या कार्यक्रमाला उपस्थित असल्यामुळे माधवराव पाटील जवळगावकर भारावून गेले या सर्व उपस्थित कार्यकर्त्यांची हदगाव तालुका काँग्रेसच्या वतीने यांनी उत्तम अशी भोजनाची व्यवस्था करून विविध सामाजिक उपक्रम राबवून त्यांनी वाढदिवस साजरा केला.

# कृषी क्षेत्रातील डिजिटल क्रांतीचे महत्त्वाचे पाऊल म्हणजे 'ग्रिस्टॅक' योजना : तहसिलदार देवणीकर

**तभा वृत्तसेवा**
**अर्धापूर,दि. २९ जानेवारी**

कृषी क्षेत्रातील डिजिटल क्रांतीचे महत्त्वाचे पाऊल म्हणजे ग्रिस्टॅक' योजना आहे. या योजनेद्वारे शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी शासकीय योजना प्रभावीपणे पोहोचवण्याचा शासनाचा प्रयत्न आहे. त्यामुळे सर्व शेतकऱ्यांनी या योजनेचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा आणि आपली नोंदणी वेळेत पूर्ण करावी असे आवाहन तहसीलदार रेणुकादास देवणीकर यांनी दाभड येथे शेतकरी ओळखपत्र वितरण कार्यक्रम प्रसंगी शेतकऱ्यांना केले. यावेळी परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

७६ व्या प्रजासत्ताक दिनी ग्रिस्टॅक योजना अंतर्गत शेतकरी ओळखपत्र वितरण विशेष मोहीम जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आली. या योजनेची सुरुवात नांदेड जिल्ह्यातील दाभड ता. अर्धापूर येथे करण्यात आली. यावेळी गंगाधरराव टेकाळे, बाबुराव टेकाळे, संजय टेकाळे, भगवानराव टेकाळे, गोविंद तिडके आदी शेतकऱ्यांना शेतकरी ओळखपत्राचे वितरण तहसीलदार रेणुकादास देवणीकर यांच्या हस्ते करण्यात आले. ग्रामपंचायत अधिकारी दामोधर गमे, आर.के.दाभडकर, संभाजीराव टेकाळे, माजी सरपंच शंकरराव टेकाळे, उपसरपंच अरविंद पांचाळ, राजेश टेकाळे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी मंडळ अधिकारी महेश वाकडे यांनी योजनेची माहिती दिली.

यावेळी शावजी पा.टेकाळे, बळीराम जाधव, दादाराव टेकाळे, श्रीराम जाधव, बाबुमीयाँ शेख, वसंतराव टेकाळे, कांतराव टेकाळे, प्रकाश सुर्यवंशी आदी शेतकरी उपस्थित होते. यासाठी मंडळ अधिकारी महेश वाकडे, तलाठी रवी पल्लेवाड, तलाठी प्रदिप उबाळे, महसूल सेवक राजेश सुर्यवंशी, विजय जैस्वाल यांनी परिश्रम घेतले.

# निवघा, शिरड परिसरात वन्य प्राण्यांचा धुमाकुळ

**तभा वृत्तसेवा**
**निवघा,दि. २९ जानेवारी**



हादगाव तालुक्यातील शिरड येथील वन्यप्राणी वानर, रानडुक्कर व रोही इत्यादींचा नागरिकांना व शेतीसाठी त्रास होत असल्यामुळे त्वरित बंदोबस्त करण्यात यावा शिरड येथील नागरिकातून मागणी होत आहे. मागील एक ते दोन वर्षा पासून वन्यप्राणी वानर रानडुक्कर व रोही इत्यादींचा वावर वास्तव आहे हे वन्यप्राणी गावात व शेतात नागरिकांना त्रास देत आहेत, तसेच महिलांना व लहान मुलांना गावात घरी या प्राण्यांचा भयंकर त्रास असून बऱ्याच महिलांना या वन्य प्राण्यांनी मारहाण करून जखमी केलेले आहे.

त्यामुळे गावात या वन्य प्राण्यांपासून महिला वर्गात व लहान मुलांत घबराट, भीती निर्माण झालेली आहे. तसेच शिरड या गावातील सर्व शेतकऱ्यांच्या शेतात वानरांची टोळी दिवसरात्र राहून शेतातील पिकांचे अतोनात नुकसान करीत आहेत, वनारांच्या दैनंदिन वास्तव्याच्या त्रासामुळे या गावातील शेतकरी भयंकर वैतागून गेले आहेत तरी मोकाट वन्यप्राणी वानर, रानडुक्कर व रोही इत्यादींचा कायमस्वरूपी त्वरित बंदोबस्त करावा जेणेकरून गावातील नागरिकांना व शेतकऱ्यांना या वन्य प्राण्यांपासून त्रास होणार नाही व भविष्यात वन्य प्राण्यांपासून महिला व लहान मुलांना धोका निर्माण होणार नाही असे निवेदन देण्यात आले यावेळी नागेश कल्याणकर, राम कल्याणकर, संजय कल्याणकर, संजय कदम, यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी नांदेड व उपविभागीय कृषी अधिकारी किनवट यांची भोकर येथे प्रक्षेत्र भेट

**तभा वृत्तसेवा**
**भोकर,दि. २९ जानेवारी**

दि.२७ जानेवारी २०२५ रोजी भोकर येथील भोसी , ताटकळवाडी बोरवाडी आमदारी वाडी व वाकद येथे उपविभागीय कृषी अधिकारी राजकुमार रणवीर तसेच मंडळ कृषी अधिकारी भोकर प्रमोद कद्रेकर यांनी महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत फळबाग लागवड तसेच प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेअंतर्गत ठिबक व तुषारची तपासणी तसेच राष्ट्रीय अन्न व पोषण अभियानांतर्गत रब्बी गहू लागवड प्रात्यक्षिक यांची पाहणी केली.

त्यासोबतच जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी भाऊसाहेब बराटे यांनी तालुका कृषी अधिकारी भोकर कार्यालयास भेट देऊन मा.मुख्यमंत्री यांच्या क्षत्रिय तसेच कार्यालयीन १०० दिवसांच्या कृती आराखड्याबाबत कार्यालयीन तसेच क्षत्रिय कर्मचाऱ्यांच्या बैठका घेऊन त्यांना सूचना दिल्या तसेच कृषी विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध प्रात्यक्षिके कृषी यांत्रिकीकरण योजना इत्यादी कामांची पाहणी केली यावेळी तालुका कृषी अधिकारी दिलीप जाधव यांनी याबाबत कृषी विभागाच्या योजना सामान्य माणसापर्यंत पोहोचविण्याचे आश्वासन दिले.

प्रक्षेत्र भेटीचे नियोजन कृषी पर्यवेक्षक सुनील सूर्यवंशी कृषी सहाय्यक अतुल कंचटवाड राम मेटकर व जयंत जाधव यांनी केले प्रक्षेत्र भेटी दरम्यान भोसी येथील अरुण कल्याणकर व विकास वाकीकर यांनी महात्मा गांधी रोजगार हमी योजनेअंतर्गत लागवड केलेल्या उती संवर्धित केळी बागेची पाहणी केली तसेच आनंद रूमनवाड बोरगाव या शेतकऱ्यांनी त्यांच्या प्रक्षेत्रावर लागवड केलेल्या महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना अंतर्गत पेरू पिकाच्या लागवडीची पाहणी केली. तसेच कृषी यांत्रिकीकरण योजनेअंतर्गत ट्रॅक्टर व पावर विडर याची तपासणी केली व सदरील अवजाराचे वेळोवेळी देखभाल व दुरुस्ती करण्यात यावे अशा सूचना दिल्या.

# पालकमंत्री अतुल सावे यांचा नांदेड दौरा

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. २९ जानेवारी**



राज्याचे इतर मागास बहुजन कल्याण, दुग्धविकास व अपारंपारिक ऊर्जा मंत्री तथा नांदेड जिल्ह्याचे पालकमंत्री अतुल सावे हे गुरूवार ३० जानेवारी २०२५ रोजी नांदेड दौऱ्यावर येत असून त्यांचा दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे राहील. गुरूवार ३० जानेवारी रोजी सकाळी ४.३० वा. छत्रपती संभाजीनगर येथून शासकीय वाहनाने नांदेडकडे प्रयाण. सकाळी ९.४५ वा. शासकीय विश्रामगृह नांदेड येथे आगमन व राखीव. सकाळी १० वा. जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड येथे जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीस उपस्थिती. दुपारी १२.३० वा. जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड येथून राजीव गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळ हैद्राबादकडे प्रयाण करतील.

CMYK

लातूर
# जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## 'लाल परी'च्या बस चालकास मारहाण; चौघांवर गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**वलांडी, दि.२९ जानेवारी -**

वलांडी ते उदगीर वाया कवठाळ ते सय्यदपूर मार्ग जाणारी महामंडळाच्या बस चालकास कट मारल्याच्या कारणावरून बसचालकास बेदम मारहाण केल्याप्रकरणी चौघांविरुद्ध २८ जानेवारी रोजी देवणी पोलीसांत गुन्हा दाखल करण्यता आला आहे.

देवणी पोलीसांच्या वतीने मिळालेली अधिक माहिती अशी की, शासकीय बस चालवत असताना आरोपीनी फिर्यादीची बस ममदापूर पाटी जवळ अडवून तू आमच्या मोटार सायकलला

कट का मारलास असे म्हणून शिवीगाळ करून लाथाबुक्यांने मारहाण करून जिवे मारण्याची धमकी देऊन शासकीय कामकाजात अडथळा निर्माण केला. बसचालक उमाकांत बाबूराव बरगाले (रा. कवठाळ) यांच्या फिर्यादीवरून माधव विठ्ठल फावडे, शाम पांडूरंग बंडगर,

रतन दशरथ फावडे, ज्ञानेश्वर ज्योतिराम फावडे (सर्व रा चवणहिप्परगा ता. देवणी) यांच्या विरोधात गुरनं २६ /२०२५ कलम १३२,१२१, (१) १२६, (२) ३५२, ३५१, (२) ३, (५) नुसार गुन्हा नोंद करण्यात आला आहे. अधिक तपास राजेश लामतूरे हे करीत आहेत.



## संक्षिप्त वृत्त...



### अविनाश धुमपले पुरस्काराने सन्मानित

**रेणापूर, दि.२९ जानेवारी -**

२६ जानेवारी प्रजासत्ताक दिनानिमित्त लातूर जिल्हा क्रीडा कार्यालय अंतर्गत क्रीडा व युवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे जिल्हा क्रीडा अधिकारी लातूर यांच्यावतीने पानगावचा सुपत्र अविनाश भागवत दुमपल्ले याला हा पुरस्कार देण्यात आला. सामाजिक क्षेत्रामध्ये कार्य करणाऱ्या व्यक्तींना व युवकांना हा पुरस्कार दिला जातो. हा पुरस्कार देताना लातूर जिल्ह्याचे पालकमंत्री छत्रपती शिवेंद्रराजे भोसले, जिल्हाधिकारी वर्षा घुगे-ठाकूर, जि.प.सिओ अनमोल सगर, पोलिस अधिक्षक सोयम मुंडे यांच्या हस्ते हा पुरस्कार देण्यात आला. हा पुरस्कार मिळाल्याबद्दल अविनाश धूमपल्ले यांचे सर्व स्तरावर कौतुक होत आहे.



### 'आबासाहेब'मध्ये प्रजासत्ताक दिन साजरा

**देवणी, दि.२९ जानेवारी -**

येथील आबासाहेब इंग्लिश स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज येथे ७६ वे स्वातंत्र्ता दिनानिमित्त ध्वजारोहण कार्यक्रम संपन्न झाला. संस्थेचे संस्था अध्यक्ष गोविंदराव भोपणीकर यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून माजी सैनिक दाऊद उंटवाले, देविदास पतंगे, मल्लेवाले रसीद, प्रताप कोयले यांच्यासह पालक उपस्थित होते. तसेच रसिका कॉलेजचे प्राचार्य डॉ.चंद्रकांत जावळे, उपप्राचार्य डॉ. शिवाजी सोनटक्के, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. यावेळी चिमुकल्या विद्यार्थ्यांनी भाषणांनी मान्यवराची लक्ष वेधून घेतले. तसेच वेगवेगळ्या खेळाचे स्पर्धा झालेली पारितोषक अध्यक्ष व मान्यवरांचे हस्ते देण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन स्वाती कोयले यांनी केले.



### प्रजासत्ताक दिनी संविधान पुस्तकांचे वाटप

**वलांडी, दि.२९ जानेवारी -**

देशाच्या ७६ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त सबंध देशात प्रजासत्ताक दिन उत्साहाने साजरा करण्यात आला. प्रजासत्ताक दिनाचे अवचित साधून रा.काँ. शरदचंद्र पवार पक्षाचे वाहतूक सेलचे जिल्हाध्यक्ष हकीम बौडीवाले यांच्या हस्ते देवणी तालुक्यातील सर्व वरिष्ठ अधिकाऱ्यांना संविधान पुस्तकाचे वाटप करण्यात आले. देवणी तहसीलचे तालुका दंडअधिकारी तथा तहसीलदार यांना संविधानाचे पुस्तक देण्यात आले. तर देवणी पोलिस ठाण्याचे सपोनि. माणिकराव ढोके, देवणी पं.स.चे ज्ञानोबा लक्ष्मणराव मुळे, ग्रामविकास अधिकारी व सरपंच यांना संविधानाच पुस्तक देऊन सत्कार करण्यात आले. यावेळेस हसन मोमीन, नरेश बिरादार, महेश कंजे, नियाज मुर्शेद, अक्रम शेख, बाबासाहेब उमाटे, अजिज सौदागर, बाळू तिपराळे, आनंद अंकुलगे, गुरुनाथ हिप्पळणारे, अहमदखा पठाण, विलास वाघमारे, अंकुश गायकवाड, कार्यकर्ते उपस्थित होते.

### प्रतीक्षा गजिले विद्यापीठात सर्वप्रथम

**वलांडी, दि.२९ जानेवारी -**

नळेगाव येथील शिवजागृती महाविद्यालयात २०२३-२४ या शैक्षणिक वर्षात बी.ए. तृतीय वर्षात शिकणारी प्रतीक्षा बळीराम गजिले ही विद्यार्थिनीं उन्हाळी २०२४ च्या विद्यापीठ परीक्षेत बी.ए. तृतीय वर्षातून मराठी विषयात नांदेड येथील स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठात सर्वप्रथम आली आहे. तिला महाविद्यालयाचे मराठी विभाग प्रमुख डॉ. लहू वाघमारे आणि डॉ. बालाजी डिगोळे यांनी मार्गदर्शन केले होते. तिच्या या यशाबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय वाघमारे, मराठी विभाग प्रमुख डॉ. लहू वाघमारे, डॉ. बालाजी डिगोळे, डॉ. ओमशिवा लिगाडे यांच्यासह महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी तिचे अभिनंदन केले आहे.





### धनेगांव ताडा येथे शालेय साहित्य वाटप

**वलांडी, दि.२९ जानेवारी -**

२६ जानेवारीच्या निमीत्ताने धनेगांव ताडा येथील जिल्हा परिषद शाळेत शालेय साहीत्य वाटप करण्यात आले. रामलिंग शेरे यांच्या माध्यमातून छोट्या विद्यार्थ्यांना आकर्षक असे परिक्षेसाठी लागणारे पॅड आणि शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले. यावेळी उपसंरपच रामलिंग शेरे, संगाप्पा चरपले, लक्ष्मण पवार, विठ्ठल बोयणे, सखाराम चव्हाण, बाळासाहेब बिरादार, किशोर बिरादार, जंयत पाटील, किशोर कारभारी, प्रणव बिरादार, शेट्टीबा पवार, शंकर आपटे, सुरेखा जाधव, जाधव, प्रिती जाधव, शालेय समिती अध्यक्ष राजकुमार जाधव, शंकर जाधव, रंगराव राठोड, रामराव जाधव आदी उपस्थित होते.

## शैक्षणिक क्षेत्रात कर्मचाऱ्यांनी झोकून काम करावे : आ. विक्रम काळे

**तभा वृत्तसेवा**
**अहमदपूर, दि.२९ जानेवारी -**

भारतीय संस्कृतीमध्ये गेल्या अनेक पिढ्यापासून समाजामध्ये शिक्षकांना अत्यंत मानसन्मान दिला जातो. त्यामुळे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी शाळेत आणि संस्थेत नाव कमावण्यासाठी स्वतःला झोकून देऊन काम करावे, असे आग्रही प्रतिपादन मराठवाडा विभागाचे शिक्षक आ. विक्रम काळे यांनी केले.

गिरजा गार्डन येथे यशवंत विद्यालयाचे मुख्य लिपिक सोमनाथ स्वामी यांच्या सेवापूर्ती गौरव सोहळ्यात मार्गदर्शनाप्रसंगी बोलत होते. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिक्षण महर्षी डी.बी. लोहारे गुरुजी, व्यासपीठावर प्रमुख अतिथी म्हणून भक्ती स्थळाचे प्रमुख परमपूज्य आचार्य गुरुराज स्वामी, मराठवाडा विभागाचे शिक्षक आमदार विक्रम काळे, माजी मंत्री बाळासाहेब जाधव, माजी मंत्री विनायकराव पाटील, संस्थेचे अध्यक्ष डॉ. अशोक सांगवीकर, पुष्पा लोहारे, प्रा. सुनिता चवळे, शिक्षण उपसंचालक डॉ. गणपतराव मोरे, सहा. शिक्षण उपसंचालक डॉ. दत्तात्रय मठपती, मा. शिक्षणाधिकारी नागेश मापारी, राष्ट्रवादीचे शिवानंद हेंगणे, काँग्रेसचे सांब महाजन, अॅड. विश्वंभरराव गुणाले, मदनराव धुमाळ, जब्बार सगरे, डॉ. महेश पडसलगे, प्रा. अंकुश नाडे, प्रा. गजानन शिंदे, सत्कारमूर्ती सोमनाथ स्वामी, विजया स्वामी यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती होती. यावेळी सेवानिवृत्तबद्दल शाळेच्या वतीने सोमनाथ स्वामी आणि विजया स्वामी यांचा शाल, श्रीफळ आणि भर आहेर देऊन शिक्षणमहर्षी डी.बी. लोहारे गुरुजी, आ. विक्रम काळे यांच्यासह मान्यवरांच्या हस्ते यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

यावेळी माझे मंत्री विनायक पाटील माजी मंत्री बाळासाहेब जाधव यांची शुभेच्छा पर आणि भक्ती स्थळाचे प्रमुख आचार्य गुरुराज स्वामी यांचे आशीर्वचन पर मार्गदर्शन झाले. शिक्षण महर्षी डी.बी. लोहारे गुरुजी यांच्या



भाषणाने समारोप करण्यात आला. सत्कारमूर्ती सोमनाथ स्वामी यांचे मनोगतपर भाषण झाले.

कार्यक्रम यशस्वीतेसाठी माधव वाघमारे, प्रा. मुजमिल सय्यद, राम तत्तापुरे, शिवाजी सूर्यवंशी, प्रा. गणेश मुस्तापुरे राजेश्वर पारशेट्टे, बालाजी सोनटक्के, माधव भोजराज यांच्यासह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

## राष्ट्रीय सेवा योजना म्हणजे माणूस आणि समाज जोडणारा पूल : अॅड. किशनराव बेंडकुळे

**तभा वृत्तसेवा**
**अहमदपूर, दि.२९ जानेवारी -**

राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास होतो त्याची माणूस म्हणून घडण होत असते. तसेच समाज आणि माणूस जोडणारा संवाद पूल म्हणून रासेयो ही एक महत्त्वाची योजना आहे, असे मत दत्तक गाव परचंडा येथे रासयो विशेष शिबिराचे समारोप कार्यक्रमाच्या अध्यक्षीय भाषणातून अॅड. किशनराव बेंडकुळे यांनी व्यक्त केले.

येथील विचार विकास मंडळ संचलित महात्मा गांधी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे विशेष निवासी शिबिरे परचंडा येथे दि.१६ ते २२ जानेवारी या दरम्यान आयोजित करण्यात आले.

शिबिराचा समारोप २२ जानेवारी रोजी झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अॅड. किशनराव बेंडकुळे हे होते.

पुढे बोलताना त्यांनी रोकडेश्वर देवस्थानामुळे पंचक्रोशीत प्रसिद्ध असलेल्या परचंडा गावाचे आणि महात्मा गांधी महाविद्यालयाचे नाते आधीपासूनच सहकार्याचे व जिव्हाळ्याचा असल्याचा उल्लेख करून महाविद्यालयाने हे गाव दत्तक घेऊन केलेल्या विविध कामामुळे त्यात अधिक दृढता निर्माण झाली असल्याचे म्हणाले. विचारपीठावर तहसीलच्या नायब तहसीलदार शुभांगी जवादे, विचार विकास सहसचिव सुरेश देशमुख, संचालक बापूसाहेब कदम, महाविद्यालयाचे कार्यालयीन अधीक्षक डी.के. गाजरे, परचंडा गावच्या सरपंच शिवनंदा हिप्परगे, उपसरपंच भागवत कदम, तंटामुक्तीचे अध्यक्ष बाळू पाटील, तुकाराम जाधव, तुकाराम रड्डेवाड, ग्रामपंचायतचे इतर सदस्य उपस्थित होते.

## दगडोजीराव फार्मसीत हॉलीबाल, टेनिस स्पधचे उद्घाटन

**तभा वृत्तसेवा**
**औसा, दि.२९ जानेवारी -**

तालुक्यातील आलमला येथील श्री विश्वेश्वर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित दगडोजीराव देशमुख डी. फार्मसी कॉलेज आणि शिवलिंगेश्वर कॉलेज ऑफ फार्मसीत अंतर पदविका अभियांत्रिकी विद्यार्थी स्पर्धा विभाग, छत्रपती संभाजीनगर अंतर्गत आयोजित टेबल टेनिस व व्हॉली बॉल स्पर्धेचे उद्घाटन औसा नागरी सहकारी पतसंस्थेचे चेअरमन अमर खानापुरे, औसा तालुक्याचे पोलिस निरीक्षक सुनिल रजतवाड, शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालय, नांदेडचे प्राध्यापक गोविंद सुडे, संस्थेचे उपाध्यक्ष प्रभाकर कापसे, सचिव बसवराज धाराशिवे, सहसचिव महादेव खिचडे यांच्या हस्ते करण्यात आले.

विश्वेश्वरय्या अभियांत्रिकी पदविका महाविद्यालयाचे प्राचार्य प्रशांत धाराशिवे, महात्मा बसवेश्वर डी. फार्मसी कॉलेजचे प्राचार्य डॉ. संतोष कोसगी, प्रशासकीय अधिकारी योगेश धाराशिवे, विश्वेश्वरय्या औद्यौगीक प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य गोपाळ दंडिमे, ब्ल्यू बर्ड इंटरनॅशनल स्कूलच्या प्राचार्या स्वाती कापसे, ब्ल्यू बर्ड ज्युनीअर सायन्स कॉलेजचे प्राचार्य योगेश माशाळकर, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. कैलास कापसे, डॉ. विश्वेश्वर धाराशिवे, विभाग प्रमुख अजित लोकरे, प्रविण साबदे, रेवण बुक्का, अंकुश बिडवे, संदेश माडे, ताज काझी, दिनेश गुजराथी, डॉ. समीर शफी, डॉ. अजय फगटे, डॉ. सुरज मालपानी, डॉ. सचिन हंगरगेकर, डॉ. मोहम्मद रईस इत्यादी मान्यवर मंचावर उपस्थित होते. नविन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शैक्षणिक अभ्यासक्रमा बरोबरच क्रिडागुणांना देखील महत्व देण्यात आले असल्याचे डॉ. कापसे यांनी सांगितले.

सदरील स्पर्धेत मराठवाड्यातील व्हॉलीबॉल स्पर्धेसाठी मराठवाड्यातील १७ संघानी तर टेबल टेनिस स्पर्धेसाठी ५ संघानी सहभाग नोंदवला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. पायल जाधव व तानाजी जाधव यांनी केले तर आभार स्पर्धेचे समन्वयक प्रा. गोपाळ माळी यांनी मानले.

## वारकरी संप्रदाय माणूस जोडण्याचे काम करतो : हभप. शामसुंदर महाराज सोन्नर



**तभा वृत्तसेवा**
**निलंगा, दि.२९ जानेवारी -**

महाराष्ट्रातील मराठा बहुजन समाजाला एकत्रित करून एका माळेत गुंफण्याचे काम मराठा सेवा संघ आणि जगद्गुरू तुकोबाराय साहित्य परिषद करत आहे. प्रत्येक माणूस जातीपातीच्या बंधनात अडकला आहे त्यातून माणसाला बाहेर काढून मानवजातीला एकत्र जोडण्याचे काम वारकरी संप्रदाय करत असल्याचे प्रतिपादन शामसुंदर महाराज यांनी केले.

निलंगा येथे मराठा सेवा संघ प्रणित जगदगुरू तुकोबाराय साहित्य परिषदेच्या वतीने आयोजित तीन दिवसीय कीर्तन महोत्सवातील पहिल्या दिवशी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पं.स.चे माजी सभापती अजित माने, उदघाटक माजी नगराध्यक्ष बाळासाहेब शिंगाडे, विशेष सत्कारमूर्ती विष्णू मोहिते, मराठा सेवा संघाचे जिल्हा सचिव एम.एम. जाधव आदी मंचावर उपस्थित होते.

पुढे बोलताना शामसुंदर महाराज म्हणाले संत तुकाराम महाराजांनी कर्मकांड नाकारले, जातीभेद नष्ट करण्यासाठी तुकाराम महाराजांनी वारकरी संप्रदायाच्या माध्यमातून आपल्या वाणीतून समाजप्रबोधन केले.

यातून आदर्श पिढी निर्माण होण्यासाठी बळ मिळाले. त्यांचाच आदर्श घेऊन सर्वसामाजाने मार्गक्रमण करावे तरच समाजाची आणि राष्ट्राची प्रगती होईल असे ते म्हणाले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक बालाजी जाधव उजेडकर, यांनी केले तर सूत्रसंचालन सतिष हानेगावे, आभार प्रताप हंगरगे यांनी मानले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डी.बी. बरमदे, विनोद सोनवणे, अजय मोरे, आनंद जाधव, प्रदीप कदम, ज्ञानेश्वर जाधव, इंजि मोहन घोरपडे, अनिल जाधव, संदीप खमीतकर, महेश जाधव, माधव गाडीवान, अंकुश धानुरे, संदीप पाटील, तुकाराम शिंदे आदींनी परिश्रम घेतले.

## शासकीय चित्रकला परीक्षेत लाल बहादुर शास्त्री विद्यालयाचे यश

**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.२९ जानेवारी -**

महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ, मुंबई आयोजित शासकीय रेखाकला एलिमेंटरी व इंटरमिजिएट ड्रॉइंग ग्रेड परीक्षा २०२४ चा निकाल लागला असून उदगीरच्या लाल बहादुर शास्त्री माध्यमिक विद्यालयातील इयत्ता सातवी ते नववी मधील १०६ विद्यार्थी एलिमेंट्री ड्रॉइंग ग्रेड परीक्षेत सहभागी झाले होते.



सदर परीक्षेच्या निकालानुसार विद्यालयाचा १०० टक्के निकाल लागला असून विद्यालयातील नितूशा गिरीश बिरादार व त्रिशा संदीप सोनटक्के या दोन विद्यार्थिनी 'ए' श्रेणी घेऊन उत्तीर्ण झालेल्या आहेत. तर बी श्रेणी घेऊन २९ विद्यार्थी उत्तीर्ण झालेले आहेत. तसेच इयत्ता आठवी ते दहावी मधील विद्यार्थी ५९ विद्यार्थी इंटरमिजिएट ड्रॉइंग ग्रेड परीक्षेत सहभागी झाले होते. या परीक्षेचा ९३ टक्के निकाल लागला असून यात चार विद्यार्थी बी श्रेणी घेऊन उत्तीर्ण झाले आहेत.

यशस्वी विद्यार्थ्यांचे शंकरराव लासुणे, मधुकरराव वट्टमवार, सतनप्पा हुरदळे, बालासाहेब केंद्रे, अरुण पत्की, कृष्णा मारावार, किरण नेमट, माधव मठवाले व सर्व शिक्षक वृंदांनी याबद्दल अभिनंदन केले.

## साहित्यिक प्राचार्य चंद्रशेखर कळसे यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा**
**जळकोट, दि.२९ जानेवारी -**

येथील महात्मा फुले शैक्षणिक संकुलातील महात्मा फुले अध्यापक विद्यालयाचे प्राचार्य चंद्रशेखर कळसे यांना त्यांनी लिहिलेल्या अंधश्रद्धा निर्मूलन आणि संत साहित्य या ग्रंथास उदगीर येथील रंगकर्मी प्रतिष्ठानच्या वतीने राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल सत्कार करण्यात आला.

उदगीर येथील रंगकर्मी साहित्य कला क्रीडा प्रतिष्ठान मागील नऊ वर्षांपासून साहित्य कला क्रीडा सामाजिक पर्यावरण आरोग्य कृषी क्षेत्रात भरीव कार्य करणाऱ्या व्यक्तीला पुरस्कार प्रदान करीत असते.

यावर्षीचा साहित्य क्षेत्राचा पुरस्कार हा जळकोट येथील प्राचार्य चंद्रशेखर कळसे आणि कणकवली येथील डॉ. सोमनाथ कदम यांना जाहीर झाला आहे. रंगकर्मी प्रतिष्ठानचा पुरस्कार



हा मानाचा आणि प्रतिष्ठेचा असून तो कळसे यांना जाहीर झाला. त्यामुळे प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून महात्मा फुले ग्रामीण विकास सेवाभावी संस्था सोनवळाच्या वतीने संस्थापक सचिव चंदन पाटील यांच्या हस्ते शाल, श्रीफळ आणि प्रोत्साहन म्हणून २१०० रू देऊन सत्कार करण्यात आला.

यावेळी मंचावर प्राचार्य चंद्रकांत बिरादार, प्राचार्य माधव वाघमारे, सोनवणे उपस्थित होते. चंद्रशेखर कळसे यांचे एकुण नऊ ग्रंथ प्रकाशित आहेत.

कार्यक्रमास प्रा. नागरगोजे, प्रा. गोताळे, प्रा. गिते, पवार एस.व्ही., नागरगोजे डी.एन., गंगोत्री एस.के., जाधव एम.जी., राठोड बी.के., रंजप्रसाद, सुरजित सिंह, तिगोटे, गुळवे विनोद, अंधारे डी.व्ही., गितांजली, चोले, आर.ए. कळसे, कुलकर्णी, आदी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

## लालबहादूर शास्त्रीचा संघ वादविवाद स्पर्धेच्या ढाल विजयाचा ठरला मानकरी

### कमला नेहरू विद्यालयाचा संघ उपविजेता...

**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.२९ जानेवारी -**

मराठवाड्यातील सुप्रसिद्ध व ऐतिहासिक स्व. लालबहादुर शास्त्री यांच्या स्मरणार्थ आयोजित केलेल्या मराठवाडास्तरीय आंतरशालेय वादविवाद स्पर्धेचे ४५ वे वर्ष आहे. एकूण ४६ संघातील ९२ स्पर्धकांनी सहभाग घेतला. दोन दिवस चालणाऱ्या स्पर्धेच्या समारोप बक्षीस वितरणांनी झाला.

सोहळ्यासाठी मंचावर अध्यक्षस्थानी भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष डॉ. सुरेंद्र आलुरकर उपस्थित होते. तर प्रमुख अतिथी खा.डॉ. शिवाजीराव काळगे, विशेष उपस्थितीत अविनाश तळणीकर, बाबुराव आडे, मधुकरराव वट्टमवार, शंकरराव



लासुणे, सतनप्पा हुरदळे, व्यंकटराव गुरमे, डॉ. प्रशांत राजुरकर, संतोष कुलकर्णी, अंजली नळगीरकर, अॅड. शिवाजी बिराजदार, मुख्याध्यापक बालासाहेब केंद्रे, अंकुश मिरगुडे, श्रीपाद सीमंतकर, अमोल निडवदे हे उपस्थित होते.

याप्रसंगी परीक्षक प्रा. दुष्यंत कटारे व अॅड. राजा कदम यांनी मनोगत मांडले. प्रमुख पाहुण्यांच्या मार्गदर्शनात खा. शिवाजीराव काळगे यांनी सुसंस्कृतपणा व गरजू विद्यार्थ्यांना विद्यादान करणे हे या वाद विवाद स्पर्धेच्या संकल्पनेतून दिसून आले, असे मत व्यक्त केले.

या मराठवाडास्तरीय आंतरशालेय वादविवाद स्पर्धेत प्रथम क्रमांकाचे बक्षीस ढाल आणि ११ हजार रुपये पारितोषिकाचे मानकरी ठरला आहे. लाल बहादूर शास्त्री विद्यालयाचा संघ तर द्वितीय क्रमांकाचे बक्षीस ८००० रुपये पारितोषकाचे मानकरी ठरले आहे अहमदपूर येथील कमला नेहरू विद्यालयाचा संघ उपविजेता ठरला आहे.

तृतीय किशन सोमानी विद्यालय लातूर, सर्व चतुर्थ संघ पीएम जिल्हा परिषद प्रशाला दैठणा (ता.जि. परभणी) सर्व पंचम संघ छत्रपती शिवाजी विद्यालय दांडेगाव (ता. कळमनुरी जि. हिंगोली) हे मानकरी ठरले आहेत.

ग्रामीण मुलीत प्रथम आरती मोकल, द्वितीय सृष्टी सूर्यवंशी, तृतीय वैष्णवी मुसळे, चौथी सुदेशना साळुंके, पाचवे बक्षीस वसुंधरा गोरे यांनी प्राप्त केले. ग्रामीण मुलात सर्वप्रथम तन्मय जैन, द्वितीय कल्याण कच्छवे, तृतीय यशराज कच्छवे चौथा ज्ञानेश्वर बिरादार, पाचवा कृष्णा सोनवणे, शहरी मुलीत प्रथम निकिता राजगुरू, द्वितीय सायली कुलकर्णी, तृतीय अक्षरा दुरूगकर, चौथी गायत्री जाधव, पाचवी संस्कृती पिसाळ, शहरी मुलात प्रथम पुष्कर जाधव, द्वितीय हर्षल चव्हाण, तृतीय शुजाओद्दीन काझी, चौथा भीमाशंकर आरदवाड, पाचवा अलोक कीर्तने हे स्पर्धक विजयी झाले आहेत.

या स्पर्धेचे सूत्रसंचालन अनिता मुळखेडे यांनी केले तर अहवाल वाचन स्पर्धा प्रमुख एकनाथ राऊत, सांघिक पद्य प्रीती शेंडे, स्वागत व परिचय अनिता येलमटे, निकाल वाचन माधव मठवाले, विजेता संघ मार्गदर्शक अंबिका पारसेवार, वैयक्तिक गीत बालाजी पडलवार, आभार आशा गौतम तर जान्हवी देशमुख यांनी मानले.

## रिपाइं (आठवले) संपर्क कार्यालयाचे उद्घाटन

**तभा वृत्तसेवा**
**जळकोट, दि.२९ जानेवारी -**

तालुक्यातील होकर्णा येथील सरपंच दामोदर भोजाजी बोडके यांची रिपाईचे जळकोट तालुकाध्यक्षपदी निवड रिपाईचे मराठवाडा सरचिटणीस देविदास कांबळे यांनी केली. त्या निमित्त रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडीया तालुकाध्यक्ष दामोदर भोजाजी बोडके यांच्या संपर्क कार्यालयाचे उद्घघाटन सोमवार दि.२७ जानेवारी रोजी जळकोट येथे संपन्न झाले.

उद्घाटक म्हणुन महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस चंद्रकांत चिकटे, रिपाई मराठवाडा सरचिटणीस देविदास कांबळे, मराठवाडा सचिव अशोक कांबळे व अध्यक्षस्थानी रिपाई तालुकाध्यक्ष दामोदर बोडके हे उपस्थित होते. यावेळी बाबासाहेब कांबळे, गोतम काळे, अंकुश ढेरे यांच्यासह आदि उपस्थित होते.

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## यशवंतराव पाटील विद्यालयात संत साखरे महाराजांना श्रद्धांजली

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२९ जानेवारी -** कै. यशवंतराव पाटील विद्यालय, हरंगुळ (बु.), ता. जि. लातूर येथे भारतीय प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

यावेळी संत साखरे महाराज यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. या प्रसंगी आदर्श ग्रामीण शिक्षक प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. बि. व्ही. वाघमारे, सचिव ॲड. एन. डी. कुलकर्णी, संचालक बाबूराव आयलाने, चंद्रकांत पाटील, डी. एस. सरवदे, पोलिस पाटील सूर्यकांत पाटील, शाळेचे मुख्याध्यापक कुकडे एस. डी. व शाळेतील शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात ध्वजारोहणाने झाली.

ज्याचा मान ॲड.एन. डी. कुलकर्णी यांना मिळाला. राष्ट्रध्वजाला मानवंदना दिल्यानंतर विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त करत देशभक्तीपर संदेश दिला.

या प्रसंगी श्री. डी. एस. सरवदे यांनी भारतीय संविधानाची महती सांगत विद्यार्थ्यांना देशासाठी योगदान देण्याची प्रेरणा दिली. वैकुंठवासी झालेले संत व वेदांत तज्ञ डॉ. किशन महाराज साखरे यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. त्यांच्या शिष्य ॲड. श्री. एन. डी. कुलकर्णी यांनी डॉ. साखरे महाराजांच्या जीवनकार्याचे स्मरण केले आणि विद्यार्थ्यांना त्यांच्या महान कार्याची ओळख करून दिली.

डॉ. साखरे महाराज हे वारकरी संप्रदायातील ऋषितुल्य संत होते. त्यांनी सार्थ ज्ञानेश्वरी, सार्थ तुकाराम, सार्थ भगवद्गीता यांसारखे ११५ ग्रंथ लिहून संत वाङ्मय समृद्ध केले. त्यांनी ५०० तांब्याच्या पत्रकांवर संपूर्ण ज्ञानेश्वरी प्रकाशित केली होती. यावेळी अनेकांची उपस्थिती होती.



### संक्षिप्त वृत्त...

## नर देह मुक्तीचे माहेर : शि.भ.प. शिवमूर्ती स्वामी महाराज

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२९ जानेवारी -** नर देह हे सर्वांगिण मुक्तीचे माहेर आहे. जन्म मरणाच्या फेऱ्यातून मुक्ती साध्य करायची असेल तर हिंदू धर्माने दिलेल्या चार वेदांचा व वेदातील शास्त्र, उपनिषदे ग्रंथ यांच्या माध्यमातून माणसाला अध्यात्मिक सुखाची प्राप्त करावी नामस्मरण करावे त्यामुळे माणसाला मुक्ती प्राप्त होते असा विश्वास शि.भ.प. शिवमूर्ती स्वामी महाराज यांनी लातूर तालुक्यातील वरवंटी परिसरातील वडगावे फार्म, काशिनगर येथे आयोजित ग्रंथराज परमरहस्य कथा ज्ञानयज्ञ सोहळ्या प्रसंगी व्यक्त केला.

वरवंटी शिवारातील वडगावे फार्मस आणि काशिनगर येथे सुरु असलेल्या या सोहळ्यात सुरु झालेल्या पर्वात सकाळी परमरहस्य पारायण, त्यानंतर शिवजागर, यानंतर परमरहस्य कथा, तसेच सायंकाळी संध्या आणि रात्री किर्तन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये कथाकार शि.भ.प. शिवमूर्ती महाराज स्वामी, आयोजक रामभाऊ वडगावे, बाबुराव वडगावे, तसेच गायनाचार्य बाबुराव वाघमारे चेअरमन, शिवदास बोने, शिवयोगी अनंत महाराज, हार्मोनियम अंगद पाटील, मृदंग वादक सतिश पांचाळ महाराज, अनिल स्वामी तसेच समस्त काशिनगर परिसरातील भाविक भक्तांचे योगदान लाभत घेत असून परिसरातील शेकडो भाविक या कथा ज्ञान यज्ञ व पारायण सोहळ्याचा उपस्थिती लावत आहेत.

## माउली सोट हत्याप्रकरणी ‘जय मल्हार’ करणार निदर्शने

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२९ जानेवारी -** तालुक्यातील टाकळी येथील माउली सोट या तरुणाच्या हत्या प्रकरणातील सर्व आरोपींना अटक करावी, शासनाने त्याच्या कुटुंबीयास २५ लाख रुपयांची मदत द्यावी, आदी मागण्यांसाठी जय मल्हार सेनेच्यावतीने ४ फेब्रुवारी रोजी पोलीस अधीक्षक कार्यालयासमोर निदर्शने करण्यात येणार असल्याची माहिती जय मल्हार सेनेचे प्रमुख लहुजी शेवाळे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

प्रेमप्रकरणातून माउली सोट या धनगर समाजातील तरुणाला १० ते १५ जणांनी बेदम मारहाण केली. बेशुध्दावस्थेतील माउलीवर दोन महिने उपचार करण्यात आले. त्याचा ६ जानेवारी रोजी मृत्यू झाला. अद्याप या घटनेतील सर्व आरोपींना अटक करावी. त्याच्या कुटुंबीयास शासनाने २५ लाखांची मदत द्यावी, अशी मागणी करण्यात आली. पत्रकार परिषदेस हरिभाऊ काळे, संजय केसाळे, प्रा. लिंबराज केसाळे, ज्योती भोकरे, माणिक आलुरे, शंकर शेळके, संतोष गडदे, रमेश सोट, राजेश सोमवंशी, सुभाष काळे, श्रीकांत हाके, नारायण वगरे आदिंची उपस्थिती होती.

## शेतकरी कार्डधारकांच्या खात्यावर दोन कोटी वर्ग

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२९ जानेवारी -** जिल्ह्यातील १४७० शेतकरी रेशनकार्डधारकांना मार्च २०२४ पर्यंतचा लाभ देण्यात आला असून, जिल्हा पुरवठा अधिकारी व्यंकटेश रावलोड यांनी पदभार घेताच रखडलेल्या अनुदान वाटप प्रक्रियेला गती दिली आहे. त्यांनी एकाच दिवशी २ कोटी रूपये लाभार्थ्यांच्या खात्यावर वर्ग केले आहेत.

ज्या एपीएल शेतकऱ्यांच्या खात्यावर रक्कम जमा झाली नाही, शेतकऱ्यांनी महिला कुटुंबप्रमुखांचे अकाऊंट नंबर संबंधित कार्यालयात जमा करावे, असे पुरवठा विभागाकडून करण्यात आले आहे. शेतकरी रेशनकार्डधारकांना धान्याऐवजी प्रति लाभार्थी दीडशे रूपये दरमहा दिले जात आहेत. जिल्हा पुरवठा विभागाकडे आलेल्या अहवालानुसार तालुकानिहाय लाभार्थ्यांना निधी वाटप जात आहे. वेगवेगळ्या टप्प्यात दिले जाणारे हे रोख अनुदान शेतकरी लाभार्थ्यांच्या खात्यावर पाठवले जात आहे. जिल्हा पुरवठा अधिकारी म्हणून अशा व्यंकटेश रावलोड यांच्याकडे पदभार बँक येताच त्यांनी लागलीच शेतकरी तहसील कार्डधारकांच्या खात्यावर रक्कम वर्ग आवाहन करण्याचे काम हाती घेतले आहे.

## शेतकऱ्यांना राज्य शासनाचा दिलासा

### सोयाबीन खरेदीचे उद्दीष्ट वाढवून देण्याचा निर्णय

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२९ जानेवारी -** जिल्ह्याला हमीभावाने सोयाबीन खरेदीचे १२ लाख ८४ हजार १७० क्विंटलचे उद्दिष्ट प्राप्त झाले होते. हे उद्दिष्ट पूर्ण होवूनही काही नोंदणीकृत शेतकऱ्यांची सोयाबीन खरेदी शिल्लक असल्याने लातूर जिल्ह्याला आणखी २ लाख क्विंटल सोयाबीन खरेदीचे उद्दीष्ट वाढवून देण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. त्यामुळे जिल्ह्यातील शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे.

लातूर जिल्ह्याला हमीभावाने सोयाबीन खरेदीसाठी १२ लाख ८४ हजार १७० क्विंटलचे उद्दिष्ट प्राप्त झाले होते. जिल्ह्यात १ लाख १५ हजार ३९७ शेतकऱ्यांनी हमीभावाने सोयाबीन विक्रीसाठी ऑनलाईन नोंदणी केली आहे. त्यापैकी १ लाख ४९३ शेतकऱ्यांना सोयाबीन विक्रीसाठी घेवून येण्याचे मेसेज पाठविण्यात आले. २७ जानेवारी २०२५ रोजी रात्री ९ वाजेपर्यंत जिल्ह्यात १२ लाख ८४ हजार १७२ क्विंटल सोयाबीन खरेदी करण्यात आली. हमीभावाने सोयाबीन खरेदीचे जिल्ह्याला मिळालेले उद्दिष्ट पूर्ण झाल्याने सोयाबीन खरेदीचे पोर्टल बंद झाले होते. त्यामुळे जिल्ह्यातील सोयाबीन खरेदी बंद झाली होती. ऑनलाईन नोंदणी केलेल्या शेतकऱ्यांचे सोयाबीन शिल्लक असल्याने जिल्ह्याचे उद्दिष्ट वाढवून सोयाबीन खरेदी पुन्हा सुरू करण्याची मागणी शेतकऱ्यांकडून करण्यात आली. याबाबत जिल्हा पणन अधिकारी यांनी शासनाकडे अहवाल सादर केला होता. त्यानुसार जिल्ह्याला आणखी २ लाख क्विंटल सोयाबीन खरेदीचे उद्दिष्ट वाढवून देण्यात आले आहे. तसेच सोयाबीन खरेदीचे पोर्टलही पूर्ववत सुरू करण्यात आले आहे. सोयाबीन खरेदीची मुदत ३१ जानेवारी २०२५ पर्यंत आहे. पालकमत्र्यांनी मंत्रिमंडळ बैठकीत मांडली सोयाबीनच्या खरेदीचा मागणी लातूर जिल्ह्यातील हमीभावाने सोयाबीन खरेदीचे उद्दिष्ट पूर्ण झाल्याने ही खरेदी बंद झाली होती.

## मराठवाड्यात बांगलादेशी रोहिंग्यांचा अधिक रहिवास

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२९ जानेवारी -** मराठवाडा आणि विदर्भात बांगलादेशी रोहिंग्या ॲक्टिव्ह झाले आहेत. रहिवासी प्रमाणपत्र काढण्यासाठी सर्वात जास्त अर्ज याच भागातून अर्ज आले आहेत. लतार जिल्ह्यातून ३ हजारांपेक्षा जास्त रोहिंग्यांनी रहिवासी प्रमाणपत्र काढण्यासाठी अर्ज केले आहेत. अशा रोहिंग्यांचा शोध घेण्याची मागणी करीत भाजप नेते किरीट सोमय्या यांनी मंगळवारी जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर यांची भेट घेऊन चर्चा केली.

रोहिंग्यांनी रहिवासी प्रमाणपत्र काढण्यासाठी दिलेली कागदपत्रे बोगस आहेत. मराठवाडा आणि विदर्भसारख्या भागात लक्ष जात नसलेल्या ठिकाणी रहिवासी प्रमाणपत्र काढण्याचा सपाटा त्यांनी लावला आहे. आधार कार्ड, रेशन कार्ड, शाळा सोडल्याचा दाखला यासारखी बोगस कागदपत्रे देत रहिवासी प्रमाणपत्र काढण्यासाठी अर्ज सादर केले आहेत.



तहसीलदार, नायब तहसीलदारांनी त्यांची चूक सुधारून घ्यावी, रहिवासी प्रमाणपत्रासाठी सादर करण्यात आलेली कागदपत्रे बोगस आहेत. त्यासाठी प्रमाणपत्र काढून देणारी टोळी सक्रिय झाली आहे. अशांचा प्रशासनाने शोध घ्यावा. पुणे, मुंबईसारख्या ठिकाणी दोनअंकी अर्ज आले आहेत. मात्र लातूरमध्ये साडेतीन हजार, अमरावती ४ हजार ८००, सिल्लोडमध्ये ४ हजार ८०० अर्ज आले आहेत. हे खूप मोठे कारस्थान सुरू आहे. बांगलादेश सीमेवरील दोन एजंट यात काम करतात. यामुळे संपूर्ण तपास एटीएसकडे देण्यात आला आहे, अशी माहिती भाजप नेते किरीट सोमय्या यांनी लातूर येथे दिली.

## भाजीपाला विक्रेत्यांकडून ‘त्या’ पत्रकाची होळी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२९ जानेवारी -** गंजगोलाईतीलहातगाडीव्यापाऱ्यांचे अतिक्रमण हटविल्यानंतर तेथे आता पे अँड पार्किंग सुरू करण्यात आले आहे. याविरोधात स्वाभिमानी मुस्लिम विकास परिषदेच्यावतीने गंजगोलाईत त्या पत्रकाची होळी करीत निषेध केला.

शहराच्या गंजगोलाईत हातगाडीवर फळ विक्रेते, भाजीपाला विक्रेते व्यवसाय करीत होते. न्यायालयाच्या आदेशावरून गोलाईच्या ७० फुटी सर्कलमधील व्यापाऱ्यांचे अतिक्रमण पालिकेने हटविले. त्या व्यापाऱ्यांना दुसऱ्या जागेत पुनर्वसित केले. परंतु, तेथे कोणीही व्यापारी व्यवसाय करण्यास तयार नाहीत. गोलाईतून उठविलेले व्यापारी मशीद रस्त्यावर गेले आहेत. यामुळे मशीद रस्ता जाम झाला आहे. महापालिकेने गोलाईतील ७० फुटी चौकात पे अँड पार्क सुरू केले आहे. यामुळे खरेदीसाठी आलेले नागरिक आपली वाहने गोलाईच्या सर्कलमध्ये पार्क करीत आहेत. याच्या निषेधार्थ स्वाभिमानी मुस्लिम विकास परिषदेच्यावतीने मंगळवारी महापालिकेच्या त्या पत्रकाची होळी केली. महापालिकेच्या धोरणाविरोधात तीव्र घोषणाबाजी केली. यावेळी गोलाई तील व्यापाऱ्यांचे गोलाईतच पुनर्वसन करावे अशा मागण्या यावेळी करण्यात आल्या.

## ...तोपर्यंत केंद्र बंद करु नका : माजी आ. देशमुख

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२९ जानेवारी -** केंद्र सरकारने नाफेडमार्फत सोयाबीन खरेदी सुरु केली आहे. त्यासाठी लातूर जिल्ह्यातील हजारो शेतक-यांनी नोंदणी केली आहे. परंतु, लातूर जिल्ह्याचा कोटा संपला या सबबीखाली पोर्टल बंद करण्यात आले, त्यामुळे नाफेडमार्फतची सोयाबीन खरेदी ठप्प झाली आहे, खरेदी केंद्रांवर आठ दिवसांपासून सोयाबीनची वाहने उभी आहेत. वाहन भाड्याचा भुर्दंड शेतक-यांना बसतो आहे.त्यामुळे सरकारने सोयाबीनची हमीभावाने खरेदी होत नाही तोपर्यंत केंद्र बंद करु नये, अशी मागणी माजी आमदार धिरज देशमुख यांनी केली आहे.

लातूर तालुक्यातील नागझरी येथील विकास ॲग्रो प्रोड्युसर कंपनी लि.च्या नाफेडच्या सोयाबीन खरेदी केंद्राला २८ जानेवारी रोजी भेट दिली, यावेळी जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष संतोष देशमुख, विलास सहकारी साखर कारखान्याचे व्हाईस चेअरमन रवींद्र काळे, अनुप शेळके, रेणापूर बाजार समितीचे सभापती उमाकांत खलंग्रे, लातूर बाजार समितीचे संचालक सुभाष घोडके, शेषराव हाके, विकास ग्रोचे विलास उफाडे आदीसह सोयाबीन उत्पादक शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी शेतकऱ्यांनी माजी आमदार धिरज विलासराव देशमुख यांच्याकडे व्यथा मांडल्या.



माजी आमदार धिरज देशमुख म्हणाले, सरकारनेच नाफेडमार्फत हमीभावाने सोयाबीन खरेदी करण्याचे जाहीर केले. त्यासाठी ऑनलाईन नोंदणी करण्याचे आवाहन केले. लातूर जिल्ह्यातील हजारो शेतक-यांनी जिल्ह्यातील नाफेडच्या ५४ केंद्रांवर नोंदणी केली. नोंदणी केलेल्या शेतक-यांना ओटीपी मिळाला. ओटीपी मिळाल्यानंतर शेतकरी नाफेड केंद्रांवर सोयाबीनचे ट्रॅक्टर घेऊन गेले. परंतु, सोयाबीन खरेदीचा लातूर जिल्ह्याचा कोटा संपला या सबबीखाली सरकारने पोर्टल बंद केले. त्यामुळे आजघडीला जिल्ह्यातील सोयबीन खरेदी ठप्प झाली आहे. नाफेडच्या खरेदी केंद्रांवर वाहनांच्या रांग लागलेल्या आहेत.

## स्पर्धा परीक्षेतील यशाकरिता भाषेवर प्रभुत्व हवे : ॲड. राजेंद्र लातूरकर

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२९ जानेवारी -** मराठी भाषा, साहित्य, वाङ्मय, अनुवाद क्षेत्रात रोजगाराच्या विविध संधी आज उपलब्ध आहेत. कोणत्याही स्पर्धा परीक्षेच्या यशाकरिता भाषेवर प्रभुत्व मिळणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ विधीज्ञ राजेंद्र लातूरकर यांनी केले.

महात्मा बसवेश्वर महाविद्यालयातील मराठी भाषा, साहित्य, वाङ्मय व संस्कृती विभाग यांच्या वतीने आयोजित मराठी भाषा संवर्धन पंधरवड्याच्या समारोप सभारंभात स्पर्धा परीक्षा व मराठी व्याकरण या विषयावर साधनव्यक्ती म्हणून ते बोलत होते.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय गवई हे होते. तर विचारपीठावर मराठी विभागप्रमुख डॉ. रत्नाकर बेडगे आणि प्रा. मारुती माळी हे उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी जगत् ज्योती महात्मा बसवेश्वरांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर मराठी भाषा व वाङ्मय मंडळाच्या वतीने विद्यार्थ्यांच्या स्वरचित अस्मिता या भीत्तीपत्रकाच्या काव्यविशेषांकाचे विमोचन मान्यवरांच्या शुभहस्ते करण्यात आले.

पुढे बोलताना ज्येष्ठविधीज्ञ ड. राजेंद्र लातूरकर म्हणाले की, मराठी आता ज्ञान-विज्ञान-तंत्रज्ञान या क्षेत्रात नावलौकिक पावलेली भाषा आहे. शिक्षण क्षेत्र, भाषांतर क्षेत्र, पत्रकारिता, दूरदर्शन, चित्रपट संवाद कौशल्य, प्रशासन, सृजनशील लेखन, स्पर्धा परीक्षा यात महाराष्ट्रात मराठीला उच्च व महत्त्वपूर्ण स्थान आहे. भाषेचा सखोल व चिकित्सक अभ्यास केल्यास कोणत्याही स्पर्धात्मक परीक्षा उत्तीर्ण होणे सहज शक्य आहे. केंद्रीय लोकसेवा आयोग, राज्य लोकसेवा आयोग यांच्या पूर्व मुख्य परीक्षेत भाषा साहित्य व्याकरण हे विषय अत्यावश्यक आहेत, असेही ते म्हणाले. आपल्या अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ. संजय गवई म्हणाले की, प्रत्येक मराठी भाषिकांनी मातृभाषेचा अभिमान बाळगायला हवा. सर्व तऱ्हेच्या व्यवहारात भाषेचा वापर अनिवार्यपणे केला जावा. भाषेविषयक अनास्था न बाळगता भाषेचा गौरव कसा वाढेल याकडे भाषिकांनी लक्ष द्यायला हवे, असेही ते म्हणाले.

## लाडकी बहीण; निराधार योजनेचे पैसे बंद होणार

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२९ जानेवारी -** शासनाकडून मागील वर्षीपासून लाडकी बहीण योजना लागू करण्यात आलेली आहे. मात्र, निराधार योजनेतून मदत घेणाऱ्या लाभार्थ्यांनी जर लाडकी बहीण योजनेचे पैसे घेतले असतील त्यांना निराधार योजनेचे पैसे मिळणे बंद होणार आहे.

शासनाकडून अनेक वर्षांपासून निराधार लाभार्थ्यांसाठी विविध योजना राबविण्यात येतात. त्यात संजय गांधी निराधार योजना, श्रावणबाळ योजनेचा समावेश आहे. लातूर जिल्ह्यात जवळपास ३ लाखांवर निराधार लाभार्थ्यांची संख्या आहे. आता मात्र, लाडकी बहीण योजनेचा लाभ घेतलेल्या लाभार्थ्यांना निराधार योजनेतून वगळण्यात येणार आहे. निराधार लाभार्थ्यांना मदत थेट बँक खात्यात मिळण्यासाठी केवायसीसह इतर कागदपत्रांची पडताळणी करण्यात येत आहे. लाडकी बहीण योजनेत अनेकांनी लाभ घेतला. त्यात ज्यांना निराधार योजनेतील लाभ मिळतो, असेही अनेक लाभार्थी असल्याचे प्रशासनाच्या निदर्शनास आले आहे. त्यामुळे अशा लाभार्थ्यांचे नाव वगळण्याचे काम सुरु करण्यात आले आहे. कोणत्याही एकाच योजनेतून लाभार्थ्यांना शासनाचे अनुदान मिळणार आहे.

**कागदपत्रे जमा न केल्यास लाभ बंद होणार.**

प्रशासनाकडून निराधार लाभार्थ्यांची कागदपत्रे जमा करण्यासाठी विशेष मोहिम सुरू आहे. कागदपत्रे जमा करणाऱ्यांना मदतीपासून मुकावे लागणार आहे.

**फेब्रुवारीपासून बंद केले जाणार अनुदान**

निराधार योजनेतील जे लाभार्थी कागदपत्रांची पूर्तता करणार नाहीत, अशा लाभार्थ्यांचे येत्या फेब्रुवारी महिन्यांपासून मिळणारे अनुदान बंद होणार आहे. त्यामुळे कागदपत्रांची पुर्तता करणे आवश्यक आहे.

**आधार, बँक पासबुक जमा करण्याची प्रक्रिया सुरु**

निराधार योजनेचा लाभ घेणाऱ्या लाभार्थ्यांची कागदपत्रे जमा करण्याचे काम प्रशासनाकडून सुरू करण्यात आलेले आहे.

प्रत्येक लाभार्थ्यास आधार केवायसी, बँकेच्या तपशीलासह प्रतिज्ञापत्र प्रशासनाकडे जमा केले जात आहेत. त्यामुळे निराधार योजनेतून मदत घेणाऱ्या लाभार्थ्यांनी जर लाडकी बहीण योजनेचे पैसे घेतले असतील त्यांना निराधार योजनेचे पैसे मिळणे बंद होणार आहे.

## लातुरात महिला मैदानी क्रीडा स्पर्धांचे उद्घाटन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२९ जानेवारी -** येथील शासकीय निवासी महिला तंत्रनिकेतन, येथे आयईडीएसएसए जी २ झोन महिला मैदानी क्रीडा स्पर्धेचे उद्घाटन झाले. सोहळ्यास सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिक्षक अभियंता डॉ. सलीम शेख, पोलीस निरीक्षक श्रीमती बी.एस.वाकडकर यांची उपस्थिती होती.

यावेळी डॉ. सलीम शेख यांच्या हस्ते क्रीडा ध्वज फडकविण्यांत आला. मान्यवरांना विविध तंत्रनिकेतनातील महिला संघांनी मानवंदना दिली. क्रीडा स्पर्धेची शपथ विद्यार्थीनी शिवानी वरपे हिने सर्व खेळाडूंना दिली. विद्यार्थीनींनी अभ्यासात रुचीबरोबर खिलाडू वृत्तीही जोपासली पाहीजे तसेच त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी मैदानी खेळाचे असलेले महत्व डॉ. सलीम शेख यांनी मार्गदर्शनात नमूद केले. त्यांच्या शालेय जीवनातील खेळासंबधी आठवणी मुलींना सांगून खेळासाठी प्रोत्साहन दिले.

पालीस निरीक्षक श्रीमती बी.एस. वाकडकर यांनी स्पोर्टस इव्हेंट मॅनेजर, स्पोर्टस जर्नलिझम, स्पोर्टस ऑडीटर सारख्या संधी भविष्यकाळामध्ये उपलब्ध होणार असल्याचे सांगितले. महिलांच्या जीवनातील खेळाचे महत्व त्यांनी नमूद केले. कार्यक्रम संस्थेचे प्राचार्य एस.डी. राठोड यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. मुलींनी खेळामध्ये सांघीक भाव जोपासून स्पर्धा पार पाडाव्यात, असे आवाहन प्राचार्य राठोड यांनी केले. सूत्रसंचालन श्रीमती आर.व्ही. कोताळकर यांनी केले, श्रीमती प्रणोती ऐतवाडे यांनी आभार मानले. या दोन दिवसीय स्पर्धेत व्हॉलीबॉल, बास्केटबॉल, कबड्डी, खो-खो, ॲथलेटीक्स इ. मैदानी क्रीडा प्रकारांचा समावेश आहे.




## पुतळा विटंबना करणाऱ्या व्यक्तीवर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२९ जानेवारी -** अमृतसर येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याची व संविधान शिल्पाची विटंबना करणाऱ्या व्यक्तीवर देशद्रोह अंतर्गत गुन्हा नोंद करून कठोर कारवाई करावी, या मागणीचे निवेदन लातूरच्या संविधान स्तंभ कृती समितीच्यावतीने केंद्रीय गृहमंत्री व पंजाबच्या मुख्यमंत्र्यांना पाठविण्यात आले आहे.

२६ जानेवारी प्रजासत्ताकदिनी अमृतसर येथे संविधान जाळण्याचा आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याची विंटबना केल्याचा निंदनीय प्रकार घडला आहे. यातील समाजकंटकावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करून कठोर कारवाई करावी, अशी मागणी येथील संविधान स्तंभ कृती समितीच्यावतीने जिल्हाधिकारी यांच्यामार्फत केंद्रीय गृहमंत्री अमित शहा व पंजाबचे मुख्यमंत्री यांना निवेदन देऊन करण्यात आली. निवेदनावर माजी नगरसेवक नवनाथ आल्टे, संजय सोनकांबळे, लाला सुरवसे, विनय जाकते, प्रशांत माने, डी. उमाकांत यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## ‘स्वामी विवेकानंद’च्या विद्यार्थ्यांचे यश

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२९ जानेवारी -** स्वामी विवेकानंद इन्स्टिट्यूट ऑफ पॉलिटेक्निक कॉलेजचा निकाल ९६ टक्के लागला असून यामध्ये कॉम्प्युटर इंजिनिअरिंग विभागातील शिवकुमार मल्लिनाथ स्वामी आणि आदित्य सुभाष कांबळे ९६ टक्के गुण घेऊन जिल्ह्यात प्रथम येण्याचा बहुमान पटकावला.

सदरील परीक्षेमध्ये सिव्हील, मेकॅनिकल, इलेक्ट्रिकल, कॉम्पुटर आणि इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलीकम्युनिकेशन विभागाचा निकाल लागला आहे. कॉम्प्युटर इंजिनिअरिंग मधून इंगळे प्रथमेश ओम ९४ टक्के गुण घेऊन द्वितीय, पिंपरवार राजनंदनी राजू ९२% गुण घेऊन मिळवले आहेत. सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे संस्थेचे संस्थापक अध्यक्ष शिवाजी पाटील कव्हेकर, सचिवा प्रतिभा पाटील कव्हेकर, अजित पाटील कव्हेकर, रणजित पाटील कव्हेकर, निलकंठ पवार, संभाजी पाटील, समन्वयक विनोद जाधव आदिंनी अभिनंदन केले.

## सोयाबीन खरेदीचे उद्दिष्ट वाढवून खरेदीची मुदत वाढवावी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२९ जानेवारी -** शेतकऱ्यांना दिलासा देता यावा यासाठी हंगाम २०२४२५ करिता केंद्र शासनाने निश्चित केलेल्या आधारभूत किंमत खरेदी योजनेअंतर्गत नाफेड तर्फे चार एजन्सी मार्फत लातूर जिल्ह्यात सोयाबीन खरेदीचे काम सुरू झाले. आतापर्यंत १२ लाख ८४ हजार सोयाबीन ची खरेदी झाली असून ६३ हजार शेतकऱ्यांचे सोयाबीन खरेदी करणे बाकी आहे बहुतांशी शेतकऱ्यांचे सोयाबीन घरीच असल्याने दहा लाख क्विंटल सोयाबीन खरेदीचे उद्दिष्ट वाढवून सोयाबीन खरेदीची मुदत वाढवून द्यावी अशी मागणी भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि राज्याचे पणन मंत्री जयकुमारजी रावल यांच्याकडे एका निवेदनाद्वारे केली आहे.

लातूर जिल्हा सोयाबीन उत्पादक जिल्हा असून जिल्ह्यातील बहुतांशी शेतकरी सोयाबीनचे पीक मोठ्या प्रमाणात घेतात या सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा देता यावा याकरिता राज्यातील महायुती शासनाने निश्चित केलेल्या आधारभूत किंमत खरेदी योजनेअंतर्गत नाफेड मार्फत सोयाबीन खरेदीचे काम सुरू केले आतापर्यंत जिल्ह्यातील १ लाख १५ हजार शेतकऱ्यांनी सोयाबीन खरेदीसाठी नोंदणी केली असून त्यापैकी ५२ हजार शेतकऱ्यांचे १२ लाख ८४ हजार १७२ क्विंटल सोयाबीनची खरेदी झालेली आहे नोंदणी झालेल्या ६३ हजार २९१ शेतकऱ्याची सोयाबीन खरेदी होणे बाकी असून खरेदीची मुदत ३१ जानेवारी २०२५ पर्यंतच आहे असे दिलेल्या निवेदनात नमूद करून आ. रमेशआप्पा कराड म्हणाले की, बहुतांशी शेतकऱ्याचे सोयाबीन मोठ्या प्रमाणात शिल्लक असल्याने लातूर जिल्ह्यातील सोयाबीन खरेदी योजनेचे उद्दिष्ट वाढवण्याबरोबरच खरेदी योजनेला मुदतवाढ देणे गरजेचे आहे.